३१वा

# वार्षिक अहवाल

२०१५-२०१६

31st

# Annual Report

2015 - 2016





यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २०१५ चे विजेते डॉ. विजय केळकर यांना प्रतिष्ठानच्या वतीने राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार. सोबत यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार समितीचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर, प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष श्री. अरुण गुजराथी, कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे, सरचिटणीस श्री. शरद काळे, कोषाध्यक्ष श्री. हेमंत टकले.



मा. यशवंतराव चव्हाण यांचे आत्मचरित्र असलेले 'कृष्णाकांठ' या पुस्तकाच्या ऑडिओ रेकॉर्डींग केलेल्या सी.डी.चे प्रकाशन करताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार. सोबत डॉ. अनिल काकोडकर, उपाध्यक्ष श्री. अरुण गुजराथी, कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे, सरचिटणीस श्री. शरद काळे, कोषाध्यक्ष श्री हेमंत टकले.

# ३१ वा वार्षिक अहवाल २०१५ - २०१६

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग,
नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१
दूरध्वनी क्र.: २२०२८५९८, २२०४५४६०, २२८५२३४५.
फॅक्सः २२८५२०८१, २२८५२०८२

**Email: ybchavan100@gmail.com**

**Visit us : ybchavanpratishthan.org**

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

## वार्षिक अहवाल २०१४-२०१५

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे विश्वस्त मंडळ, कार्यकारिणी मंडळ, कार्यकारी समिती, प्रतिष्ठानचे विभाग प्रमुख, प्रतिष्ठानच्या विभागीय केंद्राचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापन | ३-५ |
| २ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई केंद्रातील उपक्रम | ५-८ |
| ३ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या केंद्रात झालेले महत्वाचे कार्यक्रम | ८ |
| ४ | यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक, राष्ट्रीय पुरस्कार व इतर उपक्रम | ८-९ |
| ५ | विशेष कार्यक्रम | ९-२५ |
| ६ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | २५-२७ |
| ७ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या सहकार्याने कार्यरत असलेले इतर कार्यक्रम / उपक्रम | २७-२८ |
| ८ | प्रतिष्ठानमार्फत देण्यात आलेली व मिळालेली अनुदाने | २८ |
| ९ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या विभागांमार्फत झालेले कार्यक्रम / उपक्रम | २८-५६ |
| १० | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईची विभागीय केंद्रे | ५६-८६ |
| ११ | प्रतिष्ठानची प्रकाशने व सीडी व डीव्हिडी कॅसेटस् | ८७-८८ |
| १२ | प्रतिष्ठानच्या वैधानिक लेखा परीक्षकाचे प्रमाणपत्र | ८९ |
| १३ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानची हिशोबपत्रके व संबंधित परिशिष्टे | ९०-१०० |

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

ट्रस्ट रजि.नं.एफ.१०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि.नं.एम.एम.एच/बी.ओएम-५३९/८५
यशवंतराव चव्हाण सेंटर, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - ४०० ०२१

## विश्वस्त मंडळ सदस्य

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. अरुण गुजराथी | उपाध्यक्ष |
| ३. | मा. सौ. सुप्रिया सदानंद सुळे | कार्याध्यक्ष |
| ४. | मा. श्री. श. गं. काळे | सरचिटणीस |
| ५. | मा. श्री. हेमंत टकले | कोषाध्यक्ष |
| ६. | मा. श्री. शिवाजीराव पाटील-निलंगेकर | |
| ७. | मा. श्री. राम प्रधान | |
| ८. | मा. श्री. वसंतराव कार्लेकर | |
| ९. | मा. श्री. दिलीप वळसे-पाटील | |
| १०. | मा. श्री. अजित निंबाळकर | |
| ११. | मा. श्री बी. के. अग्रवाल | |
| १२. | मा. श्री. अमित डहाणूकर | |
| १३. | मा. डॉ. समीर दलवाई | |
| १४. | मा. ना. धो. महानोर | |
| १५. | मा. श्रीमती प्रभा कुलकर्णी | |

**<u>महाराष्ट्र शासन प्रतिनिधी</u>**

१६. मा. श्री. नितीन करीर
प्रधान सचिव, नगर विकास विभाग

१७. मा. श्री. एन. जे. जमादार,
सचिव, वरिष्ठ विधी सल्लागार,
विधी व न्याय विभाग

## कार्यकारिणी मंडळ सदस्य

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. अरुण गुजराथी
३. मा. सौ. सुप्रिया सदानंद सुळे
४. मा. श्री. श. गं. काळे
५. मा. श्री. हेमंत टकले
६. मा. श्री. जयंत पाटील
७. मा. श्री. राम ताकवले
८. मा. श्री. ना. धो. महानोर
९. मा. श्री. लक्ष्मण माने
१०. मा. श्री विनायकराव पाटील
११. मा. श्री. के. बी. आवाडे
१२. मा. श्री. प्रकाश कुलकर्णी
१३. मा. श्री जीवनराव गोरे
१४. मा. श्री विजय शिर्के
१५. मा. श्री. जयराज साळगांवकर
१६. मा. श्री. गणपतराव पाटील
१७. मा. श्री अंकुशराव टोपे
(निधन ३.४.२०१६)
१८. मा. श्री. शामराव पा. पाटील
१९. मा. श्री. चंद्रकांत घुले - पाटील
२०. मा. श्री. यशवंतराव गडाख पाटील
२१. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी
बँक लि. (पदसिध्द)

**<u>महाराष्ट्र शासन प्रतिनिधी</u>**

२२. मा. श्री. नितीन करीर,
प्रधान सचिव, नगर विकास विभाग

## कार्यकारी समिती

१ मा. श्री. शरदराव पवार
२ मा. श्री. अरुण गुजराथी
३ मा. सौ. सुप्रिया सदानंद सुळे
४ मा. श्री. श. गं. काळे
५ मा. श्री. हेमंत टकले
६ मा. श्री. अजित निंबाळकर
७ मा. श्री जीवनराव गोरे
८ मा. श्री. यशवंतराव गडाख

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

**प्रतिष्ठानचे विभाग**

| | | |
|---|---|---|
| १. सृजन | सृजन प्रमुख | सौ. सुप्रिया सुळे |
| २. वसुंधरा कक्ष (पर्यावरण संवर्धन अभियान) | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| ३. कृषी व सहकार व्यासपीठ | निमंत्रक | श्री. अजित निंबाळकर |
| ४. कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम | सदस्य सचिव | श्री. म. बा. पवार |
| ५. यशवंतराव चव्हाण माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | संचालक | ब्रिगेडीअर श्री. सुशील गुप्तन |
| ६. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | कार्यक्रम संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| ७. महाराष्ट्र महिला व्यासपीठ | संयोजिका | श्रीमती रेखा नार्वेकर |
| | कार्यकारी संयोजिका | श्रीमती ममता कानडे |
| ८. नवमहाराष्ट्र युवा अभियान | संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| ९. सांस्कृतिक विभाग | निमंत्रक | श्री. विनय नेवाळकर |
| १०. यशवंतराव चव्हाण ग्रंथालय | ग्रंथपाल व संदर्भ अधिकारी | श्री. अनिल पाझारे |
| ११. यशवंतराव चव्हाण केंद्र सभागृहे | व्यवस्थापक | श्री. विजय देसाई |
| १२. वार्तापत्र | मानद संपादक | श्री. दत्ता बाळसराफ |
| १३. शिक्षण विकास मंच | प्रमुख संयोजक | श्री. वसंत काळपांडे |
| १४. अपंग हक्क अभियान | संयोजक | श्री. विजय कान्हेकर |

**प्रतिष्ठानच्या विभागीय केंद्रांचे अध्यक्ष :**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | विभागीय केंद्र कराड | अध्यक्ष | श्री. बाळासाहेब उर्फ शामराव पाटील |
| २) | विभागीय केंद्र पुणे | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| ३) | विभागीय केंद्र नागपूर | अध्यक्ष | श्री. गिरीश गांधी |
| ४) | विभागीय केंद्र नाशिक | अध्यक्ष | श्री. विनायकराव पाटील |
| ५) | विभागीय केंद्र औरंगाबाद | अध्यक्ष | श्री. नंदकिशोर कागलीवाल |
| ६) | विभागीय केंद्र लातूर | अध्यक्ष | श्री. जनार्दन वाघमारे |
| ७) | विभागीय केंद्र कोंकण | अध्यक्ष | श्री. राजाभाऊ लिमये |
| ८) | विभागीय केंद्र अमरावती | अध्यक्ष | रिक्त |
| ९) | विभागीय केंद्र अहमदनगर | अध्यक्ष | श्री. यशवंतराव गडाख |
| १०) | विभागीय केंद्र बीड (अंबाजोगाई) | अध्यक्ष | डॉ. द्वारकादास लोहिया |
| ११) | विभागीय केंद्र सोलापूर | अध्यक्ष | डॉ. गो. मा. पवार |
| १२) | विभागीय केंद्र ठाणे | अध्यक्ष | श्री. मुरलीधर नाले |

**इतर**

| | | |
|---|---|---|
| १) | मानद वास्तुविशारद | मे. शशी प्रभु अँड असोशिएटस् |
| २) | सांविधिक लेखा परीक्षक | मे. सी.व्ही.के. अँड असोशिएटस् |
| ३) | अंतर्गत हिशेब तपासनीस | मे. मार्क ॲन्ड असोसिएटस् |

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचा सन २०१५-२०१६ चा वार्षिक अहवाल पुढीलप्रमाणे सादर करीत आहोत.

**१. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे व्यवस्थापन :**

मा. यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा व कार्याचा प्रसार करण्यासाठी प्रतिष्ठानतर्फे विविध प्रकारचे उपक्रम प्रतिवर्षी राबविण्यात येतात. उपक्रमांची आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी नेमलेल्या कार्यकारी समितीच्या ११ बैठका घेण्यात आल्या व विविध विषयांवर सांगोपाग चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. या आर्थिक वर्षात विश्वस्त मंडळाच्या व कार्यकारिणी मंडळाच्या प्रत्येकी पुढीलप्रमाणे ३ बैठका झाल्या. दिनांक १९ सप्टेंबर २०१५, दिनांक २५ नोव्हेंबर २०१५ व दिनांक १२ मार्च २०१६. तसेच कार्यकारी समितीच्या दिनांक ४ एप्रिल २०१५, २ मे २०१५, ४ जुलै २०१५, १ ऑगस्ट २०१५, ५ सप्टेंबर २०१५, ३ ऑक्टोबर २०१५, ४ नोव्हेंबर २०१५, ४ डिसेंबर २०१५, १ जानेवारी २०१६, ६ फेब्रुवारी २०१६ व ५ मार्च २०१६ अशा एकूण ११ बैठका झाल्या.

प्रतिष्ठानच्या हिशेबाची तपासणी प्रत्येक महिन्याला अंतर्गत हिशेब तपासनीस मे. संजय राणे ॲन्ड असोसिएटस्, यांचेमार्फत करण्यात आली व त्यांचे अहवाल कार्यकारी समितीपुढे ठेवण्यात आले. वार्षिक हिशेबाची तपासणी सांविधिक हिशेब तपासनीस मेसर्स सी.व्ही.के. असोसिएटस्, चार्टर्ड अकाउटंट यांच्याकडून झाली असून त्याचा अहवालही विश्वस्त मंडळ व कार्यकारिणी मंडळासमोर ठेवण्यात आला. वार्षिक सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकास आधीन राहून प्रत्येक विभागीय केंद्रासाठी व मुख्य कार्यालयातील विविध विभागांना खर्चाचे अंदाजपत्रक दिले असून त्यांच्याकडून खर्चाचे तिमाही अहवाल मागवून तपासण्यात आले व कार्यकारी समितीपुढे सादर करण्यात येऊन त्रुटींची पूर्तता करुन घेण्यात आली. प्रतिष्ठानची वेबसाईट ybchavanpratishthan.org असून ती वेळोवेळी अद्ययावत करण्यात येत आहे. तसेच प्रतिष्ठानचा ई-मेल ybchavan100@gmail.com हा आहे.

**सभासद संख्या** : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईची निरनिराळया प्रकारच्या सभासदांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

१. संस्थापक सदस्य - ३५
२. आजीव सदस्य - २५७
३. संस्था सदस्य - २८

महाराष्ट्र शासनाचे दोन प्रतिनिधी विश्वस्त मंडळावर नेमलेले आहेत. त्यापैकी मा. श्री. नितीन करीर, प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांची कार्यकारिणी मंडळावरही नियुक्ती केलेली आहे.

## २. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई केंद्रातील उपक्रमः

### २.१ सभागृहे

१.१ **मुख्य सभागृहः** यशवंतराव चव्हाण केंद्रातील सभागृहाचा वापर, प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमांसाठी तसेच निरनिराळया सामाजिक संस्था, शासनातर्फे आयोजित केलेल्या सभा, संमेलने, चर्चा, परिषदा, चित्रपट, सांस्कृतिक कार्यक्रम यासाठी करण्यात आला. सभागृहामध्ये मराठी, हिंदी, गुजराती व इंग्रजी नाटके, संगीत, सभा आदि कार्यक्रमही झाले.

१.२ **सांस्कृतिक व रंगस्वर सभागृहः** सांस्कृतिक सभागृह व रंगस्वर सभागृह या दोन्ही सभागृहात विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. प्रतिष्ठानच्या रंगस्वर मार्फत प्रत्येक महिन्याला किमान ४ ते ५ सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित

करण्यात येतात. तसेच दिवाळी पहाट हा अतिशय दर्जेदार कार्यक्रम संपन्न होतो. वरील दोन्ही सभागृहे सर्व सोयींनी युक्त व अद्ययावत करण्यात आली आहेत.

## २.२ यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय :-

२.१ **ग्रंथालयाविषयी माहिती :-** ग्रंथालयात विविध नियतकालिके, समाजशास्त्र, शेती, इतिहास, कायदा, संस्कृती इत्यादी विषयांवरील पुस्तके, आत्मचरित्रे, धर्मकोश, विश्वकोश, गॅझीटीयर, ॲटलास, इअरबुक डिक्शनरी, निरनिराळया कायद्याचे ग्रंथ उपलब्ध आहेत. वेळोवेळी ग्रंथालयाला अनुसरुन नवीन पुस्तके खरेदी करण्यात येतात. ग्रंथालयीन नियमानुसार ग्रंथालयाची मांडणी केली आहे. ग्रंथालयाचा वाचकांकरिता जास्तीत जास्त वापर व्हावा यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. तसेच पुस्तके शोधण्याकरिता मशीन कॅटलॉगच्या सहाय्याने वाचकांना मदत होते. डिडिसी-२३ (डेव्ही डेसिमल क्लासिफि केशन) नुसार ग्रंथांचे वर्गीकरण केले आहे. मुख्य वर्गांक आणि त्याचे उपवर्ग यानुसार ग्रंथांची मांडणी केलेली आहे. सर्व ग्रंथ याच पध्दतीप्रमाणे कपाटात ठेवण्यात आले असून त्यामुळे संगणकीय सहाय्याने साहित्य शोध जलद गतीने व अचूक घेता येतो.

**ग्रंथालयाचे नियम :-** यशवंतराव चव्हाण ग्रंथालयाचे सभासद होण्याकरिता नमुना अर्ज तयार कला आहे. या अर्जामध्ये स्वतःच्या हस्तक्षरात परिपूर्ण माहिती भरुन त्यासोबत पुढीलप्रमाणे वर्गणी भरणे आवश्यक आहे.

**सर्वसाधारण सभासद** :- यशवंतराव चव्हाण ग्रंथालय संदर्भ ग्रंथालय असून ग्रंथ ग्रंथालयात वाचण्याची किंवा घरी घेऊन जाण्याची सुविधा आहे. याकरिता वार्षिक वर्गणी रु.५००/- व अनामत रक्कम रु.५००/- आहे. सभासदाना एकावेळी एक पुस्तक / ग्रंथ देण्यात येईल. ते पंधरा दिवसात परत करणे आवश्यक आहे. तसेच संदर्भग्रंथाचा उपयोग ग्रंथालयातच करता येईल. संदर्भ ग्रंथ घरी नेता येणार नाही. पुस्तकाची किंमत भरलेल्या अनामत रक्कमेपेक्षा जास्त असेल तेव्हा अधिक अनामत रक्कम किंवा त्या पुस्तकांच्या किंमती एवढी अनामत रक्कम भरुन पुस्तक घरी नेता येईल. महाविद्यालयीन व उच्चशिक्षण घेणारे विद्यार्थी / संशोधन यांना ग्रंथ, नियतकालिके ग्रंथालयात बसून वाचण्यासाठी / संदर्भासाठी देण्यात येतात. घरी ग्रंथालयाबाहेर नेण्याकरिता देण्यात येणार नाही. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र यांच्या नियमाप्रमाणे ग्रंथालयाचे व्यवस्थापन संगणकीकरण करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे वृत्तपत्रात प्रसिध्द होणा-या महत्वाच्या घडामोडींची कात्रणे ठेवण्यात आली आहेत. सन २०१५-२०१६ मध्ये ग्रंथालयास महाराष्ट्र शासनाकडून रु.१,४४,०००/- इतके अनुदान मिळाले आहे. सन २०१५-२०१६ वर्षाकरिता रु.३ लाख इतकी रक्कम मंजूर केली होती व प्रत्यक्ष खर्च रु.३,९२,३७८/- इतका झाला आहे. या रकमेतून वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके, ग्रंथ, संदर्भ ग्रंथ खरेदी करण्यात आले. त्यामध्ये ११९६ ग्रंथ/पुस्तके खरेदीचा समावेश आहे.

दिनांक ३१.३.२०१६ रोजी ग्रंथालयाची सभासद फी व सभासदाची एकूण संख्या पुढीलप्रमाणे :
महाविद्यालयीन विद्यार्थी वार्षिक फी रु.५०/- अनामत रक्कम रु.१००/-, सर्वसामान्य सभासद वार्षिक फी रु.५००/- अनामत रक्कम रु.५००/-, विद्यार्थी रेफरन्स वार्षिक फी रु.५००/-, विद्यार्थीला महिन्यापर्यंतची फी रु.५०/- प्रमाणे आहे. महाविद्यालयीन विद्यार्थी / संशोधन / सभासद, सर्वसामान्य यांची एकूण संख्या २७५, एकूण वर्गणी / अनामत रक्कम म्हणून रु.३१,५००/- इतकी रक्कम जमा झाली आहे. तसेच सन २०१५-२०१६ या सालामध्ये प्रतिष्ठानने प्रकाशित केलेल्या एकूण रु.२,४१,६०३/- एवढया रकमेची विक्री झाली आहे.

दि. १ एप्रिल, २०१५ ते ३१ मार्च २०१६ पर्यंत खालील पुस्तके खरेदी केलेली आहेत.

| अ.क्र. | पुस्तकाचे नांव | लेखक |
|---|---|---|
| १ | छोटी सी बात | तांबे राजीव |
| २ | पुर्ण जागृत ध्यान | तारे विजय |
| ३ | अरण्यवाटा | मळेकर अरुण |

| | | |
|---|---|---|
| ४ | विश्व नकाशांचे | मळेकर अरुण |
| ५ | फुले वेचिता | मंगेशकर लता |
| ६ | शब्दव्रती शांताबाई | नीला उपाध्ये |
| ७ | सुवासनी | देव सीमा |
| ८ | ध्वनिप्रदूषण आणि आपण | ओक यशवंत |
| ९ | निरंतर विज्ञान शिक्षण कक्ष | नाईक शरद |
| १० | जलप्रदूषण | साठे दिलीप |
| ११ | स्त्री-शरीर विज्ञान प्रश्नोत्तरी | |
| १२ | हवा प्रदूषण | साठे मृणालिनी |
| १३ | पोस्टकार्डातून विज्ञान | नारळीकर जयंत |
| १४ | आपले डोळे | जेस्ते-चिद्वांस माधवी |
| १५ | विज्ञान जिज्ञासा प्रश्नोत्तरी | |
| १६ | बालवैज्ञानिकांकरिता प्रयोग संच | देशपांडे अ. पां. |
| १७ | वयात येताना | प्रभू विठ्ठल |
| १८ | सूर्यचूल आणि सौरबंब | यावलकर अभय |
| १९ | शहरी शेती | दाभोळकर श्री. अ. |
| २० | माझी प्रयोग शाळा | जुईकर चारशीला |
| २१ | Science through Post-Cards | Narlikar Jayant |
| २२ | Our Eyes | Vidvauns |
| २३ | My Laboratory | Juikar Charusheela |
| २४ | Invisible World | Barve Siddhivinayak |
| २५ | Set Of Experiments For Children | |
| २६ | Our Society And Noise Pollution | Vaidya Vishnu |
| २७ | Science Quest | Kital S. S. |
| २८ | Adolescent-Boys | Prabhu Vitthal |
| २९ | Science of Female Body<br>Dr. Babasaheb Ambedkar Writing & Speeches Vol. 17 Part Three | Gandhi Bhalerao Ashwin |
| ३० | Rebeeca | Maurier, Daphne |
| ३१ | The Great Divide | Stiglitz J. E. |
| ३२ | The Partition of Bengal | Sengupta, Debjani |
| ३३ | Political Philosophy | Ray B. N. |
| ३४ | India The Crucial Years | Rajeswar T.V. |
| ३५ | An Upstart In Government | Maira, Arun |
| ३६ | The Engergence A Personal | Kapoor, Coomi |
| ३७ | My Vice is My Conscience | Sawant P. B. |
| ३८ | Our Parliament | Jois M. R. |
| ३९ | Debating China | Hachigian, Nina |
| ४० | Public Secrets of Law | Baxi, Pratiksha |

२.३ **मा. न्यायमूर्ती वाय. व्ही. चंद्रचूड यांच्या नावाने 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान पुरस्कृत न्यायमूर्ती वाय. व्ही. चंद्रचूड पारितोषिक'**: भारताचे भूतपूर्व सरन्यायाधीश मा. न्यायमूर्ती वाय. व्ही. चंद्रचूड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान पुरस्कृत न्यायमूर्ती वाय. व्ही. चंद्रचूड परितोषिक' प्रत्येक वर्षी देण्याचे मान्य झाले. त्यानुसार मुंबई विद्यापीठाच्या मार्चच्या एल.एल.एम.च्या अंतिम परीक्षेत विद्यापीठात पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांस देण्यात येतो. त्यामुळे सन २०१५ या वर्षाचे पारितोषिके विद्यापीठाने कळविल्यानुसार कु. शामालेन सिक्वेरा यांना मा. चव्हाणसाहेबांच्या पुण्यतिथीदिनी मा. अध्यक्षांच्या हस्ते देण्यात आले. रु.१०,०००/- रोख असे पारितोषिकाचे स्वरुप आहे.

## ३. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईच्या केंद्रात झालेले महत्वाचे कार्यक्रम :

३.१ **मा. चव्हाणसाहेबांची पुण्यतिथि व जयंती**: मा. चव्हाणसाहेबांच्या ३१ व्या पुण्यतिथीनिमित्त दिनांक २५ नोव्हेंबर २०१५ रोजी यशवंतराव चव्हाण केंद्र इमारतीच्या मुख्य सभागृहात झालेल्या कार्यक्रमास प्रतिष्ठानचे अध्यक्ष व माजी केंद्रीय कृषीमंत्री मा. श्री. शरदराव पवार उपस्थित होते. या कार्यक्रमात 'यशवंतराव चव्हाण कला व क्रीडा राज्यस्तरीय पारितोषिक २०१५' श्रीमती अरुणिमा सिन्हा यांना प्रदान करण्यात आले व 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २०१५' अर्थतज्ज्ञ डॉ. विजय केळकर यांना देण्याचे जाहीर करण्यात आले.

## ४. यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक, राष्ट्रीय पुरस्कार व इतर कार्यक्रम :

४.१ **यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक** : प्रतिष्ठानच्या उद्दिष्टांतील एक भाग म्हणून खालील क्षेत्रात भरीव कार्य करणा-या मान्यवर व्यक्ति वा संस्थेला पारितोषिक व सन्मानपत्र देण्यात येते.

१) यशवंतराव चव्हाण कृषी औद्योगिक समाजरचना/व्यवस्थापन प्रशासन पारितोषिक

२) यशवंतराव चव्हाण सामाजिक एकात्मता/विज्ञान तंत्रज्ञान पारितोषिक

३) यशवंतराव चव्हाण ग्रामीण विकास/आर्थिक-सामाजिक विकास पारितोषिक

४) यशवंतराव चव्हाण मराठी साहित्य संस्कृती/कला व क्रीडा पारितोषिक

सन २०१५ यावर्षीच्या पारितोषिकासाठी वर्तमानपत्रात प्रगटन करण्यात आले होते. या क्षेत्रामध्ये भरीव पथदर्शी कार्य करणा-या व्यक्ती अगर संस्था यांना शिफारस करण्याचे आव्हान करण्यात आले होते. त्या आव्हानाला प्रतिसाद देऊन अनेक प्रस्ताव प्राप्त झाले होते. या प्रस्तावावर निवड समितीत विचार होऊन अपघात व आघात यावर आत्मिक बळाने मात करुन 'एव्हरेस्ट' सर करणारी पहिली भारतीय अपंग महिला पद्मश्री श्रीमती अरुणिमा सिन्हा यांना देण्याचे जाहीर करण्यात येऊन सदर पारितोषिक दिनांक २५ नोव्हेंबर २०१५ रोजी मा. यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथी दिनी प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार यांच्या हस्ते देण्यात आले. पारितोषिकाचे स्वरुप रु.२ लाख रोख, शाल, मानपत्र व श्रीफळ असे आहे.

४.२ **यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार** : मा. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राष्ट्रीय पातळीवर राष्ट्रीय एकात्मता, लोकशाहीमूल्ये, सामाजिक-आर्थिक विकास या क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कार्य करणा-या नामवंत व्यक्तीला 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार व सन्मानपत्र' देण्यात येते. रक्कम रुपये ५ लाख व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. सुयोग्य व्यक्तीची निवड करण्यासाठी डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली आहे. या समितीमध्ये (१) मा. डॉ. आरमायटी देसाई, माजी अध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग, (२) मा. डॉ. रघुनाथ माशेलकर, माजी महानिदेशक वैज्ञानिक तथा औद्योगिक अनुसंधान परिषद, (३) मा. डॉ. रुपा शहा, माजी कुलगुरु, एस.एन.डी.टी. विद्यापीठ (४) मा. डॉ. संजय देशमुख, कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, (५) मा. डॉ. नरेंद्र जाधव, माजी सदस्य, योजना आयोग, (६) मा. श्री. आय. एम. काद्री, प्रख्यात वास्तुविशारद याचा समावेश आहे.

या निवड समितीच्या शिफारशीनुसार मा. चव्हाणसाहेबांच्या पुण्यतिथी दिनी दि. २५ नोव्हेंबर २०१५ मध्ये जाहीर करण्यात आलेला यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार सुप्रसिध्द अर्थतज्ज्ञ डॉ. विजय केळकर यांना मा. श्री. शरदराव पवार यांच्या हस्ते सन्मानपूर्वक देण्यात आला. डॉ. केळकर यांनी पुरस्काराची रक्कम रु.५ लाख न स्वीकारता सदरची रक्कम मा. यशवंतराव चव्हाणसाहेब ज्या शाळेत शिकले त्या कराड येथील शाळेला देणगी म्हणून देण्यात यावी असे कार्यक्रमात जाहीर केले. या समारंभास प्रतिष्ठानचे विश्वस्त व सदस्य मोठया संख्येने उपस्थित होते.

## ५. विशेष कार्यक्रम / उपक्रम :

५.१ **'यशवंत' आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव - दिनांक २२ ते २८ जानेवारी २०१६ :-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व पुणे फिल्म फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आणि महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने दि. २२ जानेवारी ते २८ जानेवारी २०१६ या दरम्यान चव्हाण सेंटर, मुंबई येथे 'सहावा यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव' आयोजित केलेला होता. या महोत्सवाचे उद्‌घाटन प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे यांच्या हस्ते व हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ कलाकार श्रीमती वहिदा रहेमान व मा. सरचिटणीस श्री. शरद काळे चित्रपट महोत्सवाचे संचालक डॉ. जब्बार पटेल यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या प्रसंगी श्रीमती वहिदा रहेमान यांना हिंदी चित्रपट क्षेत्रातील योगदानाबद्दल प्रतिष्ठानच्या वतीने पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या चित्रपट महोत्सवात विविध देशातील सुमारे ७५ निवडक चित्रपट दाखविण्यात आले. या चित्रपट महोत्सवात केंद्रातील मुख्य सभागृह, रंगस्वर सभागृह व सांस्कृतिक सभागृहात डीसीपी, ब्ल्यू रे, डीव्हीडी व डीजीबीटा याद्वारे दिवसाला प्रत्येकी ५ चित्रपट दाखविण्यात आले. महोत्सवाच्या उद्‌घाटन प्रसंगी पुणे फिल्म फेस्टीव्हलमध्ये प्रथम क्रमाकांने आलेली फिल्म दाखविण्यात आली. चित्रपट महोत्सवात ग्लोबल सिनेमा ४०, रिट्रॉस्पेक्टिव्ह ५, कंट्री फोकस ७, इंडियन सिनेमा ५, मराठी सिनेमा ५, स्टुडंट कॉम्पिटीशन १० दाखविण्यात आले.

५.२ **मा. यशवंतराव चव्हाण यांचे जन्मघर देवराष्ट्रे, तालुका कडेगांव, जिल्हा सांगली :-** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक विभागामार्फत मा. यशवंतराव चव्हाण यांचे देवराष्ट्रे, तालुका कडेगांव, जिल्हा सांगली येथील जन्मघर प्राचीन व ऐतिहासिक स्मारक असल्याचे घोषित केलेले आहे. या स्मारकाचे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईने महाराष्ट्र वैभव राज्य संरक्षित स्मारक संरक्षण योजने अंतर्गत पालकत्व घेतले आहे. पुरातत्व विभाग व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांचेमध्ये दिनांक ११.३.२०१३ रोजी करार झालेला आहे. त्यानुसार स्मारकामध्ये मा. यशवंतरावांच्या जन्मापासून ते उप-पंतप्रधान काळापर्यंतच्या कालावधीची छायाचित्रे लावण्यात आली असून तेथे मा. चव्हाणसाहेबांची भाषणे ऐकविण्यात येत आहेत. या ऐतिहासिक स्मारकाचे उद्‌घाटन प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार यांच्या हस्ते झाले.

त्यानंतर स्मारकामध्ये देवराष्ट्रे व पंचक्रोशीतील शेतक-यांसाठी तसेच तरुण मुलांसाठी वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. त्यापैकी खालील महत्वाचे कार्यक्रम देवराष्ट्रे येथे आयोजित करण्यात आले.

२.१ **करियर गायडन्स व व्यक्तिमत्व विकास शिबीर** — देवराष्ट्रे येथील व परिसरातील विद्यार्थ्यांसाठी दि. २२.९.२०१४ रोजी करयिर गायडन्स व व्यक्तिमत्व विकास शिबीर आयोजित केले. प्रमुख मार्गदर्शन श्री. सजीव लाटकर, ज्येष्ठ माध्यम तज्ज्ञ व सकाळचे माजी संपादक हे होते. या शिबीरामध्ये दहावी, बारावी पर्यंतच्या ४५० विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

२.२ **केळी पिकाविषयी मार्गदर्शन** - जैन इरिगेशनचे श्री. सुरेश मगदूम व श्री. गुलदगड यांनी देवराष्ट्रे येथील सभागृहामध्ये दि. ६.२.२०१५ रोजी देवराष्ट्रे परिसरातील जवळ जवळ ३५० ते ४०० केळी उत्पादक शेतक-यांना मार्गदर्शन केले.

२.३ **शेती शाळा - बोल अनुभवाचे —** देवराष्ट्रे येथील शेतक-यांसाठी दि. १३.१२.२०१४ रोजी कार्यशाळा आयोजित करण्यात आली. प्रमुख मार्गदर्शन श्री. शंकर खोत. २५० ते ३०० शेतकरी उपस्थित.

२.४ **मा. चव्हाणसाहेबांच्या जयंतीनिमित्त आत्मतेज योग व ध्यान संस्कार शिबीर** - प्रमुख मार्गदर्शन योगाचार्य पांडुरंग गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली दि. ७ ते १२ मार्च २०१५ पर्यंत देवराष्ट्रे गावातील जवळ जवळ ८०० ते ९०० स्त्री / पुरुष यांनी ६ दिवस योग अभ्यास व प्रात्यक्षिक केले.

या व्यतिरिक्त देवराष्ट्रे येथील स्मारकात परिसरातील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी पुस्तके उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. त्याचा लाभ देवराष्ट्रे परिसरातील विद्यार्थी घेत आहेत. तसेच यशवंतराव चव्हाण जन्मघर स्मारकास प्रत्येक महिन्याला किमान २००० लोक भेटी देतात. त्यामध्ये मा. चव्हाणसाहेबांवर प्रेम असणा-या व्यक्ती, सांस्कृतिक, साहित्यिक क्षेत्रातील मान्यवर तसेच सांगली, सातारा जिल्हयातील शाळांच्या सहलीचा समावेश आहे.

२.५ **स्मारकास मान्यवरांच्या भेटी:-** सांगली जिल्हयातील देवराष्ट्रे येथील यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मघर स्मारकाचे पालकत्व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईने स्वीकारल्यानंतर २६ जून २०१४ पासून मोठया संख्येने पर्यटकांनी व कित्येक मान्यवरांनी स्मारकास भेट दिली आहे. विविध शाळा विद्यार्थ्यांच्या सहली घेऊन या स्मारकास भेट देतात. उद्घाटन समारंभापासून आतापर्यंत सुमारे ४४७६ पर्यटकांनी स्मारकास भेट दिल्याच्या नोंदी असून अतिशय उत्कृष्ट अभिप्राय दिलेले आहेत. याच काळात आजूबाजूच्या परिसरातील २१ शाळांनी स्मारकास भेट दिली आहे.

५.३ **ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा - २०१५ :-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्यातर्फे दरवर्षी ऑक्टोबरमध्ये एका विशिष्ट क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या ज्येष्ठ नागरिक संघटनांच्या व फेस्कॉमच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा केंद्र इमारतीच्या मुख्य सभागृहामध्ये आयोजित केला जातो. त्या मेळाव्यामध्ये दोन पुरुष व दोन महिला ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात येतो. सत्काराचे स्वरुप शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व गौरव पत्र असे असते. तसेच प्रवास प्रवास खर्च दिला जातो. सत्कार समारंभाच्या आधी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. कार्यक्रम सर्वसाधारणपणे सकाळी ९.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत चालतो. रविवार दि. ४ ऑक्टोबर २०१५ रोजी चव्हाण केंद्रामध्ये कुर्ला ते मुलुंड व नवी मुंबई या क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या ज्येष्ठ नागरिक संघटनांचा मेळावा भरविण्यात आला. मेळाव्याचे अध्यक्ष श्री. शरद काळे हे होते व प्रमुख पाहुणे सुप्रसिध्द साहित्यिक व ज्येष्ठ संगणक तज्ज्ञ श्री. अच्युत गोडबोले होते. अंदाजे ४०० पेक्षा जास्त ज्येष्ठ नागरिक मेळाव्याला उपस्थित होते.

सत्कारासाठी महिला व पुरुष ज्येष्ठ नागरिकांनी आपले अर्ज पाठविले होते. सरचिटणीस श्री. शरद काळे व विश्वस्त श्री. बी. के. अग्रवाल यांच्या समितीने सत्कारासाठी खालील दोन पुरुष ज्येष्ठ नागरिक व दोन महिला ज्येष्ठ नागरिक यांची निवड केली. तसेच या वर्षापासून वरील कार्यक्षेत्रात ज्येष्ठांसाठी काम करणा-या एका ज्येष्ठ नागरिक संघटनेचाही सत्कार करण्याचे ठरले. त्यानुसार त्या ज्येष्ठ नागरिकांचा व संघटनेचा समारंभामध्ये सत्कार करण्यात आला.

१) **पुरुष ज्येष्ठ नागरिक**
 १. श्री. प्रभाकर नथुराम ठाकूर, देवनार, मुंबई  २. श्री. भगवान राघोबा शेजाळे, सानपाडा, मुंबई

२) **महिला ज्येष्ठ नागरिक**
 १. डॉ. विजया कृष्णराव गोसावी, सानपाडा, नवी मुंबई  २. श्रीमती प्रभावजी अशोक देशपांडे, घाटकोपर (पूर्व), मुंबई

३) **ज्येष्ठ नागरिक संघटना**
 १. ज्येष्ठ नागरिक संघ, मुलुंड (पूर्व), मुंबई

५.४ **मा. श्री श्रीनिवास पाटील, राज्यपाल, सिक्कीम यांचे व्याख्यान :-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईने शनिवार दि. १२ डिसेंबर २०१५ रोजी चव्हाण सेंटरच्या रंगस्वर सभागृहामध्ये मा. श्री. श्रीनिवास पाटील, राज्यपाल, सिक्कीम यांचे 'सिक्कीम राज्याची भौगोलिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरा' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

मा. श्री. श्रीनिवास पाटील यांनी अतिशय नीटनिटकेपणाने सिक्कीम राज्याच्या भौगोलिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरेविषयी व्याख्यान दिले. तसेच सिक्कीम राज्याविषयीचा लघुपटही दाखविण्यात आला. कार्यक्रमास उत्तम उपस्थिति होती.

५.५ **महाराष्ट्र २०२५ : चर्चासत्र मालिका** : मा. यशवंतराव चव्हाण यांच्या विचार व कार्यातून प्रेरणा घेऊन प्रगतिशील व समतावादी महाराष्ट्र घडविण्यासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई प्रयत्नशील आहे. महाराष्ट्राच्या जनमानसाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असणा-या प्रश्नांचा वेध घ्यावा आणि सामाजिक कार्य करणारी माणसे तयार व्हावीत या भूमिकेतून गेली ३० वर्षे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई कार्यरत आहे.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार दि. १२ डिसेंबर २०१५ रोजी ७५ वर्षे पूर्ण करीत आहेत. या अमृत महोत्सवाचा योग साधून 'महाराष्ट्र २०१५' या संकल्पनेवर आधारीत महाराष्ट्रासमोरील आगामी दशकातील काही कळीच्या प्रश्नावर चर्चा घडवून आणणारी १३ चर्चासत्रे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे जून ते डिसेंबर या सहा महिन्यात राज्यातील प्रमुख शहरांत आयोजित करण्यात आली. या चर्चासत्रांतून त्या त्या क्षेत्रात आगामी दशकात महाराष्ट्रात कोणती महत्वाची आव्हाने उभी राहतील, त्यासाठी कोणत्या उपाययोजना आखता येतील तसेच येत्या दशकात संबंधित क्षेत्रातील चित्र नेकमे कसे असेल यासंदर्भात मांडणी व्हावी अशी कल्पना होती.

एका दिवसाच्या चर्चासत्रात एकूण ४ सत्रे होती. प्रत्येक सत्रात त्या त्या विषयाची मांडणी करण्यासाठी वक्त्याला ४५ मिनिटे देण्यात आली. १५ मिनिटे प्रश्नोत्तरे होती. चर्चासत्रासाठी निवडण्यात आलेल्या विषयातील प्रश्नांमध्ये आस्था असलेल्या महाराष्ट्रातील सुमारे १५० ते २०० मान्यवर, अभ्यासक, कार्यकर्ते, धोरणकर्त्यांना मुद्दाम या चर्चासत्रात आमंत्रित करण्यात आले होते. त्यांच्या उपस्थितीत आणि सहभागाने हे चर्चासत्र अधिक फलदायी झाले. चर्चासत्रानंतर विषयानुरुप झालेल्या मांडणीचे स्वतंत्र व एकत्रित अशा दोन्ही स्वरुपात ग्रंथ प्रकाशित करण्यात येत आहेत.

तत्पूर्वी 'विचारसूत्रे' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. प्रतिष्ठानचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते मा. श्री. शरदराव पवार यांचा विविध क्षेत्रांचा व्यासंग सर्वश्रुत आहे. पन्नास वर्षांची दीर्घ संसदीय कारकीर्द, राज्य आणि देश पातळीवरील महत्त्वाच्या धोरणांच्या निर्मितीतील सहभाग, राजकारणाचा प्रदीर्घ अनुभव आणि यशस्वी प्रशासक म्हणून त्यांचे व्यक्तिमत्व देशपातळीवर सर्वमान्य आहे. विविध क्षेत्रातील त्यांचा अभ्यास आणि वावर अचंबित करणारा राहिला आहे. त्यामुळे त्यांनी विविध प्रसंगी व्यक्त केलेले विचार सद्यस्थितीत भावी पिढीला अनमोल मार्गदर्शनाचे ठरु शकतात. त्यांनी गेल्या पंधरा वीस वर्षांत केलेल्या महत्त्वाच्या भाषणांतील विचार संकलित स्वरुपात '**विचारसूत्रे**' या पुस्तकातून प्रकाशित करण्यात आले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईने प्रसिध्द केलेल्या या पुस्तकाचे प्रकाशन पहिल्या चर्चासत्राच्या उद्‌घाटनाचे वेळी महाराष्ट्राचे माजी मुख्य सचिव श्री. द. मा. सुकथनकर आणि मुंबईचे माजी पोलीस आयुक्त श्री. ज्युलिओ रिबेरो यांच्या हस्ते मा. श्री. शरदराव पवार यांच्या उपस्थितीत करण्यात आले. त्यावेळी प्रतिष्ठानचे सरचिटणीस श्री. शरद काळे आणि कोषाध्यक्ष श्री. हेमंत टकले तसेच 'विचारसूत्रे' चे संपादक श्री. पद्‌मभूषण देशपांडे त्यावेळी उपस्थित होते.

सदर चर्चासत्र मालिकेमध्ये एकूण १३ चर्चासत्रे झाली ती खालीलप्रमाणे.

५.१ **चर्चासत्र पहिले - प्रशासनापुढील आव्हाने दि. १३ जून २०१५** : महाराष्ट्रातील प्रशासन एके काळी देशात अव्वल मानले जात होते. मा. श्री. शरदराव पवार आणि त्या प्रशासनाचे नाते प्रशासक आणि प्रशासन यांतील नाते कसे असावे याचे उत्तम उदाहरण म्हणून दिले जात होते. महाराष्ट्राच्या प्रशासनाच्या या लौकीकाला आता काहीसा छेद गेला आहे. समाजाच्या विविध थरातील वाढत्याा अपेक्षा आणि त्याला अपुरे पडणारे प्रशासन हाही सध्या चर्चेचा महत्वाचा विषय आहे. त्यामुळे मा. पवार यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त आयोजित करावयाच्या चर्चासत्र मालिकेतील पहिले चर्चासत्र मुंबईत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या रंगस्वर सभागृहामध्ये 'प्रशासन' या विषयावरच आयोजित केले गेले. प्रतिष्ठानचे सरचिटणीस श्री. शरद काळे हेही महाराष्ट्रातील नावाजलेल्या प्रशासकांपैकी असल्याने या चर्चासत्राला त्यांच्याच प्रास्ताविकाने सुरुवात झाली. चर्चासत्र

मालिकेची कल्पनाही त्यांचीच असल्याने त्यांनी आपल्या प्रास्ताविकात विषयाबरोबरच चर्चासत्र मालिकेच्या आयोजनामागील भूमिका विषद केली.

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्य सचिव श्री. द. मा. सुकथनकर यांनी उद्घाटनपर भाषणात आपल्या दीर्घ प्रशासकीय अनुभवांच्या आधारे प्रशासन व्यवस्थेबाबतची निरीक्षणे मांडली. त्याआधारे प्रशासनापुढील आव्हानांची व्याप्तीहित्यांनी स्पष्ट केली. मुंबईचे माजी पोलीस आयुक्त, श्री. सतिश सहानी यांनी 'कायदा व सुव्यवस्थेसाठी प्रशासन' या विषयावर आपली मते मांडली. लाचलुचपत प्रतिबंधक महासंचालक, श्री. प्रविण दिक्षीत यांनी 'प्रशासनामध्ये पारदर्शकता आणि प्रामाणिकपणा' या विषयावर आपली भूमिका मांडताना सद्यःस्थितीतील उदाहरणे देत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेली कारवाई आणि त्या दरम्यान आलेले अनुभव सांगितले. खाजगी संस्था, शाळा, कॉलेज, हॉस्पिटल यांना भ्रष्टाचाराविरोधी कायद्यामध्ये सामिल करण्यासाठी भारताच्या विधी आयोगाने शिफारस केल्याचे अधोरेखित केले. ज्येष्ठ पोलीस अधिकारी श्री. व्ही. बालचंद्रन यांनी 'राष्ट्रीय सुरक्षेसमोरील आव्हाने' या विषयावर उहापोह केला. सध्या राष्ट्रीय सुरक्षेपुढील आव्हानांचा सामना करताना विविध राज्यांच्या पोलीस दलांमध्ये दिसून येणारा समन्वयाचा अभाव त्यांनी अधोरेखित केला. गुप्तचर विभाग सक्षम करण्यासोबतच सुरक्षेच्या दृष्टीने महत्वाच्या घटनांना सामोरे जाण्याकरिता जलद आणि प्रभावी काम करणा-या यंत्रणांची गरज त्यांनी मांडली.

'नागरिकांचे सक्षमीकरण आणि पारदर्शकता' या विषयावर आपले मत मांडताना राष्ट्रीय माहिती आयुक्त, श्री. शैलेश गांधी म्हणाले, माहितीच्या अधिकाराच्या कायद्याने सामान्य नागरिकाच्या हाती एक प्रभावी शस्त्र दिले आहे आणि त्यामुळे प्रशासनाचा चेहरा बदलण्यास मदत होते आहे. ज्येष्ठ अर्थतज्ञ आणि नगरनियोजन विषयातील तज्ञ श्री. अभय टिळक यांनी 'नागरीकरण आणि प्रशासन' या विषयावर बोलताना नागरिकरणाच्या मुद्यावर महानगरांच्या समस्यांकडेच प्रामुख्याने पाहिले जाते, परंतु छोटया शहरांची लोकसंख्या झपाटयाने वाढताना दिसते. त्यामुळे त्या शहरांसमोरील आव्हानांना प्राधान्य देण्याची गरज मांडली.

ज्येष्ठ अणुविज्ञान तज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांनी 'विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रापुढील प्रशासकीय आव्हाने' या विषयावर सादरीकरण केले. या क्षेत्रात प्रगती करताना प्रशासकीय व्यवस्थेला दुर्लक्षून चालणार नाही, हे सांगताना त्यांनी प्रत्येक जिल्हयामध्ये सायन्स सेंटर, फिरती विज्ञान प्रदर्शने, इंडस्ट्री इंटर्नशीप आणि नवीन रिसर्च पार्कची गरज प्रतिपादन केली. प्रतिष्ठानचे अध्यक्ष, श्री. शरदराव पवार, मुंबईचे माजी पोलीस आयुक्त, श्री. ज्युलिओ रिबेरो, महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्य सचिव, श्री. जॉनी जोसेफ, प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्ष खासदार सौ. सुप्रिया सुळे, ज्येष्ठ पत्रकार श्री. प्रताप आसबे, श्री. पद्मभूषण देशपांडे, 'ग्रंथाली' चे सुदेश हिंगलासपूरकर असे अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच प्रतिष्ठानचे विश्वस्त / कार्यकारिणी मंडळाचे सदस्यही उपस्थित होते. अनेकांनी प्रश्नोत्तराच्या सत्रात सहभागदेखील नोंदवला. सूत्रसंचालन ज्येष्ठ पत्रकार आणि संयोजक श्री. सदा डुंबरे यांनी केले.

५.२ **दि. २७ जून २०१५ चर्चासत्र दुसरे - 'स्त्रीप्रन : स्वरुप आणि आव्हाने'**: मालिकेतील दुसरे चर्चासत्र २७ जून २०१५ रोजी पुण्यास एस. एम. जोशी सभागृहात आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्राचे उद्घाटन खासदार सौ. सुप्रिया सुळे यांनी केले. ज्येष्ठ स्त्रीवादी कार्यकर्त्या श्रीमती विद्या बाळ, डॉ. विद्युत भागवत, प्र. डॉ. श्रुती तांबे, प्रा. डॉ. राजेश्वरी देशपांडे, श्रीमती करुणा गोखले, प्रा. डॉ. बेनझीर तांबोळी, प्रा. डॉ. जया सागडे यांनी स्त्री चळवळ आणि स्त्रीवादाशी संबंधित मुद्यांवर चर्चासत्रात सखोल चर्चा घडवून आणली.

सौ. सुप्रिया सुळे यांनी एक स्त्री म्हणून आलेले अनुभव कथन केले. त्यांच्या आजी श्रीमती शारदाबाई पवार यांनी घराची जडणघडण केली, त्यांचे नेतृत्वगुण पुढच्या पिढीत आले. सौ. सुप्रिया सुळे यांच्या आईच्या आईंनी पतिनिधनानंतर धैर्याने मुलींचे संगोपन केले. तसेच त्यांच्या आईने आजूबाजूच्या सामाजिक आणि राजकीय वातावरणात आत्मविश्वासाने सांभाळलेले घर अशी स्वानुभवाधारीत उदाहरणे देत स्त्रीच्या जडणघडणीची वैशिष्टये मांडली. संसदेतला महिला खासदार म्हणून असलेला अनुभवही त्यांनी उपस्थितांसमोर मांडला. डॉ. विद्युत भागवत यांनी आपला शोधनिबंधातील सारांश कथन करतांना राज्यसंथा, न्यायसंस्था,

कुटूंबसंस्था आणि अर्थव्यवस्था या सगळयांची सांगड स्त्रीप्रश्नांशी जोडली जाणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले. श्रुती तांबे यांनी 'स्त्रीवाद चळवळ आणि सामाजिक परिवर्तन' या विषयावर आपले विचार मांडताना 'आजची समतावादी, विज्ञाननिष्ठ म्हटली जाणारी समाजव्यवस्था कोणतेही सोहळे साजरे करताना काळाच्या काही पावले मागे चालेली दिसते. यातून समाजाची छिन्नव्यक्तिमत्त्वाची लक्षणे दिसून येतात' असे निरीक्षण नोंदविले.

'राजकीय प्रक्रियेतील स्त्रियांचा सहभाग' यावर बोलतांना प्रा. डॉ. राजेश्वरी देशपांडे यांनी राजकारणातील वर्गावर किंवा व्यक्तींवर स्वतःसोबत इतरांचा विचार करण्याची अधिकची देखील जबाबदारी असते' असे सांगितले. ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीनंतर स्त्रियांच्या सहभागाची जितकी चर्चा झाली, त्याप्रमाणात विधानसभा, लोकसभा या निवडणूका तसेच उमेदवारी यांमध्ये महिलांची टक्केवारी वाढलेली नाही, स्त्रियांच्या राजकीय सहभागाबद्दल महिलांच्या सक्षमीकरणाबरोबरच पुरुष राजकीय नेतृत्वाच्या सक्षमीकरणावर अधिक भर दिला पाहिजे, स्त्रियांचे राजकरण हे कडेकडेने मुख्य प्रवाहातील संघर्षाला टाळून चालावे असेच आजच्या राजकीय व्यवहाराला अपेक्षित आहे अशी टीका केली. प्रा. डॉ. जया सागडे यांनी 'महिलांची सुरक्षितता व कायदे' या विषयीची माहिती दिली. करुणा गोखले यांनी आजच्या कुटुंबव्यवस्थेतील स्त्रीचे बदलते स्थान सांगताना मूल्यव्यवस्थेतील बदल हे स्त्रीच्या दर्जामध्ये बदल घडवण्यास कारणीभूत कसे ठरतात हे विस्ताराने सांगितले. स्त्रियांना आपले स्थान बळकट करण्यासाठी लोकशाही व्यवस्था सुदृढ करावी लागेल, ती कुटुंबात रुजवावी लागेल असे सांगितले. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या विद्या बाळ यांनी समारोपाच्या सत्रात संपूर्ण दिवसभरात वक्त्यांनी मांडलेल्या विचारांचा आढावा घेतला. चर्चासत्राच्या समारोपास खासदार वंदना चव्हाण प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. महिलांचे प्रश्न राजकीय व्यवस्थोत हाताळतानाचे अनुभव त्यांनी कथन केले.

५.३ **दि. ११ जुलै २०१५ चर्चासत्र तिसरे - शेती, पाणी आणि आधुनिक तंत्रज्ञानः** मालिकेतील तिसरे चर्चासत्र जळगाव येथील जैन हिल्सच्या गांधी तीर्थावर ११ जुलै रोजी आयोजित करण्यात आले. प्रतिष्ठानचे सरचिटणीस श्री. शरद काळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. 'जैन इरिगेशन' चे संस्थापक अध्यक्ष श्री. भंवरलालजी जैन यांनी अध्यक्षीय भाषण केले. ज्यांच्याकडे पाणी आहे त्याला गरीब शेतकरी म्हणता येणार नाही. जमीन, पाणी आणि नियोजनाचे कौशल्य ज्याच्याकडे आहे तो श्रीमंतच असायला हवा असे प्रतिपादन त्यांनी केले.

महाराष्ट्रात बहुतांश जमिनीवर ७०० मि. मि. इतका सरासरी पाऊस पडतो. पाण्याचे योग्य नियोजन आणि व्यवस्थापन केले तर एवढे पाणीही पुरेसे आहे पण त्यासाठी शेतक-याला सध्या वापर होत असलेल्या पाण्यामध्ये बचत करायला शिकावे लागेल. वाचविलेले पाणी आपल्याला शेती उत्पादनासाठी चांगल्या पध्दतीने वापरता येईल असे सांगून ते म्हणाले, उद्या कदाचित शेतक-याला पाण्याचे मार्केटींग करता येईल. आपल्याकडून वाचविलेले पाणी एक शेतकरी दुस-या शेतक-याला विकत शकेल. मात्र, त्यासाठी पाणी मोजण्याची, मोजून देण्याची आणि मोजून वापरण्याची पध्दती आपल्याला विकसीत करावी लागेल. प्रत्यक्ष अनुभवातील अनेक उदाहरणे देत जैन यांनी आपला शेती आणि पाणी वापराबाबतचा आधुनिक दृष्टिकोन उपस्थितांबरोबर मांडला.

प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष, विधानसभेचे माजी अध्यक्ष श्री. अरुणभाई गुजराथी यांनी 'सरकार चलन निर्माण करु शकते, पाणी नाही' अशी वास्तवाची कल्पना देत 'सध्या पाण्याची चोरी होते, उद्या ढगांचीही होईल' असे मिश्कील प्रतिपादन केले. 'शेतकरी हा शरद पवार यांच्या विचारांचा आणि धोरणांचा केवळ केंद्रबिंदूच नाही तर प्राणबिंदू आहे,' असे सांगून शरद पवार यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त प्रतिष्ठानने महाराष्ट्र २०१५ या मालिके अंतर्गत आयोजित केलेल्या त्यांनी चर्चासत्राचे कौतुक केले. प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा खासदार सौ. सुप्रिया सुळे यांनी उपस्थित तज्ज्ञ आणि शेतक-यांचे प्रतिष्ठानच्यावतीने स्वागत करताना चर्चासत्रामागील हेतू विषद केला. प्रतिष्ठानचे सरचिटणीस श्री. शरद काळे यांनी प्रास्ताविकात महात्मा गांधींचा शेतीविषयक दृष्टीकोन मांडला. खासदार ईश्वरलालजी जैन, संयोजक सदा डुंबरे व्यासपीठावर उपस्थित होते. जलअभ्यासक, ज्येष्ठ पत्रकार डॉ. सुधीर भोंगळे यांनी चर्चासत्राचे सूत्रसंचालन केले.

माजी कृषी सचिव श्री. नानासाहेब पाटील यांनी सुरुवातीलाच 'शरद पवार यांना देशात दुस-या हरित क्रांतीचे जनक' म्हणून ओळखले जाते. पण महाराष्र्टात मात्र तसा उल्लेखही होत नाही याबद्दल खंत व्यक्त केली. महाराष्ट्राची शेती ही मुख्यतः पावसावरच अवलंबून आहे. त्यामुळे इथे मोठया धरण प्रकल्पांपेक्षा जलसंधारण आणि छोटया प्रकल्पांना महत्त्व द्यायला हवे असे आग्रहपूर्वक सांगून प्रत्यक्षात महाराष्ट्रात आजही जलसंधारणापेक्षा मोठया प्रकल्पांसाठी पाटबंधारे विभागालाच भरघोस आर्थिक तरतूद केली जाते. जलसंधारण योजना इथे रोजगार हमी योजनेशी जोडली गेल्यामुळे बदनाम झाली. पण गुजराथने मात्र त्याचे महत्व ओळखले. आज गुजराथमधील बहरलेल्या शेतीचे श्रेय नर्मदासागर प्रकल्पाला दिले जाते पण ते खोटे आहे. श्री. केशुभाई पटेल मुख्यमंत्री असतांना त्यांनी जलसंधारणाच्या कामाला दिलेल्या प्राधान्यामुळेच गुजराथचे चित्र पालटले असा दावा त्यांनी केला. आपल्या दीर्घ प्रशासकीय कारकिर्दीतील अनेक किस्से सांगत पाटील यांनी महसूल, शेती आणि पाटबंधारे विभागाची आकडेवारी कशी सदोष असते याची उदाहरणे दिली. प्रत्येक गोष्टीत भ्रष्टाचाराचा संशय व्यक्त करण्याची विचित्र संस्कृती महाराष्ट्रात रुजू पाहते आहे. त्यापासून सावध राहून नीट अभ्यास करुन वस्तुस्थिती मांडायला शिकले पाहिजे असा सल्लाही त्यांनी दिला. वातावरणातील बदलामुळे हंगामी पिके धोक्यात येणार असून शेतक-यांनी यापुढे फळबागा आणि पशुसंवर्धनावरच भर द्यावा असे मतही त्यांनी मांडले.

कृषितज्ज्ञ आणि शेतकी यांच्यातील सुसंवाद शेतीविकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असून शेतक-यांना रुचेल अशा भाषेत शेतीतज्ज्ञ आपली मांडणी करु लागले तर कृषीशास्त्राच्या प्रगतीच्या दृष्टीने ते अत्यंत उपयोगी ठरेल असे विचार ज्येष्ठ हवामानतज्ज्ञ डॉ. रंजन केळकर यांनी येथे मांडले. गेल्या ४० वर्षातील प्रत्येक दशक त्या आधीच्या दशकापेक्षा उष्ण आहे हे खरे असले तरी या वातावरण बदलावर आपल्या शेतक-यांनी मात केली आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आपल्या लोकसंख्येत ४ पटीने वाढ झाली असली तरी धान्योत्पादनात मात्र पाच पटीने वाढ झाली आहे. येत्या काळात वाढणा-या लोकसंख्येचा विचार करता आपल्याला एकूण उत्पादकतेतच वाढ करण्याचे आव्हान असून काळजी करायचीच तर त्याची करायला हवी असे डॉ. केळकर म्हणाले. आपण बदलू, जग बदलेल पण हवामान मात्र आहे तसेच स्थिर राहिले पाहिजे ही कल्पना चुकीची असल्याची जाणीव करुन देऊन ते म्हणाले, वातावरणातील कार्बनच्या प्रमाणात सातत्याने वाढ होत असली तरी त्याचा फायदा आपल्याला पीक वाढीसाठी कसा करुन घेता येईल याचा विचार केला गेला पाहिजे. अल् निनो आणि ला नीना या दोन्ही वैश्विक संकल्पना समजावून देऊन त्याचा आपल्याकडील पर्जन्यमानावर थेट परिणाम झालेला दिसून येत नाही. पाऊस लांबला किंवा लवकर संपला तरी त्याचा ऋतुचक्राच्या बदलाशी काही संबंध नाही. ऋतुचक्र आणि हवामान बदल यांचा परस्परांशी संबंध नाही हेही त्यांनी स्पष्ट केले. पावसाच्या प्रमाणापेक्षा पावसाचे वितरण म्हणजे तो किती काळात व कसा पडतो ह जास्त महत्वाचे आहे. त्यामुळे त्याचा अंदाज वर्तविण्याबाबत अधिक संशोधन झाले पाहिजे असेही डॉ. केळकर यांनी सांगितले.

कडधान्ये, तेलबिया आणि कमी पावसावर घेतले जाणा-या ज्वारी, बाजरी व मका अशा पिकांचे उत्पादन किफायतशीर ठरु लागले तर आजपर्यंत सर्वात किफायतशीर ठरलेल्या नगदी पिकाच्या शेतीसाठी समर्थ पर्याय निर्माण होऊ शकतात. कोरडवाहू शेती शाश्वत ठरु लागली तर महाराष्ट्रातील कोरडवाहू शेतक-यांसाठी ती आनंददायी व सुखकारक प्रक्रिया ठरेल आणि कोरडवाहू शेतीच्या विकासाची ती मंगल पहाटसुध्दा ठरु शकेल असा विचार 'कोरडवाहू शेतीचे नियोजन' या विषयावर जलतज्ज्ञ विजयअण्णा बोराडे यांनी व्यक्त केले. सोयाबीन, हरभरा, तूर, मूग या पिकावर प्रक्रिया करणारे कारखाने काढा व चांगला भाव द्या. लातूर परिसरात जिथे सोयाबीनचे उत्पादन होते त्या परिसरात सोयाबीनवर प्रक्रिया उद्योग बहरले आहेत. जालन्याला लोखंड निर्मितीचा उद्योग आहे. उदाहरण देत पीकपध्दती बदल करण्याबाबत 'महाराष्ट्रातील शेती व पाणी व्यवस्थापन' या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. दि. मा. मोरे म्हणाले, मोसंबी, डाळिंबाच्या जळीत बागेच्या जागी आंब्याच्या बागा लावा. दुष्काळातून धडा घेण्याची गरज असल्याचे प्रतिवादनही त्यांनी केले. वॉटर फूट 'प्रिंट' बाबत जैन इरिगेशनचे वरिष्ठ अधिकारी डॉ. डी. एन. कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले. ब्यू, ग्रीन आणि ग्रे अशा पध्दतीने वर्गीकरण करता येते. शेतीसाठी, उद्योगासाठी आणि पिण्यासाठी पाण्यासंदर्भात त्यांनी उपस्थितांना सोदाहरण सांगितले. शेती विषयावर काम करणारे कार्यकर्ते, विचारवंत व प्रगतीशील शेतकरी यांनी या चर्चासत्रास आवर्जून उपस्थिती नोंदवली.

५.४ **दि. २५ जुलै २०१५ चर्चासत्र चौथे - सामाजिक न्यायः** विविध सामाजिक विषयांवर मत व्यक्त करणे, त्यावर विचारविनिमय होणे यासाठी विविध चर्चासत्रांचे आयोजन सातत्याने होण्याची गरज आहे. विधायक विषयांवर वादविवाद ही महाराष्ट्राची परंपरा आहे असे मत खासदार सौ. सुप्रिया सुळे यांनी 'सामाजिक न्याय' या विषयावरील चर्चासत्रात बोलताना व्यक्त केले. सामाजिक नयायासंदर्भातील अशी चर्चासत्रे लोकप्रतिनिधींसाठीही वेळोवेळी आयोजित करणे गरजेचे आहे. यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणाला व येथील सामाजिक जीवनाला वेगळी दिशा मिळेल व महाराष्ट्राच्या सामाजिक विकासाला आणखी भक्कम बळ मिळेल असेही त्या म्हणाल्या.

शनिवार दि. २५ जुलै २०१५ रोजी चौथे 'सामाजिक न्याय' या विषयावरील चर्चासत्र एम. जी. एम.च्या आईन्स्टाईन सभागृहात संपन्न झाले. यावेळी खासदार सौ.सुप्रिया सुळे, विभागीय केंद्राचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, कोषाध्यक्ष सचिन मुळे, प्रा. प्रताप बोराडे, प्रा. सुधीर देशमुख, महेश चव्हाण, प्राचार्य डॉ. जनार्दन वाघमारे, डॉ. गंगाधर पानतावणे, प्रताप आसबे, हरी नरके, मिलींद आवाड, जहीर अली, आनंद करंदीकर, स्मिता अवचार, संपत काळे, सदा डुंबरे आदींनी विविध सत्रात मार्गदर्शन केले. स्वागतपर बोलताना डॉ. वाघमारे यांनी श्री. शरदराव पवार यांनी राजकीय सत्तेमार्फत वेळोवेळी वंचित घटकांना उचित न्याय देण्याचा सातत्याने प्रयत्न केला असे गौरवोद्‌गार काढले. उद्‌घाटनपर भाषणात डॉ. पानतावणे म्हणाले, सामाजिक न्याय ही संकल्पना जातीनिर्मूलनासाठीच असून ती प्रभावीपणे राबविण्याची गरज आहे. विविध साधनसंधी साधनवंचितांना मिळवून देण्यासाठी जुन्या मार्गाबरोबरच नवनवे मार्ग शोधण्याची आज गरज आहे. सामाजिक न्याय विषयाची पार्श्वभूमी त्यांनी मांडली.

चर्चासत्राचे बीजभाषण करताना ज्येष्ठ पत्रकार श्री. प्रताप आसबे यांनी सामाजिक न्यायावर तळमळीने विचार मांडले. देशाला प्रगतीपथावर नेण्याची पंतप्रधान नेहरुंन बरेच प्रयत्न केले. परंतु त्यानंतरची धोरणे वरवरची होती. 'गरीबी हटाव', 'अच्छे दिन' या घोषणा सामाजिक न्यायाकडे दुर्लक्ष करणा-या आहेत. बलवान लोकांभोवतीच यंत्रणा फिरत असल्यामुळे जागतिकीकरणात संपत्तीचे केंद्रीकरण वाढले आहे असे म्हणत समाजव्यवस्थेतील शोषण संपविण्यासाठी मार्क्सने शास्त्रशुध्द विचार मांडले. त्यांच्या दबावामुळेच सामाजिक न्यायाची संकल्पना भांडवली जगाने स्वीकारली. मात्र, अजूनही तीस टक्के प्रभावी लोकांसाठीच यंत्रणा कार्यरत असते असे परखड मत त्यांनी व्यक्त केले.

'जात, आरक्षण व सामाजिक न्याय' या विषयावर बोलताना ज्येष्ठ विचारवंत प्रा. नरके म्हणाले, भारतातील प्रत्येक जात ही स्वतंत्र राष्ट्र आहे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते. जात विषमतेतून मुक्त होण्यासाठी आरक्षणाची संकल्पना राबविली गेली. ५२ टक्के ओबीसीना २७ टक्के आरक्षण दिले. पण प्रत्यक्ष नोक-यात साडेचार टक्केच वाटा मिळाला. एखाद्या जातील आरक्षण देणे म्हणजे सामाजिक न्याय प्रस्थापित करणे हा चुकीचा समज आहे. राज्यातील १०० खुल्या प्रवर्गातील जातींना तर ओबीसीतील काही जातींना एनटी आणि एससी प्रवर्गात जाण्याची इच्छा आहे. सर्वांनाच आरक्षण हवे असल्याने सध्या आपल्या देशाला मागासलेपणाचे डोहाळे लागलेले आहेत असे मत त्यांनी व्यक्त केले. जागतिक स्तरावर उजव्या विचारांच्या लोकांचे हितसंबंध प्रभावी ठरत असून उपेक्षित घटकांच्या चर्चेला पूर्णविराम देणारी शक्ती वेगाने कार्यरत होत आहे, कल्याणकारी शासनाची भूमिका बदलत चालली आहे यासाठी नव्या जाणीवा घेऊन शासनाने आर्थिक क्षेत्रातील सामाजिक न्यायाविषयीच्या संकल्पना स्पष्ट करणे गरजेचे आहे असे मत विविध दाखल्यांसहित 'आर्थिक क्षेत्रातील सामाजिक न्याय' या विषयावर बोलताना प्रा. आवाड यांनी व्यक्त केले.

'अल्पसंख्याक समाज व सामाजिक न्याय' या विषयावर बोलताना मुस्लिम समाजाला चौकटबंद करुन ठेवण्याचे प्रयत्न सातत्याने होत आलेले आहेत. भारताचे धर्मनिरपेक्ष स्वरुप लक्षात घेऊन हिंदू मुस्लिमांनी याविषयी सखोल विचार करण्याची गरज आहे. यामुळे भारताचे धर्मनिरपेक्ष स्वरुप निश्चितपणे टिकून राहील असे मत प्रा. अली यांनी यावेळी व्यक्त केले. शिक्षण हे सामाजिक न्यायाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे आहे. शिक्षणहक्क कायदा हमी जगभरातील १३५ देशांनी दिली आहे. त्याच्या कार्यवाहीतून सामाजिक न्याय प्रस्थापित व्हायला मदत होईल. भारतातही ते लागू आहे. परंतु त्याची अंमलबजावणी अजून प्रभावीपणे होत नाही अशी खंत प्रा. करंदीकर यांनी शिक्षण व सामाजिक न्याय याविषयी बोलताना व्यक्त केली. यासोबतच 'स्त्रिया व सामाजिक न्याय' या विषयावर प्रा. अवचार तर 'नैसर्गिक संसाधने व सामाजिक न्याय' या विषयावर प्रा. काळे यांनी

आपले विचार मांडले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी सदा डुंबरे यांनी या चर्चासत्रातील मान्यवरांच्या भाषणांचे लवकरच पुस्तकरुपात संपादन करण्यात येणार असल्याचे सांगितले व सर्व मान्यवरांचे आभार व्यक्त केले. दोन्ही सत्रातील चर्चासत्राचे संचालन ज्येष्ठ पत्रकार श्री. पद्‌मभूषण देशपांडे यांनी केले.

५.५ **दि. १६ ऑगस्ट २०१५ चर्चासत्र पाचवे - सर्वकष ग्रामविकास** : महाराष्ट्राच्या दृष्टीने जिव्हाळयाच्या मानल्या जाणा-या 'सर्वकष ग्रामविकास' या विषयावरील चर्चासत्राच्या आयोजनामध्ये राजारामबापू पाटील प्रबोधिनी, इस्लामपूर, जिल्हा सांगली यांनी प्रतिष्ठानला सहकार्य केले. प्रबोधिनीचे कार्यवाहक श्री. श्यामराव पाटील यांनी सुरुवातीलाच त्यामागील आपला हेतू कथन केला. कै. राजाराम बापूंनी ग्रामविकास मंत्री म्हणून प्राधान्य क्रमाने राबविलेल्या धोरणाचा आढावा घेतानाच मतदार संघात संघात त्यांन पदयात्रांद्वारे गावागावात जाऊन केलेल्या जलसाक्षरतेच्या कामाचा गौरव त्यावेळी केला.

या विषयावरील बीजनिबंधाचे सादरीकरण करताना माजी सचिव श्री. नानासाहेब पाटील यांनी ग्रामविकासाकरिता स्वातंत्र्यपूर्वीपासून झालेल्या प्रयत्नांचा आढावा घेतला. त्याचबरोबर ग्रामविकासांतर्गत येणा-या विविध घटकांची आणि आपल्यासमोरील आव्हानांची मांडणी केली. श्री. माधवराव पाटील शेळगावकर यांनी आपल्या भाषणात ग्रामीण विकासासाठी शेतीसोबत जोडधंद्यापेक्षा नावामध्ये उद्योगधंदे कसे येतील याकडे पाहिजे पाहिजे असा आग्रह धरला. ग्रामीण उद्योगांसाठी त्यांनी मार्गदर्शन केले.त्याचबरोबर निर्मलग्राम, व्यवसनमुक्ती आणि तंटामुक्तीवर भर दिला. श्री. अविनाश पोळ यांनी ग्रामविकासासाठी स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले. त्याचबरोबर यासंबंधी काम करत असताना आलेले अनुभवदेखील विस्ताराने सांगितले. सध्या ग्रामीण विकासाकरिता लजसंधारणाच्या कामांना प्राधान्य दिले पाहिजे अशी मांडणी केली. जलसंधारणाची कामे करताना मोठया आर्थिक तरतुदीपेक्षा लोकांनी स्वयंप्रेरणेने पुढे येण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

श्री. सुरेश खानापूरकर यांनी आपल्या सादरीकरणा दरम्यान 'शिरपूर पॅटर्न' समजावून सांगितला. नात्यांचे रुंदीकरण व खोलीकरण असे साधे स्वरुप असलेल्या या पॅटर्नवर काम करताना मात्र शास्त्रसुध्द पध्दतीने आखणी करण्याची आणि प्रामाणिक अंमलबजावणीची गरज त्यांनी मांडली. 'शिरपूर पॅटर्न' च्या तांत्रिक बाबींसोबतच त्याद्वारे झालेल्या जलसाठयाची छायाचित्रे आणि व्हिडीओ ध्वनिचित्रफिती सादर केले. या चर्चासत्रास माजी ग्रामविकास मंत्री श्री. जयंत पाटील, खासदार सौ. सुप्रिया सुळे, आ. श्री. बाळासाहेब पाटील, कराड, जिल्हा परिषद अध्यक्ष, सदस्य, सरपंच मोठया संख्येने उपस्थित होते.

५.६ **दि. २० सप्टेंबर २०१५ चर्चासत्र सहावे - देवस्थान न्यासांची जबाबदारी** : महाराष्ट्रामध्ये आज मोठी उलाढाल असलेले सार्वजनिक देवस्थान विश्वस्त न्यास आहेत. आपल्याकडील देणग्यांचा उपयोग हे न्यास विविध समाजोपयोगी कामांसाठी करत असतात. त्यामध्ये करुणेचा भाग अधिक असतो. या सार्वजनिक न्यासांकडे असलेल्या निधीतून अधिक उपयोगी समाज उपयोगी कामे सुरु करता येतील का, यावर विचारमंथन करण्यासाठी शेगाव, जिल्हा बुलढाणा येथील गजानन महाराज विश्वस्त न्यासाच्या मदतीने २० सप्टेंबर २०१५ रोजी चर्चासत्र पार पडले.

विविध धर्मिय आणि उपासनांच्या न्यासांच्या रचना, कार्य याबरोबरच चर्चासत्रामध्ये विविध धर्म कल्पना, त्यातील साम्य याविषयीही साहजिकच चर्चा झाली. या चर्चासत्राच्या बीजभाषणामध्ये श्री. अभय टिळक यांनी देवस्थान न्यासांची सामाजिक जबाबदारी सांगताना नैतिकता, चारित्र्य आणि प्रामाणिकपणा या दैवी भांडवलाविषयी कुणाच्याही मनात शंका असू नये अशी अपेक्षा व्यक्त केली. या कार्याला क्षमता आणि नेटवर्किंगची गरज आहे. देवस्थानांनी आजवर सेवेचा जो भाविककेंद्री दृष्टीकोन ठेवला होता तो यापुढील काळात विस्तारावा लागेल. कारण या क्षेत्रामध्ये देवस्थानांशिवाय कार्य करणारे आणखी कोणी नाही हे स्पष्ट केले. देवस्थानांकडे पैसा, बुध्दिमत्ता तंत्रज्ञान आणि व्यवस्थापनाचे जे संचयन आहे त्याचे अधिक योग्य संचलन होण्याची गरज त्यांनी स्पष्ट केले आणि शेगाव मध्ये जी दृष्टी दिसते तशी इतरत्रही दिसावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांनी विविध धर्मप्रवाहातील उपासना, प्रवृत्तीआणि निवृत्ती मार्गाचा थोडक्यात आढावा घेतला. पाश्चिमात्यांची यंत्रसंस्कृती आणि भारतीयांची मंत्रसंस्कृती यांची तुलना त्यांनी केली. पाश्चात्यांचा प्रवृत्तीमार्ग आणि भारतीयांचा

निवृत्तीमार्गाची तुलना करुन पाश्चिमात्य अंतराळाचा तर भारतीय अंतरंगाचा शोध कसा घेतात हे त्यांनी सांगितले. उद्याची भारतीय देवस्थाने कशी असावीत याचे शेगाव हे मॉडेल असल्याचे सांगून फादर दिब्रिटो म्हणाले ख्रिश्चन धर्मात सामाजिकतेशिवाय धर्माचा विचार होऊ शकत नाही. येत्या दशकाचा विचार करताना जागतिकीकरणाच्या आव्हानाला आपल्याला तोड द्यावे लागेल.

पीर मकदूम साहेब अली माहिम दर्ग्याचे विश्वस्त नूर परकार यांनी दर्ग्याच्या माध्यमातून होणा-या सामाजिक आणि धार्मिक ऐक्याची अनेक उदाहरणे दिली. या दर्ग्याच्या विश्वस्त न्यासाच्या माध्यमातून सर्व धर्मियांसाठी होणा-या वैद्यकिय तसेच शैक्षणिक मदतीची माहितीही त्यांनी दिली. शेगावच्या श्री गजानन महाराज न्यासाचे प्रमुख शिवशंकर पाटील यांनी सर्व उपस्थितांचे सुरुवातीला स्वागत केले. श्री. सुदर्शन जैन यांनी जैन धर्मियांचे सामाजिक न्यास याबद्दल माहिती दिली. श्री संत तुकडोजी महाराज देवस्थान तसेच कागल येथील श्री काडसिध्देश्वर स्वामी मठाच्या प्रतिनिधींसह महाराष्ट्रातील बहुतेक सर्व प्रमुख न्यासांनी आपले प्रतिनिधी आवर्जून पाठवले होते.

५.७ **दि. १७ ऑक्टोबर २०१५ चर्चासत्र सातवे - साहित्य, संस्कृती व कला : सामाजिक पर्यावरण आणि शासकीय धोरण** :

साहित्य - संस्कृती - कलेच्या संवर्धनासाठी समाजात पोषक वातावरण असणे व शासनाने योग्य सांस्कृतिक धोरण आखून अंमलात आणणे आवश्यक आहे. या विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र २०१५ या संकल्पनेखाली १७ ऑक्टोबर २०१५ रोजी नाशिक येथे 'साहित्य, संस्कृती व कला : सामाजिक पर्यावरण आणि शासकीय धोरण' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या सहकार्याने केले होते. नाशिकच्या कुसुमाग्रज स्मारकात हे चर्चासत्र पार पडले.

नाशिक विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री. विनायकदादा पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत केले व कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. नंतर चंद्रकांत कुलकर्णी यांनी 'चित्रपट' या विषयाची मांडणी केली. चित्रपटाला आतापर्यंतच्या शासकीय रचनेमध्ये जसे यशवंतराव चव्हाणांनी करमाफी दिली तसेच कुठेतरी अनुदानाचे पाठबळ नक्कीच आहे ते खूप कमी प्रमाणावर आहे. दुसरी महत्वाची गोष्ट, आता शासनाकडे ज्या प्रकारे सांस्कृतिक खात्याचा पैसा आहे त्याचा विनियोग मात्र नीट होत नाही. त्याचे एकच खात आहे आणि त्या खात्यावरची जबाबदारी जर तुम्ही बघितली तर तिथे कमीत कमी चार IAS माणसे नेमावीत एवढी त्याची जबाबदारी आहे म्हणजे लोक कलाकारांना, निवृत्त कलाकारांना पेन्शनपासून ते दिल्लीला २६ जानेवारीला चित्ररथाची निर्मिती करण्यापर्यंत सगळे आहे. मी याच नाशिकच्या नाटयसंमेलनात, बोललो होतो की, श्राध्दपक्ष केल्यासारखे राज्य नाटयस्पर्धा होते. एक चित्रपट महोत्सव होतो, एक बक्षीस वितरण समारंभ होतो, त्याला जो विनियोग पाहिजे, त्याला जे शासकीय धोरण पाहिजे पाच वर्षांसाठी राबवण्याची काही तरी शिस्त पाहिजे, ती कुठेच होत नाही. शिवाय मग ज्या पक्षाचे सरकार त्या पक्षाच्या जवळच्या माणसांच्या कमिटया. आधीच्या केलेल्या सगळया कमिटया लगेच रद्द. पुन्हा एकदा नवीन कमिटया... हे शासकीय धोरण म्हणजे आपल्या लोकशाहीचे मांडलेले वगनाटय आहे आणि त्या धोरणामध्ये कशी काय कुठे आपण मांडा-मांडी करणार असा प्रश्न त्यांनी विचारला.

कुठल्याही प्रगल्भ समाजामध्ये लेखकाला, कलावंताला महत्व दिले जाते. अशी परिस्थिती आपल्याकडे आहे असे म्हणणे जरा कठीण आहे म्हणजे लेखक काही म्हणतो आणि त्याची सर्वदूर प्रतिक्रिया समाजामध्ये घडते अशी परिस्थिती आपल्या भाषिक संस्कृतीमध्ये नाही आहे. मुद्दा माझ्या दृष्टीने असा महत्साचा आहे की अशा समाजामध्ये जिथे लेखकाचा शब्द गंभीरपणे घेतला जातो तिथे त्या संपूर्ण समाजामध्ये साहित्याची जागा अतिशय वर असते. कारण सामाजिक प्रश्नाच्या वातावरणाच्या संदर्भामध्ये समाज त्याला किती महत्व देईल असे ते एक शस्त्र आहे आणि ते जबाबदारीने वापरले पाहिजे. नुसता साहित्याचा विचार केला तरी साहित्य निर्मितीसाठी साहित्य म्हणजे फक्त कथा, कादंबरी नव्हे किंवा कविता नव्हे नाटक नव्हे, वैचारिक साहित्य, वैचारिक गद्य, कोषवाड.मय या सगळया महत्वाच्या गोष्टी आहेत. चांगल्या प्रकारचे ललित साहित्य निर्माण होण्यासाठी ही ज्ञानाच्या क्षेत्रातली जी सगळी साधने आहेत, विविध ज्ञानशाखांमधले जे ज्ञान आहे, आपल्या भाषेतले असेल, इतर भाषेतले असेल, ते सातत्याने याच्यामध्ये येत राहाण्यासाठी यशवंतरावांनी अतिशय उत्तम बैठक घालून दिलेली होती, असे मी म्हणेन

म्हणजे नुसते साहित्य संस्कृती मंडळ नाही, विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ असे, साहित्य संस्कृती मंडळ असेल, विश्वकोश मंडळ असेल हे सगळे यशवंतरावांनी सुरु केले. चांगल्या आणि गंभीर साहित्याचा वाचक जगभर सगळयाच भाषांमध्ये कमी असतो, तो फक्त मराठीत कमी आहे असा भाग नाही. पण त्याच वेळेला तो वाढला पाहिजे ही एक सामाजिक भूमिका अत्यंत आवश्यक आहे असे प्रतिपादन साहित्य या विषयावरील मांडणीत प्रसिध्द साहित्यिक रंगनाथ पठारे यांनी केले.

चर्चासत्राचे बीजभाषण श्री. संजय भास्कर जोशी यांनी केले. त्यांनी नमूद केले की, साहित्य, संस्कृती व कला : सामाजिक पर्यावरण आणि शासनाचे धोरण हा जरी विषय असला तरी आता कला, साहित्य आणि संस्कृतीमध्ये नाटय, चित्रपट सगीत, चित्रशिल्प म्हणजे माणसाला माणूसपण देणा-या सगळया गोष्टींचा समावेश आहे. आपण जगतो तेव्हा आपल्यातले माणूसपण ख-या अर्थाने जिवंत करणा- या या या गोष्टी आहेत. कला, साहित्य आणि संस्कृती हा विषय अतिशय व्यापक आहे. त्यामुळे या सर्व अंगाना स्पर्श करणे महत्वाचे आहे. पण त्याचबरोबर त्यांनी हे ही आवर्जून सांगितले की, यामध्ये धर्म, अध्यात्म आणि राजकारण यांचा समावेश नाही. आजच्या चर्चासत्रामध्ये आपण स्पेसिफिकली या कलांकडे सांस्कृतिक अंगाने बघणार आहोत. कारण आज अशी अवस्था आहे की, कुठल्याही विषयातून धर्म, अध्यात्म आणि राजकारण याकडे सहज जाता किंवा घसरता येते तर ते आपण टाळू या, त्यामुळे या गोष्टींचा आणि कला, साहित्य आणि संस्कृती या विषयाचा जास्त खोलवरचा अभ्यास होईल असेही मत त्यांनी मांडले. पुढे ते म्हणाले की, सामाजिक पर्यावरण आणि शासनाचे धोकरण असे पुढचे जे कलम आहे यातले ते केवळ यमक नाही तर त्या संस्कृतीचे समृध्द होण्याचे गमक आहे. थोडक्यात समृध्द संस्कृतीसाठी आदर्श सामाजिक पर्यावरण आणि शासकीय धोकरण कसे असायला हवे? What is ideal? की, ज्या सामाजिक पर्यावरणामध्ये आणि ज्या प्रकारच्या शासकीय धोरणामुळे कला, साहित्य आणि संस्कृती ख-या अर्थाने समृध्द होईल आणि ख-या अर्थाने आपल्या सर्वांचे जगणे समृध्द होईल, ते काय असेल? आदर्श समाजिक पर्यावरण आणि शासनाचे धोरण याविषयी प्रथम आपण विचार करावा. भोवतालचे पर्यावरण कसे म्हणजे एकीकडे आपण आदर्श कसे असायला हवे म्हणजे त्यात काय include समाविष्ट आहे, Basically बेसिकली सामाजिक पर्यावरण मी म्हणतो तेव्हा त्यात कुठले कुठले घटक मला अपेक्षित आहेत ते सांगावे आणि मग भवतालचे आहे काय? As against कुठले घटक, ते आदर्श कसे असावेत आणि वास्तव काय आहे याची मांडणी या वक्त्यांच्या भाषणातून होईल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. भोवताली जे पर्यावरण आहे, शासनाचे धोरण आहे तिथून ते आदर्श पर्यावरणापर्यंत जाण्यासाठी काय करावे लागेल की ज्यायोग्य आपले साहित्य, कला आणि संस्कृती ख-या अर्थाने समृध्दीकडे वाटचाल करेल. या तीन दिशांनी आपण चर्चा कराल म्हणजे आदर्श काय असावे. सामाजिक पर्यावरण आणि शासनाचे धोरण भवतालाचे वास्तव काय आहे आणि या दोघात जर काही पोकळी आढळत असेल तर तो कसा भरुन काढता येईल यासाठी काही सकारात्मक सूचना देखील असाव्यात अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

'नाटक' या विषयाची मांडणी करताना नाटककार सतीश आळेकर यांनी महाराष्ट्राच्या १८४३ पासूनच्या नाटय इतिहासाचा आढावा घेतला, नागरी नाटकाची परंपरा नको इतकी नाटककारप्रधान राहिल्याने मराठी रंगभूमी अनेक वर्ष नाटककारांसोवतीच केंद्रीत झाली होती. गेल्या २५-३० वर्षात किंवा स्वातंत्र्योत्तर काळात विजया मेहता आल्यानंतर चंद्रकांत कुलकर्णी पर्यंत किंवा त्यानंतरची पिढी निपुण धर्माधिकारी किंवा आलोक राजवाडे यांच्या पिढीपर्यंत आता दिग्दर्शकीय दृष्टीकोनातून रंगभूमी दिसते आहे. संहितेला दिग्दर्शकीय दृष्टीकोनाचे कोंदण लाभल्याने एक वेगळे परिणाम नजरेस येतो आहे. यामुळे मराठी रंगभूमीचा डिंडीम सगळीकडे वाजतो आहे असे ते म्हणाले. गेल्या ५०-६० वर्षांमध्ये नाटकातल्या व्याकरणाच्या त्रुटींची संवेदना रंगभूमीला जाणवू लागली आहे. नाटकाचे एक व्याकरण विध्द होण्याची गरज आहे असेही आळेकर म्हणाले. 'चित्रकला, शिल्पकला' या विषयाची मांडणी करताना सुहास बहुलकर यांनी या दोन्ही कला वर्तमानात कशा मागे पडत चालल्या आहेत याचा उहापोह केला. शासकीय आणि सामाजिक अशा दोन्ही स्तरांवर या कलांची उपेक्षा सुरु असल्याची व्यथा मांडून बहुलकर म्हणाले, गतकाळातील मौल्यवान कला संपत्तीचे जतनही आज होत नाही. आपण सिडी विकत घेतो, नाटक बघतो, आवर्जून सिनेमा बघतो, यासाठी तिकीट काढतो पण चित्रांच्या प्रदर्शनाला आवर्जून किती जण जातो. आपण खरोबखरच चित्रसाक्षर आहोत का हा विचार केला पाहिजे असे ते म्हणाले. आपण लाखो रुपये खर्चून फ्लॅट घेतो, बंगले बांधतो पण किती

जणांनी चित्र विकत घेऊन घरात लावले आहे असा आणखी एक प्रश्न विचारुन बहुलकरांनी कलावंतांनीही लोकाभिमुखपणे आवश्यक आहे असे सांगितले. समाज आणि कलावंतांमध्ये दरी दूर करतांना सरकारी धोरण बदलण्यासाठी प्रयत्न करावे लागतील असेही ते म्हणाले. डॉ. सत्यशील देशपांडे यांनी संगहताबाबतचा विषय सप्रयोग प्रभावीपणे उलगडून दाखवला. संगीत हे घोडयांच्या शर्यतीसारखे नसते, त्यामुळे त्याची तुलना आणि सरस-निरस ठरवणेही अवघड असते असे आवर्जून सांगितले.

५.८ **दि. २४ ऑक्टोबर २०१५ चर्चासत्र आठवे - नागरीकरणाची आव्हाने** : देशामध्ये एकूणच शहरीकरणाचा वग प्रचंड वाढतो आहे. त्याचबरोबर अनेक समस्या आणि आव्हानेही समोर उभी राहात आहेत. आधुनिक भारताच्या जडण-घडणीमध्ये शहरीकरण अत्यंत महत्वाचा टप्पा राहणार आहे. महाराष्ट्रात आजच ५० टक्के शहरीकरण झाले असून पुढील दशकात ते अधिक वेगाने होईल असे दिसते आहे. पुढील दशकातील शहरीकरणासमोर असणा-या मोठया समस्या आणि आव्हाने यावर विचारविनिमय व्हावा यासाठी 'महाराष्ट्र २०२५ : नागरीकरणाची आव्हाने' या विषयावर २४ ऑक्टोबर २०१५ रोजी नवी मुंबई स्पोर्टस् क्लब, वाशी, नवी मुंबई येथे चर्चासत्राचे आयोजन केले होते.

कार्यक्रमावेळी स्वागत करताना माजी खासदार डॉ. सजीव नाईक यांनी गेल्या चाळीस वर्षातील शहरीकरणाच्या वाढत्या वेगावर चिंता व्यक्त केली आणि त्याची कारणे उपस्थितांसमोर मांडली. नवी मुंबई हे नियोजनबध्द शहर असले तरी प्रचंड स्थलांतरामुळे या शहरालाही आता विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे हे त्यांनी स्पष्ट केले. या चर्चासत्रात नागरीकरणावरील सर्व समस्यांचा उहापोह करण्यात आला.

कार्यक्रमाची भूमिका मांडताना ज्येष्ठ पत्रकार सदा डुंबरे यांनी महाराष्ट्रात जवळ जवळ सर्वच शहरांत उपजीविकेकरिता स्थलांतराचा मोठा प्रश्न आहे हे नमूद को. आगामी १० वर्षात यामुळे शहरांसमोर जी अनेक आव्हाने उभी राहणार आहेत, त्यांचा आपल्यालाच सामना करावा लागेल. हे चर्चासत्र पुढील दहा वर्ष महाराष्ट्राच्या नागरीकरणाला नक्कीच बौध्दिक खाद्य पुरवेल अशी खात्री त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रतिष्ठानचे सरचिटणीस श्री. शरद काळे यांनी हा विषय खूप व्यापक आणि जटील आहे हे स्पष्ट केले. नागरीकरणाच्या बाबतीमध्ये ज्या अनेक पैलूंचा आपल्याला विचार करायचा आहे त्यामध्ये नगरांची उत्पत्ती, स्थिती, व्याप्ती, गती, दिशा आणि भविष्य एवढया पैलूंचा विचार करावा लागेल. कोणत्याही देशाला नागरी आणि ग्रामीण समाजामधल्या परस्परावलंबित्वाचा तोल सांभाळावा लागतो असे सांगितले. तो सांभाळला नाही तर मग अडचणी निर्माण होतात. नागरीकरण आज दोन पध्दतीने होत आहे. एक आकर्षण म्हणून तर दुसरी गोष्ट म्हणजे ग्रामीण भागात जी अभावग्रस्तता आहे आणि काही ठिकाणी अन्याय किंवा विषम समाजरचनेची जी झळ लोकांना लागते त्यामुळे लोक गाव सोडून शहरांकडे धाव घेताना दिसत आहेत आणि यामध्ये आपण जर तोल राखू शकलो नाही तर मग शहरांमध्ये प्रश्न निर्माण होत राहणारच, फक्त गावातून होणारे स्थलांतर याला जबाबदार आहे असे म्हणणे नक्कीच चुकीचे ठरेल. एका प्रक्रियेतून हे प्रश्न निर्माण होत असल्या कारणाने नागरीकरणाच्या आव्हानांचा विचार करताना फक्त शहरांचा विचार करुन चालणार नाही तर संकलित समग्र विचार केला पाहिजे असे मत श्री. शरद काळे यांनी मांडले.

कार्यक्रमाचे उद्घाटन करताना माजी मंत्री गणेश नाईक यांनी नवी मुंबई हे नियोजित शहर घडविताना आलेले आपले अनुभव उपस्थितांसमोर मांडले. खेडेगावात राहून पोट भरत नाही म्हणून आज सारी शहरे वाढताना दिसत आहेत. यावर उपाय म्हणून सर्वांगीण विकासाची गरज आहे असा विकासच शहरावरील ताण कमी करु शकतो. यशवंतराव चव्हाण तसेच श्री. शरदराव पवार यांसारखे अष्टपैलू तसेच विचार व दूरदृष्टी असणारी राजकीय फळी आज तयार झाली पाहिजे असे विचारही त्यांनी व्यक्त केले. आपल्या बीजभाषणात श्री. विद्याधर फाटक यांनी नागरीकरणाकडे आपण नेहमीच समस्या या दृष्टीने पाहत आलो आहोत, पण पुढे बघायचे असेल तर नागरीकरणाकडे एक संधी म्हणून बघणे अत्यंत आवश्यक आहे आणि त्या सकारात्मक दृष्टीकोनातून आपण बघितले तर कदाचित नागरीकरणाला आपण योग्य त-हेने सामोरे जाऊ शकू असे नमूद केले. जसा जसा आर्थिक विकास होत होता तसे नागरीकरणही वाढत गेले. आज जे प्रगत देश आहेत, त्यांच्यातल्या नागरीकरणाचे प्रमाण साधारण ७० ते ८० टक्के आहे आणि जे देश अप्रगत किंवा मागासलेले आहेत त्यांच्यामध्ये मात्र

नागरीकरणाचे प्रमाण ४० ते ३० टक्क्यांपेक्षाही कमी आहे. आज भारतातल्या नागरीकरणाचे प्रमाण ३० टक्क्यांच्या आसपास आहे. मा. शरदराव पवार यांनी २००७ मध्ये असे म्हटले होते की, शेतीवर अवलंबून असलेल्या देशामधला शेतीवरचा अतिरिक्त बोजा कमी करणे, त्यातल्या लोकांना उत्पन्नाचा पर्याय उपलब्ध करुन देणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी शिक्षणाचा विस्तार, गुणवत्ता आणि दर्जा महत्त्वाचा आहे. त्याच्याही पुढे जाऊन असे म्हणता येईल की, त्याकरिता नागरीकरणही तितकेच महत्त्वाचे आहे.

श्री. माधव पै यांनी 'वाहतूक' या महत्त्वाच्या प्रश्नावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. रस्त्यावर दिवसागणिक येणा-या वाहनांची संख्या वाढतच असल्याने वाहतूकीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शहरात शेवटी रस्तेवाढीला काही मर्यादा असतातच, पण वाहनवाढीची मात्र आजच्या घडीला तशी काही व्यवस्था नाही. वाहतूक कोंडी आणि प्रदूषण, मग ते ध्वनी व हवेचे असो, हे प्रश्न खूप गांभीर्याने डोके वर काढत आहेत आणि त्यावर तोडगा काढणे खूपच जिकीरीचे आणि कटकटीचे आहे. कारण आपली सरकारी वाहतूक व्यवस्था अत्यंत उदयनीय आहे. तिच्यात अमूलाग्र बदल झाल्याशिवाय काहीच बदल होणे अपेक्षित नाही. दुसरा पर्याय आहे तो स्वयंप्रेरणेचा. नागरिक जोवर वाहन वापराला पर्याय शोधत नाहीत तोपर्यंत उपाय शक्य नाही पण यासाठी शहराचे इन्फ्रास्ट्रक्चरही तसेच विकसित करणे अत्यंत गरजेचे आहे असे मत श्री. पै यांनी मांडले. प्रा. अमिता भिडे यांनी झोपडपट्टया, अनौपचारिक घरबांधणी आणि परवडणारी घरे या अत्यंत निकडीच्या विषयाची मांडणी केली. अनौपचारिक घरबांधणी हाच एक मोठा प्रश्न झाल्याने तो वेगवेगळया प्रश्नांची निर्मिती करत आहे आणि त्यामुळे त्याच्याबद्दल सांगोपांग चर्चा करण्याची खूप गरज आहे असेही त्या म्हणाल्या. जमीन, जमिनीचे नियोजन, बांधकाम (बांधणी) व वित्त हे गृहनिर्माणामधले चार मुख्य घटक आहेत. त्यासाठी एक चांगले शासकीय धोरण खूपच गरजेचे आहे असे प्रा. भिडे यांनी आपल्या मांडणीत सांगितले. आपण शहर नियोजन करतो आहोत पण त्यात मुलभूत चुका झालेल्या आहेत. गेल्या ६० वर्षांपूर्वी जगभरात जी शहर नियोजनाची तत्वे आणि पध्दती वापरल्या होत्या त्या चुकीच्या होत्या असे आज लक्षात आले आहे. त्या चुका मुख्यतः अज्ञानामुळे, अवैज्ञानिक दृष्टिकोनामुळे आणि चुकीच्या नियोजन पध्दतीमुळे झाल्या आहेत. महाराष्ट्रात आपले शहर नियोजन ६० वर्षांपूर्वीच्या कायद्यावर बेतलेले आहे.

नेहरुंच्या काळात आपण देशासाठी खाजगी आणि सरकारी उद्योगांची मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली होती. त्यानुसार महाराष्ट्र राज्य शासनाने अनेक शहरांजवळ पायाभूत सेवा देऊन औद्योगिक विकासाला चालना देण्याचे प्रयत्न केले. शहराचे नियोजन आणि औद्योगिक वसाहती यांची नीट सांगड घालता आली नाही. १९७०-८० च्या दशकात शहरांचे नियोजन करु शकणारे मनुष्यबळ नव्हते, आजही नाही. शहरांचे विकास आराखडे, प्रादेशिक नियोजन, महाराष्ट्रातले असमान नागरीकरण, शहरांची वाढ, अशक्त नागरी प्रशासन संस्था, सार्वजनिक, समावेशक संस्कृतीचा अभाव, पर्यावरण आणि ऐतिहासिक वारशाची उपेक्षा, शहरातील असुरक्षितता, तोटाग्रस्त सार्वजनिक सेवा, वाहनाची वाढ आणि शहरांचा -हास, बदलती शहरे - आज आपले नियोजन कुठे चुकले आणि त्यासाठी काय करायला पाहिजे हे वरील मुद्दांचा अभ्यास केला तर निश्चित लक्षात येईल. जगात शहर नियोजनाची दिशा बदलते आहे. जे नियोजन सामान्यातल्या सामान्य, गरीबातल्या गरीब नागरीकाची काळजी घेते तेच खरे नियोजन हा नवीन दृष्टिकोन आता जगात मान्य होऊन बिघडलेली शहरे नव्याने घडवली जात आहेत. शहराचे चैतन्य, लोकांचे आरोग्य, सुरक्षितता आणि शाश्वत विकास हा नवीन शहरी मंत्र आहे. शहरांच्या समावेशक नियोजनाची ही नवीन भाषा आपण समजून घ्यायला पाहिजे. लोकांसाठी छान शहरे घडवणे जागतिक निकड आहे. आपणही त्यात भाग घ्यायला हवा असे प्रतिपादन श्रीमती सुलक्षणा महाजन यांनी केले.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी आमदार संदिप नाईक यांनी राज्यकर्त्यांची इच्छाशक्ती, नागरिकांचा सहभाग आणि उत्तम प्रशासन नागरीकरणात महत्वाच्या बाबी आहेत आणि त्यांची योग्य सांगड घातली गेली तर शहराचा विकास उत्तम होणार यात शंका नाही. प्रत्येक नागरीकाचा सहभाग घेवून आपले शहर स्मार्ट कसे करता येईल यावर भर दिला तर नागरहकांचाही उत्स्फूर्त सहभाग मिळाल्याशिवाय राहणार नाही असे वाटते हे शेवटी संदपि नाईक यांनी नमूद केले. यानंतर नवी मुंबईचे महापौर सुधाकर सोनावणे यांनी एखादे शहर स्मार्ट झाल्यावर जर गावेही स्मार्ट झाली नाहीत तर ते नक्कीच शहरांत स्थलांतर करत राहतील आणि त्यांना परवडणारी घरे दिली नाहीत तर झोपडपट्टयांचा प्रश्न हा कधीच निकालात निघणार नाही असे सांगितले. राज्यकर्ते

आणि प्रशासन यांचा मेळ बसणे अत्यंत गरजेचे असून अशी चर्चासत्रे वारंवार झाली तर आम्हा राज्यकर्त्यांचा ब्रेन वॉशही होत राहील व ख-या अर्थाने विकास कशाला म्हणतात व आम्हाला कुठल्या दिशेने जायचे आहे हे आम्हाला कळेल असे श्री. सोनावणे यांनी शेवटी स्पष्ट केले.

नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी नागरीकरणातील विविध समस्यांवर चर्चा करत त्यावर इतर ठिकाणी कसे कसे उपाय अवलंबिले गेले हे उदाहरणांसह मांडले. त्याचा अभ्यास करुन येथील समस्यांवरही तोडगा काढण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे असे ते म्हणाले. घनकचरा व्यवस्थापन या विषयावर श्री. शरद काळे यांनी शहरांना कचरा समस्या, डंपिंग समस्या यावर कसा साधा सरळ मार्ग काढता येऊ शकतो याबद्दल मार्गदर्शन केले. अगदी आपल्या घरापासूनच जर कच-याचे योग्य व्यवस्थापन केले तर महानगरपालिकेवरील कम-याचा भार कसा कमी येऊ शकतो हे अगदी विस्ताराने समजाऊन सांगितले. जनप्रतिनिधींनी पुढाकार घेतल्यास नागरीकांचे समुपदेशन करण्याची तयारी श्री. शरद काळे यांनी दर्शविली. घरातील कचरा जर घरातच शून्य केला तर भारत एक दिवसात स्वच्छ करण्याची ताकत तुमच्यात आहे असा उल्लेखही शेवटी त्यांनी केला.

५.९ **दि. १ नोव्हेंबर २०१५ चर्चासत्र नववे - व्यवस्था आरोग्याची**: या चर्चासत्र मालिकेतील आरोग्यविषयक 'व्यवस्था आरोग्याची' हे चर्चासत्र नागपूरला १ नोव्हेंबर २०१५ रोजी पार पडले. नागपूरचे विभागीय अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांनी त्याचे आयोजन केले होते. आपल्या प्रास्ताविकात गांधी यांनी प्रभावी प्रशासनाची गरज मांडली ते म्हणाले श्री. शरद पवार यांचा हा दृष्टिकोन लक्षात घेऊनच यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे नागपूर केंद्र विविध क्षेत्रातील कार्यक्रम आणि उपक्रमांच्या आयोजनामध्ये पुढाकार घेत असते. आरोग्य क्षेत्रातील राष्ट्रीय प्रश्नांपासून स्थानिक पातळीवरील समस्यांचा उहापोह त्यांनी स्वागतपर भाषणात केला.

प्रतिष्ठानचे विश्वस्त डॉ. समीर दलवाई यांनी प्रास्ताविकपर भाषणात सर्वांसाठी आरोग्य म्हणजे केवळ सरकारी दवाखान्यामध्ये औषध उपचारांची सोय करणे नव्हे असे स्पष्ट केले. आपण जर पोलिओसारख्या आजाराचे उच्चाटन करु शकतो तर या देशामध्ये आरोग्य सेवेचेही नियोजन होऊ शकते असे ते म्हणाले. दैनिक लोकमत चे संपादक सुरेश द्वादशीवार यांनी कुपोषण सगळयाच क्षेत्रामध्ये आहे. सर्वच क्षेत्रातील दारिद्रय आणि आजारांकडे लक्ष देणे आवश्यक आहे असे सांगून आरोग्य क्षेत्रात केवळ रुग्णाला बरे करणे हा दृष्टिकोन योग्य नसून रुग्णच निर्माण होणार नाही याची काळजी घेणे जास्त आवश्यक असल्याचे सांगितले. समाजात एकारलेपण वाढते आहे आणि हाही एक मानसिक आजार आहे अशी टिका त्यांनी केली. महाराष्ट्रात गडचिरोली, नंदूरबार किंवा मेळघाटपेक्षा नागपूरमध्ये कुपोषण जास्त आहे. पण शहरातील कुपोषणाची चर्चा होत नाही अशी मांडणी आम्ही आमच्या आरोग्यासाठीचे डॉ. सतिश गोगुलवार यांनी केले. कुपोषणावर मात करायची असेल तर ती महिलांच्या माध्यमातूनच होऊ शकते असे ते म्हणाले. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार जगाला दरवर्षी २५ लाख कोटी रुपयांच्या औषधांची गरज आहे. मात्र यापेक्षा कितीतरी अधिक प्रमाणात औषधे वापरली जातात आणि त्यामुळे आरोग्याला गंभीर धोके संभवतात अशी धक्कादायक माहिती अन्न व औषध संचालनालयाचे माजी संचालक महेश झगडे यांनी दिली.

महाहे प्रगतराज्य असले तरी आरोग्य आणि आरोग्य सेवांबाबत मागासलेले राज्य आहे. याबाबतीत महाराष्ट्राचा देशात तिसरा क्रमांक लागतो असे सांगून पुण्याच्या जनआरोग्यचे सहसमन्वयक डॉ. अनंत फडके यांनी सार्वजनिक क्षेत्रांचे सक्षमीकरण झाले पाहिजे अशी भूमिका मांडली. सरकारने आपले औषध धोरण जाहीर करावे असेही ते आरोग्य सेवा आरोग्य जन चळवळ या विषयावर बोलताना म्हणाले. डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांनी आरोग्य शिक्षण क्षेत्राविषयी आपले मत मांडले. या क्षेत्रामध्ये मनुष्यबळ वाढविण्याची गरज आहे असे ते म्हणाले. सुरुवातीच्या बीजभाषणात डॉ. श्याम अष्टेकर यांनी प्रत्येक व्यक्तीला आरोग्य सेवा देणे ही त्या देशाची जबाबदारी आहे. आरोग्य सेवा हा नागरहकाचा मुलभूत न्यायिक हक्क व्हायला हवा असे सांगून ते म्हणाले याऐवजी सार्वजनिक आरोग्याच्या मुद्दयावरच अधिक भर दिला जातो हे दुर्दैव आहे. भारतात शेजारील देशातही

आरोग्यसेवेसाठी भारतापेक्षा अधिक खर्च केला जातो. पर्यावरणातील बदल लक्षात घेता भारताने आरोग्य सेवेवरील खर्च वाढविण्याची गरज आहे.

५.१० **दि. ६ नोव्हेंबर २०१५ चर्चासत्र दहावे - उद्योग** : पुणे येथे ६ नोव्हेंबर २०१५ रोजी 'उद्योग' विषयावर चर्चासत्र पार पडले. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीजने चर्चासत्राच्या स्थानिक नियोजनाची जबाबदारी पार पाडली. 'शासनाचे उद्योगविषयक धोरण' या विषयावर बोलताना श्री. अच्युत देशमुख यांनी राज्य सरकारद्वारे उद्योग वाढीसाठी असलेल्या विविध योजनांची माहिती दिली. महाराष्ट्राला आज या क्षेत्रात केरळ, तामिळनाडू, गुजराथ या राज्यांशी स्पर्धा करावी लागत असल्याची जाणीव त्यांनी उपस्थितांना दिली.

भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नामध्ये महाराष्ट्राचा वाटा सुमारे १५ टक्के आहे. महाराष्ट्र त्यात आता मागे पडतो आहे अशी टिका होते. पण मला तसे वाटत नाही असे स्पष्ट करुन श्री. देशमुख म्हणाले आपल्याकडील पायाभूत सुविधा अन्य कोणत्याही राज्यापेक्षा चांगली आहे. इथल्या कामगाराची उत्पादकता, तंत्रज्ञ, उपलब्ध तंत्रज्ञान ही महाराष्ट्राची जमेची बाजू आहे. त्यामुळेच परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यात महाराष्ट्र आघाडीवर असू. २०१५ मध्ये महाराष्ट्राची प्रगती यापेक्षा किती तरी अधिक झालेली असेल अशी आशाही त्यांनी बोलून दाखवली. 'उद्योग व अर्थकारणाचे महत्व' या विषयावर बोलताना अनिल लांबा यांनी उद्योग चालविताना अर्थकारणाचे महत्त्व अधोरेखित केले. वाईट  अर्थकारण चांगल्या उद्योगालाही दिवाळखोरीत नेऊ शकते, एखादे राष्ट्रही दिवाळखोरीच्या दिशेने जाऊ शकते हे त्यांनी समजावून सांगितले. उद्योग क्षेत्रात पैसा कसा जमवावा याबद्दलचे सविस्तर विवेचन त्यांनी केले. 'कौशल्य विकासातून मनुष्यबळाचा विकास' या विषयाची मांडणी करताना श्री. जे. पी. श्रॉफ यांनी मनुष्यबळ विकासासाठी आवश्यक शिक्षणपध्दतीतील बदल आणि प्रशिक्षकांच्या समस्या या विषयी सविस्तर विवेचन केले. लोकांच्या कौशल्याचा विकास ही उद्योगाची जमेची बाजू ठरेल अशा पध्दतीने प्रणाली तयार व्हायला हवी असेही ते म्हणाले. राज्याचा औद्योगिक विकास होत असेल तर त्यासाठी कुशल मनुष्यबळाची गरज भासेल, ती सरकारची जबाबदारी ठरते असेही श्री. श्रॉफ म्हणाले.

'कृषी आधारीत उद्योगांचे भवितव्य' हा विषय मांडताना श्री. यतिन पाटील यांनी महाराष्ट्रातील वाईन उद्योगाची रुपरेखा उपस्थितांसमोर मांडली. या उद्योगासमोरील आव्हाने, कररचनेतील किचकटपणा, सरकारकडून अपेक्षित बसलेल्या मदत सहकार्याचा अभाव त्यांनी मांडला. भारतीय बाजारात होत असलेल्या वाईनच्या पिछेहाटीच्या कारणांची मीमांसाही त्यांनी उपस्थितांसमोर केली. वाईन उद्योगाचा लाभ थेट द्राक्ष उत्पादक शेतक-यांनाच मिळणार असल्याने सरकारने या उद्योगाला प्रोत्साहन देणारे धोरण आखायला हवे. या उद्योगामध्ये विकास दर २५ ते ३० टक्के झाला तरच आपण या उद्योगामध्ये यशस्वी होऊ असेही ते म्हणाले. 'औद्योगिक विकासाचे प्रादेशिक आणि सामाजिक संतुलन' या विषयावर बोलताना उद्योजक मिलींद कांबळे यांनी महाराष्ट्रातील सुरक्षित वातावरणाचा गौरवाने उल्लेख केला. महाराष्ट्र हे रोजगार उपलब्ध देणारे राज्य म्हणून देशात ओळखले जाते. महाराष्ट्राला सामाजिक सुधारकांची मोठी परंपरा आहे. त्यामुळे या राज्यातील औद्योगिक विकासाला गती आणि दिशा आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. वर्तमान परिस्थितीतील काही त्रुटींकडे लक्ष वेधून श्री. कांबळे यांनी महाराष्ट्रात उद्योजकतेचे प्रशिक्षण देणारी एकही संस्था महाराष्ट्रात नाही याबद्दल खंत व्यक्त केली. ख्यातनाम उद्योजक प्रमोद चौधरी यांनी चर्चासत्राच्या सुरुवातीला बीजभाषणामध्ये महाराष्ट्रातील औद्योगि वाढ आणि स्थितीचा सार्थ आढावा घेतला होता.

५.११ **दि. २१ नोव्हेंबर २०१५ चर्चासत्र अकरावे - क्रीडा धोरण च क्रीडा संस्कृती**: 'क्रीडा धोरण आणि क्रीडा संस्कृती' या विषयावर मुंबईत वानखेडे स्टेडियमच्या सभागृहात नामवंत खेळाडूंच्या उपस्थितीत २१ नोव्हेंबर २०१५ रोजी चर्चासत्र पार पडले. प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष हेमंत टकले यांनी श्री. शरदराव पवार साहेबांचा खेळाविषयीचा दृष्टिकोन आणि त्यासंबंधीच्या त्यांच्या आठवणी सांगत या चर्चासत्रामागील आयोजनाचा हेतू स्पष्ट केला. चर्चासत्राच्या नंतरच्या सत्रामध्ये क्रीडा विषयावर चर्चा झाली.  क्रीडा हा शालेय शिक्षणाचा मूलभूत भाग झाल्याशिवाय आपल्याकडील क्रीडा क्षेत्राचा पाया विस्तृत होणार नाही असे प्रतिपादन प्रतिष्ठानचे सरचिटणीस श्री. शरद काळे यांनी प्रस्तावनेत केले.

श्री. भीष्मराज बाम यांनी आपल्या बीजभाषणात क्रीडा संघटनांनात्यांनी कशाप्रकारे काम करावे याचे दिशादिग्दर्शन केले. क्रीडा संघटना एखाद्या पेढीसारखी चालवायची नसते. पैसे अधिक राहायला लागले तर कार्य व्यवस्थित सुरु नाही असे समजावे. कामासाठी पैसे जमवावेत आणि जमले की, ते त्या कारणासाठी खर्च करुन टाकावेत असे ते म्हणाले. प्रत्येक जण आपलाच अहंकार जपत बसला तर क्रीडा क्षेत्रातील प्रगती होणे शक्य नाही. आपण एकत्र असलो तरच कार्य उभे राहते. श्री. शरदराक पवार यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त हा गुण क्रीडा संघटनानी घेतला तरी या क्षेत्रात बरेच काम होईल असेही श्री. बाम यांनी मांडले. खो खो खेळाच्या माध्यमातून भारतीय खेळाचे भवितव्य मांडताना श्री. सतिश देसाई यांनी भारतीय खेळांच्या मार्गदर्शकांना पुरेसे मानधन मिळत नाही याबद्दल खंत व्यक्त केली. अनेक पक्ष छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावे चालतात, त्यांच्या जयंत्या साज-या करतात, पण राज्यकर्त्यांना छत्रपतींच्या नांवे असलेला पुरस्कार द्यायला तीन-तीन वर्ष वेळ मिळत नाही, पण त्याचे त्यांना काहीच वाटत नाही. ही अशी शोकांतिका फक्त याच राज्यात घडू शकते अशी खंत त्यांनी व्यक्त केली. दिवंगत यशवंतराव चव्हाण यांनी १९६८ मध्ये 'महाराष्ट्र हरला तरी चालेल, पण या खेळाचा प्रसार देशभरात झाला पाहिजे' असे विधान केले होते. त्याची आठवण देऊन श्री. देसाई यांनी गेल्या ४७ वर्षात खरेच तसे झाले का? असा प्रश्न उपस्थित केला. खो-खो ची आर्थिक ताकद कमी झाले आहे या खेळाला राज्याश्रय मिळत नाही, संघाची अवस्था डबघाईला आली आहे. क्रीडा शिक्षक नाहीत, पुरस्कार नाहीत असे असंख्य प्रश्न त्यांनी मांडले.

ज्येष्ठ ॲथलिट आदिल सुमारीवाला यांनी ॲथलॅटिक्स विषयाच्या अनेक बाजू या निमित्ताने मांडल्या. २०२० च्या ऑलिम्पिकमध्ये आपण २० सुवर्णपदके मिळवू हा पोकळ बडेजाव आहे असे सुरुवातीलाच स्पष्ट करुन ते म्ळणाले आपण या खेळाच्या कोणत्याच अंगामध्ये अद्यापपर्यंत तेवढीच सुधारणा किंवा प्रगती केलेली नाही. खेळासाठी जो निधी असतो, तो नेमका कुठे जातो हाच प्रश्न आहे. पाच वर्षांपूर्वी जे क्रीडा धोरण जाहीर झाले होते, त्याचे पुढे काय झाले हे कुणालाच माहित नाही. क्रीडा क्षेत्रासंबंधी जी विधाने आपल्याकडे येतात त्याचा दर्जा अगदीच निराशाजनक असतो, जर इनडोअर स्टेडियम म्हणून उभारले आहे ते हॉल खुशाल सभा समारंभांना वापरले जातात मग खेळाडू तयार होणार कसे? ॲथलेटिक्समध्ये जगातील सर्वाधिक देश सहभागी असतात. या क्षेत्रात तीव्र स्पर्धा असते. त्यात यशस्वी व्हायचे तर आपण ग्रामीण भागातील गरीब मुलांकडे पाहायला हवे. त्यातून चांगले ॲथलिट मिळतील. आज गल्लीबोळात मॅरेथॉनचे पेव फुटले आहे. परंतु त्याचा ॲथलेटिक असोसिएशनला काहीही उपयोग नाही. शालेय स्पर्धा, महाविद्यालयीन स्पर्धा, विद्यापीठीय स्पर्धा हा कोणत्याही क्रीडा क्षेत्राचा कणा असतो. आपण त्याकडे गांभीर्याने पाहिले, पुरेसा निधी उपलब्ध करुन दिला तरच या क्षेत्रात भवितव्य आहे असे सुमारीवाला यांनी शेवटी सांगितले.

आंतरराष्ट्रीय नेमबाजपटू अंजली भागवत यांनी आपल्या अनुभवांच्या आधारे या क्षेत्रातील प्रश्न मांडले. २०२५ मध्ये नेमबाजीतील पदकांची संख्या सहावरुन वीसवर जावी अशी अपेक्षा असेल तर सरकार आणि समाज यांनी एकत्रित प्रयत्न केले पाहिजे असे मत त्यांनी मांडले. निवृत्त खेळाडूंना चांगले मानधन देऊन शालेय पातळीपासून प्रशिक्षक म्हणून नेमले पाहिजेत. त्यासाठी क्रिकेटचा आदर्श आपल्यासमोर ठेवला पाहिजे असेही त्या म्हणाल्या. पालकांनी आपल्या मुलाच्या वाढीकडे आवश्यक तेवढेच लक्ष द्यावे, खेळाडूंना वेळच्या वेळी क्रीडा साधने, प्रोत्साहन आणि पुरस्कार मिळावेत, त्यांच्या रोजगाराचीही सोय व्हावी असे सांगून शेवटी श्रीमती भागवत यांनी क्रीडा विद्यापीठाची गरज बोलून दाखवली. श्री. उमेश झिरपे यांनी 'गिर्यारोहण' या विषयाची मांडणी करताना या क्रीडा प्रकाराबद्दल सामाजिक जागृती आवश्यक आहे असे सांगितले. गिर्यारोहण ही जीवनशैली आहे. एक गिर्यारोहक निसर्गाचे खूप मोठे संरक्षण करतो. एखादा अपघात होतो, आपत्ती कोसळते, जिथे अग्नीशमन दल किंवा पोलीस अपुरे पडतात तिथे गिर्यारोहकच कर्तव्यबुध्दीने धावून जातात. या खेळाचे हे सामाजिक अंग लक्षात घेऊन अधिकाधिक लोकांना यात येण्यासाठी प्रोत्साहन द्यायला हवे असे ते म्हणाले.

प्रसिध्द कसोटीपटू पद्‌माकर शिवलकर यांनी क्रीडा धोरण आणि क्रीडा संस्कृती यात आधी काय? असा प्रश्न उपस्थित केला. क्रीडा संस्कृती आधी येते आणि मग धोरण येते असे स्पष्ट करुन त्यांनी यासंदर्भात ऑस्ट्रेलियन क्रिकेटचे उदाहरण दिले. आपल्याकडे क्रिकेटला ग्लॅमर असल्याने बहुतेक पालक आपल्या पाल्यांना क्रिकेट खेळण्यासाठी प्रोत्साहन देतात. एवढया

सगळया मुलांची निवड वरच्या दर्जाच्या संघामध्ये कशी होईल? पण हे पालक समजून घेत नाहीत. कारण ते क्रिकेटकडे खेळ म्हणून पाहत नाहीत. आज क्रिकेट खेळताना मुलांसमोर पैसा असतो, कमाई असते, त्यामुळे खरे क्रिकेट मरते आहे अशी खंतही त्यांनी बोलून दाखवली. या चर्चासत्रातील अखेरचे सत्र ग्रँड मास्टर प्रविण ठिपसे यांनी मांडले. त्यांनी अतिशय आग्रहपूर्वक आणि स्पष्टपणे क्रीडा संस्कृतीबद्दलची आपली मते मांडली. आपल्याकडे सरकार जिमखाना किंवा क्लबना भाडेपट्टीवर मैदाने देते. तिथे सर्वसामान्य मुलाला कधीच प्रवेश मिळत नाही. भारतातील क्रीडा संस्कृतीसाठी सर्वाधिक मारक असलेली अशी ही बाब आहे. युरोपीय देशामध्ये ९० ते ९५ टक्के नागरीक वेगवेगळया माध्यमातून खेळामध्ये सहभागी असतात. आपल्याकडे हे प्रमाण केवळ दिड ते दोन टक्के आहे असे त्यांनी दाखवून दिले. शालेय स्तरावर खेळाला प्रोत्साहन देण्यासंदर्भात त्यांनी शिक्षण महर्षि दादा रेगे यांचे उदाहरण दिले तर शासनाने द्यावयाच्या प्रोत्साहनाबाबत आंध्रप्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांचे उदाहरण दिले. क्रीडा धोरण हे केवळ क्रीडा क्षेत्रातील व्यक्तींच्या विचारविनिमयातूनच तयार व्हावे, त्यावर प्रशासकीय अधिका-यांचे नियंत्रण नसावे असेही त्यांनी आवर्जून सांगितले.

५.१२ **दि. २८ नोव्हेंबर २०१५ चर्चासत्र बारावे - शालेय शिक्षण** : 'शालेय शिक्षण' या विषयावर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आणि रयत शिक्षण संस्था, सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २८ नोव्हेंबर २०१५ रोजी यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, सातारा येथे चर्चासत्र आयोजित करण्यात आले. डॉ. गणेश ठाकूर, सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा यांनी उपस्थितांचे स्वागत केले. शिक्षण विकास मंचचे संयोजक महाराष्ट्रदत्ता बाळसराफ यांनी या कार्यक्रमामागची भूमिका विशद करुन प्रास्ताविक केले. डॉ. निल पाटील, कार्याध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, सातारा यांनी बीजभाषण केले आणि परिषदेचे उद्घाटन केले. डॉ. वसंत काळपांडे, मुख्य संयोजक, शिक्षण विकास मंच यांनी 'शालेय शिक्षणाचा विस्तार, गुणवत्ता आणि समता' या विषयावर प्रतिपादन केले. यापुढील मुख्य सत्राचा विषय होता सत्र 'अभ्यासक्रम, पाठयपुस्तके, अध्ययन-अध्यापन आणि मूल्यमापन प्रक्रिया' या विषयावर तीन तज्ज्ञांची व्याख्याने झाली. सुचेता भवाळकर 'अभ्यासक्रम आणि पाठयपुस्तके' या पैलूवर बोलल्या तर डॉ. अ. ल. देशमुख 'अध्ययन-अध्यापन आणि मूल्यमापन प्रक्रिया' या विषयावर आणि डॉ. योगेश कुलकर्णी 'शालेय शिक्षणात कौशल्य विकास' या विषयावर बोलले.

दुपारच्या सत्रात डॉ. केशव साठये यांनी 'शालेय शैक्षणिक तंत्रज्ञानाचा वापर' या विषयावर अभ्यासपूर्ण मांडणी केली. 'शिक्षक-प्रशिक्षणाच्या नव्या दिशा' या विषयावर शिक्षण विकास मंचच्या विशेष सल्लागार बसंती रॉय आणि डॉ. दिगंबर दुर्गाडे टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशन, पुणे यांची सादरीकरणे झाली. डॉ. वसंत काळपांडे यांनी परिषदेचा समारोप केला. महाराष्ट्रदत्ता बाळसराफ यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बसंती रॉय यांनी केले.

५.१३ **दि. ५ डिसेंबर २०१५ चर्चासत्र तेरावे - विज्ञान आणि तंत्रज्ञान** : मराठी विज्ञान परिषदेचे प्रमुख अ. पा. देशपांडे यांनी या विषयासंबंधी प्रास्ताविकातून विवेचन केले. या चर्चासत्रामध्ये सहभागी झालेल्या सर्व विषयतज्ज्ञांची ओळखही श्री. देशपांडे यांनी करुन दिली. प्रतिष्ठानचे सरचिटणीस श्री. शरद काळे यांनी उपस्थितांचे स्वागत करताना गहन मुलगामी विज्ञानाचे संशोधन आणि त्याचा रोजच्या जीवनामध्ये होणारा उपयोग यामुळे विज्ञान आणि तंत्रज्ञान अत्यंत निकट असतात अशी मांडणी केली. विज्ञान हे गहनगंभीर असल्याने थोडे मागे रहाते. मात्र तंत्रज्ञान डोळे दिपवून टाकणारे असल्याने त्याचीच चर्चा अधिक होते असे विश्लेषण केले.

डॉ. एम. एम. शर्मा यांनी आपल्या बीजभाषणामध्ये ब्रिटीशकाळापासून देशात रुजत गेलेल्या विज्ञानतंत्रज्ञानाची माहिती देताना उद्योग क्षेत्रामध्ये त्याचा कसा वापर झाला हे सोदाहरण सांगितले. उच्च दर्जाच्या विज्ञानाशिवाय तंत्रज्ञान सहजसोपे होऊ शकत नाही असेही ते म्हणाले. डॉ. हेमचंद्र प्रधान यांनी उपस्थितांसमोर वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे काय याची तपशिलवार मांडणी केली. समाजाच्या भल्यासाठी विज्ञानाचा उपयोग घ्यायचा असेल तर नितीशास्त्र आणि विज्ञान यांच्यात सहकार्य आवश्यक आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा वापर करताना सहमतीचे नितीशास्त्र आवश्यक असते असेही डॉ. प्रधान यांनी

सांगितले. समाजहितासाठी वैज्ञानिक विश्लेषणाला सहमतीच्या नितीशास्त्राची, शहाणपणाची आणि सुज्ञतेची जोड द्यावी लागते. जो समाज विज्ञान-तंत्रज्ञानाबरोबरच अशी परिपक्वता आणि सुज्ञता दाखवतो तोच समाज पुढे जातो असेही डॉ. प्रधान यांनी अतिशय आकर्षकपणे मांडले.

'सौरऊर्जा' या विषयावर बोलताना श्री. प्रभाकर देवधर यांनी आजही भारतात ५० कोटी लोकांपर्यंत वीज पोहचलेली नाही या वास्तवाची जाणीव करुन दिली. सौरऊर्जेचा भारताने योग्यरीतीने उपयोग केला तर या सर्व वंचितांना वीज मिळेल आणि त्यांच्या जीवनात फरक पडेल असेही श्री. देवधर यांनी आकडेवारीसह सांगितले. नैसर्गिक साधनांची कमतरता, पर्यावरण, आधुनिक तंत्रज्ञान ते भू-संपादन अशा विविध प्रश्नांना सामोरे जात सरकारला कमी खर्चात वीज उत्पादनाचा प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घ्यावा लागतो असेही त्यांनी बोलण्याच्या ओघात सांगितले. 'विज्ञान, तंत्रज्ञान आणि संशोधन' या विषयाची मांडणी जे. बी. जोशी यांनी केली. जागतिक पातळीवर आघाडीवर नेऊन ठेवेल असे ज्ञान विद्यापीठाने द्यावे, त्यातून जे तंत्रज्ञान निर्माण होईल ते सोपे, स्वस्त आणि सर्स समाजाला उपयुक्त ठरणारे असावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. संशोधनातून येणारे उत्तर सोपे, सगळयांना परवडेल असे आणि लोकांपर्यंत पोहोचलेले असणे आवश्यक आहे हे सांगताना त्यांनी त्या संदर्भातील अनेक उदाहरणे उपस्थितांसमोर ठेवली. भारतामध्ये तरुण पिढीला योग्य मार्गदर्शन मिळाले तर ते अवघडातला अवघड प्रश्न सोडवतात. आपल्या चाळीस वर्षांच्या संशोधनाच्या कारकिर्दीमध्ये आपण एकही प्रश्न अनुत्तरीत ठेवलेला नाही असे त्यांनी आवर्जून सांगितले.

'विज्ञान आणि शिक्षण' या विषयावर बोलताना सुधीर पानसे यांनी विज्ञान शिक्षणाचे महत्व विषद केले. विज्ञान शिक्षणाची भारतात झालेली सुरुवात, त्यातील महाराष्ट्राचे स्थान आणि आताची स्थिती याचा सुंदर विवेचन त्यांनी केले. शिक्षण हा आशेचा एकमेव तंतू आहे. पण सध्या शिक्षणसम्राटांद्वारे होत असलेली वाताहात, हजारोंनी निघालेल्या संस्था आणि शेकडो विद्यापीठे यातून सकस शिक्षणाबाबत चिंता निर्माण झाली आहे असे ते म्हणाले. 'पुढील दहा वर्षातील दिशा दर्शन' या विषयावर बोलताना ज्येष्ठ शास्त्रज्ञ बाळ फोंडके यांनी आज वेगवेगळया क्षेत्रात असलेली प्रगती आणि मरगळीची स्थिती उपस्थितांसमोर मांडली. वैचारिक असहिष्णूता, भारनियमन, विकासविरोधी मानसिकता, आत्मकेंदी वियार, शिक्षणाची पिछेहाट, राजकीय इच्छाशक्तीचा अभाव आणि नैतिक अहंकार या वैगुण्यावर मात करण्यासाठी राष्ट्रीय आत्मपरिक्षणाची वेळ येऊन ठेपली आहे, ते केले तरच महाराष्ट्र २०२५ चे स्वप्न आपण पाहू शके असे ते म्हणाले.

श्री. हेमंत लागवणकर यांनी 'देशी साधनांचा वापर' या विषयावर मार्गदर्शन करताना जे लौकीक अर्थाने शास्त्रज्ञ नाहीत अशा सामान्य माणसांनी केलेल्या संशोधनाचे दर्शन उपस्थितांना घडविले. समाजात असलेल्या अशा धडपडया व्यक्तींच्या कामाला प्रोत्साहन देण्याची गरज आहे. दैनंदिन जीवनातल्या समस्या सोडवितानाच हे संशोधक जन्माला येतात. त्यांच्या कल्पकतेचा वापर समाजाने आणि सरकाने करुन घेतला पाहिजे असे श्री. लागवणकर यांनी आग्रहपूर्वक सांगितले.

## ६. यशवंतराव चव्हाण माहिती तंत्रज्ञान प्रबोधिनी :-

प्रबोधिनीमध्ये सी-डॅक (C-DAC) पुणे व महाराष्ट्र नॉलेज कार्पोरेशन लिमिटेड (MKCL) चे मान्यताप्राप्त अभ्यासक्रम चालतात. सालाबादप्रमाणे अकॅडमीने विद्यार्थ्यांच्या पसंतीचे आणि आवडीचे उपक्रम हाती घेतले. अकॅडमीने नवीन सुरु केलेल्या कोर्सेसचा विद्यार्थ्यांना चांगला उपयोग झाला. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही १० वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी खास उन्हाळी सुट्टीचे वर्ग आयोजित करण्यात आले. उन्हाळी सुट्टीच्या हया वर्गाना विद्यार्थ्यांचा चांगलाच प्रतिसाद मिळाला. ब-याच विद्यार्थ्यांनी मुलभूत संगणक मुलभूत मल्टिमिडिया कोर्सेसमध्ये भाग घेतला. विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार काही खास वर्ग Advanced MS. Excel आणि Advanced Power Point चे भरविण्यात आले.

यशवंतराव चव्हाण माहिती तंत्रज्ञान प्रबोधिनीने (MKCL) चे कोर्स घेण्यासाठी अधिकृत केंद्र म्हणून जानेवारी २०१५ मध्ये मान्यता मिळविली. (MKCL) चे MS-CIT आणि KLiC Certificate कोर्स घेण्यात आले. शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी या कोर्सेसला चांगला प्रतिसाद दिला. (MKCL) च्या मदतीने वाय.सी.पी.ने १० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी

Practice Test च्या वर्गाचे आयोजन केले. त्याचप्रमाणे फॉर्म्युला पुस्तिका आणि Send off KIT देऊन परीक्षेत यश मिळविण्यासाठी शुभेच्छा दिल्या. हा उपक्रम साधारण फेब्रुवारी २०१६ दरम्यान संपन्न झाला. वेगवेगळया विषयावर सेमिनार व कार्यशाळा घेऊन (MKCL) नेटवर्कमध्ये नाव उज्ज्वल केले.

PG-DAC कोर्सची फेब्रुवारी २०१५ ची बॅच १९ फेब्रुवारी २०१५ रोजी सुरु झाली आणि ३० जुलै २०१५ ला संपली. फेब्रुवारी २०१५ च्या डॅक कोर्सच्या विद्यार्थ्यांसाठी प्लेसमेंट प्रोग्राम सुरु करण्यात आला. त्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती वेगवेगळया कंपनीमध्ये नियोजित केल्या गेल्या. ब-याच विद्यार्थ्यांना हया प्रक्रियेद्वारे नोकरी प्राप्त झाली. डॅक कोर्समध्ये अॅडमिशन मिळविण्याकरिता प्रवेश परीक्षा देणे आवश्यक असते. ही प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होता यावी म्हणून माहिती तंत्रज्ञान प्रबोधिनीतर्फे प्री-डॅक कोर्स चालविला जातो.

सी-डॅक (डॅक पूर्व परीक्षा) आपल्या केंद्रात ऑगस्ट २०१५ व फेब्रुवारी २०१६ करिता अनुक्रमे दि. २१ जून २०१५ आणि २८ जून २०१५ तसेच दि. १३ डिसेंबर घेतली गेली. साधारण अनुक्रमे २४० व १४० विद्यार्थी हया परीक्षेला उपस्थित होते. यातून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना डॅक ऑगस्ट २०१५ तसेच फेब्रुवारी २०१६ बॅचमध्ये प्रवेश मिळाला. Certificate Course in Advanced Computing (CCAC) या या कोर्सची बॅच १८ ऑगस्ट २०१५ ला सुरु झाली. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांस बॅंकींग क्षेत्रात चांगल्या हुद्दयावर नोकरी मिळविण्यात ए.आय.टी.ला यश आले.

Diploma in Advanced computer Arts (DACA) सहा महिन्यांचा पूर्ण वेळ कोर्स आहे. बारावी उत्तीर्ण त्याचप्रमाणे ARTS Teacher, Diploma in Drawing अशा तत्सम शैक्षणिक पात्रता असलेल्या विद्यार्थ्यांना कॉमन एन्टरन्स टेस्ट (CET) उत्तीर्ण होऊन या कोर्समध्ये प्रवेश घेता येतो. डिजिटल इमेज इफेक्टस, 2D Animation, 3D Animation, 3D Character Animation, Web Site Designing तसेच Personality Development आणि Job interview preparation हया कोर्समध्ये सहभाग असतो.

DACA कोर्सची बॅच १८ ऑगस्ट २०१५ ला सुरु झाली आणि ३० जुलै २०१५ ला संपली. कोर्सला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांना Web designer, 3D Animator इत्यादी क्षेत्रात नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या.

महिला दिनानिमित्त स्त्रियांसाठी मार्च २०१५ मध्ये खास वर्ग चालविण्यात आले. या वर्गाना महिलांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. या वर्गामध्ये स्त्रियांना इंटरनेटचा वापर त्याचप्रमाणे रेल्वे रिझर्व्हेशन, पेन्शन, Online Chat, सोशल नेटवर्किंग, Online ग्रुप बनविणे हया गोष्टी शिकविण्यात आल्या.

दि. १८ एप्रिल २०१६ रोजी दहावी व बारावीच्या परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मोफत सल्ला व व्याख्यान आयोजित केले होते. वाघे हायस्कूल, सेंट जोसेफ हायस्कूल, बीएमसी माध्यमिक हायस्कूल, सिध्दार्थ कॉलेज, एल्फिन्स्टन कॉलेज या शाळा व महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी या व्याख्यानाला उपस्थिती लावली. दि. १६ मे २०१५ रोजी मातृदिनाचे औचित्य साधून डॉ. विना यार्डी यांचे खास व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानात स्त्रियांच्या व मुलांच्या अनुषंगाने योग्य आहाराबद्दलचे सल्ले दिले.

Java Technology वर मोफत एकदिवसीय कार्यशाळा दि. ११ सप्टेंबर २०१५ ला Datta Meghe College of Engineering मध्ये आयोजित केली होती. त्याला कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला. डॅक फेब्रुवारी २०१५ च्या विद्यार्थ्यांसाठी श्री. अक्षय देशपांडे HR Head, Techprocess यांचे व्याख्यान २७ मे २०१५ रोजी आयोजित केले. AIT च्या सर्व विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घेतला. त्याचप्रमाणे HR Head, HERE MAPS केविन कार्डोज व रुबिना खान यांनी विद्यार्थ्यांना HR Interview Crack करण्यासंबंधी व्याख्यान दिले. What does companies Expects from students या विषयावर श्रीमती मिनाक्षी डेब, HR Head Princeton Blue यांनी १० ऑगस्ट २०१५ रोजी व्याख्यान दिले. त्याचप्रमाणे Team Computers च्या श्रीमती श्रेया यांनी Business Intelligence या Technical विषयावर व्याख्यान दिले. डॅक बॅचच्या विद्यार्थ्यांसाठी सहलीचे आयोजन करण्यात आले होते. त्याचप्रमाणे पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा म्हणून एक निरोप समारंभ व स्नेहभोजन ठेवण्यात आले होते.

गरजू आणि अपंग विद्यार्थ्यांना माफक दरामध्ये शिक्षण उपलब्ध करुन देण्याची संधी AIT ने दिली. अनेक कोर्सेसमध्ये अशा प्रकारच्या विद्यार्थ्यांना पडताळणीनंतर माफक दरात प्रवेश देण्यात येतो. AIT (YCP) तर्फे लष्कर आणि पोलीस खात्यातील व्यक्ती आणि त्यांचे कुटुंबीय यांसाठी फीमध्ये सवलत दिली जाते. इच्छुक आणि शैक्षणिक पात्रता असणा-या विद्यार्थ्यांसाठी हप्त्याने फी भरण्याची सुविधा देण्यात येते. AIT तर्फे PG-DAC कोर्ससाठी मोफत कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या जे विद्यार्थी हा कोर्स उत्तीर्ण झाले.

**ए.आय.टी विशेष** : आपल्या प्रबोधिनीचे विद्यार्थी गेल्या काही बॅचेसमध्ये सर्वोत्तम स्थान मिळवून मुंबईत प्रथम येण्यात यशस्वी झाले. तसेच आपल्या प्रबोधिनीमधून प्रशिक्षण घेतलेले विद्यार्थी सर्वोत्तम Salary package मिळविण्यात सतत पुढे दिसून येत आहेत याचा आम्हाला आनंद आणि अभिमान आहे. वेगवेगळया कार्यक्रमांद्वारे तसेच इतर संस्थांच्या सहाय्याने अधिकाधिक संगणकीय प्रशिक्षण वर्ग चालविणे हेच AIT चे उद्दिष्ट आहे.

## ७. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या सहकार्याने कार्यरत असलेले इतर कार्यक्रम/उपक्रमः

७.१ **प्रथम - मुंबई शिक्षण उपक्रमः** मुंबईत शहरात झोपडपट्टीवासियांच्या मुलांना शिक्षणाची गोडी लागावी म्हणून बालवाडया चालविणे, संगणकांचे प्रशिक्षण देणे, झोपडपट्टीतील स्थानिक रहिवाशांमधून उपक्रमाकरिता शिक्षक - शिक्षिका तयार करणे इत्यादी महत्वपूर्ण कामे प्रथम - मुंबई शिक्षण उपक्रम मार्फत डॉ. माधव चव्हाण व श्रीमती फरिदा लांबे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठया प्रमाणावर केली जातात. संस्थेच्या उपक्रमास प्रतिष्ठानकडून सहकार्य करण्यात येते. या संस्थेस प्रतिष्ठानने केंद्र इमारतीच्या चौथ्या मजल्यावर जागा दिली आहे.

७.२ **युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्सः** युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्सच्या भारतीय विभागाचे सहकार्य प्रतिष्ठानच्या उपक्रमांना लाभत असून महाराष्ट्रातील व्यापार, उद्योग व सहकार या सामाजिक क्षेत्रांच्या भरीव वृध्दीसाठी ते फार महत्वाचे आहे. युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्स इन इंडियाद्वारे निरनिराळया क्षेत्रात प्रकल्प उभारण्यासाठी आर्थिक मदत कशी उपलब्ध करुन घेता येईल, याची माहिती प्रसिध्द केली जाते. या संस्थेस प्रतिष्ठानने केंद्र इमारतीच्या तिस-या मजल्यावर जागा दिली आहे.

७.३ **महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळः** महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ या संस्थेची स्थापना प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ कै. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी सन १९५७ मध्ये केली. ही संस्था महाराष्ट्राचा आर्थिक व औद्योगिक विकास वेगाने आणि संतुलितपणे होण्यासाठी संशोधनाचे कार्य करते. महाराष्ट्रामध्ये उद्योग सुरु करण्यासाठी इच्छुक असणा-या उद्योजकांना सांख्यिकीय माहिती पुरविणे, योग्य निर्णय घेण्यासाठी राज्य शासनाच्या धोरणात्मक निर्णयांची माहिती देणे, चिकित्सक पध्दतीने अधिकृत आकडेवारी पुरविणे तसेच महाराष्ट्रात उपलब्ध असलेल्या उद्योगसंधीविषयी माहिती देण्याचे काम ही संस्था करते. संस्थेतर्फे उद्योजकांसाठी परिसंवाद, परिषदा व कार्यशाळा आयोजित केल्या जातात. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व सदरची संस्था परस्पर सहकार्याने काम करतात. या उपक्रमासाठी महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाला केंद्र इमारतीतील तिस-या मजल्यावरील जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

७.४ **बॉम्बे सिटी पॉलिसी रिसर्च फाउंडेशन (बॉम्बे फर्स्ट)** : बॉम्बे फर्स्ट ही संस्था बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रिज आणि बॉम्बे सिटी पॉलिसी रिसर्च फाउंडेशन या संस्थांच्या पुढाकाराने व औद्योगिक / वाणिज्य क्षेत्रातील अनेक आस्थापनांच्या आर्थिक पाठबळावर १९९५ मध्ये अस्तित्वात आली. या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट मुंबई शहरातील वाढत्या लोकसंख्येचे आव्हान स्वीकारुन येथील पायाभूत सुविधामध्ये विकास करुन नागरिकांच्या राहणीमानाची पातळी उंचावणे, काम करण्याच्या

परिस्थितीत सुधारणा घडवून आणणे आणि भांडवली गुंतवणूकदारांना आकर्षित करणे हे आहे. मुंबई शहराच्या विविध प्रश्नांवर विचार करण्यासाठी शासन, महानगरपालिका व इतर स्वयंसेवी संस्था यांचे समन्वयक म्हणून ही संस्था कार्य करते. संस्थेचा वाढता व्याप लक्षांत घेऊन प्रतिष्ठानने या संस्थेला केंद्र इमारतीतील तिस-या मजल्यावर जागा दिली आहे.

## ८. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई मार्फत देण्यात आलेले अनुदान :-

८.१ **सार्वजनिक उत्सव समिती, नवी दिल्ली :-** सार्वजनिक उत्सव समिती, नवी दिल्ली ही संस्था मा. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रत्येक वर्षी नवी दिल्ली येथे यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह कार्यक्रम आयोजित करीत आहे. यावर्षी मा. चव्हाणसाहेबांच्या पुण्यतिथीनिमित्त दि. २१ ते २९ नोव्हेंबर २०१५ रोजी पर्यंत वेगवेगळे कार्यक्रम आयोजित केले. या कार्यक्रमासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईतर्फे रु.१,२५,०००/- इतकी आर्थिक मदत केली आहे.

८.२ **नॅशनल असोसिएशन फॉर दि ब्लाईंड :-** यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २०१४ ज्येष्ठ उद्योगपती मा. श्री. रतन टाटा यांना सन्मानपूर्वक देण्यात आला होता. पुरस्काराची रक्कम रु.५ लाख त्यांनी न स्वीकारता सदर रक्कम एका उत्कृष्ट कार्य करणा-या विश्वस्त संस्थेला अनुदान म्हणून देण्यात यावी असे दि. २३.४.२०१५ च्या पत्राने कळविले. त्यानुसार प्रतिष्ठानने सदरचे रु.५ लाख National Association for the Blind या संस्थेला अनुदान म्हणून दिले.

८.३ **बालगंधर्व संगीत रसिक मंडळ, पुणे :-** बालगंधर्व संगीत रसिक मंडळ, पुणे यांनी नाटय महोत्सव साजरा करण्यासाठी केलेल्या विनंतीनुसार रु.२,५०,०००/- आर्थिक अनुदान देण्यात आले. त्या प्रीत्यर्थ वरील संस्थेने कराड, जिल्हा सातारा येथे दि. १.६.२०१५ रोजी सौ. वेणुताई चव्हाण यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'संगीत कान्होपात्रा' या नाटकाचा प्रयोग सादर केला. तसेच मुंबईमध्ये दि. २१.११.२०१५ रोजी चव्हाण सेंटरच्या सभागृहात 'संगीत कान्होपात्रा' या नाटकाचा प्रयोग सादर केला.

८.४ **गीता रहस्य ग्रंथाचे शताब्दी वर्ष :-** विभागीय केंद्र कोकणच्या वतीने लोकमान्य टिळकांच्या 'गीता रहस्य' या ग्रंथाचे शताब्दी वर्ष साजरे करण्यासाठी रु.५०,०००/- अनुदान दिले.

८.५ **प्राज्ञ पाठशाळा, वाई :-** प्राज्ञ पाठशाळा, वाई या संस्थेचा शताब्दी उत्सव साजरा करण्याकरिता यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईने रु.५०,०००/- अनुदान दिले.

## ९. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या विभागांमार्फत झालेले कार्यक्रम / उपक्रम :-

९.१ **कृषी व सहकार व्यासपीठ पुणे :-** प्रतिष्ठानच्या कृषी व सहकार व्यासपीठाचे कामकाज पुणे केंद्राचे अध्यक्ष श्री. अजित निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली चालते. तसेच संयोजक म्हणून श्री. शं. त्रि. भिडे काम पहातात.

१.१ **सहकारी संस्था सभासदत्वः-** दिल्ली उच्च न्यायालयाचे सहकारी संस्था सभासदत्वासंबंधीचा रीट पिटीशन क्र. ३६६८, दि. २६.७.२०१२ चे पुनरावलोकन निकालावर दि. २०.३.२०१५ रोजी कृषी सहकार व्यासपीठाचे सभेत चर्चेचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये संस्था उपविधी व कायदा कानूनातील विसंगतीवर भाष्य करण्यात आले. या निकालामध्ये जमीन हा नैसर्गिक संसाधन स्त्रोत असल्याने, त्यास असणा-या मर्यादा लक्षात घेता, उपविधीतील अनैसर्गिक बंधने उदा. त्याच जातीधर्मातील लोकांनाच सभासदत्व देणे कसे अयोग्य असून वारसा हक्क कायदा, नागरिकांचे अधिकार इत्यादी लक्षात घेता अनैसर्गिक बंधने घालणे योग्य नसल्याचे निकालात स्पष्ट केले होते. त्यावर चर्चासत्रात सखोल चिंतन होऊन झोरॅस्ट्रीयन को. ऑप. हौसिंग सोसायटी, अहमदाबाद या प्रकरणातील सुप्रिम कोर्टाच्या २००५ चे निकालाची एकप्रकारे चिरफाडच दिल्ली

उच्च न्यायालयाने या निकालात केल्याचे व निकाल संबंधित व अन्य कायद्यातील तरतूदी तसेच मूलतत्त्व लक्षात घेऊनच देणे कसे आवश्यक आहे हे सदर निकालात स्पष्ट केल्याचे चर्चेमध्ये दिसून आले.

१.२ **ऑडीट फी वाढ** :- शासनाचे आदेशावरुन ऑडीट फी कमी करण्यासाठी सहकार आयुक्तांनी नेमलेल्या चौगुले समितीने गृहनिर्माण संस्थांवर कशी २५० टक्के ते ३३३ टक्के ऑडीट फी वाढ केली यावर सहकार व्यासपीठाने तयार केलेल्या टिपणीवर दि. १६ मे २०१५ रोजी चर्चा करण्यात आली व सहकार आयुक्तांना दि. १६ जुलै २०१५ रोजी प्रस्तावही पाठविला. यामुळे गृहनिर्माण संस्थांवर रु.१५ कोटींचा बोजा वाढल्याने तो कमी करण्यास विनंती केली.

१.३ **गृहनिर्माण सहकारी संस्था बिनविरोध निवडणूक** :- सचिव राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांचेशी चर्चा आणि ज्या क व ड संस्थांच्या निवडणुका बिनविरोध होतात, त्यांच्या वरील निवडणूक खर्च कमी करणेबाबत हौसिंग फेडरेशन प्रतिनिधीं सोबत राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे सचिवांना प्रस्ताव दि. २७.७.२०१५ रोजी समक्ष सादर.

१.४ **गृहनिर्माण संस्था मानवी अभिहस्तांतरण** :- कृषी व सहकार व्यासपीठाचे सभेतील चर्चेस अनुसरुन जिल्हा हौसिंग फेडरेशन, पुणे व सातारा व सचिव सहकारवर्धिनी प्रतिनिधी संयोजक कृषी व सहकार व्यासपीठ यांनी दि. २७.७.२०१५ रोजी श्री. चंद्रकांत दळवी यांची भेट घेऊन चर्चा केली. आता सदर विषयावरील प्रस्ताव मा. सचिव, गृह विभागाला सादर झाला असून सहकारी गृहनिर्माण संस्थांना अशा प्रकरणी सादर करावयाची कागदपत्रे कमी करण्याची शिफारस करण्यात आल्याचे समजते.

१.५ **गोदावरी खोरे प्रकल्प आराखडा** :- दि. ५ सप्टेंबर २०१५ रोजी डॉ. दि. म. मोरे, माजी मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग आणि गोदावरी खोरे प्रारुप आराखडयाचे माजी प्रमुख यांचे व्याख्यान आयोजित केले. डॉ. मुकुंदराव गायकवाड, कुलगुरु, अरविंद कृषी विद्यापीठ, नागपूर हे अध्यक्षस्थानी होते. सदर विषयावरील चर्चेतील सूचनांचे अनुषंगाने श्री. अंकुशराव काकडे यांचे सहीने सचिव, जलसंपदा विभाग यांना सूचनांचा प्रस्ताव सादर केला

१.६ **सहकार कायदा कलम १४ दुरुस्तीनुसार कार्यवाहीची मागणी** :- याबाबत दि. ८ ऑक्टोबर २०१५ रोजी एक चर्चासत्र आयोजित केले होते. त्यामध्ये ज्या उद्देशाने सहकार कायदा कलम १४ मध्ये जेव्हा एखाद्या सहकारी संस्था उपविधीतील तरतूदी कायदा कानूनशी व शासकीय धोरणाशी विसंगत असल्याचे आढळून येते तेव्हा त्या सक्तीने बदलण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्याबाबत सालसेट को. ऑ. उपविधी दुरुस्ती प्रस्ताव आयुक्तांकडे २२ सप्टेंबर २०१५ ला सादर झाला होता. त्यावर चर्चा करुन त्याबाबतचा पाठपुरावा व्हावा असे चर्चेत ठरले. चौकशी अंती नुकतेच संस्थेस आपले उपविधी बदलण्याबाबतच्या सूचना संबंधित उपनिबंधक सहकारी संस्था, बांद्रा (पश्चिम) यांना दिल्या असल्याचे समजते.

१.७ **प्रसिध्दी** :- श्री. शं. त्रिं. भिडे, संयोजक, कृषी व सहकार व्यासपीठ यांचे सहकार विषयाचे तेरा लेख महाराष्ट्र को. क्रेडीट न्यूज पुणे, बँकींग आशय अभिप्राय पुणे सहकारी महाराष्ट्र पुणे, वनराई पुणे, महाराष्ट्र टाइम्स पुणे ५.१.२०१६, महाराष्ट्र कृषी वर्धिनी, दैनिक ॲग्रोवन यामध्ये प्रसिध्द करण्यात आले. त्याशिवाय इंडियन सोसायटी फॉर स्टडीज इन को. ऑपरेशन या संस्थेचे म्हैसूर येथे झालेल्या वार्षिक अधिवेनशनासाठी ग्रोथ ऑफ को. ऑपरेटीव्ह इन महाराष्ट्र बिफोर ॲन्ड ऑफ्टर लीबरलायझेशन हा निबंध सादर करण्यात आला.

**१.८ कृषी विषयावरील व्याख्याने**:- बळीराजा शेतकरी मंडळ आाणि कृषी व सहकार व्यासपीठ यांचे विद्यमाने कृषी विषयावरील एक चर्चासत्र नामवंत व्याख्यात्यांना बोलावून दरमहा पहिल्या शनिवारी घेतले जाते. त्यात टिश्यूकल्चर, हरित

रसायनशास्त्र, भाताच्या लागवडीचे तंत्रज्ञान, सेंद्रिय शेती, गोदावरी खोरे प्रारुप आराखडा, वनशेतीतील चंदन लागवड, पाणी आडवा हावरटपणाने, वापरा विवेकाने, शेतमाल बाजार सुधारणा, मातीविना परसबाग, दुष्काळात जनावरे जगवायची कशी? संजीवन कृषी पध्दती या विषयावर व्याख्याने व त्यावर चर्चा घेण्यात आल्या.

१.९ **निवडणूक वर्ग क आणि ड मधील सहकारी संस्था निवडणुका** :- दि. २ जानेवारी २०१६ रोजी या विषयावर एक चर्चासत्र आयोजिण्यात आले होते. त्यातील चर्चेस अनुसरुन गृहनिर्माण व अन्य संस्थातील बिनविरोध निवडणुकीसाठी निवडणूक फी मोठया प्रमाणात कमी करावी असा प्रस्ताव श्री. अंकुशराव काकडे यांचे सहीने श्री. मधुकरराव चौधरी, आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांना सादर करण्यात आला.

**१.१० सहसभासद/संयुक्त सभासद आणि सहयोगी सभासद** :- सहकार कायदा कलम २(९)(बी) मध्ये सहयोगी सभासदाची व्याख्या दिली आहे. त्यांत अशा सभासदांना मूळ सभासदाचे गैरहजेरीत मते देण्याचा अधिकार दिला आहे. तर कलम १६५(२)(९) मध्ये सह/संयुक्त सभासदाचा उल्लेख असून त्यांना सभासद करुन घेण्यासंबंधी नियम करावेत असा उल्लेख आहे. सह/संयुक्त सभासद हा मालमत्तेमध्ये हक्कदार आहे. अशाप्रकारे या दोन प्रकारचे सभासदांना कायद्यात स्वतंत्र अस्तित्व व अधिकार असतांना चुकीने असोसिएट (सहयोगी) सभासद यालाच सह/संयुक्त सभासद करणेचा प्रयत्न शासनाकडून झाला. चूक लक्षांत आल्यावर शासनाने ती दुरुस्त केली. मात्र सहकार आयुक्त स्तरावर त्याबाबत दि.१२.१.२०१६ रोजी प्रस्ताव पाठवून व पाठपुरावा करुनही प्रकरण लालफितीतच अडकून आहे.

**१.११ आदर्श उपविधी** :- गृहनिर्माण संस्थांचे आदर्श उपविधीसंबंधी कृषी व सहकार व्यासपीठाच्या पाच सभा घेतल्या व त्यांत कायदा कानूनशी विसंगत अशा काही तर शुध्दलेखन व मुद्राराक्षसाच्या अनेक अशा एकूण १४४ सुधारणा वेळोवेळी सुचविल्या आहेत त्याचा पाठपुरावा चालू आहे.

## ९.२ महाराष्ट्र महिला व्यासपीठ :

महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या वतीने महिलांची शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक विविध दृष्टीने सक्षमता वाढावी यासाठी विविध उपक्रम, विविध कार्यशाळा आणि इतर कार्यक्रम यांच्या माध्यमातून कृतीशील प्रयत्न केले जातात. महिला व्यासपीठाचे काम संयोजिका श्रीमती रेखा नार्वेकर, कार्यकारी संयोजिका श्रीमती ममता रमेशचंद्र कानडे या पाहतात.

२.१ **सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापक प्रशिक्षण :-** मुंबई मध्ये २० ते ४० हजार सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. या सर्व संस्थांचे काम चांगले होण्यासाठी शासनाचे कायदे किंवा उपविधी लोकांना माहित असणे आवश्यक आहे हे लक्षात घेऊन महाराष्ट्र महिला व्यासपीठातर्फे जून २०१० सालापासून केंद्र इमारती मध्ये ‘सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापक प्रशिक्षण’ दिले जाते. या कार्यशाळेला श्री. प्रभाकर चुरी, श्रीमती देवयानी गोरे, ॲड. प्रमोद कुमार, श्री. विजय सामंत व सहकारी क्षेत्रातील इतर मान्यवरांचे मार्गदर्शन मिळते. या कार्यशाळेचे फायदे म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्थेत पूर्णवेळ / अर्धवेळ नोकरी मिळू शकते. तसेच हे प्रशिक्षणार्थी सल्लागार म्हणूनही चांगले काम करु शकतात. तसेच आपल्या स्वतःच्या राहत्या सोसायटीत मॅनेजिंग कमिटीत चांगले काम करु शकतात. तसेच सामाजिक ज्ञान / भान याची जाणीव होते. आतापर्यंत २० ते अगदी ७० वर्षांच्या व ५०० च्या वर प्रशिक्षणार्थिनी हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. त्यांना परीक्षा घेऊन प्रमाणपत्र देण्यात येते.

सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन वर्ग क्र. १३ व १४ चा प्रमाणपत्र वितरण सोहळा दि. १८.४.२०१५ रोजी अप्पर मुख्य सचिव (कृषी व पणन) डॉ. सुधिर गोयल यांच्या हस्ते संपन्न झाला. या कार्यक्रमाचे औचित्य साधून श्री. मिलिंद मुंगळे

यांचे 'मृत्यूपत्र सहज व सुलभ' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान ठेवले. लोकांच्या मृत्यूपत्राविषयीच्या ब-याचशा शंकांचे निरसन झाले. तसेच जुलै ते सप्टेंबर महिन्यात या कार्यशाळेचे वर्ग क्र. १५ व १६ ही पूर्ण झाले व फेब्रुवारी महिन्यात या कार्यशाळेचा १७ वा वर्ग पूर्ण झाला.

२.२ **मंजिरीच्या झटपट रांगोळया व रांगोळी काढायच्या सोप्या व विविध पध्दती :-** रांगोळी म्हणजे प्रसन्नता, सकारात्मकता व भारतीय संस्कृतीचे कलात्मक प्रतिबिंब म्हणूनच महाराष्ट्र महिला व्यासपीठातर्फे 'मंजिरीच्या झटपट रांगोळया व रांगोळी काढायच्या सोप्या व विविध पध्दती' या कार्यशाळेला सततच्या वर्गांना मिळालेल्या भरघोस प्रतिसादामुळे व खास आग्रहास्तव पुन्हा एकदा एकदिवसीय कार्यशाळा दि. २० मे २०१५ रोजी आयोजित करण्यात आली.

२.३ **छत्रीवर ॲक्रेलिक रंगाचे प्रशिक्षण :** छत्रीवर ॲक्रेलिक रंग वापरुन स्वतः रंगकाम केलेल्या छत्रीची पावसात मजा काही औरच असते याचा अनुभव या प्रशिक्षणात लोकांनी घेतला. २५ जून २०१५ रोजी ही कार्यशाळा घेण्यात आली. वेगवेगळे रंग वापरुन लोकांनी आपापल्या छत्र्या कलात्मक पध्दतीने रंगविल्या.

२.४ **वर्तमानपत्रांपासून बास्केट, टेराकोटा दागिने व पेपर क्विलिग तयार करण्याचे प्रशिक्षण :-** श्री गणेश चतुर्थीच्या निमित्ताने वर्तमानपत्रापासून तयार केलेली बास्केट, टेराकोटा दागिने व पेपर क्विलिग कला या माध्यमाने गणेशाचे स्वागत आणि आरास कशी करावी या आगळया वेगळया प्रात्यक्षिकाचे आयोजन दि. २४ ऑगस्ट २०१५ रोजी करण्यात आले. ४६ महिलांनी या प्रात्याक्षिकाचा लाभ घेतला व वरील कार्यशाळांसाठी नोंदणी केली. त्याप्रमाणे दोन ते तीन दिवसांच्या पेपर बास्केट, टेराकोटा दागिने, पेपर क्विलिग, गिफ्ट रॅपिंग व ग्लास पेन्टींग या कार्यशाळा घेण्यात आल्या. महिलांनी आपआपल्या आवडीप्रमाणे वेगवेगळया प्रतिकृती बनविल्या.

२.५ **अंडे व अंडयाशिवाय ब्राऊनी, कुकीज आयसिंगचे प्रशिक्षण :-** नाताळचे औचित्य साधून १० डिसेंबर रोजी बेकरी प्रात्यक्षिक ठेवण्यात आले. अंडे व अंडयाशिवाय ब्राऊनी, कुकीज आयसिंगचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. ६० महिलांनी या प्रात्यक्षिकाचा फायदा घेतला. श्री. अंजुम पीरभॉय यांनी बेकिंग व आयसिंगबाबतीत मार्गदर्शन केले.

२.६ **जागतिक महिला दिन :** जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने श्रीमती माधवी नानल यांचे शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम ठेवण्यात आला.

सर्व कार्यक्रम व प्रशिक्षण यांचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे :

| दिनांक | विषय व प्रशिक्षण | उपस्थिती |
|---|---|---|
| १८.४.२०१५ | इझी विल विनामूल्य व्याख्यान | ७५ |
| २०.५.२०१५ | रांगोळी | १२ |
| १३.६.२०१५ ते २.८.२०१५ | सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन प्रशिक्षण वर्ग क्र. १५ शनिवार / रविवार | |
| २५.६.२०१५ | छत्रीवरील रंगकाम | १५ |
| ३.८.२०१५ ते ९.९.२०१५ | सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापक वर्ग १६ नियमित | २६ |
| २४.८.२०१५ | छंद वर्ग प्रात्यक्षिक | ५० |
| ३.९.२०१५ व १०.९.२०१५ | पेपर बास्केट | २३ |
| ४.९.२०१५ व ९.९.२०१५ | पेपर क्विलिंग | २० |

| | | |
|---|---|---|
| ५.१०.२०१५ व ८.१०.२०१५ | टेराकोटा ज्वेलरी | १८ |
| २०, २३ व २६.९.२०१५ | गिफ्ट रॅपिंग | १० |
| २१.१०.२०१५ व २९.१०.२०१५ | ग्लास पेंटींग | १५ |
| १०.१२.२०१५ | बेकरी प्रात्यक्षिक | ६० |
| १.२.२०१६ ते ४.३.२०१६ | सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन प्रशिक्षण वर्ग-१७ | २७ |
| ८.३.२०१६ | माधवी नानल शास्त्रीय गायन | ५० |

## ९.३ नवमहाराष्ट्र युवा अभियान :-

नवमहाराष्ट्र युवा अभियानचे काम संयोजक श्री. दत्ता बाळसराफ, सहसंयोजक श्री. विश्वास ठाकूर व संघटक श्री. नीलेश राऊत हे पाहतात.

३.१ **'आकलन महाराष्ट्राचे' तीन दिवसीय अभ्यास शिबीर दि. २२, २३ आणि २४ मे २०१५ पुणे** :- नव महाराष्ट्र युवा अभियानतर्फे युवांसाठी अभ्यास शिबीरे आणि कार्यशाळांचे नियमित आयोजन केले जाते. याचाच एक भाग म्हणून 'आकलन महाराष्ट्राचे' या तीन दिवसीय अभ्यास शिबिराचे आयोजन केले. शिबिरामध्ये सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणा-या तसेच संबंधित विषयाचे अध्ययन, चिंतन करणा-या निवडक युवांना नोंदणी प्रक्रियेद्वारे प्रवेश देण्यात आला. शिबिरास महाराष्ट्राच्या अनेक जिल्हयांतील विविध विषयांवर विविध संस्थांसोबत काम करणारे ८० युवा उपस्थित होते.

ज्येष्ठ पत्रकार श्री. पद्मभूषण देशपांडे आणि श्री. दत्ता बाळसराफ यांनी शिबीराची आखणी केली. सामाजिक क्षेत्रामध्ये कार्यरत असणा-या युवांना सर्वप्रथम महाराष्ट्राची नीट ओळख होणे आवश्यक आहे. एखाद्या वैचारिक चष्म्यातून महाराष्ट्र न पाहता महाराष्ट्रातील समाजजीवन समजावून घेणे, विविध दृष्टिकोनांची माहिती असणे आवश्यक ठरते. हे उद्देश समोर ठेवून शिबीराची आखणी केली गेली. त्यामध्ये पहिल्या दिवशी 'महाराष्ट्राचे धर्मजीवन', दुस-या दिवशी 'महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी' आणि तिस-या दिवशी 'निवडणूकांचे राजकारण' अशा सूत्रानुसार ज्येष्ठ विचारवंत आणि अभ्यासकांनी वेगवेगळया विषयांची मांडणी केली.

**दिवस पहिला - महाराष्ट्राचे धर्मजीवनः** ज्येष्ठ पत्रकार श्री. सदा डुंबरे यांनी या तीन दिवसीय शिबीराचे उद्घाटन केले. उद्घाटन पर सत्रात बोलताना श्री डुंबरे यांनी पत्रकारिता करत असतांना महाराष्ट्र नावाचा हा ऐवज समजून घेणे किती महत्वाचे ठरते याची गरज अधोरेखित केली. महाराष्ट्र समजून घेताना इतिहास, भूगोल, साहित्य, संस्कृती हे वेगवेगळे ठिपके एकत्रित जोडले गेले तर महाराष्ट्राचे आकलन होण्यासाठी मदत होईल असे सांगितले. महाराष्ट्राची एकूण प्रकृती संयत, मध्यममार्गी, विवेकाचा दोर हातातून न सोडलेली अशी आहे. स्वातंत्र्य चळवळीतले महाराष्ट्राचे योगदान कोणीही नाकारु शकणार नाही असेही त्यांनी यावेळी सांगितले.

पहिल्या सत्रात बोलताना अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांनी संतपरंपरा उलगडून सांगितली आणि त्याचबरोबर इतर समकालीन प्रवाहांची माहिती दिली. लोकसंग्रहाची भूमिका वारकरी संप्रदायाने घेतल्याने तो महाराष्ट्रात अधिक रुजला. वारकरी संप्रदाय, नाथ संप्रदाय, रामदासी परंपरा यांनी महाराष्ट्राच्या समाजमनाची जडणघडण कशी झाली याची व्यापर मांडणी केली. वैदिक किंवा हिंदू म्हणवल्या गेलेल्या धार्मिक विचारांसोबतची या संप्रदायांची देवाणघेवाण आजच्या अभ्यासकांना आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी समजून घेणे कसे आवश्यक आहे हे त्यांनी अधोरेखित केले.

डॉ. आ. ह. साळुंखे यांनी महाराष्ट्रामधील जैन परंपरा उलगडून सांगताना जैन समाजाची अधिक लोकसंख्या असणा-या जिल्हयांतील जैन समाजातील लोकांचे सामाजिक जीवन व त्यांचे योगदान याबाबत मांडणी केली. बौध्द धर्माची विस्ताराने मांडणी करतांना भारतातील व महाराष्ट्रातील आज असणा-या विविध पथांमध्ये, संप्रदायांमध्ये व धर्मामध्ये बौध्द व जैन

संप्रदायाची शिकवण कशा प्रकारे आत्मसाद केली आणि व्यवहारात आणण्याचा प्रयत्न केला याबाबत मांडणी केली. श्री. अनिल दहिवाडकर यांनी भारतामध्ये ख्रिस्ती धर्मप्रचारकांद्वारे आलेले बदल जसे शाळा, छापखाना इत्यादी गोष्टींचा उल्लेख करुन ख्रिस्ती धर्माचे वैचारिक योगदान याबाबत विवेचन केले. आजच्या महाराष्ट्रातील ख्रिस्ती समाजाची धार्मिक समजूत आणि आचार याबाबत देखील त्यांनी विवेचन केले.

**दिवस दुसरा - महाराष्ट्रातील सामाजिक चळवळी:** श्री. राजीव साने यांनी महाराष्ट्राचा इतिहास आणि सामाजिक चळवळी समजवून घेत असतानाच आजच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीचे भान असण्याची गरज अधोरेखित केली. त्यांनी जागतिक पटलावरील बदलत असणारी आर्थिक परिस्थिती आणि विचार मांडून आजच्या परिस्थितीचे विवेचन केले. त्याचबरोबर महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांच्या विचारांची दिशा ही भविष्यवेधी असावी यावर भर दिला. श्री. जयदेव गायकवाड यांनी आंबेडकरी चळवळीबद्दल मांडणी करताना चळवळीची वैचारिक विस्ताराने सांगितली. त्याचबरोबर महाराष्ट्रातील सामाजिक, राजकीय घडामोडी आणि आंबेडकरी चळवळ यांचे परस्परांवरील प्रभाव याबाबत आपले मत व्यक्त केले. श्री. अजित अभ्यंकर यांनी साम्यवाद आणि कामगार चळवळीचा इतिहास मांडला. आज मोठया प्रमाणात असणा-या असंघटीत कामगारांपर्यंत कामगार चळवळ पोहचत नाही. पण त्याचबरोबर कामगारांपुढील अनेक समस्या लक्षात घेता या चळवळीची बदलत्या काळात देखील कशाप्रकारे गरज आहे याचे विवेचन केले. शिबीराच्या संध्याकाळी विंदांच्या कवितांवर आधारीत 'विंदांची त्रिपदी' हा कार्यक्रम श्री. आनंद करंदीकर आणि श्रीमती सरीता आव्हाड यांनी सादर केला. श्रीमती करुणा गोखले आणि स्त्रीचळवळीची भूमिका विस्ताराने मांडली. व्यवहारामध्ये वेगवेगळया पातळयांवर दिसून येणारी स्त्री-पुरुष असमानता आणि त्याबाबत स्त्रीचळवळीचा दुष्टिकोन त्यांनी उदाहरणांसह समजावून सांगितला.

**दिवस तिसरा - निवडणूकांचे राजकारण :** डॉ. सदानंद मोरे यांनी स्वातंत्र्यपूर्व काळातील निवडणूका, टिळक-गांधी युग याबद्दल उपस्थितांना माहिती दिली. पगडी-गांधी टोपी याचा रंजक इतिहास उलगडून सांगताना त्या काळातील संदर्भ त्यांनी चपखलपणे दिले. ब्रिटीशांची राजवट, महाराष्ट्रातील वेगवेगळे प्रवाह, संयुक्त महाराष्ट्र चळवळ महाराष्ट्रातील महत्वाचे नेते त्याचा राज्यातील राजकारणावर असलेला प्रभाव याचीही माहिती दिली. प्रा. शैलेंद्र खरात यांना स्वातंत्र्योत्तर काळातील राजकारण, १९५२ नंतरच्या निवडणूका ७० च्या दशकातले बदलते राजकारण ते आताच्या सोशल मिडियाची व्याप्ती असणारे राजकारण याची माहिती दिली.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा खासदार सौ. सुप्रिया सुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिबीराचा समारोप झाला. यावेळी बोलताना सौ. सुप्रिया सुळे यांनी दिल्लीतील राजकारणात महाराष्ट्राचे नेमके आज स्थान काय हे सांगितले. राज्याराज्यात असलेल्या स्पर्धा, महाराष्ट्राची बदलती ओळख याचे महत्व त्यांनी अधोरेखित केले. अशा प्रकारच्या कार्यशाळा आगामी काळात यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सातत्याने आयोजित करेल आणि त्यातून नव्या पिढीला महाराष्ट्राचे समग्र आकलन होण्यास मदत होईल. खरा इतिहास समजून घेता येईल असेही त्यांनी यावेळी सांगितले. श्री. दत्ता बाळसराफ यांनी आगामी काळात महाराष्ट्रातील राजकारण, स्त्री-पुरुष विषमता, मराठी भाषा कला व साहित्य संस्कृती याबद्दल कार्यशाळा आयोजित करण्याचा मनोदय व्यक्त केला. ज्येष्ठ पत्रकार श्री. पद्मभूषण देशपांडे यांनी तीन दिवसीय शिबीराचा आढावा घेतला. नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे संघटक श्री निलेश राऊत यांनी सर्वांचे आभार मानले.

३.२ **१८ जुलै - चाळीस वर्षानंतर 'सामना' आजही तरुण असल्याचा सूरः**- 'सामना' ची चाळीशी : 'सिनेमा व चर्चा' या कार्यक्रमातून पुढे आला. सामना या चित्रपटाला चाळीस वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने चित्रपट चावडी व सम्यक संवाद फिल्म क्लबच्या वतीने यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे या चित्रपटाचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या सिनेमाबाबत या

चित्रपटाचे निर्माते श्री. रामदास फुटाणे, चित्रपट समीक्षक श्री. अशोक राणे आणि अभिनेते-दिग्दर्शक श्री. नंदू माधव यांनी उपस्थितांशी संवाद साधला. विजय तेंडुलकर लिखित, डॉ. जब्बार पटेल दिग्दर्शित, रामदास फुटाणे निर्मित आणि निळू फुले, डॉ. श्रीराम लागू, स्मिता पाटील, मोहन आगाशे अभिनित 'सामना' सिनेमाला या वर्षी ४० वर्षे पूर्ण झाली. महाराष्ट्राच्या ग्रामीण राजकारणातील सहकार साम्राज्याच्या दहशतीचे पैलू उलगडणा-या या सिनेमाने तेव्हा खळबळ उडवली होती. बेरकी नेता, सहकार सम्राट हिंदूराव (निळू फुले) व या सम्राटाच्या विरुध्द उभा राहिलेला फाटका मास्तर (डॉ. श्रीराम लागू) यांच्या अभिनयाची अप्रतिम जुगलबंदी हेही या सिनेमाचे एक मोठे वैशिष्टय आहे. चर्चेच्या या कार्यक्रमाचे संचालन श्रीमती उल्का महाजन व श्री. दत्ता बाळसराफ यांनी केले.

३.३ **युवा स्वातंत्र्यज्योत रॅली :-** दिनांक १४ ऑगस्ट २०१५ रोजी स्वातंत्र्य दिनाच्या पूर्व संध्येला राष्ट्रपुरुषांना अभिवादन करण्यासाठी व तरुणांमध्ये स्वातंत्र्यदिनाविषयी आदराची जाणीव व जागृती निर्माण व्हावी यासाठी नवमहाराष्ट्र युवा अभियान आयोजित युवा स्वातंत्र्यज्योत रॅलीचे भव्य स्वरुपात आयोजन करण्यात आले. सहभागी तरुण-तरुणींचे व प्रमुख पाहुणे श्री. नरेंद्र राणे (अध्यक्ष, श्री सिध्दीविनायक गणपती मंदिर न्यास) यांचे स्वागत झाल्यानंतर स्वातंत्र्य मिळवण्यासाठीअनेक स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. आपल्या संसार, घरादाराची पर्वा न करता स्वातंत्र्याच्या वेलीवर आपला बळी दिला. अशा शौर्य व त्यागातून आपल्याला आजचे स्वातंत्र्य मिळाले आहे. अशाप्रकारे स्वातंत्र्यदिनाचे महत्व विषद करण्यात आले. यासोबत महाराष्ट्रातील खालील इतर शहरांमध्ये देखील स्वातंत्र्यज्योत रॅलीचे आयोजन करण्यात आले. पुढील सर्व शहरांमध्ये युवांनी स्वातंत्र्य ज्योत रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला व मोठया संख्येने युवा या रॅलीमध्ये सामिल झाले. यवतमाळ - विवेक गावंडे, राहुल कानारकर, अकोला - अविनाश चव्हाण, अमरावती - सुशिल गावंडे, परभणी - सुमंत वाघ, मंगेश उबाळे, धुळे - विजय महाले, सोलापूर - दिनेश शिंदे, डोंगरकडा - शिवाजी गावंडे, वसमत - नामदेव दळवी, अंबेजोगाई - डॉ. नरेंद्र काळे, नेताजी साळुंके, नाशिक - विश्वास ठाकूर, भूषण काळे, वैभव गांगुर्डे, गडचिरोली - लीलाधर भराडकर, नागपूर - अभिजीत राऊत, जगदीश पंचबुध्दे, निशिकांत काशीकर.

३.४ **यशवंत युवा फेलोशिप :-** घसरलेली शैक्षणिक गुणवत्ता, अपु-या शैक्षणिक सोयीसुविधा, शाळा गळतीचे वाढते प्रमाण, विद्यार्थी आत्महत्या, व्यावसायिक कौशल्यांचा अभाव, वाढती बेरोजगारी, ढासळलेले शारीरिक व मानसिक आरोग्य, अपु-या आरोग्य सुविधा, शेतकरी आत्महत्या, शेतमालाला न मिळणारा भाव, वाढती रासायनिक शेती, नष्ट होत चाललेली जैवविविधता, वाढते तापमान, पाणी व विजेचा अनावश्यक वापर, वाढती व्यसनाधीनता, जातीयता अशा एका ना अनेक समस्यांना अनेक सामाजिक संस्था, संघटना आपापल्या परीने उत्तरे शोधत आहेत. या संस्था संघटनांबरोबरच काही नव्या दमाचे युवकदेखील स्पर्धात्मक जगाच्या चाकोरीतून बाहेर पडून आपापल्या परीने धडपड करीत आहेत. ख-या अर्थाने सामाजिक बदलांची धुरा सांभाळणा-या या युवांना आर्थिक सक्षम करण्यासाठी पुरेसे ज्ञान, आर्थिक पाठबळ व योग्य मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. युवांची ही गरज ओळखून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या वतीने यशवंत युवा फेलोशिप २०१० पासून सुरु करण्यात आली आहे. समाजाला भेडसावणा-या प्रश्नांवर मात करण्यासाठी सामाजिक क्षेत्रात रचनात्मक कार्य सुरु केलेल्या युवाना मार्गदर्शन, आर्थिक पाठबळ व प्रोत्साहन देणे हा यशवंत युवा फेलोशिपचा उद्देश आहे.

**कार्यरत फेलोः** १) **श्री. सिध्दार्थ रामचंद्र खरातः-** सामाजिक क्षेत्रामध्ये स्वयंसेवक म्हणून गेली अनेक वर्षे कार्यरत. दलित इलेक्शन वॉच व एससी/एसटी सबप्लॅन अंमलबजावणीकरिता काम. बांधकाम मजदूर सभा, महाराष्ट्र या संघटनेचे श्री. नितीन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सातारा जिल्हयातील ११ पैकी ८ तालुक्यात असंघटीत कामगारासोबत काम सुरु आहे. असंघटित कामगारांत त्यांचे हक्क व शोषणाबाबत प्रबोधन करणे, तसेच त्यांच्या न्यायिक व मूलभूत प्रश्नांवर काम. या कालावधीमध्ये

कचरा वेचक महिला बचत गटांच्या फेडरेशनच्या स्थापनेचे काम पूर्णत्वाकडे नेत आहेत. कचरा डेपोमध्ये काम करणा-या महिलांचे आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले. त्याचबरोबर सातारा नगर परिषद नोनगाव कचरा डेपो बायोग मायणीग व कंपोस्ट निर्मितीबाबत मुख्याधिका-यांकडे प्रस्ताव सादर करण्यात आला. सातारा शहरातील ४ रुग्णालयांतील आयास, मदतनीस, नर्सेस अशा महिलांचा बैठक घेऊन त्यांच्या मागण्यांचा पाठपुरावा करीत आहेत. जावळी तालुक्यातील कातकरी आदिवासी समाजाची स्वतंत्र काण्हेर धरण हद्दीत मच्छीमारासाठी सहकारी विकास संस्था नोंदणीकृत झाली.

२) **श्री. अमोल काटकरः** मौजे किरकसाल या गावी आदर्श गाव योजनेमध्ये डॉ. अविनाश पोळ आणि श्री. पोपटराव पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत, फेलोशिपच्या माध्यमातून वृक्षारोपण, जलसंधारण, मृद्संधारण याबाबत जनजागृती करणे, किमान कौशल्यावर आधारित व्यावसायिक शिक्षण क्षेत्रात कार्य व प्रसार, ग्रामीण भागातील नागरिकांचे स्थलांतर थांबविण्यासाठी संस्थात्मक कामे उभी करणे. याशिवाय आदर्श गाव निर्मितीसाठी विविध उपक्रम राबविण्याचा मानस. मौजे किरकसाल या गावचा महाराष्ट्र शासनाच्या आदर्श गाव योजनेत समावेश होण्यासाठी महत्वपूर्ण योगदान.

३) **कु. अमृता ढगे** : 'आनंद निकेतन' या नाशिकमधल्या प्रयोगशील शाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत. 'आनंद निकेतन' या शाळेची प्रयोगशील शिक्षण पध्दती समजून घेऊन सर्जनशील काम करण्यासाठी फेलोशिपच्या माध्यमातून काम करण्याची इच्छा. फेब्रुवारी ते सप्टेंबर या कलावधीमध्ये पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना ओंझल पेस्टलच्या सहाय्याने मुक्त चित्र काढण्यासाठी प्रोत्साहन देवून निरीक्षणे नोंदवली त्याचबरोबर इयत्ता आठवीच्या मुलांना 'कोरल ड्रॉ' च्या माध्यमातून भेटकार्ड बनवता येतील अशाप्रकारे विविध साधनांची (टूल्स) ची ओळखत करुन दिली. भाषा शिक्षणासाठी विविध पुस्तकांचा तसेच दैनंदिन जीवनातील संवादाचा त्यांनी वापर केला. विज्ञान शिक्षणाकरीता अनेक प्रयोग घेतले.

३.५ **नवमहाराष्ट्र युवा अभियान आणि पिनॅकल क्लब गिर्यारोहण कार्यक्रमः-** पिनॅकल क्लब आणि नवमहाराष्ट्र युवा अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने फेब्रुवारी ते ऑगस्ट २०१५ दरम्यान अनेक गिर्यारोहन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. ८ फेब्रुवारी २०१५ रोजी सांकशी किल्ला (बद्रुध्दिन), १५ फेब्रुवारी २०१५ रोजी माणिकगड, ८ मार्च रोजी पनवेल जवळील कलावतीण, ७ जून २०१५ रोजी राजमाची किल्ला, २८ जून १५ रोजी नाशिंडे, १७ ते १९ जुलै १५ रोजी सातारा येथील चंदनवंद, पाठेश्वर, ठोसेघर, सज्जनगड आणि अजिंक्यतारा, २६ जुलै १५ रोजी गंभीरगड, ९ ऑगस्ट २०१५ रोजी भीमाशंकर, १५ ते १७ ऑगस्ट २०१५ रोजी घनगड आणि अंदारबन, २२ ऑगस्ट १५ रोजी माहुली किल्ला येथे पदभ्रमण कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. ओ.एन.जी.सी. सायन कार्यालयातर्फे अग्नि सुरक्षा सप्ताहानिमित्त आयोजित कार्यक्रमामध्ये १५ आणि १६ एप्रिल २०१५ रोजी १२ माळयांच्या उंच इमारतीवरुन प्रस्तरावतरण (रॅपलिंग) करण्यात आले. संस्थेने तेथील कर्मचा-यांना रॅपलिंगचे प्रशिक्षण दिले. त्यांनी रॅपलिंगचे प्रात्यक्षिक करुन दाखविले, त्यात तीन महिला कर्मचा-यांनी देखील सहभाग घेतला होता. २२ ते २५ मे २०१५ रोजी नेरळ येथे लहान मुलांसाठी ना नफा ना तोटा या तत्वावर साहस शिबीराचे आयोजन करण्यात आले. त्याचा लाभ ३६ बालगिर्यारोहकांनी घेतला. संस्थेच्या दोन सभासदांनी गरजू रुग्णांना रक्तदान केले.

३.६ **तंबाखू मुक्त महाराष्ट्र अभियान, तंबाखू विरोधी पदयात्रा (नाशिक, औरंगाबाद, तासगांव (सांगली):-** समाजात तबांखूविरोधी जनजागरुकता निर्माण व्हावी आणि महाराष्ट्र तंबाखूमुक्त व्हावा यासाठी सलाम मुंबई फाऊंडेशन आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांनी तंबाखूमुक्त महाराष्ट्र अभियानाची सुरुवात केली आहे. १६ एप्रिल २०१५ रोजी नाशिक शहरातून मा. खासदार सौ. सुप्रिया सुळे यांच्या हस्ते अभियानाची सुरुवात करण्यात आली. नाशिक मध्ये झालेल्या रॅलीमध्ये एकूण १५०० विद्यार्थी आणि कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.

औरंगाबाद जिल्हा तंबाखूमुक्त व्हावा यासाठी २५ जुलै २०१५ रोजी तंबाखू विरोधी पदयात्रेचे आयोजन सलाम मुंबई फाऊंडेशन, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान आणि औरंगाबाद शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. या पदयात्रेमध्ये १ हजार विद्यार्थी आणि १ हजार शासकीय आणि अशासकीय पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. मुलांनी या पदयात्रेमधून तंबाखूविरोधी घोषणा देत औरंगाबाद जिल्हा तंबाखूमुक्त करण्याचा संदेश दिला. छत्रपती संभाजी चौक ते संत तुकाराम महाराज नाटयगृह अशी तंबाखूविरोधी पदयात्रा काढण्यात आली. खासदार सौ. सुप्रिया सुळे यांनी पदयात्रेला हिरवा बावटा दाखविला. पदयात्रेत शालेय विद्यार्थी, कॉलेज तरुण, औरंगाबादमधील पदाधिकारी आणि सामाजिक संस्थांनी पुढाकार घेतला होता. पदयात्रेत सांगतेप्रसंगी विद्यार्थ्यांनी पदाधिका-यांना महाराष्ट्राला तंबाखूमुक्त बनवण्यासाठी निवेदन सादर केले. तसेच यावेळी औरंगाबाद जिल्हयातील फुलंब्री तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नरळे ही शाळा तंबाखूमुक्त म्हणून घोषित करण्यात आली व खासदार सौ. सुप्रियाताई यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

तंबाखूमुक्त महाराष्ट्र अभियानांतर्गत माजी उपमुख्यमंत्री मा. आर. आर. पाटील यांच्या पहिल्या जयंतीनिमित्ताने १६ ऑगस्ट २०१५ रोजी तासगाव (जिल्हा सांगली) येथे सलाम मुंबई फाऊंडेशन, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व राजारामबापू ज्ञान प्रबोधिनी आणि प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभाग, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने तंबाखूविरोधी पदयात्रा काढण्यात आली. मुलांनी या पदयात्रेतून तासगाव तंबाखूमुक्त व्हावा यासाठी घोषणा दिल्या. या पदयात्रेची सुरुवात व सांगता वि. स. पागे हायस्कूल येथे करण्यात आली. पदयात्रेची सांगतेप्रसंगी विद्यार्थ्यांनी पदाधिका-यांना तासगाव व महाराष्ट्राला तंबाखूमुक्त बनवण्यासाठी निवेदन दिले. सांगली जिल्हयातील तासगाव तालुक्यातील आर. आर. पाटील (आबा) ज्ञानप्रबोधिनी शाळा व कनिष्ठ महाविद्यालय (अंजनी) व वाळवा तालुक्यातील जि.प.प्र. शाळा (दुधारी वसाहत) श्री वाटेश्वर कन्या शाळा (वाटेगाव) हया शाळा तंबाखूमुक्त म्हणून घोषित करण्यात आल्या. खासदार सौ. सुप्रियाताई, आमदार सुमनताई पाटील व जिल्हा परिषद अध्यक्ष यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला. पदयात्रेमध्ये ३ हजार विद्यार्थी आणि १ हजार शासकीय आणि अशासकीय पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते. तसेच श्री. जयंतराव पाटील (माजी ग्रामविकास मंत्री), सुमनताई पाटील (आमदार), कु. स्मिता पाटील (आर. आर. पाटील यांची ज्येष्ठ कन्या), श्रीमती रेशमाक्का होर्तीकर (जि. प. अध्यक्ष), श्री. लिंबाजी पाटील (जि. प. उपाध्यक्ष) यासह इतर मान्यवरांनी तंबाखूमुक्त पदयात्रेत सहभाग घेतला.

३.७ **जागर जाणिवांचा ... क्रांतीज्योत सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रम** :- दि. ४ जानेवारी २०१६ रोजी सकाळी नवमहाराष्ट्र युवा अभियान मुंबईच्या वतीने नाडकर्णी पार्क कल्याण केंद्र, बी.पी.टी. वडाळा (पूर्व), मुंबई येथे बाल विकास प्रकल्प वडाळा-शिवडी विभाग यांच्या सहभागाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. या निमित्ताने 'जागर हा जाणिवांचा .... तुमच्या माझ्या लेकींचा' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास प्रा. डॉ. प्रभा तीरमारे (कॉलेज ऑफ सोशल वर्क, निर्मला निकेतन) या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात श्री सुरज भोईर यांनी सावित्रीबाईंच्या गौरवार्थ ओव्यांचे गायन करुन केली. श्री. चंद्रशेखर भावसार (कल्याण अधिकारी, बी.पी.टी.) यांनी स्वागतपर भाषण करुन कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. श्री. प्रसाद मिरकले (बालविकास प्रकल्पाचे अधिकारी) यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य व्यक्त करुन बालविकास प्रकल्पातील अंगणवाडी सेविकांना या कार्यक्रमामध्ये समाविष्ट करुन घेतल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

यानंतर श्री. दत्ता बाळसराफ (कार्यक्रम संयोजक) यांनी 'जागर जाणिवांचा' या उपक्रमाबाबत सहभागींना माहिती देत, स्त्री-भ्रूण हत्या रोखण्यासाठी प्रतिष्ठानने केलेल्या कामाची व त्यात मिळालेल्या यशाचीही कल्पना दिली. विदर्भात शेतक-यांनी इतक्या आत्महत्या केल्या परंतु त्यांच्या एकही पत्नीनी मात्र आत्महत्या केली नसल्याचे निदर्शनास आणून देत स्त्रीमध्ये असलेल्या गुणांची स्त्रीयांनाच ओळखत करुन दिली. त्याच्यामधील क्षमता पुन्हा एकदा त्यांच्यासमोरच श्री. दत्ता बाळसराफ यांनी मांडल्या. यानंतर डॉ. अमोल लगड (सर जे. जे. समूह रुग्णालय) यांनी आरोग्यसंदर्भात व श्री. तानाजी गायकवाड (वसाहत निरीक्षक बी.पी.टी.वडाळा) यांनी उपस्थित महिला व युवतींना समयोजित मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अखेरीस सत्रात प्रा. प्रभा

तीरमारे यांनी स्वाभिमान, समानता, सामंजस्य यांचा मेळ घालत उपस्थित महिलांशी संवाद साधला व मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक, स्वागत व सूत्रसंचलन श्री. विजय कसबे यांनी केले तर श्रीमती संगीता खरात यांनी उपस्थितांचे आभार मानले.

३.८ **यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा पुरस्कार वितरण सोहळा दि. १२ जानेवारी २०१६ :-** नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे दरवर्षी दिल्या जाणा-या 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा सामाजिक व क्रीडा पुरस्कार २०१५' च्या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. महाराष्ट्रातील उत्कृष्ट खेळाडूंच्या कार्याचे मूल्यमापन होऊन त्यांचा गौरव व्हावा आणि प्रोत्साहन मिळावे हे या क्रीडा पुरस्काराचे उद्दिष्ट आहे. तसेच महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी युवा आंदोलनाच्या क्षेत्रात विधायक व रचनात्मक काम करणा-या युवक-युवतींना हा पुरस्कार देण्यात येतो. पुरस्काराचे यंदाचे सतरावे वर्ष आहे. सदरील पुरस्काराचे वितरण 'राष्ट्रीय युवा दिनी' मंगळवार दि. १२ जानेवारी २०१६ रोजी मत्स्योदरी महाविद्यालय, जालना येथे नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या निमंत्रक खासदार सौ. सुप्रिया सुळे व आमदार श्री. राजेश टोपे, श्री. नंदकिशोर कागलीवाल, कार्यक्रम संयोजक श्री. दत्ता बाळसराफ यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

२०१५ सालचा 'यशवंतराव चव्हाण विशेष युवा क्रीडा पुरस्कार' टेनिस या खेळामध्ये उल्लेखनीय कामगिरी करणा-या आंतरराष्ट्रीय टेनिसपटू प्रार्थना ठोंबरे, सोलापूर (टेनिस) यांना प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचे स्वरुप रु.५१,०००/- रोख, सन्मानपत्र असे होते. या वर्षीचा 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा क्रीडा पुरस्कार युवक व युवती' क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल श्रीहरी तपकीर, पुणे (गिर्यारोहण) व स्नेहा भगत, पुणे (व्हॉलीबॉल) यांना तर सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल सजल कुलकर्णी, नागपूर (महाराष्ट्र जीवन बँक - स्थानिक गुरांच्या वाणांचे संवर्धन) व मुमताज शेख, मुंबई (राईट टू पी चळवळ) यांना 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय युवा सामाजिक पुरस्कार – युवक व युवती' देऊन सन्मानित करण्यात आले. सामाजिक व क्रीडा युवा पुरस्कारांचे स्वरुप प्रत्येकी रु.२१,०००/- रोख, सन्मानपत्र असे होते.

यासोबतच प्रतिष्ठानच्या वतीने घेण्यात येणा-या यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेच्या विजेत्यांनाही पुरस्कार देण्यात आले. यात कत्रुवार कला, रतनलाल काबरा विज्ञान आणि बी.आर. मंत्री वाणिज्य महाविद्यालय, मानवत, परभणी यांच्या 'मानवता' या नियतकालिकास प्रथम पुरस्कार मिळाला. या पुरस्काराचे स्वरुप रु.१०,०००/- रोख, प्रमाणपत्र असे होते. अण्णासाहेब आवटे आर्टस्, कॉमर्स, हुतात्मा बाबू गेनू सायन्स कॉलेज व सौ. कुसुमाबेन कांतिलाल शाह आर्टस्, कॉमर्स, सायन्स ज्युनिअर कॉलेज, मंचर, जिल्हा पुणे यांच्या 'शिवनेरी' नियतकालिकास द्वितीय पुरस्कार मिळाला आहे. या पुरस्काराचे स्वरुप रु.७,०००/- रोख, प्रमाणपत्र असे होते. अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय, काटोल, नागपूर यांच्या 'दृष्टीक्षेप' नियतकालिकास तृतीय पुरस्कार मिळाला आहे. या पुरस्काराचे स्वरुप रु.५,०००/- रोख, प्रमाणपत्र असे होते. तर कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर, जिल्हा सोलापूर यांच्या 'कर्मवीर', श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, राजुरा, जिल्हा चंद्रपूर यांच्या 'यशश्री' व कोल्हापूर इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेज ऑफ इंजिनियरींग, कोल्हापूर यांच्या 'टेक्निकल-२०१५' नियतकालिकांस उत्तेजनार्थ पुरस्कार मिळाला आहे. या पुरस्काराचे स्वरुप प्रत्येकी रु.३,०००/- रोख, प्रमाणपत्र असे होते. सर्व पुरस्कार्थींचे नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या राज्यस्तरीय कार्यकारी समितीने अभिनंदन केले आहे.

३.९ **वाहतूक सुरक्षा अभियान – दि. १२ जानेवारी २०१६ :** ११ जानेवारी ते २५ जानेवारी दरम्यान महाराष्ट्रभर 'रस्ता सुरक्षा अभियान २०१६' राबविण्यात आले. या अंतर्गत नवमहाराष्ट्र युवा अभियान व विभागीय परिवहन कार्यालय, अंधेरी यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ते अपघात या विषयावर दि. १२ जानेवारी २०१६ राजी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. सदर चर्चासत्र पार्ले टिळक विद्यालय, विलेपार्ले येथे दुपारी ११ ते १ या वेळेत पार पडले. या प्रसंगी टिळक महाविद्यालयाचे प्राचार्या श्रीमती गजगौरी करंडे, अंधेरी विभागीय परिवहन अधिकारी श्रीमती सोनाली सोनार, श्री. दत्ता बाळसराफ तसेच इतर

मान्यवर व विभागीय परिवहन अधिकारी उपस्थित होते. पार्ले टिळक विद्यालयातील सुमारे ३०० विद्यार्थी या चर्चासत्रात सहभागी झाले होते. रस्ते अपघात ही एक आता गंभीर समस्या बनत असून समाज म्हणावा तितका त्याबाबत संवेदनशील अजून होत नाही अशी भावना टिळक विद्यालयाच्या प्राचार्यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडताना व्यक्त केली. आर्थिक सुबता व मुलांचाही हट्ट यामुळे विद्यार्थी दशेतच शाळा कॉलेजच्या विद्यार्थ्यांकडे वाहन उपलब्ध होत आहे. त्यामुळे रस्ता सुरक्षा या विषयावर गंभीरपूर्वक विचार करुन विद्यार्थी दशेतच काही संस्कार विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. रस्ते अपघात कमी करण्यासाठी अशा प्रबोधन शिबिरांची गरज असल्याचे सांगत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईतर्फे करण्यात येणा-या या कामाबद्दल त्यांनी आनंदही व्यक्त केला. यानंतर श्रीमती सोनाली सोनार यांनी जर वाहतूक नियमांचे काटेकोर पालन केले तर रस्ते अपघातांचे प्रमाण खूप प्रमाणात कमी होवू शकते असे प्रतिपादन केले. वेगावर नियंत्रण ही एक महत्वाची गरज असून याकरिता प्रत्येक चालकामध्ये एक स्वयंशिस्तता असली पाहिजे असे त्यांनी सूचित केले. यानंतर प्रतिष्ठानचे कार्यक्रम संयोजक श्री. दत्ता बाळसराफ यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईची भूमिका सर्वांसमोर मांडली. महाराष्ट्रात वर्षभर सुमारे १५० लोक रस्ते अपघातात मृत्यूमुखी पडतात व त्याहूनही अधिक कायमचे अपंग होतात आणि यात तरुणांचे (वय २५ ते ४५) प्रमाणे जास्त असते हे नमूद करत सर्वांनीच या विषयाबाबत अधिक संवेदनशील होण्याचे गरजेचे आहे असे त्यांनी सांगितले. तसेच आज जवळ जवळ सर्वच घरात किमान एक तरी वाहन आहे. एरवी पालक पाल्याला धडे देतात पण रस्ते सुरक्षा या विषयावर आपण विद्यार्थ्यांचे चांगल्या रितीने प्रबोधन केले तर ते याबाबत आपल्या पालकांना नक्कीच धडे देवू शकतील आणि पालकही अन्य कोणापेक्षाही वा नियमापेक्षा आपल्या पाल्याचेच जास्त गंभीरतेने ऐकतील असाही विश्वास त्यांनी व्यक्त केला. यानंतर अन्य काही अधिका-यांनी विद्यार्थ्यांशी चर्चा करत रस्ता सुरक्षा या विषयासंदर्भात मार्गदर्शन केले व नियमही समजावून सांगितले आणि ते इतरांबरोबर शेअर करण्यास सांगितले.

३.१० **'रस्ता सुरक्षा मार्गदर्शन आणि आरोग्य तपासणी शिबीर' विभागीय परिवहन कार्यालय, अंधेरी - दि. १५ जानेवारी २०१६ :** नवमहाराष्ट्र युवा अभियान व विभागीय परिवहन कार्यालय, अंधेरी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १५.१.२०१६ रोजी वाहन चालकांसाठी एक दिवसीय 'रस्ता सुरक्षा मार्गदर्शन आणि आरोग्य तपासणी शिबीर' आयोजित करण्यात आले होते. सदर शिबीर विभागीय परिवहन कार्यालय अंधेरी येथे पार पडले. या प्रसंगी अंधेरी विभागीय परिवहन अधिकारी श्री. विश्वंभर शिंदे, प्रतिष्ठानचे कार्यक्रम संयोजक श्री. दत्ता बाळसराफ तसेच इतर मान्यवर व विभागीय परिवहन अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटन श्री. विश्वंभर शिंदे यांच्या हस्ते झाले. त्यांनी उपस्थित नवीन वाहन चालकांना अपघात रोखण्यासाठी चालकांनी स्वकर्तव्याचे कसे पालन केले पाहिजे याबाबत अतिशय चांगल्या रीतीने मार्गदर्शन केले. यानंतर जनजागृतीपर एक पथनाटय सादर करण्यात आले. प्रतिष्ठानचे कार्यक्रम संयोजक श्री. दत्ता बाळसराफ यांनी रस्ते अपघाताचा आलेख नवीन वर्षात वाढतच चालला असल्याचे सांगत यावर आवर घालण्यासाठी नक्कीच एक मोठे राज्यव्यापी अभियानाची गरज असल्याचे नमूद केले. वाहन चालकांचा जरासा निष्काळजीपणा कसा इतर निरपराधजणांचे बळी किंवा कायमचे अपंगत्व देऊन त्यांच्या कुटुंबावर एक प्रकारे आघातच करतो हे विषद करत वाहन चालकांनी कसे जबाबदारीने व सावधानतेने ड्रायव्हिंग केले पाहिजे हे स्पष्ट केले. उद्घाटन कार्यक्रमानंतर वाहनचालकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. यात वाहन चालकांची मधुमेह, नेत्र व रक्तदाब तपासणी करण्यात आली व त्यानुसार त्यांना आरोग्यासंदर्भात पुढील मार्गदर्शन करण्यात आले. सदर तपासणी शिबिराचा सुमारे ३०० जणांनी लाभ सहभाग घेतला. याच दरम्यान परिवहन कार्यालयाच्या पटांगणात पथनाटय कलाकारांनी आपले रस्ता सुरक्षा विषयक पथनाटय सादर करत जनजागृती करण्याचा प्रयत्न केला.

३.११ **हेच शब्द ओठी :** नवमहाराष्ट्र युवा अभियान आणि रंगस्वर यांच्यावतीने महाराष्ट्राचे, महाराष्ट्र भूषण, लोकप्रिय कवी आणि गीतकार दिवंगत मा. मंगेश पाडगावकर यांच्या स्मृतीला आदरांजली वाहण्यासाठी त्यांनी लिहिलेल्या कवितांच्या वाचनाचा 'हेच शब्द ओठी' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. रविवार दि. ७ फेब्रुवारी २०१६ रोजी सायंकाळी ६ वाजता हा

कार्यक्रम प्रतिष्ठानच्या रंगस्वर सभागृहामध्ये संपन्न झाला. या कार्यक्रमात पाडगावकरांच्या परिचित असलेल्या व काही अपरिचित अशा कवितांचे वाचन मा. श्री. हेमंत टकले, श्रीमती मानसी कुलकर्णी, श्रीमती अस्मिता मोहिते आणि श्री. दत्ता बाळसराफ हया मान्यवरांनी सादर केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ पत्रकार, साहित्यिक श्री. अंबरीष मिश्र यांनी केले. यावेळी प्रतिष्ठानचे सरचिटणीस मा. श्री. शरद काळे व इतर मान्यवर उपस्थित होते. मंगेश पाडगावकरांच्या विविध पैलूंवर आधारीत कवितांचे वाचनाचे रसिक भारावून गेले होते. भटके पक्षी, उत्साह, तुझे गीत गाण्यासाठी, त्रिवेणी, नवा दिवस, बोलगाणी, सूर आनंदघन तसेच अखेरची वही अशा वेगवेगळया विषयांवर आधारीत कवितांचे वाचन करण्यात आले. कवितेच्या वाचनासोबत मा. श्री. हेमंत टकले यांनी मा. वसंत बापट, मा. कुसुमाग्रज, मा. पु. ल. देशपांडे तसेच मा. मंगेश पाडगांवकरांच्या आठवणींना उजाळा दिला. श्रीमती अस्मिता मोहिते यांनी मंगेश पाडगावकरांच्या बालपणावर आधारीत १९५४ ते १९६४ दरम्यान प्रकाशित झालेल्या 'पेन्सिल' या गद्यलेखनाचे वाचन केले. ज्यामधून त्यांच्या बालपणातील अनेकानेक पैलूंच्या छटा दिसून आल्या.

३.१२ **युवा कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीर :** आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार मा. यशवंतराव चव्हाणसाहेबांचे विचार व कार्यातून प्रेरणा घेऊन प्रगतीशील व समतावादी महाराष्ट्र घडविण्यासाठी यशवंतराव चव्हाण, प्रतिष्ठान, मुंबई गेली ३० वर्षे सतत प्रयत्नशील आहे. समाजापुढील महत्वाच्या मुद्यांवर साकल्याने विचार करता यावा याकरिता प्रतिष्ठानने चर्चेचे व्यासपीठ अनेक क्षेत्रात उपलब्ध करुन दिले आहे. महाराष्ट्राच्या जन-माणसाच्या दृष्टीने महत्वाच्या असणा-या प्रश्नांचा वेध घ्यावा आणि सामाजिक कार्य करणारी माणसे तयार व्हावीत या भूमिकेतून नवमहाराष्ट्र युवा अभियानतर्फे राज्यभर विविध कार्यक्रम राबविले जातात. नव्या तरुण पिढीतून नवे कार्यकर्ते घडावे याकरिता नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या वतीने 'युवा कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर' भिवपुरी रोड, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील यादवराव तासगावकर इंजिनिअरींग कॉलेज येथे आयोजित करण्यात आले होते. दि. २३ व २४ जानेवारी २०१६ रोजी पार पडलेल्या या दोन दिवसीय निवासी शिबिरामध्ये रायगड, ठाणे, पालघर, मुंबई येथून सुमारे ८० कार्यकर्ते सहभागी झाले होते.

**दिवस पहिला – २३ जानेवारी २०१६ :-** सदर शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी कर्जत शहराचे नगराध्यक्ष श्री. राजेश लाड तसेच कर्जतमधील मान्यवर श्रीमती हिराताई दुबे, श्री. सागरजी शेळके, श्री. कैलासजी घारे, श्री. काशिनाथजी पाटील उपस्थित होते. मान्यवरांनी सहभागींना मार्गदर्शन करीत कर्जत विभागात असे शिबिर पात्र पडत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच सर्वांनी त्यांच्या विभागातील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे राबविण्यात येणा-या सर्व कार्यक्रमास त्याचे सहकार्य नक्कीच लाभेल अशी ग्वाहीही दिली. शिबिराच्या पहिल्या सत्रात श्री. उमेश खाडे यांनी प्रेरणादायक गाण्यांनी सुरुवात करुन नंतर खेळकर वातावरणात सर्व सहभागींचे परस्पर परिचयाचे सोपस्कर पार पाडले. सर्वच सहभागींनी यात उत्स्फूर्त सहभाग घेतला. दुसरे सत्र 'सामाजिक कार्यात सोशल मिडियाचा वापर' या विषयावर पार पडले. या सत्रास लाभलेले वक्ते श्री. पराग पाटील यांनी उपस्थित सहभागींना मार्गदर्शन केले. सोशल मिडियाचे फेसबुक, व्हॉटस्अप, ट्विटर इत्यादी विविध विभागांची ओळख उपस्थितांना करुन देत सोप्या सरळ व जनसामान्यापर्यंत कसा संदेश पोहचवता येईल याबद्दल अत्यंत चांगल्या रीतीने मार्गदर्शन केले.

३.१३ **नवमहाराष्ट्र युवा अभियान व नाग्या महादू कातकरी प्रतिष्ठान, सुधागड पाली :** समाजापुढील महत्वाच्या मुद्दयांवर साकल्याने विचार करता यावा याकरिता दोन दिवसीय प्रशिक्षण शिबीर घोडपापडची वाडी, जांभुळपाडा, तालुका सुधागड, जिल्हा रायगड येथे आयोजित केले होते. सदर शिबीर हे आदिवासी बांधवांसाठी होते. दि. २० व २१ फेब्रुवारी २०१६ रोजी पार पडलेल्या या दोन दिवसीय शिबिरात भैलीव, करचुंडे, मुळशी, पावसाळा, वान्हे, आवंडे व घोडपापडी वाडीतील ग्रामस्त असे सुमारे ६५ विद्यार्थी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.

**दिवस पहिला : २० फेब्रुवारी २०१६** : सदर शिबिराचे उद्घाटन आत्मउन्नती विद्यामंदिर, कनिष्ठ महाविद्यालय, जांभुळपाडाचे प्राचार्य श्री घोडकेसर यांच्या शुभहस्ते व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत झाले. मान्यवरांनी सहभागींना मार्गदर्शन करीत असताना जांभुळपाडा येथे असे शिबीर पार पडत असल्याबद्दल आनंदही व्यक्त केला. तसेच त्यांच्या विभागातील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे व नाग्या महादू कातकरी प्रतिष्ठानतर्फे राबविण्यात येणा-या सर्व कार्यक्रमास त्याचे सहकार्य नक्कीच लाभेल अशी ग्वाहीही दिली. शिबीराच्या पहिल्या सत्रात प्रथम अगदी खेळकर वातावरणात सर्व सहभागींचे परस्पर परिचयाचे सोपस्कार पार पडले. सर्वच विद्यार्थ्यांनी यात उत्स्फूर्त सहभाग घेतला. त्याचे मनोबल वाढवण्यासाठी या सत्राची नक्कीच मदत झाली. प्रथम सत्र आदिवासी बांधवानी अशा रितीने 'एकमेका करु सहाय्य अवघे धरु सुपंथ' या उत्कीने पार पडले.

दुसरे सत्र 'आरोग्य धनसंपदा' या महत्त्वाच्या विषयावर आयोजित केले गेले. बिटस् पिलानी, राजस्थान विद्यापीठाच्या इंजिनिअर श्रीमती कल्याणी मॅडम यांनी सहभागींना विशेषतः विद्यार्थ्यांना त्यांच्या आरोग्याच्या तथा शारीरिक व्याधी विषयी मार्गदर्शन व त्यावर असणारे उपाय यावर व्याख्यान दिले. त्याचबरोबर मनातील संकोच भिती काढून आपण आपल्या आजाराविषयी चर्चा केली पाहिजे असे सहभागींनी सुचविले.

तिस-या सत्रात श्री. अभिजीत देशमुख यांनी व्यक्तिमत्व विकास या विषयावर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांशी संवाद साधला. संवाद साधत असताना सहभागींनी विविध प्रश्नांसंबंधी उकल करुन घेतली. अगदी छोटया छोटया गोष्टीतून आपणास कशा प्रकारे प्रेरणा मिळते त्यातूनच पुढे आपला व्यक्तिमत्व विकास कसा साधला जातो अशा पध्दतीने एकूणच तिसरे सत्र पार पडले.

३.१४ **अंबाजोगाईत दुष्काळ अभिसरण शिबिरास सुरुवात. संपूर्ण महाराष्ट्रातून तरुणाईचा शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद** : नवमहाराष्ट्र युवा अभियान आणि मानवलोकच्या वतीने अंबाजोगाई येथे दोन दिवसीय दुष्काळ अभिसरण शिबीर घेण्यात आले. श्रमदान करताना शिबिरामध्ये सहभागी झालेले महाराष्ट्रातील सर्व भागातील तरुण, तरुणी, ज्येष्ठ पदाधिकारी इत्यादीनी होळना नदी पुनर्जीवन कार्यक्रमांतर्गत मु. पाटोदा, तालुका अंबाजोगाई येथील कामामध्ये शिबिरार्थीनी श्रमदान केले. दि. २५ मार्च २०१६ विभागीय केंद्र अंबाजोगाई येथे युवा वर्गाच्या उत्स्फूर्त प्रतिसादात आज सकाळी दुष्काळ अभिसरण शिबिरास सुरुवात झाली. यामध्ये फक्त युवकच नव्हे तर युवतींनी सुध्दा चांगली उपस्थिती दर्शविली.

## ९.४ कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम :-

१९८७ च्या विधी सेवा प्राधिकरण अधिनियमामध्ये अंतर्भूत असलेली मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजना राबविण्याचे काम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमार्फत केले जाते. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी प्रतिष्ठानने 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम' या विभागाची निर्मिती केली आहे. या विभागामध्ये अंदाजे ३५ वकील व समाजसेवक काम करीत असून ते आपली सेवा या योजनेसाठी देत आहेत. कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरमचे सदस्य सचिव म्हणून श्री. म. बा. पवार हे कामकाज पहात आहेत.

### ४.१ फोरममार्फत सर्वसाधारणपणे खालील प्रकारचे काम केले जाते :-

१. समाजातील गोर-गरीब व तळागाळातील लोकांना कसल्याही प्रकारचा भेदभाव न करता मोफत कायदेविषयक तोंडी सल्ला देणे.
२. प्रसंगी गुंतागुंतीच्या प्रश्नांसंबंधी सखोल अभ्यास करुन गरजू लोकांना कायदेविषयक सल्ला देणे.
३. काही वेळा पत्रव्यवहाराद्वारे गरजू लोकांना कायदेविषयक सल्ला देणे.
४. पक्षकारांच्या तंटयामध्ये सामोपचाराने आपसात समेट घडवून आणणे.
५. विधी विषयामध्ये संशोधन करुन प्रचलित कायद्यांमध्ये सुधारणा सूचविणे किंवा नवीन कायद्याचे प्रारुप तयार करुन वैधानिक प्रस्ताव राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला पाठविणे.

६. विधी विषयामध्ये संशोधन करुन प्रचलित कायद्यानुसार बनविण्यात आलेल्या नियमांमध्ये सुधारणा सुचविणे किंवा नवीन नियमांचे प्रारुप तयार करुन वैधानिक प्रस्ताव राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला पाठविणे.

७. सर्वसामान्य लोकांना वेळोवेळी कायद्यांची विशेष माहिती करुन देण्यासाठी तज्ज्ञांची विशेष व्याख्याने आयोजित करणे.

८. सामान्य लोकांना कायद्यांची माहिती करुन देण्यासाठी वरचेवर विधी साक्षरता (Legal Awareness) कार्यशाळांचे आयोजन करणे.

९. विधी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी मूट कोर्ट स्पर्धा, निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करणे. तसेच अशा विद्यार्थ्यांसाठी वकिलांची व्यावसायिक नीतिमत्ता या विषयावर परिसंवादांचे आयोजन करणे.

१०. संबंधित न्यायालयाच्या सहकार्याने व त्यांच्या संयुक्त विद्यमाने त्या न्यायालयामध्ये प्रलंबित असलेल्या प्रकरणामध्ये तडजोड घडवून आणण्यासाठी लोक अदालतचे आयोजन करणे.

११. न्यायालयामध्ये मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर होण्यासाठी प्रयत्न करणे.

४.२ **फोरमच्या बैठका :-** कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजनेच्या अंमलबजावणीबाबत विचार करुन धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी, झालेल्या कार्यक्रमांचा आढावा घेण्यासाठी, पुढील कार्यक्रमांची आखणी करण्यासाठी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी दरमहा दुस-या शुक्रवारी फोरमच्या मासिक बैठका घेतल्या जातात. या बैठकांना फोरमचे जास्तीत जास्त सदस्य उपस्थित राहतात. १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१६ या आर्थिक वर्षामध्ये फोरमच्या १२ मासिक बैठका झाल्या. या १२ बैठकांमध्ये एकूण अंदाजे २२१ विषयांसंबंधी चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. या बैठकांना एकूण ११४ सदस्य उपस्थित होते. याप्रमाणे प्रत्येक बैठकीला सरासरी १० सदस्य उपस्थित होते. या बैठकीमध्ये ॲड. श्री. भूपेश सामंत, ॲड. श्री. निलेश पावसकर, डॉ. न. ब. पाटील या मा. सदस्यांनी अध्यक्ष म्हणून काम पाहिले.

४.३ **फोरमच्या उपसमित्या :-** वेळोवेळी विविध विषयांचा सखोल अभ्यास करण्यासाठी फोरमच्या उपसमित्या घटित केल्या जातात. या समित्यांमध्ये सक्रिय सदस्यांचा समावेश केला जातो. अशा उपसमित्यांनी दिलेल्या अहवालानुसार फोरमचे निर्णय घेण्यात येतात.

(१) **विभागांची बैठक** : ऑक्टोबर २०१५ मध्ये ज्येष्ठ नागरिकांचा मेळावा भरविण्यासंबंधी विचार करण्यासाठी प्रतिष्ठानच्या सर्व विभागांच्या प्रतिनिधींची बैठक मा. सरचिटणीस श्री. शरद काळे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली दि. १४ ऑगस्ट २०१५ रोजी बोर्ड रुममध्ये संपन्न झाली. बैठकीला १६ प्रतिनिधी उपस्थित होते. अंदाजे ३७ बाबींसंबंधी विचार होऊन निर्णय घेण्यात आले.

(२) **ज्येष्ठ नागरिक संघांच्या प्रतिनिधींची बैठक** : ऑक्टोबर २०१५ मध्ये आयोजण्यात येणा-या ज्येष्ठ नागरिक आंनद मेळाव्याचे आयोजन करण्यासंबंधी विचार करण्यासाठी कुर्ला ते मुलुंड व नवी मुंबई या क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या ज्येष्ठ नागरिक संघांच्या प्रतिनिधींची बैठक नेहरु नगर ज्येष्ठ नागरिक संघ, शिवाजी महाराज मैदान, नेहरु नगर, कुर्ला (पूर्व), मुंबई येथे दि. २२ जुलै २०१५ रोजी (सायंकाळी ४ ते ६ पर्यंत) श्री. विजय औंधे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीला प्रतिष्ठानच्या वतीने सर्वश्री म. बा. पवार, संजय बनसोडे व सुहास भाबल उपस्थित होते. तसेच बैठकीला इतर संस्थांचे ३५ प्रतिनिधी उपस्थित होते. अंदाजे ९० पेक्षा जास्त बाबींसंबंधी विचार होऊन निर्णय घेण्यात आले.

४.४ **कायदेविषयक सल्ला केंद्र :-** गोरगरीब व गरजू लोकांना कायदेविषयक तोंडी सल्ला देण्यासाठी दर शुक्रवारी सायंकाळी ५.३० च्या नंतर प्रतिष्ठानच्या ग्रंथालयामध्ये कायदेविषयक मोफत सल्ला केंद्र चालविले जाते. गेल्या आर्थिक वर्षामध्ये या सल्ला केंद्राच्या एकूण ४५ बैठका झाल्या. या बैठकामध्ये एकूण ७३ लोकांना (महिला व पुरुष) तोंडी सल्ला देण्यात आला. सल्ल्याचे विषय अंदाजे विवाह, घटस्फोट, हुंडा, पोटगी, वारसा हक्क, भागिदारी, कामगार कायदा, माहितीचा अधिकार,

सेवा नियम, सहकारी कायदा, पंजीकरण, मुद्रांक, फौजदारी, कौटुंबिक अत्याचार, ग्राहक संरक्षण, भाडे नियंत्रण, मोफा कायदा, गृहनिर्माण इत्यादी विषयासंबंधी होते. आपली प्रकरणे न्यायालयामध्ये चालविण्यासाठी मोफत वकीलाची सेवा मागणा-या लोकांना शासनाचे संबंधित विधी सेवा प्राधिकरणाकडे पाठविण्यात आले.

४.५ **मोफत समुपदेशन व तडजोड केंद्र** :- दर मंगळवारी सायंकाळी ५.०० ते ७.०० या वेळांत समुपदेशन व समेट केंद्राचे आयोजन केले जाते. दोन वादग्रस्त पक्षकारांना एकत्र आणून त्यांच्यामध्ये तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न या केंद्रामध्ये केला जातो. या कामाला गती देण्यासाठी विशेष प्रयत्न चालू आहेत.

४.६ **आपल्या कायद्याची माहिती करुन घ्या (Know your Law Lecture Series)** :- या व्याख्यानमाले अंतर्गत दरमहा किंवा तीन महिन्यांतून एकदा कायदे पंडितांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते. सध्या इमारतींचे पुनर्विकास व माहितीचा अधिकार आणि सायबर कायदा या कायद्यावर व्याख्याने आयोजित करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

४.७ **वकीलांची व्यावसायिक नीतिमत्ता या विषयावर चर्चासत्र** :- विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रम राबविले जातात. त्यापैकी वकीलांच्या व्यावसायिक नीतिमत्ता (Professional Ethics of Lawyers) या विषयाबाबत नवीन होतकरु वकीलांना जाणीव करुन देण्यासाठी चर्चासत्राचे आयोजन केले जाते. विधी शाखेतील विद्यार्थ्यांना याचा चांगला उपयोग होतो. सध्या अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

४.८ **विधी साक्षरता कार्यशाळा** :- लोकांना सामाजिक किंवा त्यांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधीत असलेल्या कायद्यांची माहिती करुन देण्यासाठी विविध प्रकारच्या विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यासाठी समाजाच्या वेगवेगळया घटकांसाठी वेगवेगळे प्रकल्प तयार करण्यात आले आहेत. उदाहरणार्थ - पौगंडावस्थेतील मुले व मुली, महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, सहकारी गृहनिर्माण संस्थांचे सदस्य, सार्वजनिक न्यासाचे विश्वस्त, सार्वजनिक संस्थांचे सदस्य आणि सर्वसामान्य जनता इत्यादी. या घटकांसाठी विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. मागील आर्थिक वर्षामध्ये खालीलप्रमाणे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

(१) फोरम व हिमगिरी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., सानपाडा (पश्चिम), नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महिला व पुरुष कार्यकर्त्यांसाठी रविवार दि. १९ एप्रिल २०१५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत कम्युनिटी हॉल, सानपाडा (पश्चिम), नवी मुंबई येथे एक दिवसीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. भाषणाचे माध्यम मराठी होते. १०० पेक्षा जास्त महिला व पुरुष कार्यक्रमाला उपस्थित होते. श्री. एम. बी. सिंग हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

(२) फोरम व मैत्री संस्था, लोअर परेल, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने सी.के.टी. हायस्कूल, न्यू पनवेल, नवी मुंबई येथे रविवार दि. १४ जून २०१५ रोजी (सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत) एक दिवसीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त महिला व पुरुष कार्यक्रमामध्ये उपस्थित होते. भाषणाचे माध्यम मराठी होते. श्री. सुरज भोईर हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

(३) फोरम व ज्येष्ठ नागरिक संघ, सानपाडा, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महिला व पुरुषांसाठी रविवार दि. २ ऑगस्ट २०१५ रोजी (सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत) एक दिवसीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. भाषणाचे माध्यम मराठी होते. १०० पेक्षा जास्त महिला व पुरुष कार्यक्रमाला उपस्थित होते. श्री. टी. एम. काळे हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

(४) फोरम व ओरिएंटल कॉलेज ऑफ एज्युकेशन, सानपाडा (पश्चिम), नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थीनींसाठी बी.एड. महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये, सानपाडा, नवी मुंबई येथे रविवार दि. १८ ऑक्टोबर २०१५ रोजी (सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत) एक दिवसीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त विद्यार्थीनी

कार्यक्रमामध्ये उपस्थित होत्या. भाषणाचे माध्यम इंग्रजी / हिंदी होते. प्राचार्या श्रीमती रतानी एम. ठाकूर हया अध्यक्षा म्हणून उपस्थित होत्या.

(५) फोरम व सक्षम सामाजिक संस्था, विक्रोळी (पश्चिम), मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महिला व पुरुष यांच्यासाठी पार्कसाईट, विक्रोळी (पश्चिम), मुंबई येथे रविवार दि. १५ नोव्हेंबर २०१५ रोजी (सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत) एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त महिला व पुरुष कार्यक्रमामध्ये उपस्थित होते. व्याख्यानाचे माध्यम मराठी होते. श्रीमती अनिता जाधव हया कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून उपस्थित होत्या.

(६) फोरम व मैत्री संस्था, लोअर परेल, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने शिरोडकर हायस्कूल, परेल (पूर्व), मुंबई येथे महिला व पुरुषांसाठी रविवार दि. २२ नोव्हेंबर, २०१५ रोजी (सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत) एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी श्री. सुरज भोईर हे होते. १०० पेक्षा जास्त स्त्री व पुरुष कार्यशाळेमध्ये उपस्थित होते. व्याख्यानांचे माध्यम मराठी होते.

(७) फोरम व राष्ट्रपिता महात्मा गांधी प्रतिष्ठान, बदलापूर (पूर्व) यांच्या संयुक्त विद्यमाने आदर्श विद्यालय, कुळगाव बदलापूर (पूर्व) येथे रविवार दि. २९ नोव्हेंबर, २०१५ रोजी (सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यानाचे माध्यम मराठी होते. १०० पेक्षा जास्त महिला व पुरुष या कार्यक्रमाला उपस्थित होते. श्री. अनिल चाळके हे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. श्री. प्रकाश शिंदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बदलापूर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. श्री. सुधीर कुमार यांनी सर्वांचे स्वागत केले व पुष्पगुच्छ देऊन पाहुण्यांचे स्वागत केले.

(८) फोरम व स्वयंम फाऊंडेशन, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक कार्यकर्त्यांसाठी (महिला व पुरुष) दुसरी गल्ली, कामाठीपुरा, नागपाडा, भायकळा (पश्चिम), मुंबई येथे रविवार दि. ३ जानेवारी २०१६ रोजी (सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत) एक दिवसीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. भाषणाचे माध्यम मराठी होते. १०० पेक्षा जास्त महिला व पुरुष कार्यक्रमाला उपस्थित होते. कुमारी अंब्रिता ढवळे हया कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून उपस्थित होत्या.

(९) फोरम व रोटरी क्लब ऑफ डोंबिवली (पूर्व) यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी रोटरी क्लब ऑफ डोंबिवली, रोटरी भवन, पेंढारकर महाविद्यालया समोर, एम.आय.डी.सी., डोंबिवली (पूर्व) येथे रविवार दि. १० जानेवारी २०१६ रोजी (सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत) एक दिवसीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते. व्याख्यानाचे माध्यम मराठी होते. सौ. ज्योत्स्ना भिसे या अध्यक्षस्थानी होत्या. श्री. खोपकर, श्री. शेट्टी रोटेरियन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

(१०) फोरम व कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, कल्याण यांच्या संयुक्त विद्यमाने कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली, कल्याण येथे महिला बचत गट महिला व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी रविवार दि. १७ जानेवारी २०१६ रोजी (सकाळी १० ते सायंकाळ ६ पर्यंत) एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यानाचे माध्यम मराठी होते. १०० पेक्षा जास्त बचत गट महिला व विद्यार्थी उपस्थित होते. प्राचार्या सौ. भोंडीवले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या.

(११) फोरम व जितेंद्र चौहान कॉलेज ऑफ लॉ, विलेपार्ले, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने जितेंद्र चौहान कॉलेज ऑफ लॉ, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई येथे लॉ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी शनिवार दि. २३ जानेवारी २०१६ रोजी (सकाळी १० ते सायंकाळ ६ पर्यंत) एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यानाचे माध्यम इंग्रजी होते. १०० पेक्षा लॉ महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. ए. के. सिंग, प्राचार्य हे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रम सर्वांना आवडला.

(१२) फोरम व ज्येष्ठ नागरिक संघ, नेरुळ, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिक भवन, नेरुळ (पश्चिम), नवी मुंबई येथे महिला व पुरुषांसाठी रविवार दि. ७ फेब्रुवारी २०१६ रोजी (सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत) एक दिवसीय

विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. भाषणाचे माध्यम मराठी होते. १०० पेक्षा जास्त महिला व पुरुष कार्यक्रमाला उपस्थित होते. श्री. प्रकाश लखपते हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. कार्यक्रम सर्वांना आवडला.

(१३) फोरम व स्वयंम फाऊंडेशन, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने निर्मला निकेतन, सेंट पायस कॉलेज, कॅम्पस, विरवाणी रोड, गोरेगाव (पूर्व), मुंबई येथे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी रविवार दि. २१ फेब्रुवारी २०१६ रोजी (सकाळी १० ते सायंकाळ ६ पर्यंत) एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यानाचे माध्यम इंग्रजी / हिंदी होते. १०० पेक्षा जास्त विद्यार्थी उपस्थित होते. श्री. संदेश लालगे हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. कार्यक्रम सर्वांना आवडला.

(१४) फोरम व आम्ही मैत्रिणी विकास संस्था, घाटकोपर, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी सामाजिक संस्था मैदान येथील शामियाना, घाटकोपर (पश्चिम), मुंबई येथे रविवार दि. १३ मार्च २०१६ रोजी (सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत) एक दिवसीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. भाषणाचे माध्यम मराठी होते. १०० पेक्षा जास्त महिला कार्यक्रमाला उपस्थित होत्या. श्रीमती विजया गोरे या कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रम सर्वांना आवडला.

४.९ **ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा - २०१५ :-** रविवार दि. ४ ऑक्टोबर २०१५ रोजी प्रतिष्ठानच्या मुख्य सभागृहामध्ये झालेल्या ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळाव्याच्या आयोजनामध्ये फोरमच्या सदस्यांनी हिरीरीने भाग घेतला व सदर मेळावा यशस्वी करण्याच्या कामाला हातभार लावला. या मेळाव्यामध्ये २ पुरुष ज्येष्ठ नागरिक, २ महिला ज्येष्ठ नागरिक व एका ज्येष्ठ नागरिक संघाचा सत्कार करण्यात आला.

४.१० **निबंधांना बक्षिसे :-** विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये भाग घेणा-या विद्यार्थ्यांसाठी फोरमची एक खास योजना आहे. त्या योजनेनुसार झालेल्या कार्यशाळेबाबत अथवा कार्यशाळेत शिकविण्यात आलेल्या एका किंवा अनेक विषयाबाबत विद्यार्थ्यांना निबंध लिहिता येतात व त्या निबंधाच्या गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांना पुस्तकांच्या स्वरुपात बक्षिसे दिली जातात. बक्षिसे संबंधित विद्यालये किंवा महाविद्यालयांच्या प्राचार्यांना पाठविली जातात. विद्यालयाच्या किंवा महाविद्यालयांच्या समारंभामध्ये संबंधित विद्यार्थ्यांना बक्षिसे दिली जातात.

४.११ **कार्यशाळेमध्ये शिकविलेले कायदे :-** विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये अंदाजे ५० ते ६० कायद्यासंबंधी माहिती करुन देण्यात आली. त्यामध्ये प्रामुख्याने पुढील कायद्यांचा समावेश होता. (१) भारतीय संविधान, (२) विधी सेवा प्राधिकरण अधिनियम १९८७, (३) हुंडाबंदी अधिनियम १९६१, (४) भारतीय दंड संहिता १८६०, (५) ग्राहक संरक्षण कायदा १९८६, (६) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३, (७) हिंदू वारसा हक्क कायदा १९५६ व इच्छापत्र कायदा, (८) गुंतवणूकीसंबंधीचे नियम, (९) कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा २००५, (१०) माहितीचा अधिकार कायदा २००५, (११) हिंदू विवाह कायदा १९५५, (१२) मुस्लीम कायदा, (१३) पोटगी संबंधीचे कायदे, (१४) महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकाबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३, (१५) हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम १९५६, (१६) हिंदू दत्तक व पोटगी अधिनियम १९५६, (१७) संपत्ती हस्तांतरण अधिनियम १८८२, (१८) विशेष विवाह अधिनियम १९५४, (१९) बाल विवाह बंदी अधिनियम २००७, (२०) महाराष्ट्र विवाह मंडळ नियमन व विवाह नोंदणी अधिनियम १९९८, (२१) न्यायालयांची बहुस्तरीय व्यवस्था (तालुका न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंतची माहिती), (२२) स्त्रियांचे असभ्य प्रतिरुपण (प्रतिबंध) अधिनियम १९८६, (२३) विकलांग व्यक्तीसाठी (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम १९९५, The Persons with Disabilities (Equal opportunities, Protection of Rights and Full Participation) Act, 1995 (२४) स्वमग्न असलेल्या, मस्तिष्क घात झालेल्या, मतिमंद व बहुविध विकलांगता असलेल्या व्यक्तींच्या कल्याणाकरिता राष्ट्रीय न्यास अधिनियम १९९९, (The National Trust for Welfare of Persons with Autism, Cerebral Palsy, Mental Retardation and Multiple Disabilities Act, 1999) (२५) अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६ (The Immoral Traffic (Prevention) Act, 1956 (२६) राष्ट्रप्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम

१९७१, (२७) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, (२८) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम १९८७, (२९) महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंध अधिनियम १९९९, (३०) महाराष्ट्र विद्यापीठाच्या, मंडळाच्या व इतर विनिर्दिष्ट परीक्षांमध्ये होणा-या गैरप्रकारास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९८२, (३१) मुंबई विद्यापीठाचे अध्यादेश क्रमांक २२० (अनुचित प्रथा प्रतिबंध), (३२) मुस्लिम स्त्रिया (घटस्फोटानंतर अधिकार संरक्षण) अधिनियम १९८६, (३३) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्रविकास) अधिनियम १९७१, (३४) भारतीय वारसा हक्क कायदा १९२५, (३५) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, (३६) मुंबई मुद्रांक कायदा १९५८, (३७) गृहनिर्माण संस्थांचे विनियम, (३८) अनुसूचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९, (३९) मुस्लिम व्यक्ती विषयक विधी (शरियत) प्रयुक्ती अधिनियम १९३७, (४०) नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५, (४१) भारतीय मुद्रांक कायदा १८९९, (४२) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८, (४३) प्रसूती विषयक लाभ अधिनियम १९६१, (४४) सोसायटी नोंदणी अधिनियम १८६०, (४५) अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५, (४६) मोटर वाहन अधिनियम १९८८, (४७) जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९, (४८) मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३, (४९) महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम १९९९, (५०) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, (५१) माता पिता व ज्येष्ठ नागरिक यांची पोटगी व कल्याण अधिनियम २००७, (५२) मुंबई पोलीस अधिनियम, १९५०, (५३) जादूटोणा विरोधी कायदा २०१३, (५४) हिंदू मायनॉरिटी ॲन्ड गार्डीयनशिप ॲक्ट, १९५६, (५५) गार्डीयनशिप ॲन्ड वॉर्डस् ॲक्ट, (५६) कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, बंदी, तक्रार व निवारण) अधिनियम २०१३ (५७) The Sexual Harassment of Women at Work Place (Prevention, Prohibition and Redressal) Act, 2013 (Act 14 of 2013).

खालील वक्त्यांनी विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन केले.

| | | |
|---|---|---|
| (१) श्री. म. बा. पवार | (२) श्री. प्रमोद ढोकळे | (३) ॲड. श्री निलेश पावसकर |
| (४) ॲड. श्री हेमंत केंजाळकर | (५) ॲड. श्री अजय केतकर | (६) ॲड. श्री. भूपेश सामंत |
| (७) डॉ. जे. बी. पाटील | (८) श्रीमती शिवानी शेलार | (९) प्रा. नारायण राजाध्यक्ष |
| (१०) ॲड. श्री. प्रकाश देशमुख | (११) श्री. दिलीप तळेकर | (१२) श्रीमती सुशिला मुंडे |

४.१५ पुढील आर्थिक वर्षामध्ये खालील कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे ठरले आहे.

१. पोलीसांसाठी ३ दिवसांची विधी कार्यशाळा.

२. विद्यार्थ्यांसाठी मूट कोर्ट स्पर्धा, निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन.

३. वकीलांची व्यावसायिक नीतिमत्ता यावर चर्चासत्र.

४. विधी शाखेच्या विद्यार्थ्यासाठी विधी साक्षरता कार्यशाळा

## ९.५ रंगस्वर - सांस्कृतिक विभाग :-

प्रतिष्ठानच्या रंगस्वरतर्फे नाटय, चित्रपट, गायन आदी कार्यक्रम होतात. रंगस्वरची वार्षिक वर्गणी पती- पत्नीसाठी रु.२,०००/-, वैयक्तिक रु.१,२००/-, अपंगासाठी रु.५००/- भरुन रंगस्वरचे सभासद होता येते. रंगस्वरच्या सदस्यांना तसेच प्रतिष्ठानच्या सदस्यांना कार्यक्रमाचा आस्वाद घेता येतो. जानेवारी २०१६ मध्ये यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यशवंतराव चव्हाण सेंटरच्या मुंबई येथील सभागृहात विविध सांस्कृतिक कार्यक्रम रंगस्वरच्या वतीने नियमितपणे सादर केले जातात.

## ९.६ सृजन :-

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या रंगस्वर 'सृजन' विभागामार्फत शालेय विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास आणि विविध कलांची तोंड ओळख करुन त्यांचे विद्यार्थी जीवन समृध्द व्हावे याकरिता सृजनचा हा अभिनव उपक्रम चालविण्यात येतो. सर्जनशीलतेचा अविष्कार विद्यार्थ्यांसोबत घडवून त्यांच्यामधील सुप्तकलागुणांना वाव देण्याचा हा प्रयत्न आहे. सृजनची संकल्पना व संयोजन सौ. सुप्रियाताई सुळे यांचे असून यामध्ये सुप्रसिध्द चित्रकार श्री. डग्लस जॉन आणि सुलेखनकार श्री. शुभानंद जोग सन्माननीय सल्लागार म्हणून काम पाहतात. श्री. विद्याधर खंडे या कार्यशाळेचे समन्वयक म्हणून काम करीत आहेत.

६.१ २१ जून २०१५ :- श्री. विवेक टेटवीलकर, प्राध्यापक रचना संसद कॉलेज यांनी पारंपारिक पध्दतीने पुस्तके / वहयांना कव्हर घालण्या पेक्षा विविध पध्दतीने मुलांना वहया पुस्तकांना कव्हर घालण्यास शिकविले. वहया पुस्तके खराब होणार नाहीत, वहया पुस्तकांची काळजी कशी घ्यावी याची माहिती दिली.

६.२ १ जुलै २०१५ :- व्हर्टीकल गार्डन या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सृष्टीज्ञान संस्थेच्या कार्यकर्त्या सौ. संगीता खरात आणि श्री प्रशांत शिंदे यांनी या कार्यशाळेत दैनंदिन जीवनातील वनस्पतीच महत्त्व वृक्षरोपणाकरिता शहरामध्ये असलेली जागेची कमतरता यावर उपाय म्हणून कोल्ड्रींकच्या रिकाम्या प्लॅस्टीकच्या बाटल्यांचा उपयोग करुन जागा न व्यापणारा बगीचा कसा तयार करावा याचे प्रात्यक्षिक दिले. मुलांनी आणलेल्या रिकाम्या बाटल्यांमध्ये माती, खत व कोकोपीट मिश्रण करुन पाले भाज्यांच्याबिया पेरल्या आणि मुलांना पाण्याचे व्यवस्थापन कसे करावे, खत आणि किटकनाशक कोणते वापरावे यांचे मार्गदर्शन केले.

६.३ २ ऑगस्ट २०१५ :- न्यु होहरजन हेल्थ व रिसर्च फाऊंडेशन यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांचे आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले. या आरोग्य शिबिरात विद्यार्थ्यांचे, उंची, वजन, डोळे आणि संपूर्ण आरोग्याची तपासणी करण्यात आली. आवश्यकतेनुसार विद्यार्थ्यांना काही औषधे / टॉनिक देण्यात आली. मुलांना आरोग्याची जाणीव निर्माण व्हावी याकरिता आरोग्यविषयक काही फिल्म दाखविण्यात आल्या. आरोग्य शिबिराकरिता चव्हाण सेंटरचे विश्वस्त डॉ. समीर दलवाई यांचे महत्वाचे सहकार्य लाभले.

६.४ १३ सप्टेंबर २०१५ :- माती काम या विषयावर सौ. समक्या अहिरे यांनी मुलांना मातीपासून विविध प्रकारची वस्तू बनविण्याचे प्रशिक्षण दिले. मुलांनी या कार्यशाळेत मातीच्या छोटया वस्तू आणि गणपती इ. प्रकार बनविले.

६.५ ४ ऑक्टोबर २०१५ :- शिटी वादन या विषयावर श्री चैतन्य कल्याणपूरकर यांनी कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेत शिटी वादनाचे अनेक प्रकाराबद्दल माहिती दिली. शिटी वाजवून अनेक गाणी कशी वाजवावी याची प्रात्यक्षिके दाखवून दिली.

६.६ १ नोव्हेंबर २०१५ :- श्री. विवेक टेटविलकर, प्राध्यापक, रचना संसद कॉलेज यांनी दिपावलीनिमित्ताने विद्यार्थ्यांकडून आकाश कंदील कसे तयार करावेत याचे प्रात्यक्षिक दाखवून विद्यार्थ्यांकडून आकाश कंदील बनवून घेतले.

६.७ मा. श्री. शरदराव पवार साहेब यांचा अमृतमहोत्सव वाढदिवस आणि सृजन २०१५ चा सांगता समारंभाच्या निमित्ताने ६ डिसेंबर २०१५ रोजी पार्टी आयोजित केलेली होती. या पार्टीमध्ये श्री. प्रविण कामथे यांचे जादूचे प्रयोग आणि चार्ली चॅपलीन यांचा शो आयोजित केलेला होता. मा. श्री. शरदराव पवार साहेबांवर आधारित ६ मिनिटांची फिल्म दाखविण्यात आली. कार्यक्रमाला उपस्थित असणा-या विद्यार्थ्यांना शालेयपयोगी वस्तूंची आणि खाऊ वाटप करण्यात आले.

६.८ ३ जानेवारी २०१६ :- योगाभ्यासावर कार्यशाळा आयोजित केलेली होती. श्री समर्थ व्यायाम मंदिराचे श्री. उदय देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना काही निवडक आसनांची प्रात्यक्षिके दाखवून त्यानुसार आसने विद्यार्थ्यांकडून करुन घेतली. अभ्यासामध्ये योगाच्या अभ्यासाची मदत कशी होते हे त्यांनी सांगितले.

६.९ ७ फेब्रुवारी २०१६ :- श्रीमती श्रृती दामले आणि श्रीमती श्वेता यांनी तंत्र अभ्यासाचे या विषयावर कार्यशाळा घेतली. या कार्यशाळेत अभ्यास करण्याचे तंत्र पध्दती या विषयाची माहिती दिली. परीक्षेकरिता विद्यार्थ्यांनी अभ्यास कसा करावा, अवघड व सोप्या वाटणा-या विषयांची तयारी कशी करावी याबाबत माहिती दिली. मार्च ते या महिन्यात मुलांच्या वार्षिक परीक्षा आणि उन्हाळयाची सुट्टी यामुळे तीन महिने सृजन कार्यशाळा आयोजित करण्यात येत नाही. सृजनच्या कार्यशाळेत प्रत्येक सत्रात १०० ते १५० विद्यार्थ्यांचा सहभाग असतो.

## ९.७ शिक्षण विकास मंच :-

शिक्षण विकास मंचाने आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात आपली एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. सौ. सुप्रिया सुळे या शिक्षण विकास मंचच्या निमंत्रक म्हणून तर डॉ. वसंत काळपांडे, मुख्य संयोजक आणि श्रीमती बसंती रॉय विशेष सल्लागार म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. श्री. दत्ता बाळसराफ हे संयोजक, श्री. सुरेश पाटील, माधव सूर्यवंशी समन्वयक, मिनल सावंत, रमेश मोरे हे सहाय्यक म्हणून काम पहातात तर श्रीमती नज्मा काझी, श्रीमती सुभाष चौकर व श्री. विकास कांबळे यांचे विशेष सहकार्य लाभले.

**शिक्षण कट्टा** :- शिक्षण विकास मंचच्या वतीने घेतल्या जाणा-या 'शिक्षण कट्टा' यावर शैक्षणिक गप्पांची मैफल होत असते. शिक्षण क्षेत्रातील संबंधित मंडळी आपसामध्ये विषय ठरवून गप्पा मारण्यासाठी या कट्टयावर जमत असतात. यात आपले अनुभव, आपली मते मोकळेपणाने मांडण्याची मुभा प्रत्येकालाच असते. गेल्या तीन वर्षांपासून महाराष्ट्रातील वेगवेगळया विभागात सातत्याने शिक्षण कट्टयाचे आयोजन होत आहे.

**विद्यार्थ्यांची सुरक्षितता - दि. २५ एप्रिल २०१५** :- शालेय शिक्षणात विद्यार्थी हा सर्वात महत्वाचा घटक आहे. शिक्षणाची व्यवस्था प्रामुख्याने विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून करण्यात आली आहे. त्याचा सर्वांगीण विकास करीत असताना त्यांची सुरक्षितता हा महत्वाचा भाग आहे. याचा विचार करुन शिक्षण विकास मंचाने २५ एप्रिल २०१५ रोजी 'विद्यार्थ्यांची सुरक्षितता' या विषयावर विचारमंथन, चर्चा, संवाद घडविण्यासाठी शिक्षण कट्टा आयोजित केला होता.

'विद्यार्थ्यांची सुरक्षितता' याबाबतीत विचार करीत असताना ही सुरक्षितता जशी कौटुंबिक वातावरणाशी निगडीत आहे तशीच ती शालेय वातावरणाशी निगडीत आहे. कौटुंबिक सुरक्षितता तिची जबाबदारी विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची असली तरी शालेय सुरक्षिततेची जबाबदारी शाळेची आहे. विद्यार्थी घरुन शाळेत येत असतांना ज्या बसने येत असतो, रस्ता ओलांडत असतो तेथून तो शाळेत येईपर्यंतची बाब सुरक्षिततेशी निगडीत आहे.

विद्यार्थ्यांचे शोषण कुटुंबात, धार्मिकस्थळी, शाळेत, कामाच्या ठिकाणी होत असते. अशा वेळेस हे विद्यार्थी कितपत सुरक्षित आहेत याचा विचार मनात डोकावून जातो. ज्या कौटुंबिक परिसरात विद्यार्थी राहतात त्याचाही विचार करावा असा सल्ला या ठिकाणी महात्मा गांधी विद्यालयाचे संचालक मिलींद चिंदरकर यांनी मांडला. प्रा. गवळी सर यांनी विद्यार्थ्यांचे शोषण नुसतेच शाळेत होत नसते, तर धार्मिक स्थळांच्या परिसरात ही ब-याच वेळा होत असते याकडे सगळयांचे लक्ष वेधले.

शालेय स्तरावर विद्यार्थ्यांचे शोषण प्रामुख्याने ज्या ठिकाणी होते, त्यावर काय उपाययोजना केल्या आहेत त्यासंदर्भात काही मुद्दे कट्टयावर सहभागी झालेल्या सदस्यांनी मांडले ते पुढीलप्रमाणे :

१) विद्यार्थ्यांची वाहतूक होत असताना ज्या बसमधून ते प्रवास करतात त्यात पुरुष आणि महिला सहाय्यकांची आता नियुक्ती करण्यात आली आहे.

२) बसमध्ये कॅमेरे बसविण्यात आले आहेत.

३) शालेय परिसराततसुध्दा अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांवर नजर ठेवणारे कॅमेरे लावण्यात आले आहेत.

४) विद्यार्थ्यांसाठी शाळेत प्रथमोपचाराची सोय करण्यात आली आहे.

५) ब-याच शाळांनी डॉक्टर, नर्स, मानसोपचार तज्ञांची नियुक्ती शाळेत केली आहे.

६) मधल्या सुट्टीत मुले भांडण, मारामारी करत असतात, त्यावर देखरेखीची व्यवस्था करण्यात आली आहे.

७) शाळेच्या खिडक्या, गॅलरीला लोखंडाची ग्रील लावण्यात आली आहे.

८) शिक्षक, शिपायांपासून विद्यार्थी सुरक्षित रहावेत म्हणून आरटीई मध्ये ज्या तरतुदी सांगितल्या आहेत त्याची अंमलबजावणी मुख्याध्यापकांच्या माध्यमातून सुरु आहे.

९) अचानक शाळेत एखादी दुर्घटना घडली तर त्याला तोंड देण्याची योजना शाळेने अंमलात आणावी. उदा. आग लागली

तर अग्निरोधक बाबींची पुरेशी साधने शाळेत आहेत का? अग्निशामक दल, पोलीस स्टेशन, वाहतूक व्यवस्था आदीबाबतीत गंभीरपणे विचार करुन नियोजन केलेले असावे. शिवाय शाळेची आपत्कालीन व्यवस्था नेहमी कार्यान्वित असावी.

१०) विद्यार्थी वर्षातून दोन वेळा शैक्षणिक सहलीसाठी जात असतात. तेव्हा त्यांची योग्य ती खबरदारी शाळेने घ्यावी, त्यात वाहतूक, निवास, भोजन आदी व्यवस्था काटेकोरपणे पहाव्यात.

या विषयावरील शिक्षण कट्ट्यास तज्ञ शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, पत्रकार, आदींची उपस्थिती होती. फादर ज्यूड, डॉ. समीर दलवाई, श्रेया भंडारी, पूजा पेडणेकर, विनम्रता बोरवणकर, रेशमा शिवडेकर, मनिषा पाटील आदी मान्यवर पत्रकारांनी सहभाग घेतला. या शिक्षण कट्ट्याचे संचालन शिक्षण विकास मंचच्या मुख्य सल्लागार बसंती रॉय यांनी केले. हा कट्टा यशस्वी होण्यासाठी माधव सूर्यवंशी, रमेश मोरे, मिनल सावंत यांनी मदत केली.

**राष्ट्रीय शिक्षण दिन** :- भारताचे पहिले शिक्षण मंत्री मौलाना अब्दुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी ११ नोव्हेंबर रोजी शिक्षण विकास मंच राष्ट्रीय शिक्षण दिनाचे आयोजन करीत आहे. आतापर्यंत राष्ट्रीय शिक्षण दिनाच्या निमित्ताने दरवर्षी पुढीलप्रमाणे परिषदा आयोजित करण्यात आल्या होत्या.

- शिक्षण हक्क कायदा २००९
- शाळांची परिणामकारकता २०१०
- शालेय अभ्यासक्रमात उत्पादक कौशल्याचा समावेश २०११
- शालेय विद्यार्थ्यांची वर्तनसंहिता २०१२
- शालेय शिक्षणात माहिती आणि दूरसंचार तंत्रज्ञानाचा वापर २०१३
- सरकारी आणि अनुदानित शाळांपुढील आव्हाने २०१४

**राष्ट्रीय शिक्षण दिन २०१५** :- २०११ पासून दिनांक ११ नोव्हेंबर रोजी शासनामार्फतही शाळा-शाळांमध्ये कार्यक्रमाचे आयोजन होत असल्याने आणि याच कालावधीत ब-याचदा दिवाळीची सुट्टी येत असल्याने दरवर्षी ११ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्याऐवजी दिनांक २५ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्याचा प्रतिष्ठानने निर्णय घेतला. यावर्षी हा कार्यक्रम दि. २५ नोव्हेंबर २०१५ रोजी 'रंगस्वर' यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान केंद्र, मुंबई येथे आयोजित करण्यात आला होता २५ नोव्हेंबर हा मा. यशवंतराव चव्हाण यांचा स्मृतिदिन ही आहे.

**परिषदेचा विषय : शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षितता** :- विद्यार्थ्यांना सुरक्षित वातावरणात शिकता येणे हा त्यांचा हक्कच आहे. परंतु विद्यार्थ्यांना अमानुष शारिरीक शिक्षा, मारहाण, शाळेच्या इमारती आणि विद्यार्थ्यांची ने-आण करण्यासाठी वापरली जाणारी वाहने यांचे अपघात, विद्यार्थ्यांचे लैंगिक शोषण, विशेष गरजा असणा-या विद्यार्थ्यांकडे होणारे दुर्लक्ष, मादक द्रव्याचे सेवन, शाळेतील बेशिस्त, चो-या, विद्यार्थ्यांचे अपहरण अशी अनेक उदाहरणे आपणास रोजच्या बातम्यात वाचायला व ऐकायला मिळतात. याबाबत अनेक कायदे अस्तित्वात असले तरी याबाबत शिक्षक, पालक, मुख्याध्यापक, संस्थाचालक यांचे प्रबोधन होणे गरजेचे आहे. ही परिषद त्या दिशेने टाकलेले एक पाऊल आहे.

**परिषदेची उद्दिष्टे** :

१) शालेय विद्यार्थ्यांचे सर्वांगीण हित आणि सुरक्षितता यांवर परिणाम करणा-या विविध घटकांवर चर्चा करणे.

२) या विषयांशी संबंधित कायदे, नियम आणि मार्गदर्शक तत्वे यांचा आढावा घेणे.

३) या विषयाबाबत संस्था चालक, मुख्याध्यापक, शिक्षक, पालक, अधिकारी आणि समाज यांमध्ये जागरुकता कशी निर्माण होईल याबाबतच्या उपाययोजनांचा आढावा घेणे.

४) या विषयासंदर्भात शासनाकडे शिफारशी करणे.

या परिषदेत महाराष्ट्र शासनाचे शिक्षण विभागातील राज्य आणि जिल्हा स्तरावरील काम करणारे अधिकारी, प्राथमिक व माध्यमिक शिक्षक, मुख्याध्यापक, संस्था चालक, पालक, स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, शिक्षण तज्ज्ञ, शिक्षण क्षेत्राचे अभ्यासक, पत्रकार यांनी या परिषदेत सहभाग घेतला होता.

या परिषदेला सुरुवात करीत असतांना राज्यातील विविध भागातून आलेल्या प्रतिनिधींचे स्वागत प्रतिष्ठानचे सरचिटणीस श्री. शरद काळे यांनी केले. प्रास्तविकाच्या माध्यमातून शिक्षण विकास मंचचे मुख्य संयोजक डॉ. वसंत काळपांडे यांनी परिषदेमागील हेतू आणि उद्दिष्टे काय आहेत यांची मांडणी केली.

दरवर्षी राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथाला 'डॉ. कुमूद बन्सल शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार', उत्कृष्ट शैक्षणिक ब्लॉग/वेबसाईटला पुरस्कार आणि ई-लर्निंग या क्षेत्रात काम करणा-या शिक्षक यांनाही पुरस्कार दिला जातो.

**डॉ. कुमूद बन्सल उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार २०१५ :** २५ नोव्हेंबर २०१५ रोजी शिक्षण दिनाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या शिक्षण परिषदेत डॉ. कुमूद बन्सल उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार डॉ. माधुरी शानभाग यांची अनुवादीत केलेल्या 'लेटर्स टू अ सायन्टिस्ट' या पुरस्कारास देण्यात आला. जगद्विख्यात शास्त्रज्ञ डॉ. एडवर्ड ओ. विल्सन यांच्या मूळ इंग्रजी पुस्तकांचा मराठी अनुवाद डॉ. शानबाग यांनी केला आहे. या पुस्तकात करीअर म्हणून विद्यार्थ्यांना कोणते क्षेत्र निवडावे ? करीअर पूर्ण करीत असताना वाटेत कोणत्या अडचणी आपल्या वाटयास येऊ शकतात. या संदर्भात डॉ. एडवर्ड यांनी आपल्या तरुणाशी केलेला संवाद या पुस्तकात दिला आहे. दुसरा डॉ. कुमूद बन्सल उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार 'आमच्या शिक्षणाचं काय' हेरंब कुलकर्णी यांनी लिहिलेल्या आणि मनोविकास प्रकाशन, पुणे यांनी प्रकाशित केलेल्या पुस्तकांसाठी देण्यात आला. २००९ च्या शिक्षण हक्क कायद्यात ६ ते १४ वर्षे वयोगटातील एकही मूल शाळेबाहेर राहणार नाही, शाळेत न गेलेल्यांना किंवा शाळा मध्येच सोडलेल्या मुलांना वयानुरुप प्रवेश देण्यात येतील आणि इयत्ता आठवीपर्यंत कोणत्याही मुलास या इयत्तेत ठेवता येणार नाही अशा महत्त्वपूर्ण तरतूदी आहेत असे असूनही बालमजूर, रस्त्यावरची मुले, साखर कारखान्यात आणि वीट भट्टयात काम करणा-या पालकांची मुले, आदीवासी क्षेत्रातली आणि इतरही मुले मोठया संख्येने शाळांबाहेरच आहेत. त्यांचा हेरंब कुलकर्णी यांनी विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्र जिल्हयात फिरुन आणि अभ्यास करुन घेतलेला आढावा या पुस्तकात आहे.

**उत्कृष्ट ई-लर्निंग पुरस्कार २०१५ :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, परिंचे, तालुका माढा, जिल्हा सोलापूर येथील शिक्षक रणजितसिंह डिसले यांनी QR CODE चा वापर करुन एक अत्यंत सोपी आणि उपयुक्त प्रणाली तयार केली. मुलांना अभ्यासात उपयुक्त ठरेल तसेच आशय असलेल्या संकेत स्थळांकडे त्यांना सहज जाता येईल अशी त्याची रचना असल्यामुळे लहान वयोगटातील मुलांचाही ती वापरताना अडचण येणार नाही. ही प्रणाली ज्ञानार्जनासाठी मोबाईल उपकरणाच्या सहाय्याने अत्यंत प्रभावीपणे मदत करते. ज्यांच्याकडे इंटरनेटची सुविधा नाही त्यांना Offline उपयुक्ततेची सोय यात असल्यामुळे सर्व आर्थिक गटातील मुलांना याचा फायदा घेता येईल. पालक व शिक्षक यांना विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आणि अडचणीचाही मागोवा या प्रणाकांतून घेता येऊ शकतो. उपलब्ध प्रणालीचा उपयोग अध्ययन अध्यापनात सृजनशील पध्दतीने करण्याचा श्री. डिसले यांचा हा उपक्रम अतिशय अभिनंदनीय आहे. यामुळे यांना ई- लर्निंगचा उत्कृष्ट पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

**काळानुरुप शिक्षणावर व्यापक चर्चा व्हावी - खा. मा. सौ. सुप्रिया सुळे :** 'शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षितता' या विषयावरच्या परिषदा बोलत असताना शिक्षण विकास मंचच्या निमंत्रक खा. सौ. सुप्रिया सुळे यांनी काळापुरुप शिक्षणावर व्यापक चर्चा करण्याचे आवाहन उपस्थितांना केले. हल्लीचे यग माहिती तंत्रज्ञानामुळे झपाटयाने बदलत आहे. त्यानुरुप वेगवेगळया समस्या गंभीर रुप घेऊन आपणांसमोर उभ्या आहेत यावर व्यापक चर्चा व्हायला हवी असे मत त्यांनी व्यक्त केले.

हल्लीची परिस्थिती आणि वाढते बलात्कार लक्षात घेता लैंगिक शिक्षणाची गरज आहे की काय? असे वाटत आहे. त्यामुळे आता लैंगिक शिक्षणावर उघड चर्चा होण्याची गरज आहे. राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त घेण्यात आलेल्या परिषदेच्या

दुस-या सत्रात पुरस्कार वितरण समारंभानंतर त्या बोलत होत्या. एकीकडे पालकांनी आपल्या मुलांशी मोकळपणाने चर्चा करावी असे असतना प्रत्यक्ष पालक मात्र आपल्या मुला-मुलींशी शिक्षणावर फारसे उघडपणे बोलताना दिसत नाहीत. मात्र प्रसारमाध्यमे, व्हॉटस्‌ॲप, सोशल मिडीया आदी माध्यमातून आजची पिढी सर्व प्रकारची माहिती घेत असते. आजची किशोरवयीन पिढी तर मोबाईल इंटरनेटद्वारे खूपच फास्ट झाली आहे हे विसरुन चालणार नाही. शाळकरी मुले अज्ञानी राहिलेली नाहीत. मात्र त्यांना योग्य वयात मार्गदर्शन करण्याची गरज आहे. प्रसारमाध्यमांकडून नको त्या गोष्टी आता चव्हाटयावर आणल्या जात आहेत. त्याचे परिणाम विद्यार्थ्यांवर होत आहेत. सध्याच्या इंटरनेटच्या युगात विद्यार्थ्यांना मिळणा-या शिक्षणासंदर्भात नव्याने विचार करण्याची स्थिती तयार झाली आहे. मुलांची मानसिकता, त्यांना समाजात वावरताना पडणारे प्रश्न दरवेळी विचारात घेऊन त्या मुलांची सुरक्षितता पालकांनी लक्षात घेण्याची गरज असल्याचेही त्या म्हणाल्या.राज्यशासन आणि केंद्र सरकारकडून शिक्षणासाठी निधी कमी दिला जात आहे. शिक्षण हक्क कायद्यामार्फत मिळणारा प्राथमिकचा निधी आता माध्यमिक शाळांकडे वळवला जात आहे. शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार सर्वच शैक्षणिक स्तरावर करायला हवा. शिक्षणाचा दर्जा सुधारण्यांसाठी शिक्षकांना प्रयोगशील उपक्रम राबविण्यासाठी खाजगी संस्थांची मदत घ्यावी लागत असल्याची खंतही सौ. सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केली.

विद्यार्थ्यांची भावनिक आणि मानसिक सुरक्षितता या विषयावर समुपदेशक सुप्रिया नायर आणि मानसोपचार तज्ज्ञ डॉ. आशिष देशपांडे यांनी मार्गदर्शन केले. सुप्रिया नायर यांनी शालेय विद्यार्थ्यांचे सर्वांगीण हित आणि सुरक्षितता यांच्यावर परिणाम करणा-या विविध घटकांवरचा उहापोह केला. डॉ. देशपांडे यांनी विद्यार्थ्यांच्या असुरक्षिततेमुळे विद्यार्थ्यांच्या मनावर आणि अभ्यासावर होणारा परिणाम यासंदर्भात उपस्थितांना मार्गदर्शन केले. बालवयात नकळत बालकांकडून वारंवार होणा-या चुका सुधारण्यासाठी शिक्षक आणि पालकांची भूमिका यासंदर्भात अनेक उपाययोजनांचा त्यांनी परिषदेत आढावा घेतला. प्रथमच्या विश्वस्त फरीदा लांबे यांनी बालहक्क संरक्षण कायदा यासंदर्भात माहिती दिली. पहिल्या सत्रात प्राथमिक विभागाचे संचालक महावीर माने, डॉ. मिनल नरवणे, सुचेता भवाळकर यांनी विद्यार्थ्यांची शालेय सुरक्षितता या विषयावर मार्गदर्शन केले.

परिषदेचा समारोप खुल्या चर्चेने झाला. परिषदेत उपस्थित असणा-या प्रतिनिधींनी स्वतःचे प्रश्न, शंका या खुल्या अधिवेशनात उपस्थित केल्या. व्यासपीठावर असलेल्या तज्ज्ञांनी याला उत्तरे दिली. शिक्षण विकास मंचच्या विशेष सल्लागार बसंती रॉय यांनी उपस्थितांचे आभार मानले.

**विशेष आढावा बैठक - २० जानेवारी २०१६** : शिक्षण विकास मंचची यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे विशेष आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मंचचे मुख्य संयोजक डॉ. वसंत काळपांडे हे होते. या बैठकीत राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त घेण्यात आलेल्या परिषदेच्या निर्णयांबाबत चर्चा झाली.

सद्यस्थितीत शासनाने शिक्षणासंदर्भात घेतलेले निर्णय, अंमलबजावणी यांचीही अनौपचारिक चर्चा यावेळी झाली. आगामी काळात पुणे, मुंबई येथे शिक्षण कटयाचे आयोजन करण्याचे ठरले. शिक्षण कटयाच्या विषयाबाबत तेथील प्रमुखांनी डॉ. वसंत काळपांडे सर यांच्या सोबत चर्चा करुन निवड करावी. नवीन वर्षात कोणकोणते कार्यक्रम घ्यावेत, त्यांस किती आर्थिक सहाय्य लागेल यांची चर्चा झाली आणि निर्णय घेण्यात आले. या आढावा बैठकीत बसंती रॉय, दत्ता बाळसराफ, नज्मा काझी, सुरेश पाटील, मिनल सावंत, रमेश मोरे यांची उपस्थिती होती.

## ९.८ अपंग हक्क विकास मंच :-

महाराष्ट्रातील अपंग व्यक्तींच्या विविध समस्या, संवाद व समन्वयाच्या भूमिकेतून सोडविण्यासाठी अपंग हक्क विकास मंचाची निर्मिती करण्यात आली. मंचाच्या निमंत्रक सौ. सुप्रिया सुळे आहेत. मंचाचे संयोजक श्री. विजय कान्हेकर व श्री. दत्ता बाळसराफ तर समन्वयक सुहास तेंडुलकर, अभिजीत राऊत हे काम पाहतात. या मंचामार्फत महाराष्ट्रातील विविध जिल्हयांत शिबीराचे आयोजन करुन सर्व प्रवर्गातील अपंगांना त्यांच्या आवश्यकतेनुसार कृत्रिम अवयव व साहित्य साधनांसाठीचे मोजमाप घेऊन




सहाव्या यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या प्रमुख पाहुण्या ज्येष्ठ हिंदी अभिनेत्या श्रीमती वहिदा रहेमान यांचा सत्कार करताना प्रतिष्ठानचे सरचिटणीस श्री. शरद काळे. सोबत कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे व यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे संचालक डॉ. जब्बार पटेल.



सहाव्या यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या प्रमुख पाहुण्या ज्येष्ठ हिंदी अभिनेत्या श्रीमती वहिदा रहेमान यांचे स्वागत करताना महोत्सवाचे संचालक डॉ. जब्बार पटेल. सोबत मा. सरचिटणीस. श्री. शरद काळे व सौ. सुनीति काळे.




सहाव्या यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये आयोजित केलेल्या ‘स्मिता पाटील मेमोरियल लेक्चर’ साठी उपस्थित राहिल्याबद्दल ज्येष्ठ दिग्दर्शक श्री. महेश भट यांचे स्वागत करताना सरचिटणीस श्री. शरद काळे. सोबत महोत्सवाचे संचालक डॉ. जब्बार पटेल.



ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. विजय केळकर यांच्याशी हितगुज करताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार.




मा. यशवंतराव चव्हाण यांनी दीक्षांत समारंभात केलेली भाषणे 'माझ्या विद्यार्थी मित्रांनो' या पुस्तकाचे प्रकाशन करताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार. व डॉ. अनिल काकोडकर, उपाध्यक्ष श्री. अरुण गुजराथी, सरचिटणीस श्री. शरद काळे, राज्य पारितोषिक विजेत्या श्रीमती अरुणिमा सिन्हा व प्रकाशक श्री. प्रदीप चंपानेरकर.



यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार पुरस्कार २०१५ चे पुरस्कार विजेते डॉ. विजय केळकर यांनी पुरस्काराची रक्कम मा. यशवंतराव चव्हाण ज्या शाळेत शिकले त्या शाळेला देणेसाठी परत केली. त्याप्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार. व डॉ. अनिल काकोडकर, उपाध्यक्ष श्री. अरुण गुजराथी व सरचिटणीस श्री. शरद काळे.




यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक २०१५ प्रदान केल्यानंतर आपले मनोगत व्यक्त करताना श्रीमती अरुणिमा सिन्हा.




‘सिक्कीम राज्याची भौगोलिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरा’ या विषयावर व्याख्यान देताना सिक्कीमचे राज्यपाल मा. श्री. श्रीनिवास पाटील, सोबत सरचिटणीस श्री. शरद काळे व कार्यक्रम संयोजक श्री. दत्ता बाळसराफ.



प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार यांच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात मा. अध्यक्षांना शुभेच्छा देताना प्रतिष्ठानचे विश्वस्त श्री. दिलीप वळसे-पाटील. सोबत कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे व इतर.




प्रतिष्ठानचे अध्यक्ष
मा. श्री. शरदराव पवार यांच्या अमृत महोत्सवानिमित्त शेगांव येथे आयोजित केलेल्या 'देवस्थान न्यासाची सामाजिक जबाबदारी' या चर्चासत्रात भाग घेताना श्री. गजानन महाराज शेगांव संस्थानचे कार्यकारी विश्वस्थ श्री. शिवशंकरभाऊ पाटील व प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे.




प्रतिष्ठानचे अध्यक्ष
मा. श्री. शरदराव पवार यांच्या अमृत महोत्सवानिमित्त नवी मुंबई येथे आयोजित केलेल्या 'क्रीडा धोरण आणि क्रीडा संस्कृती' या चर्चासत्रात भाषण करताना सरचिटणीस श्री. शरद काळे. व श्री. भिष्मराज बाम, श्रीमती अजंली भागवत.




प्रतिष्ठानचे अध्यक्ष
मा. श्री. शरदराव पवार यांच्या अमृत महोत्सवानिमित्त पुणे येथे आयोजित केलेल्या 'औद्योगिक विकास' या चर्चासत्रात भाषण करताना विश्वस्त श्री. अजित निंबाळकर व मराठा चेंबर्स ऑफ कॉमर्स चे श्री. अनंत सरदेशमुख.




प्रतिष्ठानचे अध्यक्ष
मा. श्री. शरदराव पवार यांच्या अमृत महोत्सवानिमित्त नागपूर येथे आयोजित केलेल्या 'व्यवस्था आरोग्याची' या चर्चासत्रा प्रसंगी भाषण करताना श्री. गिरीश गांधी.




प्रतिष्ठानचे अध्यक्ष
मा. श्री. शरदराव पवार यांच्या अमृत महोत्सवानिमित्त नाशिक येथे आयोजित केलेल्या 'साहित्य, संस्कृती व कलाः सामाजिक पर्यावरण आणि शासकीय धोरण' या चर्चासत्रा प्रसंगी मान. सरचिटणीस श्री. शरद काळे सोबत श्री. विनायकराव पाटील, श्री. रंगनाथ पठारे, श्री. संजय जोशी, व निवेदक श्री. लोकेश शेवडे.




अपंग हक्क विकास मंच आणि साहित्य व सांस्कृतिक मंडळ, पुणे यांच्या वतीने आयोजित केलेल्या ६ व्या अखिल भारतीय विशेष व्यक्ती (अपंग) साहित्य संमेलनात, भाषण करताना कार्याध्यक्षा सौ. सुप्रियाताई सुळे



इतिहासकार राजवाडे यांच्या साहित्याच्या वेब साईटचे उद्घाटन करताना ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर. सोबत प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार, नेहरु सेंटरचे संचालक श्री. सतीश साहनी, प्रतिष्ठानचे सरचिटणीस श्री. शरद काळे व राजवाडे संशोधन मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. संजय मुंदडा.




यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आणि मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या विज्ञानगंगा या कार्यक्रमांतर्गत 'गुरुत्व लहरी' या विषयावरील व्याख्यानाचे प्रास्ताविक करताना श्री. अं. पा. देशपांडे. सोबत सरचिटणीस श्री. शरद काळे व व्याख्याते ज्येष्ठ शास्त्रज्ञ आयुका पुणेचे डॉ. संजीव धुरंधर.



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या वतीने देण्यात येणारे न्यायमूर्ती वाय. व्ही. चंद्रचूड पारितोषिक २०१५ कु. शामालेन सिक्वेरा यांना प्रदान करताना डॉ. अनिल काकोडकर.



विभागीय केंद्र कराडच्या वतीने मा. यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीदिनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करताना सिक्कीमचे राज्यपाल श्री. श्रीनिवास पाटील व केंद्राचे अध्यक्ष आमदार श्री बाळासाहेब पाटील. सोबत सचिव श्री. मोहनराव डकरे.




विभागीय केंद्र नाशिक यांच्या वतीने आयोजित केलेल्या यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार २०१५ चे वितरण प्रसंगी पुरस्कार वितरण करताना माजी मंत्री, मा. श्री. बाळासाहेब थोरात, पुरस्कार विजेते ज्येष्ठ शास्त्रीय संगीतकार श्री. मकरंद हिंगणे सोबत केंद्राचे अध्यक्ष श्री. विनायकराव पाटील व इतर.



विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने आयोजित केलेल्या यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार २०१५ चे वितरण प्रसंगी पुरस्कार वितरण करताना ज्येष्ठ साहित्यिक डॉ. यशवंत मनोहर, पुरस्कार विजेत्या डॉ. रुपाताई बोधी-कुलकर्णी. सोबत केंद्राचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी व इतर.

विभागीय केंद्र कोकणच्या वतीने सिंधुदुर्ग (तुळस) येथे आयोजित केलेल्या 'अश्वमेध २०१६' या स्पर्धात्मक कार्यक्रमात बक्षीस वितरण करताना केंद्राचे कोषाध्यक्ष श्री एम. के. गावडे व इतर.




विभागीय केंद्र लातूरच्या वतीने मा. यशवंतराव चव्हाण यांच्या १०३ व्या जयंतीदिनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात व्याख्यान देताना प्रा. प्रकाश पवार. सोबत केंद्राचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे, सचिव श्री. हरिभाऊ जवळगे व इतर.




विभागीय केंद्र कराडच्या वतीने मा. यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीवर (प्रीति संगमावर) पुष्प वाहताना केंद्राचे सचिव श्री. मोहनराव डकरे व महिला कार्यकर्त्या






डॉ. कुमुद बन्सल उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार २०१५ श्री हेरंब कुलकर्णी यांना प्रदान करताना प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे. सोबत शिक्षण विकास मंचचे प्रमुख संयोजक श्री. वसंत काळपांडे, मुख्य सल्लागार श्रीमती बसंती रॉय व इतर.



डॉ. कुमुद बन्सल उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथ पुरस्कार २०१५ डॉ. माधुरी शानबाग यांना प्रदान करताना प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा सौ. सुप्रिया सुळे. सोबत शिक्षण विकास मंचचे प्रमुख संयोजक श्री. वसंत काळपांडे.




नवमहाराष्ट्र युवा अभियान यांच्या वतीने क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिनी भाषण करताना कार्यक्रम संयोजक श्री. दत्ता बाळसराफ.




नॅशनल बुक ट्रस्ट, इंडियाच्या वतीने राष्ट्रीय चरित्रमालेत 'यशवंतराव चव्हाण' या पुस्तकाचे प्रकाशन करताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार व डॉ. अनिल काकोडकर, लेखिका श्रीमती भावना पाटोळे व नॅशनल बुक ट्रस्टचे संपादक श्री. राहुल कोसम्बी.




यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईने आयोजित केलेल्या ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा २०१५ मध्ये प्रमुख पाहुणे म्हणून मनोगत व्यक्त करताना सुप्रसिध्द साहित्यिक व ज्येष्ठ संगणक तज्ज्ञ श्री अच्युत गोडबोले, सरचिटणीस श्री. शरद काळे व सत्कारमूर्ती.



यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आयोजित केलेल्या ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा २०१५ मध्ये ज्येष्ठ नागरिक संघ, मुलुंड (पूर्व), मुंबई या संघाचा सत्कार करताना सरचिटणीस श्री. शरद काळे व ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी.



▶ शिक्षण विकास मंचच्या वतीने आयोजित केलेल्या शिक्षण कट्टा या अंतर्गत 'विद्यार्थ्यांची सुरक्षितता' या विषयावर विचारमंथन, चर्चा, संवाद प्रसंगी विश्वस्त डॉ. समीर दलवाई, मुख्य सल्लागार श्रीमती बसंती रॉय व इतर.




▶ महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या वतीने आयोजित केलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापक प्रशिक्षण प्रसंगी प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र वितरण प्रसंगी डॉ. सुधीर गोयल, अप्पर मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य. सोबत कार्यकारी संयोजिका श्रीमती ममता कानडे.




▶ अपंग हक्क विकास मंच आणि साहित्य व सांस्कृतिक मंडळ, पुणे यांच्या वतीने आयोजीत केलेल्या ६ व्या अखिल भारतीय विशेष व्यक्ती (अपंग) साहित्य संमेलन प्रासंगी अभियानचे संयोजक श्री. विजय कान्हेकर व इतर.

सहाव्या यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात स्मिता पाटील मेमोरियल लेक्चरसाठी उपस्थित ज्येष्ठ दिग्दर्शक श्री. महेश भट व संचालक डॉ. जब्बार पटेल.




प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार यांच्या अमृत महोत्सवाच्या सत्कार प्रसंगी प्रतिष्ठानचे पदाधिकारी व कर्मचारी.



प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार यांच्या अमृत महोत्सवाच्या सत्कार प्रसंगी प्रतिष्ठानचे अधिकारी.



साधने मोफत उपलब्ध करुन दिली जातात. या मंचामार्फत प्रत्येक अपंगांना त्यांच्या अपेक्षेनुसार योग्य ती माहिती व सल्ला दिला जातो.

८.१ **कळंमनुरी, जिल्हा हिंगोली, दि. २१ व २२ सप्टेंबर २०१५ : कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबिर** :- महाराष्ट्रातील विविध जिल्हयांत सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली, अपंग हक्क विकास मंच मुंबई, महात्मा गांधी सेवा संघ, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने आणि समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद हिंगोली यांच्या सहकार्याने एडीप योजने अंतर्गत सर्व प्रवर्गातील अपंगांसाठी कृत्रिम अवयव व साधने वाटप शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा हिंगोली येथे आयोजित शिबीरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती रजनीताई सातव, खासदार राजीव सातव, आमदार डॉ. संतोष टारफे, पोलीस अधिक्षक कैलाश कणसे, डॉ. राजेंद्र दुबे, डॉ. दिपक गुप्ता आणि अपंग हक्काचे संयोजक श्री. विजय कान्हेकर आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबीरात एकूण १२५ अपंग लाभार्थ्यांची नोंदणी व तपासणी करण्यात आली असून १०० गरजू लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्याता आले. यामध्ये १०० जयपूर फूट या साहित्याचे वाटप करण्यात आले. या शिबीराच्या यशस्वीतेसाठी महात्मा गांधी सेवा संघ व अपंग हक्क विकास मंचाचे कर्मचारी व कार्यकर्ते आणि सहकारी यांनी परिश्रम घेतले.

८.२ **अपंग हक्क विकास मंच आणि साहित्य व सांस्कृतिक मंडळ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने ६ वे अखिल भारतीय विशेष व्यक्ती (अपंग) साहित्य संमेलन, औरंगाबाद** :- दि. १३ व १४ जानेवारी २०१६ रोजी कविवर्य सुरेश भट साहित्यनगरी, औरंगाबाद येथे साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. याचा उद्घाटन सोहळा बुधवार दि. १३ जानेवारी २०१६ रोजी सायंकाळी ५.०० वा. पार पडला. यावेळी विधानसभेचे अध्यक्ष श्री. हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते सोहळयाचे उद्घाटन झाले. प्रा. अशोक थोरात (ज्येष्ठ साहित्यिक) साहित्य संमेलन अध्यक्ष यांच्या हस्ते चित्र व ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. यावेळी मा. ना. राजकुमार बडोले (मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य), मा. रा. रं. बोराडे (ज्येष्ठ साहित्यिक), मा. अभिनंदन थोरात (अध्यक्ष, चिंतन ग्रुप, पुणे), मा. वैकुंठ कुंभार, अध्यक्ष, साहित्य व सांस्कृतिक मंडळ, पुणे आदी मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते. या साहित्य संमेलनात सौ. उषा शास्त्री (मुंबई), श्री. देव शर्मा (दिल्ली), श्री. मनी पानसे (पुणे), श्री. देवीदास आधीवार यांच्या पुस्तकांचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. नवोदित कवींचे कवी संमेलन आयोजित केले होते. विशेष व्यक्तींचे विविध सांस्कृतिक व मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यात विशेष (अपंग) व्यक्तींनी निरनिराळया गाण्यांवर नृत्याचे प्रदर्शन, मंजुळ आवाजातील ऑर्केस्ट्रा सादर करण्यात आला. मतिमंद मुलांचे राजे छत्रपती शिवरायांच्या 'जन्मसोहळा ते राज्याभिषेका पर्यंतचा जीवनपट' याचेही सादरीकरण अविस्मरणीय असे होते. यावेळी उपस्थित शिवशाहीर मा. विजय तनपुरे, राहुरी यांनी या मतिमंद मुलांचे व त्यांच्या शिक्षकांचे विशेष कौतुक केले. शिवशाहिरांनीही आपल्या दर्जेदार आवाजात पोवाडा गाऊन कार्यक्रमाची रंगत वाढवली. संमेलनासाठी एकूण ७०० साहित्यप्रेमी उपस्थित होते. साहित्य प्रेमींच्या निवासाची, नाश्ता व भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती.

गुरुवार दि. १४ जानेवारी २०१६ रोजी सकाळी दुस-या दिवशी विविध कार्यक्रमांची सुरुवात झाली. देशातील विविध राज्यातील तसेच महाराष्ट्रातील विविध राज्यातून आलेल्या मान्यवर कवींच्या कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कविसंमेलनात अध्यक्ष मा. पियुष द्विवेदी (चित्रकूट, उ. प्र.), मा. विजय आव्हाड (मुंबई), मा. नाना बेरगुडे (परभणी), मा. प्रकाश खोडके (हिंगोली), मा. गौत्तम राऊत (खामगांव), मा. राजन चव्हाण (मुंबई), मा. माधुरी भालेराव (नांदेड), मा. आकाश भैसारे (चंद्रपूर), मा. रामराव जोजार (नांदेड), मा. कृष्णा ठोंबरे (औरंगाबाद), मा. प्रा. नंदकिशोर सरोसे (सिल्लोड), मा. विभावरी साखरे (औरंगाबाद), मा. प्रा. राजाराम झोडगे (सेलू), मा. विजय साळुंखे (पुणे) देशभरातून आलेल्या कवींनी बहारदार पण तितक्याच चिंतनात्मक पध्दतीने विशेष व्यक्तींच्या वाटयाला आलेले दुःख त्याचा संघर्ष यातून मिळणा-या त्यांच्या यशाचा प्रवास उत्स्फूर्तपणे आपल्या कवितेतून सादर केला.

निमंत्रितांच्या कविसंमेलनानंतर संमेलनाचे विशेष सत्र सुरु झाले. या विशेष सत्रात महाराष्ट्र सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री ना. राजकुमार बडोले, प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षा सौ. सुप्रियाताई सुळे, मा. आमदार हेमंत टकले या मान्यवरांची उपस्थिती होती. या विशेष सत्रात विशेष व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. यात प्रामुख्याने रामदास म्हात्रे, धर्मेंद्र सातव,

गिर्यारोहक शिवाजी गाडे, दिपाताई क्षीरसागर, बाजीराव जाधव, गणेश जहांगीरदार, सैय्यद कौसर, हरिदास जोगदंड, पारसचंद साकला, संदीप ओमसाल या मान्यवरांचा सत्कारमा. मंत्री महोदय राजकुमार बडोले आणि मा. खासदार सौ. सुप्रिया सुळे यांच्या हस्ते करण्यात आला.

संस्कारभूषण साहित्य व सांस्कृतिक मंडळ, पुणे यांच्या वतीने देण्यात येणा-या संस्कारभूषण पुरस्काराचे वितरण करण्यात आले. हा पुरस्कार मा. पियूष द्विवेदी (चित्रकुट - उत्तर प्रदेश) यांना साहित्यातील, मा. गजानन वाघ (नागपूर) यांना प्रशासकीय सेवेतील, मा. कोमल बोरा यांना क्रीडा क्षेत्रातील आणि कोल्हापूरच्या चेतना अपंगमती विकास संस्थेला संस्थेचा संस्कारभूषण पुरस्कार देवून सन्मानीत करण्यात आले.

कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नाशिक यांच्याकडून ब्रेल लिपीतील ग्रंथ पेटी आणि बोलकी पुस्तके प्रतिष्ठानचे विश्वस्त मा. आ. श्री. हेमंत टकले यांच्या हस्ते तारामती बाफना अंध विद्यालयास देण्यात आली. ही बोलक्या पुस्तकांची पेटी औरंगाबाद विभागातील सर्व शाळांमध्ये फिरेल अशी माहिती यावेळी देण्यात आली. प्रसिध्द ग्रामीण साहित्यिक आणि महाराष्ट्र राज्याच्या साहित्यिक, सांस्कृतिक मंडळाचे माजी अध्यक्ष रा. र. बोराडे यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त त्यांचा सत्कार मा. मंत्री महोदय राजकुमार बडोले यांच्या हस्ते करण्यात आला.

खासदार सौ. सुप्रिया सुळे यांनी सर्वांशी संवाद साधला. विशेष व्यक्तींच्या विशेषत्वाचे त्यांनी कौतुक केले. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की, विशेष (अपंग) व्यक्ती हा समाजाचा अविभाज्य भाग आहे म्हणून समाजानेही त्याची विशेष काळजी घेतली पाहिजे. त्यांच्या विकासासाठी पोषक असे वातावरण तयार करण्याची जबाबदारी समाजाची आहे आणि हीच गरज ओळखून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या अंतर्गत अपंगांसाठी कार्य करणा-या अपंग हक्क विकास मंचाने हे संमेलन भरविले आहे.

चव्हाण सेंटरने अपंगांची विशेष तपासणी करण्यासाठी एक फिरती व्हॅन सुरु केली असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. ती व्हॅन राज्यभर फिरत असते. या व्हॅनमध्ये अपंगांना आवश्यक असणारे कृत्रिम अवयव व साधनांची निर्मिती त्यातच करता येते. लगेचच अपंगांना त्यांना आवश्यक त्या साधनांचे मोफत वाटप केले जाते. या फिरत्या व्हॅनमुळे तळागाळातील विशेष व्यक्तींपर्यंत पोहचता येते. या व्हॅनच्या माध्यमातून आतापर्यंत हजारो विशेष व्यक्तींनी तपासणी करुन घेतली आहे. शिवाय केंद्र सरकारने या व्हॅनची पाहणी करुन अशीच व्हॅन देशभर अपंगांसाठी सुरु करण्याचा मानस व्यक्त केल्याची माहितीही यावेळी सौ. सुप्रिया सुळे यांनी दिली.

अमेरिकास्थित स्टार्की फाऊंडेशन यांच्या सहकार्याने आजपर्यंत तीन हजार कर्णबधीर लोकांना आपा डिजिटल श्रवणयंत्रे दिल्याचे त्यांनी सांगितले. नॅबच्या माध्यमातून अंधांसाठी कार्य करणा-या मुंबई स्थित श्रीमती परीमला भट यांचे कौतुक करुन ताई म्हणाल्या की, स्वतः परीमला हया अंध आहेत पण सा-यांविषयी त्यांना खूप संवेदना आहेत. नोकरी सांभाळून त्या अंधांसाठी काम करीत असलेल्या नॅबसारख्या सेवाभावी संस्थेत त्या कार्यरत आहेत. या अशा संमेलनातून नवीन कार्याला दिशा मिळत असते. शिवाय सर्व स्तरावर अपंगांच्या प्रश्नांवर चर्चा होत असते व ही चर्चा करण्यासाठी आपण सर्व साहित्य प्रेमी मोठया संख्येने देशभरातून उपस्थित राहिल्याबद्दल सर्वांचे आभार त्यांनी मानले.

नामदार राजकुमार बडोले यांनी विशेष व्यक्तींना आपण न्याय देण्याचा प्रयत्न करु असे त्यांनी सांगितले. शासनाकडून जशी अपंगांची अपेक्षा झाली तशीच अपेक्षा समाजाकडून सुध्दा झाली आहे. या वर्षात १२३ विशेष अपंगांच्या शाळांना अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. जे अपंग खेळाडू ज्यांनी विशेष नैपुण्य दाखविले आहे त्यांना शासकीय नोकरीत सामावून घेतले जाणार आहे. सध्या संजय गांधी योजने अंतर्गत अपंगांना रु.६००/- मासिक वेतन मिळते ते वाढवून रु.१०००/- करण्याचा निर्णय थोडयाच कालावधीत आपण घेणार आहोत असे त्यांनी सांगितले. मा. मंत्र्यांच्या भाषणानंतर आमदार श्री. हेमंत टकले यांनी आगामी काळात होणा-या विशेष व्यक्तींच्या साहित्य संमेलनासाठी शासनाने अनुदान द्यावे असा ठराव मांडला. उपस्थित प्रतिनिधींनी बहुमताने तो मंजूर केला. या ठिकाणी हे विशेष सत्र संपले.

यशोगाथा सत्रात : विशेष व्यक्तीच्या या साहित्य संमेलनात विशेष व्यक्तिंच्या यशोगाथा हा प्रकट मुलाखतीचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. या विशेष व्यक्तींना अश्विनी दशरथे, औरंगाबाद येथील संवाद साधून त्यांना बोलते केले. या प्रकट मुलाखतीमध्ये श्रीमती परीमला भट (मुंबई), मा. राजेश ठाकरे (नांदेड), मा. खंडेराव मुळे (उस्मानाबाद) या विशेष व्यक्तींनी

आपल्या अंधत्वावर मात करुन त्यांनी मिळवलेल्या यशाच्या प्रवासाचे वर्णन या यशोगाथेच्या सत्रात केले. शिवाय सोबतच मा. पवन खेबूडकर यांनी मतिमंद विद्यार्थ्यांसाठी चेतना विकास संस्था, कोल्हापूर येथे कशी विकसित केली. या रोपटयाचे आज सुंदर वटवृक्षात कसे रुपांतर केले याचे मर्म त्यांनी सांगितले.

साहित्य संमेलनाच्या शेवटच्या भागात खुले चर्चासत्र, ठराव आणि समारोपीय आभार प्रदर्शनाचा कार्यक्रम संपन्न झाला. साहित्य एंमेलनास उपस्थित राहिल्याबद्दल सर्वांचे आभार स्वागताध्यक्ष सुहास तेंडुलकर यांनी मांडले. या संमेलनाचे अध्यक्षपद भुषविल्याबद्दल प्रसिध्द साहित्यिक प्रा. अशोक थोरात यांचे त्यांनी विशेष आभार मानून पुढील काळात आम्हाला सहकार्य करावे अशी विनंती केली. हे संमेलन यशस्वीरित्या संपन्न करण्यासाठी ज्यांनी ज्यांनी योगदान दिले त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानून पुढील संमेलनासाठी आपण भेटणार आहोत असा आशावाद व्यक्त केला.

**८.३ वैयक्तिक पातळीवर (म्हणजे शिबीराचे आयोजन न करता) या विविध जिल्हयातील १२ लाभार्थ्यांना त्यांना आवश्यक असणा-या साहित्य त्यांच्यापर्यंत पोहचून मोजमाप घेऊन उपलब्ध करुन देण्यात आले, त्याची यादी पुढीलप्रमाणे :**

| अ.क्र. | लाभार्थ्यांचे नांव | जिल्हयाचे नांव | साहित्याचा प्रकार |
|---|---|---|---|
| १ | जैनबजदा इरगाद | औरगाबाद | कॅपिलर |
| २ | लिशा राजू पटेल | औरगाबाद | कन्युंलेटर |
| ३ | दत्तू आसाराम झिरपे | औरगाबाद | कॅपिलर |
| ४ | अमरदिप डोईफोडे | जालना | ए.एफ.ओ. |
| ५ | संगीता लाला लहाने | जालना | कुबडी |
| ६ | भगवान राजेभाऊ गंडे | बुंलढाणा | ए.एफ.ओ. |
| ७ | नरेंद्र तुकाराम गंदेवार | नांदेड | कॅपिलर |
| ८ | अविनाश रोहिदास | जळगाव | कॅपिलर |
| ९ | दिपाली गोस्वामी | लातूर | कॅपिलर |
| १० | पवार बी. एस. | अहमदनगर | कन्युंलेटर |
| ११ | आकाश कृष्णा बनसोडे | बीड | कॅपिलर |
| १२ | जगदीश माधवराव आष्टीकर | कमनाबाद, कर्नाटक | जयपूर हॅन्ड |
| १३ | सुजीत विश्वकर्मा | अंधेरी, मुंबई | जयपूर हॅन्ड आणि जयपूर फूट |

**८.४ कर्णबधीर मुलांच्या कॉक्लिअर इंम्प्लाटच्या शस्त्रक्रियेच्या आर्थिक मदतीसाठी सहकार्य :** ० ते ५ वर्षे वयोगटातील कर्णबधीर मुलांच्या कॉक्लिअर इंम्प्लांटसाठी केंद्र सरकारच्या योजने अंतर्गत प्रत्येकी रु.७ लाख अर्थसहाय्य देण्यात येते. त्यासाठी आपल्या महाराष्ट्रातील ज्या गरजे व आर्थिक दुर्बल कर्णबधीर मुलांना या योजनेचा लाभ घ्यावयाचा आहे. अशा मुलांना यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या निमंत्रक मा. सौ. सुप्रियाताई सुळे यांच्या पत्रव्यवहाराच्या मार्फत केंद्र सरकारची योजना या मुलांपर्यंत पोहोचवली जाते. या वर्षभरात २०१५-१६ मध्ये चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई अपंग हक्क विकास मंचाच्या वतीने खालील कर्णबधिर मुलांना केंद्र सरकारची मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.

| अ.क्र. | लाभार्थ्यांचे नांव | जिल्हयाचे नांव | वय |
|---|---|---|---|
| १ | कृतिका दत्तात्रय पाटील | पुणे | ५ वर्षे |
| २ | सारा भूषण वर्तक | पालघर | ६ वर्षे |
| ३ | शर्वरी संदीप तिडके | पुणे | १ वर्षे |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | आर्यन विजय कदम | कोरेगांव, सातारा | ११ वर्षे |
| ५ | अर्शद अली शेख | इंदापूर, पुणे | ६ वर्षे |
| ६ | श्रावणी कैलास शेलार | इंदापूर, पुणे | ५ वर्षे |
| ७ | इसरा शेख | मुंबई | ३ वर्षे |

८.५ **अंध प्रवर्गासाठी चर्चासत्र :** अपंग हक्क विकास मंच आणि ब्लाईंड ग्रॅज्युएट फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या दोन वर्षांपासून दर महिन्याच्या चौथ्या शनिवारी अंध प्रवर्गासाठी नियमितपणे चर्चा सत्राचा उपक्रम राबविला जातो. या सत्रात अंधना विविध क्षेत्रातील मान्यवर तज्ज्ञांना बोलावून त्यांच्या संबंधित विषयावर मार्गदर्शनास्पद चर्चा केली जाते. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शिक्षणातील झालेले बदल, नोकरीत, सामान्य जीवनात येणारे अडथळे अशा विषयांवर चर्चा केली जाते. यामुळे या प्रवर्गातील अपंगांना त्यांचे आयुष्य कसं सोप्या पध्दतीने जगता येऊ शकते याबद्दल विशेष मार्गदर्शन मिळते आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यास मदतही होते.

## ९.९ वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान :-

९.१ **यशवंत औषधी वनस्पती संवर्धन प्रकल्प २०१४-१५ समारोप समारंभ दि. २० फेब्रुवारी २०१५ :** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचा पर्यावरण विभाग वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान हवामान बदलाच्या समस्येवर गेली चार वर्षे सातत्याने शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबवित आहे. पृथ्वीच्या वाढत्या तापमानामुळे हवामानात पराकोटीचे बदल होत आहेत. हवामान बदलाचे दुष्परिणाम वेळीच रोखले नाहीत तर महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील जनतेचे जगणे अधिकाधिक बिकट होत जाणारआहे. यावर सर्वांत प्रभावी उपाय म्हणजे वृक्षसंवर्धन होय. महाराष्ट्राच्या मातीत वाढणा-या आणि बदलत्या तापमानात टिकून राहणा-या वृक्षवल्लींची लागवड करणे आणि गावा-गावात स्थानिक वनस्पतींच्या बियाणांचे जतन करणे हे वाढत्या तापमानाला आवर घालण्याचे थेट उत्तर आहे. या सर्व गोष्टींचा समग्र विचार करुन पर्यावरण संवर्धन अभियानाने २०१४-१५ या शैक्षणिक वर्षात मुंबईतील १० शाळांमध्ये 'यशवंत औषधी वनस्पती संवर्धन प्रकल्प' राबविण्याचा संकल्प केला होता. महाराष्ट्राचे भवितव्य घडविणारी विद्यार्थी पिढी अशा बहुगुणी वृक्षांच्या सावलीत आणि निरोगी वातावरणात वाढावी हेच या प्रकल्पाचे अंतिम ध्येय आहे.

या प्रकल्पांतर्गत शाळांच्या परिसरात औषधी गुणधर्म असणा-या वनस्पतींची लागवड करण्यात आली. मुंबईतील दहा शाळांमध्ये जागेची अडचण लक्षात घेऊन कुंडयांमध्ये अडुळसा, तुळस व कोरफडी प्रत्येकी दहा याप्रमाणे तीस रोपांची लागवड करण्यात आली. या रोपांची काळजी कशी घ्यावी, पाणी कसे घालावे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. झाडांचे निरीक्षण कसे करायचे, त्यांच्या वाढीची नोंद कशी करावी याचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना करण्यात आले. विद्यार्थ्यांनी औषधी वनस्पतींचे शाळेच्या परिसरात संगोपन करण्याबरोबरच अडुळशाचा काढा, कोरफडीचा रस यासारखी उत्पादने कशी तयार करावी याचेही मार्गदर्शन करण्यात आले. मुंबईत प्रथमच अशा प्रकारचा प्रकल्प राबविला गेला आणि त्याला शाळांचा खूपच चांगला प्रतिसाद लाभला.

या प्रकल्पाचा समारोप शुक्रवारी २० फेब्रुवारी २०१५ रोजी सकाळी ९ ते १२ या वेळेत पार पडला. विद्यार्थ्यांनी वर्षभ केलेल्या कामाचे अहवाल, नोंदवहया, पोस्टर, रोपांच्या कुंडया, औषधी वनस्पतींवर केलेल्या कविता, चित्रे या सा-यांची विद्यार्थ्यांनी मांडणी केली. सर्वप्रथम योगिता बासुतकर हिने वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियानाच्या उपक्रमाची माहिती दिली. त्यानंतर अस्मिता संचालित जमनाधर अग्रवाल माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी फोटोंद्वारे आपल्या प्रकल्पाचे सादरीकरण केले. या शाळेत गांडूळ खताचा प्रकल्पही मोठया प्रमाणावर केला गेला आहे. शाळेतील प्रत्येक शिक्षक, विद्यार्थ्यांकडे छोटा गांडूळखत बनविण्याचा डबा असावा असा त्यांचा आग्रह आहे.

सरस्वती इंग्लीश स्कूल, अंधेरीच्या विद्यार्थ्यांनी औषधी वनस्पतींवर 'आजीबाईंचा बटवा' हे नाटक सादर केले. त्यानंतर चिकित्सक समूह शिरोळकर हायस्कूल, गिरगाव या शाळेच्या विद्यार्थ्यांनी देखील 'सौंदर्यदायिनी कोरफड' हे नाटक सादर केले.

विद्यार्थ्यांनीच लिहिलेल्या व बसविलेल्या या नाटकात विश्वसुंदरी बनलेल्या तरुणीने तिच्या सौंदर्याचे श्रेय कोरफडीस देताना दाखवले होते. समारंभाचे प्रमुख पाहुणे श्री. दत्ता बाळसराफ यांनी शाळांच्या प्रकल्प मांडणीस भेट दिली. अजय गुरव यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. श्री. दत्ता बाळसराफ यांच्या हस्ते यशवंत औषधी वनस्पती संवर्धन प्रकल्पातील सहभागी शाळांना पुस्तक संचाची भेट देऊन कौतुक करण्यात आले. या प्रकल्पातील सर्वोत्कृष्ट शाळा पुढीलप्रमाणे :

**प्रथम क्रमांक : द नॉर्थ मुंबई वेल्फेअर सोसायटीज, घाटकोपर** - या शाळेच्या एका गच्चीवर जवळ जवळ ५० प्रकारच्या औषधी वनस्पतींची लागवड करण्यात आली आहे. त्याचबरोबर या औषधी वनस्पतींचा विपुल वापर ते कसा करीत आहेत याबाबतचा प्रकल्पही त्यांनी मांडलेला आहे. हुशार विद्यार्थी, समर्थ शिक्षक, सहकार्य करणा-या मुख्याध्यापिका व त्याचबरोबर शाळेचे ट्रस्टी हे जेव्हा एखाद्या प्रकल्पात जीव ओतून काम करतात तेव्हा ती शाळा जिंकतेच.

**द्वितीय क्रमांक : सरस्वती इंग्लीश स्कूल, अंधेरी** - मोजकेच विद्यार्थी असलेली ही शाळा, त्यांचे मित्र असलेले शिक्षक आणि सहकार्यास तयार मुख्याध्यापिका या सर्वांनी काळजी घेतल्याने या शाळेतील झाडे सर्वात उत्तम वाढलेली आहेत.

**तृतीय क्रमांक : आमची शाळा, चेंबूर** - उत्साही विद्यार्थी, मेहनती शिक्षक आणि पाठिंबा देणारे मुख्याध्यापक असतात तेव्हा शाळा खूप उत्तम कामगिरी करुन जाते हे निश्चित.

विजेत्या शाळांचे अभिनंदन केल्यावर श्री. बाळसराफ यांन आपल्या भाषणात हवामान बदलाची समस्या आपल्याला रोजच्या आयुष्यात कशी भेडसावू लागली आहे आणि त्याचे दुष्परिणाम कसे भोगावे लागत आहेत याचे विवेचन केले. असे उपक्रम विद्यार्थ्यांपर्यंत हवामान बदलाची समस्या तर पोहचवतातच पण त्यातील एकाच घटकावर जसे की, औषधी वनस्पतींवर लक्ष केंद्रीत केले तर त्याची परिणामकारकता वाढते. श्रीमती संगीता खरात यांनी आभार प्रदर्शन करुन कार्यक्रमाचे समापन झाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जागृती गुरव हिने केले. प्रोजेक्टरवरील सादरीकरणाची जबाबदारी श्रेयस खारकर यांने पार पाडली. संपूर्ण प्रकल्पाच्या आयोजनामध्ये कुणाल अणेराव, संगीता खरात, ज्योती खोपकर आणि प्रशांत शिंदे यांचा महत्वपूर्ण सहभाग होता.

पुणे विभागातील शाळांच्या परिसरात सावली देणा-या आणि औषधी गुणधर्म असणा-या वृक्ष-वनस्पतींची लागवड करण्यात येणार आहे. या वनस्पती स्थानिक असून त्यांची विशेष काळजी घ्यावी लागणार नाही अशा प्रकारच्या वड, पिंपळ, उंबर, भोकर, करंज, कडुनींब, बेल, आवळा, हिरडा, बेहडा, आंबा फणस, जांभूळ, चिंच, लिंबू, पळस, पांगारा, मोह, बहावा, शेवगा सनस्पतींचा समावेश आहे. त्यासाठीची पूर्वतयारी सुरु झाली आहे.

**औषधी वनस्पती संवर्धन प्रकल्प (पुणे जिल्हा)**: पृथ्वीच्या वाढत्या तापमानामुळे हवामानात पराकोटीची बदल होत आहेत. भारतात येणा-या मोसमी पावसावर त्याचे विपरीत परिणाम आता दिसू लागले आहेत. महाराष्ट्राच्या मातीत वाढणा-या आणि बदलत्या तापमानात टिकून राहणा-या वृक्षवल्लींची लागवड करणे आणि गावा-गावात स्थानिक वनस्पतींच्या बियाणांचे जतन करणे हे वाढत्या तापमानाला आवर घालण्याचे थेट उत्तर आहे. या सर्व गोष्टींचा समग्र विचार करुन आपल्या भागातील खासदार मा. सुप्रियाताई सुळे यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या माध्यमातून औषधी वनस्पती संवर्धन प्रकल्प राबविण्याचा संकल्प केला आहे. या अंतर्गत पुणे जिल्हा परिषदेच्या शाळा, खाजगी अनुदानित शाळा आणि महाविद्यालये तसेच नगरपालिका शाळांच्या परिसरात सावली देणा-या आणि औषधी गुणधर्म असणा-या वृक्ष वनस्पतींची लागवड करण्यात येणार आहे. महाराष्ट्राचे भवितव्य घडविणारी विद्यार्थी पिढी अशा बहुगुणी सावलीत आणि निरोगी वातावरणात वाढावी हे या प्रकल्पाचे अंतिम ध्येय आहे. डिसेंबर महिन्यात या प्रकल्पांतर्गत पुणे जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये औषधी वनस्पतींचे वृक्षारोपण केले गेले. यासाठी पुणे जिल्हयातील दत्तक योजने अंतर्गत खासदार सौ. सुप्रिया सुळे यांनी दत्तक घेतलेल्या दापोडी या

गावी दि. २६ डिसेंबर २०१५ रोजी वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. याकरिता स्वीडन येथील फ्युचर अर्थ या संस्थेच्या कार्यकर्त्या श्रीमती एमिली या प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या होत्या. त्यांनी वृक्षारोपण सोबतच विद्यार्थ्यांना त्यांच्या देशाबद्दल माहिती दिली. शाळेतील विद्यार्थ्यांनी त्यांना विविध प्रश्न विचारुन स्वीडन या देशाबद्दल माहिती करुन घेतली. यावेळी कार्यक्रमात श्रीमती संगीता खरात यांनी औषधी वनस्पतींचे आपल्या आयुष्यातील महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाकरिता सरपंच, शाळा समितीचे अध्यक्ष, ग्रामसेविका यांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाला कात्रज डेअरीचे अध्यक्ष मा. रामभाऊ टुले तसेच श्री. विलास लोंढे व इतर मान्यवर उपस्थित होते.

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईची विभागीय केंद्रे :-

### १०.१ पुणे विभागीय केंद्र :-

पुणे विभागीय केंद्राचे कामकाज प्रतिष्ठानचे विश्वस्त व केंद्राचे अध्यक्ष श्री. अजित निंबाळकर, सचिव श्री. अंकुशराव काकडे व खजिनदार श्री. शांतिलाल सुरतवाला यांचे मार्गदर्शनाखाली चालते.

१.१ **ग्रंथ प्रकाशन** :- 'संरक्षण सिध्दता' या संरक्षण विषयक १६ व्याख्यानांचे ग्रंथरुपी प्रकाशन विमलाबाई गरवारे प्रशाला सभागृहात एअर मार्शल भूषण गोखले यांचे अध्यक्षतेखाली दि. १८.४.२०१५ रोजी मराठी विज्ञान परिषद व केंद्राच्या वतीने संपन्न झाले. श्री. निंबाळकर यांनी प्रतिष्ठानची माहिती दिली. मेजर जनरल पित्रे यांनी 'युध्दामुळे तंत्रज्ञान विकास' यावर व्याख्यान दिले.

१.२ **वारक-यांना अल्पोपहार व चष्मे वाटप** :- श्री. काकडे व श्री. सुरतवाला यांचे पुढाकाराने तिरंगा भवन, पुणे येथे दरवर्षीप्रमाणे दि. ११ जुलै २०१५ रोजी वरील कार्यक्रम घेण्यात आला. याकामी सर्वश्री जगमोहन सुरतवाला, गणेश चव्हाण, चंदन सुरतवाला, प्रल्हाद तापकीर, सुनिल खताळ, रमेश भांड इत्यादी कार्यकर्त्यांचे सहकार्य लाभले. रंगीलदास सुरतवाला ट्रस्ट यांचेमार्फत वारक-यांना चष्मे व गॉगल वाटप करण्यात आले तर श्रीकांत मणियार यांचेमार्फत वारक-यांना औषधे वाटण्यात आली.

१.३ **स्मार्ट सिटी पुणेकरांची** :- या विषयावर दि. २५ सप्टेंबर २०१५ रोजी एक चर्चासत्राचे आयोजन करण्यात येवून त्यात आलेल्या सूचना एकत्रित करुन मा. आयुक्त पुणे महानगरपालिका यांना श्री. काकडेंच्या सहीने सादर करण्यात आल्या.

१.४ **यशवंतराव चव्हाण विभागीय पुरस्कार** :- या पुरस्कारासाठी एकूण १३ प्रस्ताव आले होते. त्यांची छाननी करुन सदर प्रस्ताव मुख्यालयास सादर करण्यात आले होते. त्यातील मुख्यालयाचे आदेशानुसार साहित्यिक श्री. दिपक चैतन्य यांना डॉ. न. म. जोशी यांचे हस्ते सदर पुरस्काराची रक्कम रु,१५,०००/- पारितोषिक वितरण समारंभात अदा करण्यात आली.

१.५ **कार्यशाळा** :- परीक्षा यशप्राप्ती यावर मनशक्ती लोणावळा यांच्या कार्यकर्त्या श्रीमती शर्वरी, 'त्वचेची काळजी' या विषयावर त्वचारोग तज्ज्ञ सौ. धनश्री सं. भिडे यांची व्याख्याने झाली तर ब्रम्हविद्या प्रसारक श्री. मुंजाळ यांनी श्वसनाचे व्यायामाची प्रात्यक्षिके इयत्ता ८ वी व ९ वी च्या १२५ विद्यार्थी आणि ९ शिक्षक, शिक्षिका व ७ पालक यांचेकडून करुन घेतली व आरोग्यासाठी अशा नियमित व्यायामाचे महत्त्व विषद केले.

१.६ **दिवाळी पहाट कार्यक्रम** :- दि. ११.११.२०१५ रोजी पुणे केंद्रातर्फे दरवर्षीप्रमाणे दिवाळी पहाट कार्यक्रम घेण्यात आला. या वर्षीचा दिवाळी पहाट पुरस्कार डॉ. विनोद शहा यांना वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल व श्री. श्रीपाद

सोलापूरकर यांना यशवंतराव चव्हाण कला साधक पुरस्कार शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांचे शुभहस्ते देण्यात आला. सदर कार्यक्रमास श्री. गिरीश बापट (पालकमंत्री) पुणे व श्री. धनकवडे (महापौर) पुणे तसेच पुणे केंद्राचे अध्यक्ष श्री. अजित निंबाळकर उपस्थित होते. दिवाळी पहाट कार्यक्रमात श्री. अभिषेक बोरकर यांनी सरोद वादनाचा, श्री. केशव यांनी बास गिटार, श्री. उमेश वारभुषण यांनी के जॉन बॉक्स, श्री. अभिषेक भुरुक यांनी जेंबे कलाबास तसेच श्री. जितेंद्र भुरुक व सहका-यांनी जुन्या हिंदी गाण्यांचा कार्यक्रम सादर केला. कु. आर्य काकडे याने ताशा वादनाचा कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमाबरोबर आनंद आणि पुणे ब्लड बँकेतर्फे रक्तदानाचा कार्यक्रम घेण्यात आला होता व त्यास उपस्थित नागरीकांनी जास्तीत जास्त प्रमाणात रक्तदान करुन प्रतिसाद दिला. दोनही कार्यक्रमास दीड ते दोन हजार नागरीक उपस्थित होते.

१.७ **पर्वती चढणे उतरणे स्पर्धा** :- दि. १४ नोव्हेंबर २०१५ रोजी वरील स्पर्धा संपन्न झाली. त्यात १२० नागरीकांनी सहभाग घेतला. दि. ४ जानेवारी २०१६ रोजी बक्षिस वाटप वयोवृध्द श्री. गणेश दिनकर व श्री. जयप्रकाश सुराणा यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमाचे आयोजन श्री. सुरतवाला यांनी केले.

१.८ **कथा ज्योतिबा सावित्रीची** :- वरील विषयावर प्राचार्य गरुड यांचेकडून ८० पानी पुस्तिका लिहून घेतली. भिडे परिवार (मंगेशी) आणि पुणे केंद्र यांचेतर्फे अनुक्रमे दोनशे व तीनशे प्रती घेऊन त्या ४३ शाळांना व ८२ शिक्षकांना वाटून त्यांचे मार्फत सदर विषयावर प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. महात्मा ज्योतिबा व सावित्रीबाई फुले यांचे विचार विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्यासाठी प्रयत्न करण्यात आला. प्रश्न मंजुषा स्पर्धेत २८७३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला त्यातून दुस-या स्तरावर निवडक १२५ विद्यार्थ्यांची परीक्षा घेवून त्यातील २० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्यातून दुस-या स्तरावर निवडक १२५ विद्यार्थ्यांची परीक्षा घेवून त्यातील २० विद्यार्थ्यांना रु.४,२००/- ची बक्षिसे वाटण्यात आली. त्याचप्रमाणे सर्व सहभागी विद्यार्थ्यांना हसुरे व्याकरणमाला हे इंग्रजी व्याकरणाचे पुस्तक सौ. चव्हाण मुख्याध्यापिका कै. वसंतदादा पाटील विद्यानिकेतन यांचे शिफारशीनुसार वाटण्यात आले. भिडे परिवार (मंगेशी) तर्फे शिवाजी कोण होता ? ही कै. डॉ. गोविंद पानसरे यांची विचार परिपूर्ण पुस्तिका सर्व विद्यार्थी आणि परीक्षक व व्याख्याते यांना भिडे परिवार यांचेतर्फे वाटण्यात आली. त्याचप्रमाणे वरील विषयावर १५ शाळातील ९७ विद्यार्थ्यांना वक्तृत्व स्पर्धेत दि. १८.१२.२०१५ रोजी भाग घेतला. त्यातील निवडक विद्यार्थ्यांना श्री. अजित निंबाळकर यांचे हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. तसेच ७५ मुलांनी सदर विषयावर निबंध स्पर्धेत सहभाग घेतला. त्यातील विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके दिली.

१.९ **शिक्षक निबंध स्पर्धा** :- कथा ज्योतिबा सावित्रीची या विषयावर शिक्षकांसाठीही एक निबंध स्पर्धा घेण्यात आली व पहिल्या तीन निबंधांना प्रत्येकी अनुक्रमे रु.१,०००/- रु.७००/- व रु.५००/- अशी तर उत्तेजनार्थ रु.३००/- ची आठ पारितोषिके देण्यात आली. एकूण ४४ निबंध प्राप्त झाले. त्यापैकी पहिल्या चाळणीतून निबंध निवडून ते निवडक वीस निबंध प्राचार्य डॉ. न. म. जोशी यांचेकडून तपासून घेतले व त्यांचे हस्तेच श्री. काकडे यांचे उपस्थितीत पारितोषिक वितरण करण्यात आले. कराड विभागातील शिक्षिकेला मा. श्री. शरदराव पवार यांचे हस्ते तर रत्नागिरीतील शिक्षकांना त्या केंद्रातर्फे बक्षिस व हसुरे व्याकरण पुस्तकांचे वाटप करण्यात आले.

१.१० **बॉटल गार्डनिंग व अन्य स्पर्धा** :- ही स्पर्धा वनराई पुणे यांचे सहभागाने घेण्यात आली. त्यामध्ये १८ शाळातील नव्वद विद्यार्थ्यांची अंतिमतः निवड करण्यात येऊन भिडे परिवारातर्फे रु.५,०००/- ची बक्षिसे वाटण्यात आली. त्याचप्रमाणे पर्यावरण विषयावरील नृत्य, नाटय स्पर्धेसाठी वनराई तर्फे स्पर्धा घेण्यात आल्या व अंतिम वीस शाळांना बक्षिसे वाटण्यात आली. त्यासाठी भिडे परिवार यांनी शिक्षकांचे विनंतीस अनुसरुन उत्तेजनार्थ रु.५०००/- उपलब्ध करुन दिले. त्यात वनराईने रु.५०००/- ची भर घालून दहा शाळांना प्रत्येकी रु.१०००/- ची बक्षिसे वाटण्यात आली.

## १०.२ विभागीय केंद्र कराड :-

कराड विभागीय केंद्राचे कामकाज अध्यक्ष श्री. बाळासाहेब उर्फ शामराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली चालते.

२.१ **महाराष्ट्र दिन कामगार दिन - दि. १ मे २०१५** :- मा. यशवंतराव चव्हाण यांच्या 'विरंगुळा' या निवासस्थानी 'विरंगुळा' आणि सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कराडच्या श्री. मोहनराव डकरे यांनी मान्यवरांच्या उपस्थितीत राष्ट्रध्वज फडकविला. सर्व कर्मचा-यानी मानवंदना दिली.

२.२ **सौ. वेणूताई चव्हाण यांची पुण्यतिथी - दि. १.६.२०१५** :- सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कराड यांच्या वतीने प्रत्येक वर्षी १ जूनला सौ. वेणूताईची पुण्यतिथी सोहळा भावपूर्ण वातावरणात केला जातो. सन्माननीय श्री. शरदराव पवार साहेब यांच्या प्रेरणेने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आयोजित आणि बालगंधर्व संगीत रसिक मंडळ पुणे प्रस्तूत 'संत कान्होपात्रा' या संगीत नाटकाचे आयोजन सौ. वेणूताई चव्हाण स्मारक मंदिरात दि. १ जून २०१५ रोजी सायंकाळी ६ ते ९.३० या वेळेत करण्यात आला. याप्रसंगी मा. श्री. श्रीनिवास पाटील, राज्यपाल, सिक्कीम, कराड नगरीच्या नगराध्यक्षा ॲड. विद्याराणी साळुंखे, कराड उत्तरचे लोकप्रिय आमदार मा. बाळासाहेब पाटील आवर्जून उपस्थित होते. सर्व प्रमुख पाहुण्यांच्यासह श्री. मुकुंदराव कुलकर्णी, श्री. प्रकाशरावजी पाटील, डॉ. गुजर पत्रकार मोहन कुलकर्णी, कराडातील व माध्यमिक उच्च माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक सर्व कॉलेजचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक बंधूभगिनी, सहयाद्री साखर कारखान्याचे संचालक, आजी माजी नगरसेवक सौ. वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक ट्रस्टचे विश्वस्त श्री. अशोकरावजी चव्हाण, श्री. नंदकुमार बटाणे आदी सर्व जाणकार मंडळी कार्यक्रमाच्या पूर्ण वेळ उपस्थित होती. सिक्कीमचे राज्यपाल श्री. श्रीनिवास पाटील, आमदार श्री. बाळासाहेब पाटील यांची पूर्णकाळ उपस्थिती ही लक्षणीय होती. बालगंधर्व संगीत रसिक मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते. मंडळाचे अध्यक्ष श्री. सुरेश साखळकर, श्री. नाना कुलकर्णी यांनी कार्यक्रमाच्या तयारीसाठी तीन बैठका कराडला घेतल्या. 'संत कान्होपात्रा' संगीत नाटक हे कराडकराच्या मते न भूतो झाले. कराडकर रसिकांच्या मनातून 'कान्होपात्रा' जाणार नाही. संगीत शौकीनांचे कान तृप्त झाले. सौ. वेणूताई चव्हाण सभागृहाचा संपूर्ण हॉल पूर्ण क्षमतेने भरला होता. याशिवाय १५० खुर्च्या मांडाव्या लागल्या. संगीताच्या या आगळया वेगळया वातावरणात कराडकर मनोमन तृप्त झाले. सर्व कर्मचारी मंडळीनी अगदी मनापासून सहकार्य केले. कुठलीही उणीव भासू दिली नाही.

मा. आमदार बाळासाहेब पाटील, मा. राज्यपाल श्री. श्रीनिवास पाटील, श्री. अशोकराव चव्हाण (विश्वस्त), नगराध्यक्षा ॲड. श्रीमती विद्याराणी साळुंखे, श्री. नंदकुमार बटाणे (विश्वस्त) आदी मान्यवरांनी स्व. यशवंतरावजी व सौ. वेणूताई यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून आदरांजली वाहिली. सौ. वेणूताई चव्हाण यांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम 'संत कान्होपात्रा' संगीत नाटक हे संस्मरणीय झाले. कराड शहर व परिसरातील मान्यवरानी फारच चांगला प्रतिसाद दिला. सन्माननीय आमदार श्री. बाळासाहेब पाटील नियोजनबध्द कार्यक्रमाची व्यवस्था केली. सर्व कर्मचा-यांनी अगदी मनापासून सर्व कामे केली.

२.३ **स्वातंत्र्यदिन** :- दि. १५ ऑगस्ट २०१५ रोजी विभागीय केंद्र कराड 'विरंगुळा' या मा. यशवंतरावजींच्या निवासस्थानी त्याचप्रमाणे सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या, सौ. वेणूताई चव्हाण स्मारक येथे राष्ट्रध्वज फडकविण्यात आला. या कार्यक्रमासाठी सर्व कर्मचारी मोठया संख्येने हजर होते. कार्यक्रमानंतर चहापाण्याचा कार्यक्रम झाला.

२.४ **ति. विठामाता पुण्यतिथी - दि. १८ ऑगस्ट २०१५** :- मा. यशवंतरावजी चव्हाण यांच्या मातोश्री स्व. विठामाता यांच्या पुण्यतिथीनिमित्त विभागीय केंद्र कराड व सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या सौ. वेणूताई स्मारकात ती. विठामातांच्या फोटोचे प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर येथील कर्मचा-यांनी देवराष्ट्रे येथील ती. विठामातांच्या पुतळयाला पुष्पहार अर्पण केले. मा. यशवंतरावजी चव्हाण साहेबांच्या जन्मस्थानी (देवराष्ट्रे) जाऊन विठामातांना श्रध्दांजली वाहिली.

२.५ **यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार व सौ. प्रतिभाताई पवार यांची केंद्राला भेट** :- मा. श्री. शरदचंद्रजी पवार साहेब यांनी सपत्नीक 'विरंगुळा' मधील मा. यशवंतरावजींच्या फोटोची तथा रेकॉर्डची पहाणी केली. आमदार श्री. बाळासाहेब पाटील त्यांच्या सोबत होते. मा. पवार साहेब यांनी एकंदरीत सर्व कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले.

२.६ **भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम श्रध्दांजली विशेष कार्यक्रम - दि. ६ सप्टेंबर २०११)** :- '**कलाम आपको सलाम**' हा विशेष कार्यक्रम विभागीय केंद्र कराड आणि डॉ. कल्पना चावला विज्ञान केंद्र, कराड या संयुक्त विद्यमाने सौ. वेणूताई चव्हाण स्मारकात भावपूर्ण कार्यक्रम करण्यात आला. प्रत्यक्ष मा. कलामसाहेब यांच्या समवेत काम केलेले श्री. सुरेश नाईक (ज्येष्ठ शास्त्रज्ञ) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.आमदार श्री. बाळासाहेब पाटील या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित होते. स्व. राष्ट्रपती कलामसाहेब यांचे अनेक फोटो पडद्यावर दाखविले. सभागृह पूर्णपणे भरले होते.

२.७ **आमदार श्रीमती प्रणिती सुशिलकुमार शिंदे यांची केंद्रास भेट - दि. २७ ऑक्टोबर २०१५** :- सन्माननीय आमदार श्रीमती प्रणिती शिंदे यांनी दि. २७.१०.२०१५ रोजी दुपारी १.३० वाजता 'विरंगुळा' या मा. यशवंतरावजी चव्हाण यांच्या निवासस्थानाला भेट दिली व त्यांच्या रेकॉर्डची पहाणी केली. श्री. सुशिलकुमार शिंदे यांचा मा. यशवंतरावजी यांच्याबरोबर ४० वर्षांपूर्वी झालेला पत्रव्यवहार त्यांना दाखविण्यात आला. सदरचा पत्रव्यवहार व साहेबांच्या हाताचे ठसे पाहून त्या स्तिमित झाल्या. कराड नगराध्यक्षा ॲड. श्रीमती विद्याराणी साळुंखे याही त्यांच्या समवेत होत्या.

२.८ **ज्येष्ठ समाजसेवक डॉ. प्रकाश आमटे व सौ. मंदाकिनी आमटे यांची केंद्रास भेट** :- थोर समाजसेवक डॉ. प्रकाश आमटे व डॉ. सौ. मंदाकिनी यांनी 'विरंगुळा' केंद्राला दि. ३१.१०.२०१५ रोजी भेट दिली. त्यांच्या समवेत ॲड. विद्याराणी साळुंखे, आमदार श्री. बाळासाहेब पाटील आणि अनेक मान्यवर होते. डॉ. प्रकाश आमटे यांचे पिताश्री स्व. बाबा आमटे यांचा व मा. यशवंतराव चव्हाण यांचा पत्रव्यवहार होता. तो पत्रव्यवहार डॉ. आमटे व सौ. आमटे यांना दाखविला. डॉ. आमटे व डॉ. सौ. मंदाकिनी आमटे यांच्या शुभविवाहाची लग्नपत्रिका (२४.१२.१९७२) त्यांना दाखविली. अन्य काही कागदपत्रे त्यांना दाखविली. त्यांनी समाधान व्यक्त केले. त्यानंतर सौ. वेणूताई सभागृहात त्यांचे संस्मरणीय व्याख्यान झाले. नामदार श्री. रामराजे नाईक निंबाळकर समारंभाचे अध्यक्ष होते. पी. डी. पाटील प्रतिष्ठान कराड तर्फे डॉ. प्रकाश आमटे यांना नामदार श्री. रामराजे नाईक यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. मा. आमदार श्री. बाळासाहेब पाटील यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत केले.

२.९ **मा. यशवंतराव चव्हाण पुण्यतिथी कार्यक्रम दि. २५ नोव्हेंबर २०१५** :- मा. चव्हाणसाहेब यांच्या ३१ व्या पुण्यतिथीनिमित्त मा. श्री. शरदराव पवार साहेब अध्यक्ष, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांनी सकाळी ९३० वाजता विरंगुळा वास्तूची पहाणी केली. मा. कलाप्पाआण्णा आवाडे, मा. रामराजे नाईक-निंबाळकर, मा. जयंत पाटील, मा. आमदार शशिकांत शिंदे, मा. आमदार विक्रमसिंह पाटणकर त्याचप्रमाणे मा. आमदार बाळासाहेब पाटील आदी मान्यवर मा. शरदराव पवार साहेबांच्या बरोबर होते. तसेच मा. यशवंतराव चव्हाणसाहेबांचे पुतणे श्री. अशोकराव गणपतराव चव्हाण आवर्जून उपस्थित होते.

यशवंतराव चव्हाण सायन्स कॉलेज कराड आणि सौ. वेणूताई चव्हाण कला वाणिज्य महाविद्यालय, कराड या दोन्ही कॉलेजचे प्राचार्य, सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका याशिवाय श्री. प्रकाश बापू पाटील, संभाजीराव पाटील, शंकराप्पा संसुद्दी, रामभाऊ कणसे, मुकुंदराव कुलकर्णी, नगराध्यक्षा ॲड. सौ. विद्याराणी साळुंखे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. सरोदे यांचे अभ्यासपूर्ण भाषण झाले.

२.१० **मा. यशवंतराव चव्हाण यांचा जयंती कार्यक्रम दि. १२ मार्च २०१६** :- मा. चव्हाणसाहेबांची १०३ वी जयंती भावपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. मा. चव्हाणसाहेब यांची जयंती व पुण्यतिथी यासाठी होणा-या खर्चाची तरतूद स्व. पी. डी.

पाटील यांनी कायम स्वरुपाची केली आहे. त्यासाठी रु.४,००,०००/- मात्र कायम स्वरुपाची ठेव प्रतिष्ठानच्या नांवे ठेवली आहे. या रकमेच्या व्याजाच्या पैशांतून जयंती व पुण्यतिथीचा खर्च केला जातो. १२ मार्चला सकाळी ८.३० वाजता सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्टच्या इमारतीपासून सजविलेल्या रथावर मा. यशवंतराव चव्हाण यांचा फोटो ठेवला जातो. यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स आणि सौ. वेणूताई चव्हाण कला, वाणिज्य महाविद्यालयांचे प्राचार्य, सर्व प्राध्यापक प्राध्यापिका व अन्य सेवक यांची भव्य पदयात्रा काढण्यात आली. सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्टचे ट्रस्टी श्री. सुनिल शामराव पवार यांनी नारळ वाढवून पदयात्रेचा शुभारंभ केला. सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्ट, विरंगुळा, विजय चौक, कर्मवीर भाऊराव पाटील पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, यशवंत हायस्कूल, आझाद चौक, नेहरु चौक, चावडी चौक, श्री कृष्णामाई घाट ते प्रीतिसंगमा वरील यशवंतरावांचे समाधी स्थळ असा मिरवणुकीचा मार्ग होता. कृष्णा कोयनेच्या प्रीतिसंगमावरील समाधी स्थळावरील प्रीतिसंगम बागेत शहरातील १२००० विद्यार्थ्यांचे सामुदायिक राष्ट्रगीताचे गायन स्व. पी. डी. पाटील प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित केले. या कार्यक्रमासाठी सिक्कीमचे राज्यपाल मा. श्री. श्रीनिवास पाटील, आमदार बाळासाहेब यांनी विरंगुळा, विभागीय केंद्र कराड व सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट मधील यशवंतरावजी व सौ. वेणूताई चव्हाण यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण केले. मा. यशवंतरावजींचे कार्य व कर्तव्य याबद्दल राज्यपाल यांनी खूप माहिती सांगितली. मा. पी. डी. पाटील यांच्या समाधीवरही पुष्पचक्र मा. राज्यपालांनी वाहिले. कराड शहर व परिसरातील अनेक मान्यवर सर्व कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित होते.

## १०.३. विभागीय केंद्र नागपूर :-

३.१ **दीर्घकथा : संकल्पना आणि स्वरुप - ग्रंथ लोकार्पण सोहळा - दि. २७ एप्रिल २०१५ :-** विभागीय केंद्र नागपूर व विजय प्रकाशन आणि मराठी प्राध्यापक सन्मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. मदन कुलकर्णी लिखित **दीर्घकथा : संकल्पना आणि स्वरुप** या संशोधन समीक्षा ग्रंथाचा लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला. याप्रसंगी प्रसिध्द कथा कादंबरीकार सौ. आशाताई बगे या अध्यक्षस्थानी होत्या. प्रसिध्द कथाकार, कादंबरीकार, नाटककार आणि बाल साहित्यिक श्री. भारत सासणे (पूर्ण) यांनी ग्रंथानुषंगाने आपले विचार व्यक्त केले.

३.२ **नाटय प्रशिक्षण कार्यशाळा - दि. ४ ते ६ मे, २०१५ :-** श्री. गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालयाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त विभागीय केंद्र नागपूर यांच्या विद्यमाने आयोजित तीन दिवसीय **नाटय प्रशिक्षण कार्यशाळेचे** कुरखेडा, जिल्हा गडचिरोली येथे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे, उपप्राचार्य पी. एस. खोपे, कार्यशाळेचे प्रशिक्षक लघुनाटीका दिग्दर्शक, अभिनेते श्री. धनंजय मांडवकर व कार्येशाळेचे संयोजक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. नरेंद्र आरेकर उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविकातून प्रा. नरेंद्र आरेकर यांनी रौप्यमहोत्सवी उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे आभार प्रा. अजय मेश्राम यांनी मानले. नाटय प्रशिक्षण कार्यशाळेत ३४ कलावंत विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी महाविद्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

३.३ **भक्ती भाव - दि. २० जून २०१५ :-** विभागीय केंद्र नागपूर व मो. रफी फॅन्स कल्चरल ऑर्गनायझेशन यांच्या संयुक्त विद्यमाने भक्तीगीत व भावगीतांच्या बहारदार मैफलीचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी श्री. कुमार काळे, डॉ. पिनाक दंदे, श्री. दीपक निलावार, श्री. अजय पाटील हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच श्री. विनोद दुबे, प्रा. विलास डांगे व मो. सलीम हे प्रमुख गायक सहभागी झाले.

३.४ **ग्रंथ प्रकाशन सोहळा - दि. २६ जून २०१५ :-** विभागीय केंद्र नागपूर व पवन प्रकाशन, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. प्रेक्षंजय लिपटे लिखित 'साक्षेपी समीक्षक : डॉ. मदन कुलकर्णी' या ग्रंथाच्या प्रकाशन सोहळयाचे आयोजन करण्यात आले. प्रा. डॉ. निशिकांत मिरजकर, निवृत्त प्राध्यापक, भाषा व वाड्.मय विभाग, दिल्ली विद्यापीठ, दिल्ली हे कार्यक्रमाच्या

अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी डॉ. सौ. सारिका ठोकर, झाँशी राणी विद्यापीठ जबलपूर हया वक्त्या म्हणून तसेच डॉ. प्रमोद मुनघाटे, केंद्राचे सचिव, सहयोगी प्राध्यापक रा. तु. म. नागपूर विद्यापीठ हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ. मनीषा नागपुरे यांनी केले.

३.५ **प्रकाशन समारंभ - दि. ११ जुलै २०१५ :-** विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने कवयित्री श्रीमती शशी डंभारे यांच्या 'रिमझिम' या कविता संग्रहाचा प्रकाशन समारंभ आणि पाऊस कवितांच्या विशेष कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. हा प्रकाशन समारंभ प्रसिध्द कवी श्री. वसंत वाहोकार यांच्या शुभहस्ते व डॉ. प्रमोद मुनघाटे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी श्रीमती सुमती वानखेडे, श्री. तुषार जोशी, श्री. तीर्थराज कापगते, श्रीमती माधवी भट, श्री. प्रसन्न शेंबेकर हे कवी सहभागी झाले. कार्यक्रमाचे संचालन श्रीमती ज्योती भगत यांनी केले.

३.६ **डॉ. सुलभा हेर्लेकर स्मृती पुरस्कार सोहळा - २०१५ :-** विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने प्रसिध्द कवियित्री डॉ. सुलभा हेर्लेकर यांच्या स्मृती निमित्त डॉ. सुलभा हेर्लेकर स्मृती पुरस्कार सोहळयाचे आयोजन करण्यात आले. डॉ. अक्षयकुमार काळे यांच्या शुभहस्ते श्री. सुशांत बाळकृष्ण खुरसाले, औरंगाबाद व श्री. संघमित्रा ज्ञानेश्वर खंडारे, अमरावती यांना डॉ. सुलभा हेर्लेकर स्मृती पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून कवि प्रशांत असनारे व श्रीमती मनीषा साधू होत्या. तसेच संचालक सौ. शुभदा फडणवीस यांनी केले.

३.७ **प्रकाशन समारंभ - दि. १८ ऑगस्ट २०१५** :- विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने लेखक डॉ. अरुण गजभिये यांच्या रमाईकार 'प्रभाकर दुपारे यांची नाटयसृष्टी' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाचे आयोजन करण्यात आले. हा प्रकाशन समारंभ ज्येष्ठ नाटककार श्री. राम जाधव यांच्या शुभहस्ते व नागपूर विद्यापीठ, नागपूरचे कुलसचिव श्री. पुरण मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक मा. डॉ. धनराज डाहाट व डॉ. प्रकाश खरात हे वक्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन श्री. दादाकांत धनविजय यांनी केले.

३.८ **समकालीन लैंगिकता आणि समाजस्वास्थ - दि. २२ ऑगस्ट २०१५** :- विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने 'समकालीन लैंगिकता आणि समाजस्वास्थ' या विषयावर खुल्या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी उपस्थित होते. अलीकडेच केंद्र शासनाने इंटरनेटवरील पोर्न साईट्सवर बंदी घातली होती. नंतर ती काही प्रमाणात उठवली. त्यासंदर्भात सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील विचारवंत आणि कार्यकर्ते यांच्यात बरेच विचारमंथन झाले. बदलत्या समाजव्यवस्थेत तरुणांच्या गरजा बदललेल्या आहेत का? विवाहसंस्था आणि कुटुंब व्यवस्था यातही आमूलाग्र बदल झाले आहेत. संगणक आणि उपग्रह आधारित दळणवळण या सोयींमुळे तरुणांची जीवनशैली आमूलाग्र बदललेली आहे. लैंगिक गरजांच्या स्वरुपात बदल झाले आहेत. अशा परिस्थितीत सध्याची बदललेली जीवनशैली, विवाहसंस्था आणि कुटूंबव्यवस्था यांना लिव्हींग इन रिलेशनशिपसारख्या नव्या संकल्पनांनी दिलेली आव्हाने या पार्श्वभूमीवर समकालीन लैंगिक गरजा व समस्या येत आहेत व वातावरण ढवळून निघाले म्हणूनच उपरोक्त विषयावरील खुल्या चर्चेचे आयोजन करण्यात आले. प्रेक्षक, विचारवंतानी या कार्यक्रमास उत्तम प्रतिसाद दिला.

३.९ **डॉ. भालचंद्र नेमाडे यांचा सत्कार - दि. १ सप्टेंबर २०१५** :- विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त प्रसिध्द कादंबरीकार डॉ. भालचंद्र नेमाडे यांचा सत्कार प्रसिध्द नाटककार श्री. महेश एलकुंचवार यांच्या शुभहस्ते शाल, श्रीफळ देऊन करण्यात आला. याप्रसंगी डॉ. गिरीश गांधी, डॉ. गणेश देवी, डॉ. रंगनाथ पठारे, डॉ. अक्षयकुमार काळे, अजय पाटील,

डॉ. प्रमोद मुनघाटे, विवेक रानडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. 'देशीवाद आणि मराठी कादंबरी' या राष्ट्रीय चर्चासत्राच्या निमित्ताने डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईच्या नागपूर केंद्राला भेट दिली.

३.१० **प्रकाश समारंभ - दि. १९ सप्टेंबर २०१५** : विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने लेखक डॉ. प्रकाश खरात यांच्या 'यशोधरा' या कादंबरीचा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला. हा पुस्तक प्रकाशन समारंभ ज्येष्ठ विचारवंत डॉ. यशवंत मनोहर यांच्या शुभहस्ते व अध्यक्ष, विभागीय केंद्र, नागपूर डॉ. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी डॉ. रुपाताई कुलकर्णी बोधी व रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूरचे स्नाकोत्तर मराठी विभाग प्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे हे प्रमुख वक्ते उपस्थित होते.

३.११ **मुक्त चर्चा - हत्येचे राजकारण - राजकारणाची हत्या दि. २० सप्टेंबर २०१५** : विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने '**हत्येचे राजकारण - राजकारणाची हत्या**' या विषयावर खुल्या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी दैनिक भास्करचे समुह संपादक श्री. प्रकाश दुबे हे अध्यक्षस्थानी होते.

३.१२ **मुक्त चर्चा - दि. २४ ऑक्टोबर २०१५** : विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने आदिवासी कोण ? मूळनिवासी, हिंदू की वनवासी ? या विषयावर खुल्या चर्चेचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी ज्येष्ठ विचारवंत श्री. नागेश चौधरी हे अध्यक्षस्थानी होते.

३.१३ **पुरस्कार वितरण समारंभ - दि. २७ ऑक्टोबर २०१५** :- विभागीय केंद्र नागपूर व अरुणोदय साहित्यिक, सामाजिक व सांस्कृतिक संस्था, नागपूरच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील प्रसिध्द कवयित्री स्व. अरुणाताई पवार - चवरे यांच्या स्मृतीदिनानिमित्त राज्यस्तरीय काव्यलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला नवोदितांचा उस्फूर्त प्रतिसाद लाभला. हा पुरस्कार वितरण समारंभ श्री. बबन सराडकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. याप्रसंगी डॉ. रत्नप्रभा अंजनगावकर - लांजेवार प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

३.१४ **व्यवस्था आरोग्याची महाराष्ट्र २०२५ - दि. १ नोव्हेंबर २०१५** :- विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार यांच्या अमृत महोत्सवानिमित्त 'महाराष्ट्र २०२५' या संकल्पनेवर आधारित चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या चर्चासत्राची सुरुवात रविवार दि. १ नोव्हेंबर २०१५ रोजी 'व्यवस्था आरोग्याची - महाराष्ट्र २०२५' या चर्चासत्राने सकाळी १० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे झाली.

प्रथम सत्राचे उद्‌घाटन श्री. सुरेश द्वादशीवार, स्वागतपर भाषण डॉ. गिरीश गांधी व प्रास्ताविक श्री. शरद काळे यांनी केले. भूमिका कार्याध्यक्षा सौ. सुप्रियाताई सुळे यांनी मांडली.

दुस-या सत्रात सकाळी १०.५० वा. 'राष्ट्रीय आरोग्य धोरण - २०१५ व आंतरराष्ट्रीय संदर्भ' या विषयावर माजी संचालक, आरोग्य आणि विज्ञान शाखा, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक डॉ. श्याम अष्टेकर यांनी मार्गदर्शन केले. 'वैद्यकीय संशोधन शिक्षण' चेअरमन ॲन्ड मॅनेजिंग ट्रस्टी कृष्णा इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस, युनिव्हर्सिटी, कराड, पुणे डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांनी मार्गदर्शन केले.

तिस-या सत्रात दुपारी १२.१० वाजता 'खाजगी आरोग्य क्षेत्र व पी.पी.एफ.' या विषयावर चेअरमन ऑरेंजसिटी हॉस्पिटल, नागपूर मा. उदयभास्कर नायर व 'शासकीय आरोग्य व्यवस्था' या विषयावर सिनीयर ॲडव्हायजर, पब्लिक हेल्थ फाऊंडेशन इंडिया, पुणे डॉ. सुभाष साळुंखे यांनी मार्गदर्शन केले.

चौथ्या सत्रात दुपारी २.३० वा. 'कुपोषण / आशा' या विषयावर डॉ. सतीश गोगुलवार, संस्थापक विश्वस्त आम्ही आमच्या आरोग्यासाठी, गडचिरोली 'आरोग्य सेवा आरोग्य जनचळवळ' या विषयावर डॉ. अनंत फडके सहसमन्वयक जन-आरोग्य, पुणे यांनी मार्गदर्शन केले.

पाचव्या सत्रात दुपारी ४.२० वा. 'औषध धोरण' या विषयावर आय.ए.एस. मेट्रोपोलिटन रिजनल डेव्हलपमेंट ॲथॉरिटी, पुणे डॉ. महेश झगडे यांनी मार्गदर्शन केले. चर्चासत्राचा समारोप सायंकाळी ५.१० वा. झाला.

३.१५ **प्रातःस्वर - दि. ८ नोव्हेंबर २०१५** :- विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने दिवाळीनिमित्त **प्रातःकालीन अनवट रागांची अनोखी मैफल** या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी गायक डॉ. मिलींद मालशे (मुंबई), डॉ. साधना शिलेदार, संगीतकार श्री. सचिन बक्षी (तबला), श्री. श्रीकांत पिसे (संवादिनी), निवेदन डॉ. रजनी हुद्दा उपस्थित होते.

३.१६ **कथांचे अभिवाचन - दि. २१ नोव्हेंबर २०१५** :- विभागीय केंद्र नागपूर, नाविन्य कला अकादमी व आकांक्षा प्रकाशनाच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ लेखिका श्रीमती कमल देसाई यांच्या कलांचे अभिवाचन श्री. रवींद्र लाखे व डॉ. प्रिया जामकर उभयता यांनी केले. या कार्यक्रमाची निर्मिती संकल्पना डॉ. प्रिया जामकर यांची होती तर या अभिवाचनाचे दिग्दर्शन श्री. रवींद्र लाखे यांचे होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्र नागपूरचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी होते. 'रंगकमळ' या ध्वनिफितीचे एक औपचारिक प्रकाशन देखील यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाची प्रकाश व्यवस्था धनंजय मांडवकर यांनी सांभाळली.

३.१७ **यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार वितरण समारंभ - दि. २५ नोव्हेंबर २०१५** :- विभागीय केंद्राच्या वतीने त्या विभागातील विविध क्षेत्रात कार्य करणा-या मान्यवराला २०१५ पासून 'यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार' देण्याचा निर्णय मध्यवर्ती केंद्राच्या वतीने घेण्यात आला. २०१५ चा प्रथम पुरस्कार सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात भरीव कार्य करणा-या डॉ. रुपाताई बोधी-कुलकर्णी यांना देण्यात आला. हा पुरस्कार सोहळा दि. २५ नोव्हेंबर २०१५ रोजी प्रसिध्द साहित्यिक व विचारवंत डॉ. यशवंत मनोहर यांच्या शुभहस्ते देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी होते.

३.१८ **अभिनंदन सोहळा - दि. ७ डिसेंबर २०१५** :- ८९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष महाराष्ट्रातील शिक्षणतज्ज्ञ व विचारवंत डॉ. पी. डी. पाटील यांच्या सत्काराचा कार्यक्रम विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने आयोजित करण्यात आला. प्रसिध्द साहित्यिक व विचारवंत डॉ. यशवंत मनोहर यांच्या शुभहस्ते हा अभिनंदन सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक, समीक्षक व विचारवंत डॉ. वि. स. जोग होते. याप्रसंगी नामांकित पत्रकार व विचारवंत श्री. मधुकरराव भावे हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती शुभदा फडणवीस यांनी केले.

३.१९ **अभिनंदन सोहळा - दि. १९ डिसेंबर २०१५** :- विभागीय केंद्र नागपूर आणि नागपूर श्रमिक पत्रकार संघ व ट्रस्ट नागपूरच्या संयुक्त विद्यमाने श्री. यदु जोशी यांची महाराष्ट्र राज्य अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष झाल्याबद्दल व सुश्री राही भिडे यांची दैनिक पुण्यनगरीच्या मुख्य संपादकपदी नियुक्ती झाल्याबद्दल अभिनंदन सोहळयाचे आयोजन करण्यात आले. हा अभिनंदन सोहळा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते व माजी खासदार श्री. बनवारीलालजी पुरोहित यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी महाराष्ट्राचे ऊर्जा मंत्री तसेच नागपूरचे पालकमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे अध्यक्षस्थानी होत कार्यक्रमाचे संचालन डॉ. कोमल ठाकरे यांनी व आभार प्रदीप मेत्र यांनी मानले.

३.२० **सुवाच्या हस्ताक्षर स्पर्धा - दि. २५ डिसेंबर २०१५** :- विभागीय केंद्र नागपूर, रायसोनी ग्रुप, रमन विज्ञान केंद्र आणि अक्षरभूषण मधुकर भाकरे प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने सुंदर हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेच्या पुरस्कार वितरण समारंभाप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे ऊर्जामंत्री व पालकमंत्री नागपूर श्री. चंद्रशेखर बावनकुळे ज्येष्ठ नेत्रतज्ज्ञ डॉ. विकास महात्मे, केंद्राचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी, संथापक अध्यक्ष अण्णाजी मेंडजोगे, रायसोनी ग्रुपचे उपाध्यक्ष हेमंत सोनारे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी परभणीचे गोविंद नामदेव पांचाळ यांना उत्कृष्ट शिक्षक जीवन गौरव देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेतील पारितोषिक विजेते गट अ वर्ग ८ ते १० ऐश्वर्या आडे (साऊथ पॉईंट स्कूल), हर्षल तलमले (विश्वास माध्यमिक शाळा), शीतल नंदेश्वर (जवाहरलाल नेहरु विद्यालय), उत्तेजनार्थ - तृप्ती काशीकर, विशाखा मोहिते, सोनल जोगदंड, प्राजल सावरकर, आंचल कराडे, माध्यमिक गट - वर्ग ५ ते ७ - अनुष्का पाटील (पं. बच्छराज व्यास विद्यालय), राहुल कुंभारे (स्कूल ऑफ स्कॉलर्स), उत्तेजनार्थ - भारत यादव, अमृता लभाने, सना मताउल्लाह खान, सुखदा भोयर, समृध्दी भाकरे, विशेष पुरस्कार - सुश्रुती नाकाडे, सुभाष सलोखे, प्राथमिक गट - वर्ग १ ते ४ प्राजक्ता भुजाडे (नवसुग प्राथमिक शाळा), देवश्री चुटे (बी.के.व्ही.व्ही.), वैष्णवी ठवरे (नवयुग राजाबाक्षा), उत्तेजनार्थ - एंजल वालदे, अनुष्का शेंडे, नियुक्ती शहा, नामश्री मोहुर्ले, मंथन राऊत यांचा समावेश आहे.

३.२१ **प्रकाशन समारंभ - दि. २८ डिसेंबर २०१५** :- विभागीय केंद्र नागपूर आणि रसिकराज साहित्य संस्था, नागपूरच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ कवी श्री. भाऊराव कु-हाडे यांच्या 'सेत येती घरा' या पुस्तकाचे प्रकाशन सोहळयाचे आयोजन करण्यात आले. हा पुस्तक प्रकाशन सोहळा माजी कुलगुरु डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला डॉ. शरद निंबाळकर यांच्या शुभहस्ते व सुप्रसिध्द साहित्यिक, समिक्षक डॉ. प्रज्ञा आपटे, श्री. पुंडलिक महाराज संस्थान, मुर्तिजापुरचे अध्यक्ष श्री. विठ्ठलराव पातोंड, संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक प्रा. डॉ. नारायण निकम, उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर डॉ. संजय जायस्वाल व सुप्रसिध्द कवी व संस्थापक अध्यक्ष रसिकराज, नागपूर डॉ. बळवंत भोयर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी विभागीय केंद्र नागपूरचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी हे अध्यक्षस्थानी होते.

३.२२ **मुक्तचर्चा : दि. ८ जानेवारी २०१६** :- विभागीय केंद्र नागपूर यांच्या वतीने दि. ८ जानेवारी २०१६ रोजी 'विद्या की अविद्या ? शिक्षण खरे कोणते - सध्याचे की १८५४ पूर्वीचे' या विषयावर महिला महाविद्यालय नंदनवनच्या प्राचार्या डॉ. मृणालिनी फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुक्त चर्चेचे आयोजन करण्यात आले.

३.२३ **'चालता बोलता वर्षारंभ अंक' - दि. ९ जानेवारी २०१६** :- विभागीय केंद्र नागपूर व अभिव्यक्ती वैदर्भीय लेखिका संस्था यांच्या संयुक्तपणे 'चालता बोलता वर्षारंभ अंक' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या वार्षिकांकाची सर्व सदरे व्यासपीठावरुन सादर होतात हे या कार्यक्रमाचे वैशिष्टय असून यात वैचारिक अध्यात्मिक, सामाजिक, ललित, कथा, कविता, जाहिराती इ. विविध सदरांचा समावेश असतो. या कार्यक्रमात डॉ. सुनीती देव यांचे 'स्त्री शुचिता' या विषयावर वैचारिक मंथन, ॲड. अतुल सोनक आणि प्रिती वडनेरकर यांचे अनुभव कथन सुनंदा साठे आणि आजच्या परिस्थितीवर भाष्य करणारी नाटुकली, निखील नागपूरकर, मनोज वैद्य, वर्षा-किडे-कुलकर्णी यांच्या कविता, मिश्किल जाहिराती इ. सदरे सादर करण्यात आली. शर्मिला महादेवकर यांची खुसखुशीत कथा चि. सार्थक पाडगावकराचे बालगीते सादर केली. अंकाचे मुखपृष्ठ पूर्वा गंगाखेडकर यांच्या नृत्याने तर समारोपाचे पान वीणा कुलकर्णी यांच्या पसायदानाने सजले. संकल्पना आणि निवेदन स्वाती सुरंगळीकर यांचे होते. सलग तिसरे वर्षी हा अंक सादर करण्यात आला. संपादन संस्थेच्या अध्यक्षा सुप्रिया अय्यर यांचे तर संयोजन हेमा नागपूरकर यांचे होते. प्रतिष्ठानचे विभागीय अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांचे हस्ते प्रकाशन करण्यात आले.

३.२४ **कही-अनकही - दि. १० जानेवारी २०१६** :- विभागीय केंद्र नागपूर यांच्या वतीने 'कही-अनकही' या खुल्या चर्चेच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमा अंतर्गत प्रसिध्द गायक श्री. एम. ए. कादर व श्रीमती जीनत कादर यांच्या

संगीताचा दीर्घ प्रवास वरीष्ठ साहित्यकार डॉ. सागर खादीवाला यांच्याशी संवाद साधत उलगडला. केंद्राचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांनी कादर दाम्पत्याचे स्वागत केले. याप्रसंगी डॉ. सादर खादीवाला यांनी आभार प्रदर्शन केले.

३.२५ **संविधान साक्षरता वर्ष - दि. २५ जानेवारी २०१६** :- विभागीय केंद्र नागपूर, संविधान फाऊंडेशन व सकाळ परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने 'संविधान साक्षरता वर्ष' उद्घाटन समारंभाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी हे अध्यक्षस्थानी होते. ज्येष्ठ विचारवंत डॉ. यशवंत मनोहर प्रमुख वक्ते म्हणून तर माजी सनदी अधिकारी श्री. ई. झेड. खोब्रागडे हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

३.२६ **डॉ. किशोर रामचंद्र महाबळ यांना श्रध्दांजली - दि. १३ फेब्रुवारी २०१६** :- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. किशोर रामचंद्र महाबळ यांचे दि. ६ फेब्रुवारी २०१६ रोजी रात्री १० वाजता मुंबई येथे प्रदिर्घ आजाराने निघन झाले. प्राध्यापक व विद्यार्थ्यांमध्ये अत्यंत लोकप्रिय असणारे महाबळ सर यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी शोकसभेचे आयोजन करण्यात आले. शोकसभेला केंद्राचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. विनायक देशपांडे, प्राचार्य डॉ. वसंत रायपूरकर, राज्यशास्त्र अभ्यास मंडळाच्या अध्यक्षा डॉ. अलका देशमुख, पदव्युत्तर विभागातील प्राध्यापक डॉ. मोहन काशीकर उपस्थित होते. डॉ. किशोर महाबळ सरांवर नितांत प्रेम करणारे प्राध्यापक व विद्यार्थी मित्रांनी या शोकसभेला उपस्थित राहून श्रध्दांजली अर्पण केली.

३.२७ **'Verse-a-Tile-2016' प्रकाशन सोहळा - दि. २९ फेब्रुवारी २०१६** :- विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने 'Verse-a-Tile-2016' या इंग्रजी कविता संग्रहाच्या प्रकाशन सोहळयाचे आयोजन करण्यात आले. विभागीय केंद्र नागपूरचे सदस्य श्री. रमेश बोरकुटे हे अध्यक्षस्थानी होते.

३.२८ **व्याख्यान - दि. १ मार्च २०१६** :- विभागीय केंद्र नागपूरच्या वतीने मुंबईचे प्रसिध्द पत्रकार आणि पाकिस्तान इंडिया पिपल्स फोरम फॉर पीस ॲन्ड डेमोग्रसी (पी.आय.पी.एफ.पी.डी.) चे महासचिव श्री. जतीन देसाई यांचे 'पाकिस्तान-भारत संबंध आणि आंतरराष्ट्रीय दहशतवाद' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी विभागीय केंद्र नागपूरचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी हे प्रामुख्याने उपस्थित होते.

३.२९ **कही-अनकही - दि. ६ मार्च २०१६** :- विभागीय केंद्र नागपूर यांच्या वतीने 'कही-अनकही' या खुल्या चर्चेच्या श्रृंखलेअंतर्गत कवी मा. प्रा. मधुप पांडेय यांनी वरीष्ठ साहित्यकार डॉ. सागर खादीवाला यांच्या सोबत आपल्या आजवरच्या साहित्य-यात्रा तसेच साहित्यातील विविध पैलूंवर संवाद साधत कविता आणि कविसंमेलनाच्या संदर्भात विविध साहित्यातील विविध पैलूंसंदर्भात श्रोत्याना माहिती दिली. विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांनी चर्चेचे महत्त्व प्रतिपादित केले. तसेच नवोदित लेखकांसाठी हे अतिशय महत्त्वाचे असल्याचे सांगितले. याप्रसंगी गायक एम. ए. कादर, किशन शर्मा, मधुलिका पांडेय, माधुरी राऊलकर, डॉ. करुना उमरे, राजेंद्र राज, रीमा चड्ढा, पूनम तिवारी, अविनाश बागडे, वसुंधरा राय इत्यादी साहित्यकार उपस्थित होते.

३.३० **मा. यशवंतराव चव्हाण जयंती - दि. १२ मार्च २०१६** :- महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आणि आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त वैदर्भी लोककलावंत मेळावा आयोजित करण्यात आला.मेळाव्याचे उद्घाटन श्री. अजय अंबेकर, संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते व डॉ. गिरीश गांधी, अध्यक्ष, विभागीय केंद्र नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिध्द लेखक व वक्ता डॉ. अशोक राणा उपस्थित होते.

३.३१ **स्व. नाना रेटर यांची जन्मशताब्दी - दि. २० मार्च २०१६** :- महाराष्ट्रातील सुप्रसिध्द नकलाकार व भावनाटय लेखक स्व. नाना रेटर यांचे हे जन्मशताब्दी वर्ष. यानिमित्ताने नागपूर विदर्भातील सांस्कृतिक जीवन समृध्द करणा-या नानांच्या कार्याचा या निमत्ताने गौरव व्हावा व त्यांच्या विषयीच्या आठवणींना उजाळा मिळावा म्हणून विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी द.म.क्षे. सांस्कृतिक केंद्र नागपूरचे संचालक डॉ. पियुष कुमार हे होते व अतिथी म्हणून महाराष्ट्र टाइम्सचे विशेष प्रतिनिधी श्री. अविनाश महालक्ष्मे उपस्थित होते. तसेच श्री. राजाभाऊ चिटणीस व डॉ. दिलीप अलोणे, वणी यांचे विशेष सादरीकरण झाले.

३.३२ **'स्त्रीवाद आणि मराठी साहित्य' चर्चासत्र - दि. २७ मार्च २०१६** :- विदर्भ साहित्य संघ, विभागीय केंद्र नागपूर आणि स्नातकोत्तर मराठी विभाग माजी विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्त्रीवाद आणि मराठी साहित्य' या विषयावर एकदिवशीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. स्त्रीवाद साहित्य प्रदर्शनाच्या उद्‌घाटनानंतर ९.३० ते ११.०० या कालावधीत होणा-या चर्चासत्राच्या उद्‌घाटन समारंभात चर्चासत्राच्या अध्यक्षा सुप्रसिध्द स्त्रीवादी साहित्याच्या अभ्यासक अश्विनी धोंगडे, पुणे, उद्‌घाटक वसंत आबाजी डहाके आणि प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिध्द समाजसेविका सीमा साखरे उपस्थित होत्या. उद्‌घाटन समारंभानंतर डॉ. शैलेंद्र लेंडे हयांच्या अध्यक्षतेखाली होणा-या 'स्त्रीवाद आणि मराठी कथा व कादंबरी' हया पहिल्या सत्रात वंदना महाजन, मुंबई व नंदकुमार मोरे, कोल्हापूर हे अभ्यासक सहभागी झाले. अंजली कुलकर्णी, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली होणा-या दुस-या सत्रात रणधीर शिंदे, कोल्हापूर आणि अलका गायकवाड, अमरावती हे अभ्यासक सहभागी झाले. समारोपास विदर्भ साहित्य संघाचे श्री. वामन तेलंग यांची प्रमुख उपस्थिती होती.

## १०.४ विभागीय केंद्र कोकण :-

कोकण विभागीय केंद्राचे अध्चक्ष श्री. राजाभाऊ लिमये यांच्या मार्गदर्शनाखाली चालते.

४.१ **वसुंधरा दिन** :- कोकण विभागीय केंद्र व महाराष्ट्र शासन कृषी विभाग तालुका कृषी अधिकारी, मंडणगड यांचे संयुक्त विद्यमाने मंडणगड येथे दि. २८ एप्रिल २०१५ रोजी 'वसुंधरा दिन' कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी 'जागतिक तापमान वाढीचे परिणाम व उपाय' या विषयावर डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोलीचे माजी शिक्षण संचालक डॉ. जी. डी. जोशी यांचे मार्गदर्शन व महिलांकरिता फळप्रक्रिया प्रशिक्षण शिबीर घेण्यात आले.

४.२ **कृषी दिन कार्यक्रम** :- विभागीय केंद्र कोकण, तालुका कुक्कुटपालन व्यवसाय सहकारी संस्था, शिवाजीराव सावंत शेतीमाल उत्पादक प्रक्रिया संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १ जुलै २०१५ रोजी लांजा येथील कुक्कुटपालन व्यवसायिक सहकारी संस्थेच्या सभागृहात संपन्न झाला. यावेळी सामुदायिक शेतीचे महत्व सांगून तरुणांनी सामुदायिक शेतीकडे वळणे का गरजेचे आहे हे सांगण्यात आले. तसेच वैविध्यपूर्ण शेती करणा-या लांजा तालुक्यातील प्रगतशील अशा निवडक शेतक-यांचा विविध रोपे देवून सत्कार करण्यात आला.

४.३ **'गीतारहस्य चर्चासत्र'** :- लोकमान्य टिळकांच्या 'गीतारहस्य' या बृहद्‌ ग्रंथाच्या शताब्दीनिमित्त त्या ग्रंथाचा परिचय व्हावा या हेतूने 'गीतारहस्य एक सांगोपांग परिचय' यावर चर्चासत्र कार्यक्रम दि. १ व २ ऑगस्ट २०१५ रोजी कोकण विभागीय केंद्र व गीता मंडळ, रत्नागिरी यांचे संयुक्त विद्यमाने गीता भवन येथे संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात ज्येष्ठ विचारवंत आणि साहित्य संमलनाध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांचे शुभहस्ते दीपप्रज्वलन करुन करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांचे हस्ते 'गीतारहस्य' या ग्रंथाची पूजा करण्यात आली. चर्चासत्र कार्यक्रमात निबंधवाचक डॉ. शं. रा. तळघट्टी, डॉ. कल्याण काळे, श्री. श्रीराम शिधये, डॉ. धनंजय चितळे, डॉ. विद्याधर करंदीकर, श्रीमती प्रतिभा बिवलकर आदी मान्यवरांनी विविध विषयावर

निबंध सादर करुन त्यावर चर्चा करण्यात आली. सर्वांचे स्वागत व सन्मान पुणेही पगडी देवून केंद्राचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये व अन्य मान्यवरांचे हस्ते करण्यात आले.

दि. २ ऑगस्ट रोजी समारोपाचे प्रमुख अतिथी श्री. दा. कृ. सोमण व समारोप सत्राचे अध्यक्ष श्री. मधु मंगेश कर्णिक यांची व्याख्याने झाली. कार्यक्रमाला निपाणी, नाशिक, पुणे, गोवा, सिंधुदुर्ग यांचे प्रमाणेच रत्नागिरीतील 'गीतारहस्य' रसिकांची चांगली उपस्थिती लाभली. लोकमान्यांच्या जन्मगावी आणि गीता भवनातच गीता रहस्य जयंती शताब्दी कार्यक्रम प्रथमच महाराष्ट्रात कोकण केंद्राने केल्याचे सर्वच उपस्थितांनी कौतुक केले.

४.४ **'शिक्षक दिन' कार्यक्रम** :- कोकण विभागीय केंद्राचे वतीने दि. ५ सप्टेंबर रोजी 'शिक्षक दिन' कार्यक्रम सहयाद्री शिक्षण संस्थेच्या एम.बी.ए. कॉलेजच्या सभागृहामध्ये संपन्न झाला. यावेळी चिपळूणचे डॉ. धनंजय चितळे, पुण्याचे जडण घडण मासिकाचे संपादक श्री. सागर देशपांडे या प्रमुख अतिथींची शिक्षकांसाठी मार्गदर्शक व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाला कोकण विभागीय समितीचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये, उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर, सहयाद्री शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. शेखर निकम, अध्यक्षा श्रीमती अनुराधाताई निकम, विभागीय समितीचे सदस्य श्री. सुनिल शिर्के, जिल्हा समिती सदस्य श्री. कृ. आ. पाटील, सौ. युगंधरा राजेशिर्के, श्री. विवेक सावंत, श्रीमती प्राची शिंदे, श्री. संदीप लवेकर, ॲड. अमेय परुळेकर, सहयाद्री शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, कर्मचारी, शिक्षकवर्ग बहुसंख्येने उपस्थित होते. श्री. मोडक यांनी उपस्थितांचे आभार मानले. श्री. पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

४.५ **ज्येष्ठ नागरिक दिन कार्यक्रम** :- कोकण विभागीय केंद्राचे वतीने दि. १ ऑक्टोबर ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त ज्येष्ठांसाठी रत्नागिरी येथील भारत शिक्षण मंडळाचे पटवर्धन हायस्कूलचे क्रीडांगणावर दि. १ ऑक्टोबर २०१५ रोजी सकाळी ७.३० वाजता चालण्याची स्पर्धा घेण्यात आली. ही स्पर्ध पुरुष व महिला अशा दोन गटात घेतली गेली. स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ दि. १० ऑक्टोबर २०१५ रोजी केंद्राचे टिळक आळी, रत्नागिरी येथील कार्यालयात संपन्न झाला. विजयी स्पर्धकांना कोकण केंद्राचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये व उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर यांचे हस्ते रोख रक्कम व गुलाब पुष्प देवून गौरविण्यात आले.

४.६ **ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा (जिल्हा सिंधुदुर्ग)** :- कोकण विभागीय केंद्र जिल्हा समिती सिंधुदुर्गचे वतीने दि. ४ ऑक्टोबर २०१५ रोजी वेंगुर्ले येथील साई मंगल कार्यालयात ज्येष्ठांसाठी आनंद मेळावा आयोजित करण्यात आला. मान्यवरांचे हस्ते दिपप्रज्वलन करुन व मा. चव्हाणसाहेबांचे प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. ज्येष्ठ नागरिकांचे आनंद मेळाव्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा-या ज्येष्ठ नागरिकांचा मान्यवरांचे हस्ते शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

४.७ **महिला बचत गटांनी बनविलेल्या मालाचे प्रदर्शन व विक्री कार्यक्रम** :- कोकण विभागीय केंद्र - जिल्हा समिती रत्नागिरी व फिनोलेक्स इंडस्ट्रीज् रनपार यांचे संयुक्त विद्यमाने बचतगट व इतर उद्योगिनी महिलांनी बनविलेल्या मालाचे प्रदर्शन व विक्री कार्यक्रम दि. ३१ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०१५ या कालावधीत साई मंगल कार्यालय जे. के. फाईल्स येथे संपन्न झाले. महिला बचत गटांनी स्वतःचे पायावर उभ रहावे, घरगुती खाद्यपदार्थ, शोभेच्या वस्तू आणि गृहोपयोगी वस्तू उत्पादित करताना अशा वस्तू परदेशात निर्यात करता येतील यासाठी प्रयत्न करावेत. स्त्री शक्तीच्या जागरातून रत्नागिरीचे नाव उज्ज्वल करावे असे आवाहन कोकण विभागीय समितीचे उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर यांनी केले. यानंतर चार दिवसांमध्ये घेतल्या गेलेल्या स्पर्धांच्या विजेत्यांना मान्यवरांचे हस्ते बक्षिसे देण्यात आली. प्रदर्शनाचा समारोप सांस्कृतिक कार्यक्रमाने करण्यात आला. चार दिवस चालणा-या या प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्टॉलधारक महिलांनीही बचतगटांना स्टॉल लावून मालाची विक्री करण्याकरिता संधी दिल्याबद्दल यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानला धन्यवाद दिले.

४.८ **मा. यशवंतराव चव्हाण पुण्यतिथी कार्यक्रम :-** कोकण विभागीय केंद्राचे वतीने मा. यशवंतराव चव्हाण यांचा ३१ वा स्मृतीदिन कार्यक्रम भारत शिक्षण मंडळ संचलित पटवर्धन हायस्कूलचे नाटेकर सभागृहात दि. २५ नोव्हेंबर २०१५ रोजी सकाळी १० वा. संपन्न झाला. मान्यवरांचे हस्ते दीपप्रज्वलन करुन व मा. यशवंतराव चव्हाणसाहेबांचे प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने यावर्षीपासून सुरु केलेल्या 'यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार' याचे कोकण विभागाचे प्रथम मानकरी श्री. अनंतर धोंडू तथा अण्णासाहेब शिरगांवकर यांना माजी प्राचार्य श्री. सुभाष देव यांचे हस्ते शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह, मानपत्र व रु.१५,०००/- देवून गौरविण्यात आले. सत्कारमूर्तींच्या मानपत्राचे वाचन जिल्हा समिती सदस्या सौ. युगंधरा राजेशिर्के यांनी केले. मा. यशवंतराव चव्हाण राज्यातील एकमेव माणूस जो केंद्रात महत्वाच्या मंत्रीनदावर होता. मात्र दिल्लीतील राजकारण त्यांच्या स्वभावाला मिळते जुळते नव्हते. त्यांचे महाराष्ट्र निर्मितीचे पहिले भाषण स्फूर्तिदायक होते. महाराष्ट्र एकजिनसी करु शकलो तर लो. टिळकांच्या त्यागाला न्याय देवू शकू. नेत्याचे कार्य कार्यकर्ते घडविणे असते. मा. यशवंतरावांनी राजकीय कारभार करताना गावपातळीपर्यंत कार्यकर्ते घविले म्हणूनच महाराष्ट्रात पंचायत राज्याची संकल्पना यशस्वी ठरली असे माजी प्राचार्य श्री. सुभाष देव यांनी आपल्या भाषणात सांगितले. यानंतर 'गीतारहस्य - एक सांगोपांग परिचय' या चर्चासत्रात सादर झालेल्या निबंधांचे 'गीतारहस्य शताब्दी गौरस' या पुस्तकाचे प्रकाशन देवरुखचे माजी प्रा. डॉ. सुरेश जोशी व इतर मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. कृषी व सहकार व्यासपीठ, पुणे यांनी शिक्षकांसाठी 'कथा जोतिबा सावित्रीची' या विषयावर राज्यस्तरीय निबंध स्पर्धा घेण्यात आली होती. या राज्यस्तरीय निबंध स्पर्धेतील रत्नागिरी जिल्हयातील विजेत्यांना यावेळी मान्यवरांचे हस्ते पारितोषिके देण्यात आली.

४.९ **अश्वमेध महोत्सव :-** तुळस वेताळ प्रतिष्ठान आयोजित कोकण विभागीय केंद्र पुरस्कृत 'अश्वमेध २०१६' तुळस महोत्सव दि. ९ ते २६ जानेवारी या कालावधीत श्री. वेताळ तुळस खरीवाडा येथे कविवर्य मंगेश पाडगावकर स्मृति सभागृहात संपन्न झाला. या महोत्सवात कला, क्रीडा, सांस्कृतिक व शैक्षणिक अशा क्षेत्रांशी विविध स्पर्धात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. अठरा दिवस चालू असलेल्या या महोत्सवातील स्पर्धेचे बक्षीस वितरण दि. २६ जानेवारी २०१६ रोजी प्रजासत्ताकदिनाचे औचित्य साधून महोत्सवाचे अध्यक्ष श्री. दादासाहेब परुळकर, कोकण विभागीय केंद्राचे कोषाध्यक्ष श्री. एम. के. गावडे, युवा शक्ती प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. विलास गावडे, सिंधुदूर्ग जिल्हा बँक संचालक सौ. प्रज्ञा परब, वेताळ प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. सचिन परुळकर आदी मान्यवरांचे हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाचे निमित्ताने जिल्हयात व जिल्हयाबाहेर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावणा-या व्यक्तींचा विशेष मानपत्र, शाल, श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला. यात पत्रकारिता व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावल्याबद्दल तरुण भारतचे पत्रकार श्री. शेखर सामंत, सामाजिक क्षेत्रात सविता आश्रमचे श्री. संदीप परब, सहकार व महिला सक्षमीकरण क्षेत्रात श्रीमती प्रज्ञा परब, संगीत व तबलावादन बंडया धारगळकर, लोककला क्षेत्रात ज्येष्ठ दशावतार रंगकर्मी कांता मेस्त्री, शिक्षण व सामाजिक क्षेत्रात प्रा. आनंद बांदेकर, भजन क्षेत्रात विशेष योगदान देणारे भजनीबुवा दत्तात्रय वाईकर आदींचा समावेश होता. या महोत्सवाचे उद्घाटन वेंगुर्ले परिषदेचे नगराध्यक्ष श्री. प्रसन्ना कुबल यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाला अनेक मान्यवर उपस्थित होते.

४.१० **शिक्षणकट्टा कार्यक्रम :-** कोकण विभागीय केंद्र व एम. के. सी. एल.च्या संयुक्त विद्यमाने दि. २४ जानेवारी २०१६ रोजी गुरुवर्य अ. आ. देसाई माध्यमिक विद्यालय, हातखंबा, जिल्हा रत्नागिरी येथे शिक्षणकट्टा कार्यक्रम घेण्यात आला. 'परिक्षेला सामोरे जाताना' या विषयावर इ. दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी एम.के.सी.एल.च्या लांजा राजापूर शाखेच्या प्रतिनिधी श्रीमती अर्जिता कदम यांनी विद्यार्थ्यांबरोबर चर्चात्मक संवाद साधला. विद्यार्थ्यांनीही चर्चेत सहभाग घेवून आपल्या शंकांचे निरसन केले. यावेळी गुरुवर्य अ. आ. देसाई माध्य. विद्यालयाचे प्रा. चंद्रमोहन देसाई उपस्थित होते.

४.११ **संवाद कौशले कार्यशाळा** :- कोकण विभागीय केंद्राचे वतीने दि. ५ फेब्रुवारी २०१६ रोजी करबुडे येथे विद्यार्थ्यांसाठी 'संवाद कौशले' या विषयावर मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. भारत शिक्षण मंडळ, रत्नागिरीचे कार्याध्यक्ष श्री. विनायक हातखंबकर हे मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

४.१२ **गुड थॉटस् इन इंग्लिश मार्गदर्शन कार्यशाळा** :- कोकण विभागीय केंद्राचे वतीने दि. ६ फेब्रुवारी २०१६ रोजी हातखंबा येथील गुरुवर्य अ. आ. देसाई माध्यमिक विद्यामंदिरात इ. पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांकरिता 'गुड थॉटस् इन इंग्लिश' या विषयावर मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कोकण विभागीय केंद्र जिल्हा समिती रत्नागिरीचे सदस्य श्री. कृ. आ. पाटील मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. मुख्याध्यापक श्री. शिवाजी पाटील यांच्या मार्गदर्शनात झालेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. चंद्रमोहन देसाई यांनी केले तर आभार क्रीडा शिक्षक श्री. सदा पाटील यांनी मानले.

४.१३ **कारगिल विजय यावर चर्चा** :- कोकण विभागीय केंद्राचे वतीने दि. ९ फेब्रुवारी २०१६ रोजी हातखंबा येथील इ. ११ वी च्या विद्यार्थ्यांसाठी श्री. संजीव बर्वे यांचे 'कारगिल विजय' या विषयावर माहितीपर चर्चात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

४.१४ **वर्तनशास्त्र/व्यवस्थापन शासत्र, व्यवहार शास्त्र यावर व्याख्यान** :- कोकण विभागीय केंद्राचे वतीने दि. १५ फेब्रुवारी २०१६ रोजी फोंडा येथील वाणिज्य कला महाविद्यालयात 'वर्तनशास्त्र / व्यवस्थापन शास्त्र, व्यवहार शास्त्र' या विषयांवर व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये एकूण २५० विद्यार्थी व महाविद्यालयातील शिक्षक वर्ग सहभागी झाले होते. तसेच दि. १६ फेब्रुवारी रोजी फोंडा येथील ५० महिलांना एकत्र घेवून बचतगटाची स्थापना केली. या महिलांना लोकमंगल प्रतिष्ठानचे वतीने मार्गदर्शन करण्यात आले.

४.१५ **सामाजिक कार्यात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सहभाग** :- विभागीय केंद्र कोकण यांच्या संयुक्त विद्यमाने एम.बी.ए. कॉलेज सावर्डे येथे दि. १८ फेब्रुवारी २०१६ रोजी शिक्षणकट्टा कार्यक्रमातील 'सामाजिक कार्यात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सहभाग' या विषयावर एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. एम.बी.ए. कॉलेजचे एच.ओ.डी. प्रा. अजय तालुकदार यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला रत्नागिरी जिल्हा समितीचे अध्यक्ष श्री. बापूसाहेब काणे तसेच जिल्हा समिती सदस्या सौ. युगंधरा राजेशिर्के उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांनी सुध्दा वेगवेगळे मुद्दे मान्यवरांसमोर प्रस्तुत केले. या कार्यक्रमासाठी कला महाविद्यालयातील प्राध्यापक तसेच एम.बी.ए. कॉलेजचे कर्मचारी उपस्थित होते. प्राध्यापिका दिप्ती शेंबेकर यांनी सूत्रसंचालन केले.

४.१६ **महात्मा फुले यांचे शिक्षण विषयक विचार व आजचे शिक्षण या विषयावर चर्चा** :- कोकण विभागीय समिती रत्नागिरी व वराडकर बेलोसे महाविद्यालय दापोली यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २३ फेब्रुवारी २०१६ रोजी लोकसंवाद कार्यक्रम संपन्न झाला. प्रमुख अतिथी ग्रंथपाल श्री. बाळकृष्ण पाठक यांचे 'महात्मा फुले यांचे शिक्षण विषयक विचार व आजचे शिक्षण या विषयावर चर्चा' या विषयावर चर्चात्मक कार्यक्रम घेण्यात आला. मोफत प्राथमिक शिक्षण, सक्तीचे शिक्षण, राखीव जागा इ. विषयांवर उपस्थितांमध्ये चर्चा घडवून आणण्यात आली. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांना चालना मिळण्यासाठी लोकसंवाद हा कार्यक्रम उपयुक्त असल्याचे पर्यवेक्षक प्रा. एम. एस. गुंजाळ यांनी मत व्यक्त केले. जिल्हा समिती सदस्य प्रा. व्ही. टी. कमळकर यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या उपक्रमांची माहिती दिली.

४.१७ **विद्यार्थ्यांपुढील आदर्श चर्चासत्र कार्यक्रम** :- श्री. आनंदराव पवार कला, वाणिज्य, विज्ञान कॉलेज, चिपळूण येथे दि. २३ फेब्रुवारी २०१६ रोजी 'विद्यार्थ्यांपुढील आदर्श' या विषयावर चर्चात्मक कार्यक्रम घेण्यात आला. सुमारे १२५

विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला होता. मुलांनी उत्स्फूर्तपणे आपल्यासमोरील आदर्श कोण? आदर्श कसे असावेत? यावर चर्चा केली. यावेळी जिल्हा समिती अध्यक्ष श्री. प्रकाश काणे व कॉलेजचे प्राचार्य, शिक्षक वर्ग उपस्थित होते.

४.१८ **मी जिंकू शकतो यावर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन** :- कोकण विभागीय केंद्राचे वतीने दि. २६ फेब्रुवारी २०१६ रोजी स. रा. देसाई अध्यापक विद्यालय, माळनाका, रत्नागिरी येथे शिक्षणकट्टा कार्यक्रम घेण्यात आला. श्री. नथुराम देवळेकर यांनी 'मी जिंकू शकतो' या विषयावर उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन त्यांच्यामध्ये चर्चा घडवून आणली. यावेळी स. रा. देसाई अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य व शिक्षक उपस्थित होते.

४.१९ **जागतिक महिला दिन कार्यक्रम सिंधुदुर्ग** :- कोकण विभागीय केंद्र सिंधुदुर्ग जिल्हयाच्या वतीने जागतिक महिला दिन व महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांच्या १०३ व्या जयंतीनिमित्त वेंगुर्ले कॅम्प येथील महिला काथ्या कामगार औद्योगिक सहकारी संस्थेच्या ट्रेनिंग सेंटरच्या सभागृहात महिला सबलीकरण व यशस्वी महिलांचे मार्गदर्शन चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन वेंगुर्ले पोलीस उपनिरिक्षक श्रीमती सरीता लायकर यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन व कोकण विभागाचे कोषाध्यक्ष श्री. एम. के. गावडे यांच्या हस्ते मा. यशवंतराव चव्हाण यांचे प्रतिमेला पुष्पकार अर्पण करुन झाले. यावेळी सिंधुदुर्ग जिल्हा समिती अध्यक्ष ॲड. किशोर शिरोडकर, महिला काथ्या कामगार औद्योगिक सहकारी संस्थेच्या व्यवस्थापकीय संचालिका सौ. प्रज्ञा परब, श्री. प्रमोद धुरी आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाला साप्ताहिक किरातच्या संपादिका सौ. सिमा मराठे, होमिओपॅथिक मेडीकल कॉलेजच्या उपप्राचार्या डॉ. पूजा कर्पे, डॉ. सोनाली सावंत, सौ. संध्या मांजरेकर, सौ. सरोज परब, पंचायत समिती माजी सभापती सारिका काळसेकर, हितश्री गावडे, सौ. मिरा सावंत, सौ. प्रविणा खानोलकर, माजी नगरसेविका श्रीमती गीता गावडे आदी विविध क्षेत्रातील यशस्वी महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमातील उपस्थितांचे स्वागत हितश्री गावडे यांनी केले तर आभार सौ. परब यांनी मानले.

४.२० **जागतिक महिला दिन कार्यक्रम रत्नागिरी** :- कोकण विभागीय केंद्र, फिनोलेक्स उद्योग समुह व मातोश्री कमलबाई विसपुते इंग्लिश मिडीयम स्कूल यांचे संयुक्त विद्यमाने ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त बचत गट व इतर उद्योगिनी महिलांनी बनविलेल्या वस्तूंचे भव्य प्रदर्शन व विक्री महोत्सव दि. ५ ते ८ मार्च या कालावधीत मातोश्री कमलबाई विसपुते इंग्लिश मिडीयम स्कूल, कुवारबांव, रत्नागिरीच्या क्रीडांगणावर संपन्न झाला. दि. ५ मार्च २०१६ रोजी सकाळी ११ वाजता कोकण विभागीय समितीच्या माजी सदस्या आणि सिंधुदुर्ग मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालिका सौ. प्रज्ञाताई परब यांचे हस्ते कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी कोकण विभागीय समितीचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये, कोषाध्यक्ष श्री. एम. के. गावडे आदी मान्यवर उपस्थित होते.

दि. ५ ते ८ मार्च २०१६ या कालावधीत महिलांसाठी पाककला स्पर्धा. भाज्याची सजावट स्पर्धा, पानाफुलांची रांगोळी स्पर्धा, पारंपारिक वेशभूषा स्पर्धा, फनी गेम्स, लायन्स क्लब रत्नागिरीचे वतीने महिलांचे हिमोग्लोबीन टेस्ट व जनरल चेकींग करण्यात आले. 'महिलांचे हक्क व संरक्षण' याविषयी लायसेन्स क्लबच्या वतीने ॲड. लोवलेकर यांनी महिलांना मार्गदर्शन केले. तसेच एमव्हीके ग्रुपच्या महिलांनी गायनाचा व सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. दि. ५ मार्च रोजी 'नाचणीपासून तिखट व गोड पदार्थ' हा विषय देवून पाककला स्पर्धा घेण्यात आली. भाज्यांची सजावट स्पर्धा व पानाफुलांची रांगोळी स्पर्धा या स्पर्धांमधून महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. दि. ८ मार्च रोजी जिल्हा प्रादेशिक रुग्णालयाचे वतीने महिलांना जनजागृतीपर एच.आय.व्ही. एडस्‌बद्दलच्या माहिती पुस्तिकेचे वाटप करण्यात आले. सांगता समारोप कार्यक्रमाला रत्नागिरीचे जिल्हा पोलीस अधिक्षक डॉ. संजय शिंदे, फिनोलेक्स उद्योग समूहाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आशुतोष मुळे, कोकण विभागीय समितीचे अध्यक्ष, श्री. राजाभाऊ लिमये, उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर, जिल्हा समिती अध्यक्ष श्री. प्रकाश काणे, ऋषीकेश शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. धनंजय विसपुते, संस्थेच्या संचालिका श्रीमती नंदा शेलार, श्रीमती मौजमा पेटकर आदी मान्यवर उपस्थित होते.

ऋषीकेश शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. धनंजय विसपुते यांनी आपल्या संस्थेच्या क्रीडांगणावर महिलांसाठी भव्य असा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानला धन्यवाद दिले. यापुढेही संस्था आपल्याला कार्यक्रमाकरिता सहकार्य करेल असे सांगितले. फिनोलेक्सचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आशुतोष मुळे यांनी स्त्रीयांना भेडसावणा-या छातीच्या तसेच गर्भाशयाच्या कर्करोग तपासणीबाबत माहिती दिली. या तपासण्या`मुकुल माधव फाऊंडेशन व फिनोलेक्स यांचे संयुक्त विद्यमाने अत्यल्प दरात जागतिक महिला दिनानिमित्त उपलब्ध करुन देण्यात आल्या असल्याची माहिती दिली. या तपासण्या दि. ७ ते १९ मार्च २०१६ या कालावधीत नजीकच्या हॉस्पिटलमध्ये करुन घ्याव्यात असे सांगितले. उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर यांनीही महिला दिनाच्या उपस्थित महिलांना शुभेच्छा दिल्या. श्रीमती नंदा शेलार यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. अनघा मगदूम यांनी केले. शेवटी एमकेव्ही ग्रुपच्या महिलांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. दि. ५ ते ८ मार्च या चार दिवसात प्रदर्शनाला महिलांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

४.२१ **१२ मार्च जयंती कार्यक्रम** :- मा. यशवंतराव चव्हाण यांचे १२ मार्च जयंतीदिनी प्रतिष्ठानचे कोकण विभागीय कार्यालयात चव्हाणसाहेबांचे प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. चिपळूण येथील कोवॅस या संस्थेच्या 'जिद्द' या मतिमंद मुलांच्या शाळेत १२ मार्च मा. यशवंतराव चव्हाण जयंतीदिन साजरा करण्यात आला. यावेळी कोकण विभागीय समिती सदस्या श्रीमती जानकी बेलोसे, जिल्हाध्यक्ष श्री. प्रकाश काणे, जिल्हा समिती सदस्य श्री. अभिजित खानविलकर, श्री. सिध्देश लाड, कोवॅस संस्थेच्या उपाध्यक्षा तथा नगरसेविका सौ. आदिती देशपांडे, जिद्द शाळेचे मुख्याध्यापक श्री. प्रदीप दिवडकर, शाळेचे शिक्षण व पालक वर्ग उपस्थित होते. 'यशवंतरावांचे शैक्षणिक कार्य' या विषयावर कोकण विभागीय समिती सदस्या श्रीमती जानकी बेलोसे यांनी विचार मांडले. 'यशवंतराव जीवनप्रवाह' हे पुस्तक श्रीमती बेलासे यांचे हस्ते शाळेला भेट देण्यात आले. जिल्हाध्यक्ष श्री. प्रकाश काणे यांनी शाळेला रु.१०,०००/- देणगी म्हणून दिली. उपस्थित मान्यवरांनी कोवॅस संस्थेच्या 'जयदीप मोने' या कार्यशाळेला भेट दिली. या कार्यशाळेतील मतिमंद मुलांनी तयार केलेल्या वस्तूंची पाहणी करण्यात आली.

४.२२ **१२ मार्च जयंती कार्यक्रम** :- कोकण विभाग, तालुका सुधागड, जिल्हा रायगड यांचे वतीने मा. यशवंतराव चव्हाण यांच्या १०३ वी जयंतीनिमित्त कार्यक्रम संपन्न झाला. दि. १४ मार्च रोजी माणगांव खुर्द येथे जयंती कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे उपसरपंच श्री. आंग्रे लाभले व प्रमुख वक्ते म्हणून श्री. लक्ष्मण गोळे सर उपस्थित होते. सकाळी १०.३० वा. प्रमुख पाहुणे श्री. आंग्रे यांच्या हस्ते व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांनी स्वागत गीतांनी केली. त्यानंतर 'बापु के संग' या चित्रपटाचे प्रक्षेपण विद्यार्थ्यांसाठी केले गेले. त्याद्वारे मुलांना 'सत्यमेव जयते' म्हणजे नेमके काय या विधानाचा विवेकी बोध झाला. मुलांनी मोठया कुतुहलाने चित्रपट पाहिला. त्यानंतर श्री. लक्ष्मण गोळे सरांनी मुलांशी गांधी विचारावर संवाद तथा चर्चा केली. साधी राहणी, उच्च विचारसरणी हे जीवनाचे सूत्र महात्मा गांधीनी कसे आत्मसात केले हे थोडक्यात सांगितले. सदर कार्यक्रमाचे आयोजन अतिशय सुंदर पध्दतीने केले गेले होते. श्री. अभिजीत दादा देशमुख यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान - नवमहाराष्ट्र युवा अभियान रायगड जिल्हा संघटक व समन्वयक यांनी सहभागींना मार्गदर्शन केले. त्याचबरोबर श्री. लक्ष्मण गोळे सरांचा परिचय सहभागींना करुन दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन जिल्हा परिषद शिक्षकांनी केले. या कार्यक्रमास माणगाव खुर्द ग्रामस्थांनी भैरवनाथ देवस्थान मंदिर उपलब्ध करुन दिले.

४.२३ **'जागतिक महिला दिन' कार्यक्रम ठाणे** :- ठाणे जिल्हा कोकण विभाग व युवराज प्रतिष्ठान, बदलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ८ मार्च २०१६ रोजी यशस्वीनी भवन, बेलवली, बदलापूर येथे जागतिक महिला दिनानिमित्त 'ती' चा सन्मान हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी महिलांसाठी विविध स्पर्धा व मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ११

ते १ या वेळेत चॉकलेट तयार करण्याची सोपी रेसिपी, दुपारी १ ते ३ या वेळेत मेहंदी स्पर्धा व सायंकाळी ५ ते ७ 'चला स्वतः विषयी बोलू या' या विषयावर विविध मान्यवरांचे मार्गदर्शनपर कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी सौ. ऋताताई आव्हाड यांचे मार्गदर्शनाबरोबरच सौ. मानसी करंदीकर (ज्येष्ठ समुपदेशक) - स्त्रियांवर येणारा कौटुंबिक ताणतणाव, डॉ. सौ. विशाखा राठोड (मानसोपचार तज्ञ) - स्त्रियांचे सर्वसामान्य आरोग्य, सौ. तृप्ती सांडभोर (उपायुक्त, नवी मुंबई महानगरपालिका) प्रशासकीय सेवेत स्त्रियांचे योगदान, सौ. भारती शर्मा यांनी बचतगटातून व्यवसाय मार्गदर्शन या विविध विषयांवर महिलांना मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाला बदलापूरच्या नगरसेविका सौ. वंदना सावळे, कोकण विभागीय समिती सदस्य कॅप्टन श्री. आशिष दामले आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाला जवळ जवळ सहाशे महिला उपस्थित होत्या.

४.२४ **'जलदिन कार्यक्रम'** :- ठाणे जिल्हा कोकण विभाग व युवराज प्रतिष्ठान, बदलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'चला जाऊया पाण्याकडे' या विषयावर दि. २२ मार्च २०१६ रोजी यशस्वीनी भवन, बेलवली, बदलापूर येथे परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. यावेळी ज्येष्ठ जलतज्ञ श्रीमती सरोजिनी सावंत या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या. त्याचप्रमाणे कुळगाव बदलापूरचे नगरसेवक श्री. संभाजी शिंदे, पाणी पुरवठा समिती सभापती श्री. शैलेश वडनेरे, माजी नगराध्यक्ष श्री. राजन घोरपडे, श्रीमती वंदना सावळे, अनिता नवळे व कार्यक्रमाचे आयोजन कोकण विभागीय समिती सदस्य कॅन्टन आशिष दामे आदी मान्यवर उपस्थित होते.

४.२५ कोकण विभागीय समितीच्या २०१५ ते २०१६ या आर्थिक वर्षात सहा सभा संपन्न झाल्या. या व्यतिरिक्त कार्यक्रम करण्यासंदर्भात कोकण विभागीय समितीच्या विविध ठिकाणी अनेक सभा घेण्यात आल्या. त्याचप्रमाणे 'शिक्षणकट्टा' कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबत मा. अध्यक्ष यांनी रत्नागिरी जिल्हयातील संगमेश्वर तालुक्यातील दहा शाळांचे मुख्याध्यापक व संस्था अध्यक्षांच्या स्वतः भेटी घेऊन कार्यक्रमांचे आयोजन करण्याबाबत सांगितले.

## १०.५ विभागीय केंद्र नाशिक :-

नाशिक विभागीय केंद्राचे कामकाज केंद्राचे अध्यक्ष श्री. विनायकराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली चालते.

५.१ **दि. २७.११.२०१५ रोजीचे निसर्गचित्र प्रदर्शन व प्रकाशन सोहळा** :- नाशिक जिल्हयातील सिन्नर तालुक्यात ठाणगांव येथील पुजाजी रामजी भोर विद्यालय व डॉ. अण्णसाहेब कनिष्ठ महाविद्यालय मधील बालचित्रकारांनी आपल्या कुंचल्यातून निसर्गचित्रण साकारले. यात निसर्गात होणारे रंगाचे बदल, वातावरण निर्मित, उत्तम रचना रंगाचा छान समतोल या विद्यार्थ्यांनी साधला. यामध्ये बालचित्रकार गायत्री मोरे, चंचल काकड, निलेश जाधव आदींनी चित्रनिर्मिती केली. या ग्रामीण भागातील बालकलावंतांना एक मोठ व्यासपीठ मिळावे, त्यांची कला सर्वदूर पोहचावी, कलेला वाव मिळावा यासाठी तैथील शिक्षक कर्मचा-यांनी विभागीय केंद्र नाशिक यांच्याशी संपर्क साधला. त्यानुसार केंद्राने बालचित्रकारांकरिता दि. २७.११.२०१५ रोजी 'कुसुमाग्रज दालन' मोफत उपलब्ध करुन दिले. तसेच विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनिर्मित काव्य संग्रह 'पारंबीचा झुला' याचे प्रकाशन केंद्राचे अध्यक्ष श्री. विनायकराव पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

५.२ **दि. ३०.११.२०१५ रोजीचे यशवंतराव चव्हाण गुण गौरव पुरस्कार २०१५** :- विभागीय केंद्र नाशिकचे गुण गौरव पुरस्कार २०१५ हा पुरस्कार कलाक्षेत्र (संगीत) या क्षेत्राला देण्याचे ठरविले. नाशिक जिल्हयातील कलाक्षेत्र शास्त्रीय संगीतातील ज्येष्ठ संगीतकार श्री. मकरंद हिंगणे यांची निवड करण्यात आली. दिनांक ३०.११.२०१५ रोजी दुपारी चार ते सहा हया कालावधीत रावसाहेब थोरात हॉल, नशिक येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम श्रीमती शोभाताई बच्छाव

यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आता. प्रमुख अतिथी म्हणून माजी मंत्री मा. श्री. बाळासाहेब थोरात यांना आमंत्रण देण्यात आले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. स्वानंद बेदरकर यांनी केले. प्रास्ताविक विभागीय केंद्र नाशिकचे अध्यक्ष श्री. विनायकराव पाटील यांनी केले. हा पुरस्कार माजी मंत्री, श्री. बाळासाहेब थोरात यांच्या शुभहस्ते श्री. मकरंद हिंगणे यांना प्रदान करण्यात आला. या यशवंतराव चव्हाण गुण गौरव पुरस्कार २०१५ चे स्वरुप शाल, श्रीफळ, सन्मानपत्र व रु.२१,०००/- असे होते.

## १०.६ विभागीय केंद्र औरंगाबाद :-

विभागीय केंद्र औरंगाबादचे कामकाज केंद्राचे अध्यक्ष श्री. नंदकिशोर कागलीवाल यांच्या अध्यक्षतेखाली चालते.

६.१ **शनिवार दि. १८ एप्रिल २०१५ - इन्व्हेन्शन ऑफ लाईंग :-** सुप्रसिध्द चित्रपट दिग्दर्शकद्वयी रिकी ग्रीव्हीअर आणि मॅथ्यु रॉबिनसन यांचा २००९ साली प्रदर्शित झालेला 'इन्व्हेन्शन ऑफ लाईंग' हा चित्रपट दाखविण्यात आला. उपस्थित प्रेक्षकांनी चित्रपटाविषयी आपली मते प्रदर्शित केली.

६.२ **गुरुवार दि. १६ एप्रिल २०१५ - तुकाराम जाधव यांचे व्याख्यान व डॉ. नरेंद्र जाधव यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भाषणांवर आधारित पुस्तकांच्या संचाचे महाविद्यालयांना वाटप :-** विभागीय केंद्र औरंगाबादच्या वतीने ख्यातनाम अर्थतज्ञ, भारतीय रिझर्व्ह बँकेचे माजी प्रधान आर्थिक सल्लागार, आंतरराष्ट्रीय नाणे निधीचे आर्थिक सल्लागार डॉ. नरेंद्र जाधव यांनी परिश्रमपूर्वक साकारलेले भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संपादित निवडक गाजलेली भाषणे तसेच भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार एवढीच बाबासाहेबांची ओळख नव्हे तर चतुरस्त्र बाबासाहेबांचे आर्थिक विचार, धर्मशास्त्रीय विचार, समाजशास्त्रीय विचार, मानववंश शास्त्र यावर भाष्य करणारा ५ पुस्तकांचा संच ज्याची मूळ किंमत रु.३,५००/- इतकी आहे. सदर ग्रंथ संच विद्यार्थ्यांना व शिक्षकांना वाचता आणि अभ्यासता यावेत तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार त्यांच्या पर्यंत पोहचावेत या उदात्त हेतूने एम.जी.एम.च्या आइन्स्टाईन सभागृहात हे ग्रंथसंच ४० महाविद्यालयांच्या ग्रंथालयास भेट देण्यात आले. यावेळी औरंगाबादेतील या महाविद्यालयांचे प्रतिनिधी उपस्थित होते. तसेच युनिक अकादमीचे संचालक श्री. तुकाराम जाधव यांचे 'स्पर्धा परिक्षांची तयारी' याविषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. श्री. तुकाराम जाधव यांनी सुरु केलेली 'युनिक अकादमी' ही संस्था आज महाराष्ट्रातील स्पर्धा परिक्षांचे प्रशिक्षण देणारी अग्रगण्य संस्था आहे. त्यांच्या संस्थेतील विद्यार्थी आज मोठया प्रमाणावर प्रशासकीय सेवेत आहेत. यावेळी बोलतांना त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना स्पर्धा परिक्षांच्या तयारीबाबत मार्गदर्शन केले.

६.३ **दि. १२ एप्रिल २०१५ - सुप्रसिध्द पत्रकार संजय आवटे यांचे व्याख्यान व डॉ. नरेंद्र जाधव यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भाषणांवर आधारित पुस्तकांच्या संचाचे महाविद्यालयांना वाटप :-** विभागीय केंद्र औरंगाबादच्या वतीने आयोजित हा कार्यक्रम परभणी व आंबेजोगाई अशा दोन ठिकाणी आयोजित करण्यात आला. डॉ. नरेंद्र जाधव यांनी परिश्रमपूर्वक साकारलेले भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संपादित निवडक गाजलेली भाषणे तसेच भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार एवढीच बाबासाहेबांची ओळख नव्हे तर चतुरस्त्र बाबासाहेबांचे आर्थिक विचार, धर्मशास्त्रीय विचार, समाजशास्त्रीय विचार, मानववंश शास्त्र यावर भाष्य करणारा ५ पुस्तकांचा संच ज्याची मूळ किंमत रु.३,५००/- इतकी आहे. सदर ग्रंथ संच विद्यार्थ्यांना व शिक्षकांना वाचता आणि अभ्यासता यावेत तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार त्यांच्या पर्यंत पोहाचावेत या उदात्त हेतूने परभणी व आंबेजोगाई येथील प्रत्येकी ३० महाविद्यालयांच्या ग्रंथालयास भेट देण्यात आले.

यानंतर सुप्रसिध्द पत्रकार श्री. संजय आवटे यांचे 'माध्यमातील करीअर' या विषयावर उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना त्यांनी आजच्या परिस्थितीनुसार बदलणारे माध्यमांचे स्वरुप व त्या माध्यमांचा सकारात्मक वापर

करावा असे मत व्यक्त केले. याप्रसंगी परभणी येथे प्रमुख उपस्थिती म्हणून श्री. दत्ता बाळसराफ, श्री. विजय कान्हेकर, श्री. सुबोध जाधव, श्री. दिपक जाधव आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच आंबेजोगाई येथे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ. द्वारकादास लोहिया यांची उपस्थिती होती. यासोबतच श्रीमती दिपाताई क्षीरसागर, श्रीमती रचना मोदी (नगराध्यक्ष, आंबेजोगाई), माजी आमदार पृथ्वीराज साठी, श्री. अमर हबीब, श्री. दगडू लोमटे, श्री. मनोज लोहिया यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यकमाचे आयोजन विभागीय केंद्र बीडच्या वतीने आयोजित करण्यासाठी डॉ. नरेंद्र काळे यांनी परिश्रम घेतले.

६.४ **चित्रपट चावडीत 'नागरिक' ची टिम प्रेक्षकांच्या भेटीला - अकिरा कुरुसावा दिग्दर्शित 'राशोमॉन' चित्रपटाचेही प्रदर्शन** :- विभागीय केंद्र औरंगाबाद व एम.जी.एम. जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभागाच्या वतीने दरमहा राबविण्यात येणा-या चित्रपट चावडी उपक्रमात बुधवार दि. १३ मे २०१५ रोजी सायंकाळी ४ वाजता एम.जी.एम. च्या आइन्स्टाइन सभागृहात प्रसिध्द चित्रपट अभिनेते श्री. सचिन खेडेकर, श्री. शाहीर संभाजी भगत, अभिनेत्री देविका दफ्तरदार, लेखक श्री. महेश केळूस्कर व दिग्दर्शक श्री. जयप्रद देसाई यांनी त्यांच्या आगामी 'नागरिक' या चित्रपटाविषयी चित्रपट चावडीच्या प्रेक्षकांशी संवाद साधला. या चित्रपटातील गाणे सादर करुन शाहीर संभाजी भगत यांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. तसेच चावडीत या महिन्यात सुप्रसिध्द चित्रपट अकिरा कुरुसावा यांचा १९५० साली प्रदर्शित झालेला 'राशोमॉन' हा चित्रपट दाखविण्यात आला.

६.५ **दि. ११ जुलै २०१५ - 'बशर नवाज ..... ख्वाब, जिंदगी और मै' या लघुपटाचे प्रदर्शन** :- विभागीय केंद्र औरंगाबाद, महात्मा गांधी मिशन व बशर नवाज गजल मंच यांच्या वतीने दि. ११ जुलै २०१५ रोजी महात्मा गांधी मिशनच्या आईन्स्टाईन सभागृहात सायंकाळी ६ वाजता चित्रपट चावडी उपक्रमांतर्गत बशर नवाज यांच्यावरील 'बशर पवाज... ख्वाब, जिंदगी और मै' या लघुपटाचे प्रदर्शन करण्यात आले. सुप्रसिध्द दिग्दर्शक जयप्रद देसाई यांनी हा लघुपट दिग्दर्शित केला आहे. केवळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव व लेह आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव या नावाजलेल्या चित्रपट महोत्सवात हा लघुपट प्रदर्शित झाला. या लघुपटाचे देशपातळीवर मोठया प्रमाणात कौतुक झाले आहे. यानिमित्ताने बशर नवाज यांच्या आठवणींना उजाळा देऊन मान्यवरांच्या उपस्थितीत बशर नवाज यांना आदरांजली वाहण्यात आली. यावेळी त्यांच्या चाहत्यांनी व रसिकांनी कार्यक्रमास मोठया संख्येने उपस्थिती दर्शविली.

६.६ **दि. २५ जुलै २०१५ - तंबाखूमुक्त महाराष्ट्र अभियानांतर्गत खा.सौ. सुप्रिया सुळे यांच्या उपस्थितीत पदयात्रेचे आयोजन** :- विभागीय केंद्र औरंगाबाद, सलाम मुंबई फाऊंडेशन आणि जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक विभाग, औरंगाबाद यांच्या वतीने 'तंबाखू मुक्त महाराष्ट्र अभियान' राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून तंबाखूमुळे होणा-या दुष्परिणामाबद्दल राज्यभर जनजागृती करण्यात येत आहे. सदरील उपक्रमांतर्गत दि. २५ जुलै २०१५ रोजी औरंगाबाद येथे छत्रपती संभाजी महाराज चौक, टी.व्ही. सेंटर ते जगत्गुरु संत तुकाराम महाराज नाटयगृह, सिडको, औरंगाबाद या मार्गावर भव्य पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी ९ वा. छत्रपती संभाजी चौक येथे खासदार सौ. सुप्रिया सुळे यांच्या हस्ते हवेत फुगे सोडून रॅलीची सुरुवात झाली. यावेळी आमदार श्री. राजेश टोपे, विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री. नंदकिशोर कागलीवाल, कोषाध्यक्ष सचिन मुळे, आमदार भाऊसाहेब पाटील चिकटगावकर, आ. सतिश चव्हाण, नीलेश राऊत, डॉ. अनुपमा पाथ्रीकर, नितीन राठोड, प्रसन्न पाटील, सलाम मुंबई फाऊंडेशनच्या राजश्री कदम, सुबोध जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

नव्या युगाची नवी पहाट, तंबाखूची लावू वाट, औरंगाबादची शक्ती तंबाखूमुक्ती..... तंबाखूमुक्ती अशा आशयपूर्ण घोषणांनी सिडको परीसर सकाळी दुमदुमून गेला. या पदयात्रेत सुमारे पाच हजाराच्या वर विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. पदयात्रेत खा. सौ. सुप्रिया सुळे यांनी तीन किलोमीटर अंतर चालून मुला-मुलींमध्ये उत्साह निर्माण केला. पदयात्रा छत्रपती संभाजी चौक येथून मार्गस्थ होऊन एम-२ कॉर्नर, अष्टविनायक मंदीर, फरशी मैदान, त्रिमुर्ती कॉर्नर, विठ्ठल रुख्माई मंदीर, पार्श्वनाथ चौक, लहुजी साळवे चौक, बजरंग चौक मार्गे जगतगुरु संत तुकाराम महाराज नाटयगृह येथे या पदयात्रेची सांगता झाली. यावेळी

सुप्रसिध्द गायक शान यांनी गायलेल्या 'लाईफ से पंगा मत ले यार' या गाण्याची चित्रफित सभागृहात दाखविण्यात आली. फुलंब्री तालुक्यातील नरला येथील जिल्हा परीषद शाळेचा तंबाखूमुक्त शाळा म्हणून खा. सुप्रिया सुळे यांच्या हस्ते गौरव केला. यावेळी खा. सुप्रिया सुळे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांशी आपल्या खास शैलीत संवाद साधला. तंबाखू व गुटखा सेवनामुळे आर.आर. पाटील यांच्यासारख्या चांगल्या नेत्याला गमवावे लागले, असे सांगतांना खा. सौ. सुप्रिया सुळे यांनी वातावरण धीरगंभीर केले. आबांच्या काळातच गुटखाबंदीचा कायदा झाला. या निर्णयाची आठवण करुन सुप्रिया सुळे यांनी आबांना गमावल्याचे दुःख विषद केले. मी तंबाखू खाणार नाही व इतरांना त्यापासून परावृत करण्याचा प्रयत्न करील अशी शपथ विद्यार्थ्यांनी यावेळी घेतली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाल मुंबई फाऊंडेशनच्या राजश्री कदम यांनी केले तर सुत्रसंचालन श्रीराम पोतदार यांनी केले.

६.६ **दि. २५ जुलै २०१५ - मा. शरद पवार साहेब यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित महाराष्ट्र-२०२५ उपक्रमांतर्गत आयोजन** :- विभागीय केंद्र औरंगाबाद व महात्मा गांधी मिशन यांच्या वतीने प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार यांच्या अमृतममहोत्सवी वर्षानिमित्त महाराष्ट्राच्या भावी विकासाच्या दृष्टीने महत्वाच्या १३ विषयांवर चर्चासत्रांची मालिका आयोजित करण्यात येत आहे. शनिवार दि. २५ जुलै २०१५ रोजी चौथे 'सामाजिक न्याय' या विषयावरील चार्यासत्र सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजत दरम्यान एम.जी.एम.च्या आईनस्टाईन सभागृहात संपन्न झाले. यावेळी खा. सौ. सुप्रिया सुळे, विभागीय केंद्राचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, कोषाध्यक्ष सचिन मुळे, प्रा. प्रताप बोराडे, प्रा. सुधीर देशमुख, महेश चव्हाण, प्राचार्य डॉ. जनार्दन वाघमारे, डॉ. गंगाधर पानतावणे, प्रताप आसबे, हरी नरके, मिलींद आवाड, जहीर अली, आनंद करंदीकर, स्मिता अवचार, संपत काळे, सदा डुंबरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

६.८ **दि. २५ जुलै २०१५ - विं. दा. करंदीकर यांच्या कवितेवर आधारित 'विंदांची त्रिपदी' कार्यक्रमाचे आयोजन** :- बशर नवाज गझल मंच, एम.जी.एम. वृत्तपत्रविद्या व जनसंवाद महाविद्यालय, अभ्युदय कामगार साहित्य मंडळ व पसायदान प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने ज्ञानपीठ पुरस्कार विजेते विं. दा. करंदीकर यांच्या कवितेवर आधारित आनंद करंदीकर व सरीता आवाड यांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम शनिवार दि. २५ जुलै २०१५ रोजी सायं. ६ वा. एम.जी.एम.च्या आईन्स्टाईन सभागृहात संपन्न झाला.

६.९ **दि. १३ ऑगस्ट २०१५ - 'रिंगणची चर्चा, चर्चेचं रिंगण'** :- संतपरंपरेचा सामाजिक सांस्कृतिक मागोवा घेणा-या 'रिंगण' वार्षिकाचा या वर्षीचा संत जनाबाई विशेषांक राज्यभरातल्या सांस्कृतिक विश्वात चर्चेचा विषय ठरला आहे. या अंकाच्या निमित्ताने 'रिंगणची चर्चा, चर्चेचे रिंगण' आणि श्रीरंग गायकवाड यांच्याशी लोकसंवाद उपक्रमांतर्गत चर्चेचे आयोजन विभागीय केंद्र औरंगाबाद, वृत्तपत्रविद्या व जनसंवाद महाविद्यालय यांच्या वतीने जे.एन.ई.सी. महाविद्यालयाच्या आईन्स्टाईन सभागृहात करण्यात आले.

६.१० **दि. १४ ऑगस्ट २०१५ - युवा स्वातंत्र्य ज्योत रॅली** :- नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे दरवर्षी युवकांमध्ये राष्ट्रभावना जागृत होण्यासाठी युवा स्वातंत्र्य ज्योत रॅलीचे आयोजन करण्यात येते. यावर्षी औरंगाबादेतील रोट्रॅक्ट क्लब या संस्थेसोबत मिळून स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला म्हणजेच १४ ऑगस्ट २०१५ रोजी ही रॅली आयोजित करण्यात आली. या रॅलीचा मार्ग हा क्रांती चौक ते पैठणगेट असा ओता. रॅलीमध्ये औरंगाबाद शहरातील महाविद्यालयीन युवक-युवती, स्थानिक संस्था, संघटना, राजकीय पक्ष, ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक, प्रशासकीय अधिकारी तसेच सर्वसामान्य नागरिक यांचा समावेश होता. नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे राज्य संघटक श्री. नीलेश राऊत यांच्या हस्ते मशाल पेटवून रॅलीचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी नगरसेवक अंकीता विधाते, अभिषेक देशमुख, सुबोध जाधव, मंगेश निरंतर, राहूल तायडे यांची प्रमुख उपस्थिती होती. सहभागी युवक-युवतीनी यावेळी जोरदार घोषणा दिल्या. पैठणगेट येथे भारतीय घटनेच्या सरनाम्याच्या वाचनाने रॅलीचा समारोप करण्यात आला.

६.११ **दि. २२ व २३ ऑगस्ट २०१५ - भारतरत्न उस्ताद बिस्मिल्ला खाँ शहनाई संगीत महोत्सव :-** विभागीय केंद्र औरंगाबादच्या वतीने गतवर्षीप्रमाणे प्रसिध्द शहनाईवादक भारतरत्न बिस्मिल्ला खाँन यांच्या पुण्यतिथीनिमित्त दि. २२ व २३ ऑगस्ट २०१५ रोजी असे दोन दिवसीय शहनाई संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. निराला बाजार येथील तापडीया नाटयगृहात संपन्न झालेल्या महोत्सवाचे उद्‌घाटन ज्येष्ठ बासरीवादक श्रीपादराव कुलकर्णी व संजीव शेलार यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करुन करण्यात आले. यावेळी केंद्राच्या वतीने औरंगाबादचे ज्येष्ठ गायक पं. नाथराव नेरळकर व अखिल भारतीय गांधर्व मंडळ, मुंबईचे अध्यक्ष श्री. प्रभाकराव भांडारे यांचा सत्कार करण्यात आला. संगीत महोत्सवाच्या पहिल्या दिवसाची (दि. २२ ऑगस्ट २०१५) सुरुवात सायं. ७ वाजता शहनाई संगीत संस्थेचे अनिल तोडकर व संस्थेचे विद्यार्थ्यांच्या शहनाई वादनाने झाली. यात त्यांनी यमन रागात मध्यतीन तालात शहनाईचे वादन केले. त्यानंतर पुणे येथील प्रसिध्द बासरीवादक दीपक भानुसे यांनी बासरीवादन केले. त्यांनी राग पुरीया कल्याण मध्ये झप तालातील रचना सादर केली. त्यानंतर अबीर गुलाल उधळीत हा अभंग मोठया नजाकतीने सादर करीत रसिकांची मने जिंकली. त्यानंतर पुणे येथील प्रसिध्द गायक पं. संजय गरुड यांच्या गायनाने पहिल्या दिवसाचा शेवट झाला.

संगीत महोत्सवाच्या दुस-या दिवसाची (दि. २३ ऑगस्ट २०१५) सुरुवात सायं. ६ वा. औरंगाबादच्या प्रसिध्द गायिका कु. मेधा लखपती यांच्या गायनाने झाली. वग भीमपलासमध्ये त्यांनी 'जा जा रे मंदिरवा' ही बंदीश सादर केली. त्यानंतर संत ज्ञानेश्वर यांनी रचलेल्या 'रुप पाहता लोचनी' या अभंगाचे सादरीकरण केले. त्यानंतर भारतरत्न उस्ताद बिस्मिल्ला खाँन यांचे शिष्य मा. कल्याण अपार यांचे शहनाई वादन झाले. त्यांनी राग जोगच्या स्वराने सुरुवात करत पाठोपाठ वाजवलेल्या पहाडी धुनमुळे वातावरण चिरतरुण झाले होते. त्यानंतर पुण्याचे प्रसिध्द गायक उस्ताद रईस खाँ बाले खाँ यांचे सितार वादन झाले. त्यांनी राग सरस्वतीने सतारीची तार छेडत रसिकांशी संवाद साधला. सितारीच्या प्रत्येक तारेवरची त्यांची असलेली हुकूमत त्यांनी यावेळी दाखवून दिली. त्यानंतर औरंगाबादचे ज्येष्ठ गायक पं. नाथराव नेरळकर यांच्या गायनाने शहनाई संगीत महोत्सवाचा समारोप झाली. त्यांनी स्वरांची बरसात करत रसिकांना स्वररुपी पावसात चिंब भिजविले. यावेळी विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री. नंदकिशोर कागलीवाल यांची उपस्थिती होती.

६.१२ **दि. ७ सप्टेंबर २०१५ - बी. रघुनाथ स्मृतीसंध्या :-** बी. रघुनाथ स्मृतीसंध्या या उपक्रमाचे हे २६ वे वर्ष होते. यंदा हा उपक्रम नाथ समूह, परिवर्तन संस्था आणि विभागीय केंद्र औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला. मराठवाडयाच भूषण असलेले ज्येष्ठ लेखक बी. रघुनाथ यांच्या स्मृतीदिनी ७ सप्टेंबर रोजी दरवर्षी हा सोहळा आयोजित करण्यात येतो. कवीसंमेलन, साहित्यिक कार्यक्रम आणि बी. रघुनाथ साहित्य पुरस्कार वितरण असे या कार्यक्रमाचे स्वरुप होते. पुरस्काराचे वितरण हे मराठी साहित्य विश्वातील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावर्षी हा पुरस्कार कादंबरीकार, चित्रकार व प्रकाशक ल. म. कडू यांच्या यांच्या 'खारीचा वाटा' या कादंबरीस ज्येष्ठ कादंबरीकार श्री. रंगनाथ पठारे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावर्षीच्या कार्यक्रमात सुप्रसिध्द कादंबरीकार लेखक मिलींद बोकील यांच्या 'एकम्' या कादंबरीवर आधारित नाटयप्रयोग 'घटाकाश' सादर करण्यात आला. यात प्रसिध्द अभिनेत्री रीमा लागू, ज्योती सुभाष, शुभांगी दामले, पर्ण पेठे आदींनी आपली कला सादर केली. यावेळी विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री. नंदकिशोर कागलीवाल, सचिन मुळे, सुबोध जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

६.१३ **दि. २५ नोव्हेंबर २०१५ - यशवंतराव चव्हाण साहेब यांना पुण्यतिथी दिनी अभिवादन :-** महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांच्या ३१ व्या पुण्यतिथी निमित्त विभागीय केंद्र औरंगाबाद तर्फे एम.जी.एम. महाविद्यालयाच्या आईन्स्टाईन सभागृहात आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मा. यशवंतराव चव्हाण साहेबाना आदरांजली वाहण्यात आली. या प्रसंगी बोलताना रेणुका कड यांनी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांच्या कार्याविषयी माहिती दिली तसेच आजचा पुरोगामी महाराष्ट्र हा मा. यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या दूरदृष्टीमुळे घडला आहे असेही त्यांनी सांगितले. या प्रसंगी दोन पुरस्कार प्राप्त लघुपट दाखवण्यात आले.

६.१४ **दि. १४ जानेवारी २०१६ - भारतीय लोकशाही पुढील आव्हाने - चर्चासत्र :-** विभागीय केंद्र औरंगाबाद व सरस्वती भुवन शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या २२ व्या नामविस्तार दिनानिमित्त 'भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने' या विषयावर एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. दि. १४ जानेवारी रोजी सकाळी ११ वा. गोविंदभाई श्रॉफ ललित कला अकादमी सभागृह, सरस्वती भुवन महाविद्यालय, औरंगापुरा येथे सदर चर्चासत्र संपन्न झाले. चर्चासत्रात डॉ. भालचंद्र मुणगेकर, खा. सौ. सुप्रिया सुळे, डॉ. जहीर अली यांनी प्रमुख मार्गदर्शन केले. यावेळी आमदार हेमंत टकले, आमदार राजेश टोपे, आमदार सतिश चव्हाण, आमदार भाऊसाहेब चिकटगावकर, आमदार प्र.श. गजभिये, सरस्वती भुवन शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. दिनकर बोरीकर, श्री. सचिन मुळे, श्री. दिनेश गंगापूरवाला, श्री. दत्ता बाळसराफ यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. संजय मोहोड आणि त्यांच्या सहका-यांनी यावेळी विद्यापीठ गीत सादर केले.

भारताची लोकशाही आता परिपक्व झाली आहे. मात्र ही लोकशाही टिकवण्यात सर्वात मोठी भूमिका गरिबांची आहे. झोपडपट्टीतल्या ७० टक्के लोकांनी सातत्याने मतदान करुन सरकारे बदलली आहेत त्यामुळे गरिबांमुळेच लोकशाही टिकून आहे असे मत डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी व्यक्त केले. ते पुढे म्हणाले की, कोलंबिया विद्यापीठाच्या ३०० वर्षांच्या इतिहासात सर्वात हुशार विद्यार्थी म्हणून डॉ. आंबेडकरांची नोंद आहे. मात्र आपल्या देशातल्या मानसिकतेने डॉ. आंबेडकर पुरेसे समजून घेतले नाहीत. प्रत्यक्षात त्यांचे विचार कृतीत उरतवले नाहीत. अनेकांना ते महागदेखील पडले असते. इसवी सन १९१८ मध्ये छोटया शेतक-यांचे प्रश्न आणि त्यावरील उपायावर त्यांनी लेखाच्या माध्यमातून चर्चा केली, पण अर्थतज्ञांनीदेखील डॉ. आंबेडकरांना समजून घेतले नाही. भारताच्या राजकारणावर ३० टक्के सधन आणि उच्चभ्रूंचे वर्चस्व आहे. त्यामुळे हे लोक त्यांच्या हिताचे निर्णय घेण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे देशातील अनेक भागात विकास पोहचला नाही. मी आतापर्यंत २६ देशांचा प्रवास केला. मात्र भारताइतकी विवधता, धर्म, भाषा, प्रांत, संस्कृती इतक्या मोठया प्रमाणात जगात कुठेच नाही. मात्र या विविधतेवर हल्ला करण्याचे प्रयत्न सध्या सुरु असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

डॉ. जहीर अली हे यावेळी विषयाची मांडणी करताना म्हणाले, भारतात धर्मनिपेक्षतेबद्दल सध्या जे बोलले जात आहे तो सध्या मोठा जोक होत असल्याचे पहायला मिळत आहे. भारतात लोकशाही केवळ निवडणुकीपुरतीच पहायला मिळते. इतर वेळी मात्र त्याची अंमलबजावणी होत नाही ही लोकशाहीची मोठी कमतरता आहे. आपल्याकडे मुस्लिमांच्या बाबतीत केले जाणारे राजकारण हे इमोशन आणि युजलेस असून केवळ मतपेटीसाठी केले जात असल्याची टीका त्यांनी केली. अलिगड विद्यापीठाच्या माध्यमातून उर्दू जतन केली पाहिजे असे सांगितले जाते. मात्र अनेक राज्यात मोठया प्रमाणात मुस्लिम आहेत. मात्र त्या भागात मुस्लिमांची प्रमुख भाषा उर्दू नाही. त्यामुळे हा केवळ भावनेचा विषय असून त्यामधून रोजगारनिर्मिती होत नसल्याचे त्यांनी सांगितले.

खासदार सौ. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, बाबासाहेबांना आपण एका समाजापुरते अडकवून ठेवले आहे, संविधानाचे लिखाण, समता याच्या व्यतिरिक्तही बाबासाहेबानी खूप काम केले आहे. परंतु त्यांच्या कामावर फारशी चर्चा होताना दिसत नाही. त्या पुढे म्हणाल्या, विद्यापीठाचा नामविस्तार हा श्री. शरदराव पवार साहेब यांच्यासाठी एक टर्निंग पॉईंट होता. त्यांना नामांतराचा प्रश्न सोडविण्यासाठी अनेकांनी साथ दिली. आज बहुतेकांच्या मनात जातपात कायम आहे, यामध्ये परिर्तान करणे आवश्यक आहे. निवडणूकांच्या पुढे जावून प्रत्येक विषय सोडविला पाहिजे.

चर्चासत्राच्या यशस्वीतेसाठी विभागीय केंद्र औरंगाबादचे अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, सचिव मुकूंद भोगले, कोषाध्यक्ष सचिन मुळे, निलेश राऊत, सरस्वती भुवन शिक्षण संस्थेचे सहचिटणीस श्रीरंग देशपांडे, सरचिटणीस ॲड. दिनेश वकिल यांनी प्रयत्न केले.

६.१५ **दि. १४ जानेवारी २०१६ - यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार वितरण सोहळा :-** विभागीय केंद्र औरंगाबादच्या वतीने २०१५ सालापासून समाजपयोगी उल्लेखनीय कार्य करणा-या एका व्यक्तीस व संस्थेस 'यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार' प्रदान करण्याचा निर्णय करण्यात आला होता. या अनुषंगाने विविध क्षेत्रातील व्यक्त व संस्थांचे प्रस्ताव मागविण्यात आलेले होते. या पुरस्कारांचे वितरण मा. खा. सुप्रिया सुळे व आ. राजेश टोपे यांच्या हस्ते दि. १४ जानेवारी २०१६ रोजी गोविंदभाई

श्रॉफ ललित कला अकादमी येथे आयोजित कार्यक्रमात करण्यात आले. यावेळी आ. हेमंत टकले, आ. राजेश टोपे, आ. सतिश चव्हाण, आ. भाऊसाहब चिकटगावकर, आ. प्रकाश गजभिये, सचिन मुळे, श्री. दत्ता बाळसराफ यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्राप्त झालेल्या प्रस्तावांमधून २०१५ सालाकरिताच्या पुरस्कारांकरिता निवड समितीने व्यक्तीगत गटातून प्रगतीशील युवा शेतकरी श्री. दिपक पांडुरंग चव्हाण, औरंगाबाद यांची निवड करण्यात आलेली आहे. रु.११,०००/- रोख, सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व झाडाचे रोप असे या पुरस्काराचे स्वरुप होते. दिपक चव्हाण यांनी रसायनशास्त्रातून पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर शेती करण्याचा निर्णय घेतला. घरी करीत असलेल्या पारंपारिक शेतीतून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करीत आल्या शेतीला आदर्श शेतीचा दर्जा त्यांनी अल्पावधीत मिळवून दिला. जमिनीची बांधबधिस्ती, विहीर पुर्नभरण, विविध पिकांचे विक्रमी उत्पादन, सेंद्रिय व विद्राव्य खतांचा वापर, यांत्रिकीकरणाचा वापर, एकात्मिक पिक पध्दतीचा वापर, शेडनेट वापर, पिकाचे नियोजन करुन जोखीम व्यवस्थापन, शेततळे, सोशल मिडीयाचा शेतीसाठी वापर, आपल्या शेताचा गुगल मॅप, प्लॅस्टिक आच्छादन यासारख्या अनेक अभिनव प्रयोगांचा वापर करुन त्यांनी दुष्काळाच्या छायोत देखील आपली शेती नफ्यात आणली आहे. तसेच आपल्या प्रयोगांचा वापर स्वतःपुरता न करता परीसरातील युवा शेतक-यांना सातत्याने आपल्या प्रयोगांचे मार्गदर्शन करणे हे देखील कार्य श्री. चव्हाण यांनी केले आहे.

संस्था गटातून दोन संस्थांना पुरस्कार देण्याचा निर्णय निवड समितीने घेतला. जलसंवर्धनात उल्लेखनीय कार्य केलेल्या ग्रामविकास संस्था व शेतक-यांना एकत्र आणून शेतीगट स्थापन करुन कृषीक्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या जय जवान जय किसान शेतकरी मंडळ या दोन्ही संस्थांना यंदाचा यशवंतराव चव्हाण गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. प्रत्येकी रु.५०००/- रोख, सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व झाडाचे रोप असे या पुरस्काराचे स्वरुप होते.

६.१६ **दि. २२ जानेवारी २०१६ - चित्रपट चावडी** :- 'मालेगाव का सुपरमॅन' चित्रपट प्रदर्शन व कलाकारांसोबत संवाद कार्यम बॉलीवुडला टक्कर देणारी फिल्म इंडस्ट्री आपल्या महाराष्ट्राच्या मालेगांवात आहे. फिल्म मेकिंगचे कुठलेही प्रशिक्षण न घेतलेल्या या कलाकारांनी अनेक पुरस्कार आपल्या नावावर केलेत. त्यांच्या या सिनेमा तंत्राचा व जिद्दीचा गौरव करण्यासाठी विभागीय केंद्र औरंगाबाद व एम.जी.एम. जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभागाच्या वतीने राबविण्यात येणा-या चित्रपट चावडी या उपक्रमांतर्गत विशेष शोचे आयोजन करण्यात आले होते. 'मालेगाव का सुपरमॅन' हा बहुचर्चित आणि अनेक पुरस्कार विजेता चित्रपट दाखविण्यात आला. यावेळी चित्रपटाचे दिग्दर्शक आणि सिनेमॅटोग्राफर शेख नासेर, भिनेता, दिग्दर्शक, सिनेमॅटोग्राफर अक्रम खान आणि अभिनेता श्री. रमजान खान हे कलाकार प्रेक्षकांशी संवाद साधला.

६.१७ **दि. २७ फेब्रुवारी २०१६ - मराठीभाषा दिनानिमित्त 'आनंद सुधा बरसे' कविता अभिवाचन कार्यक्रमाचे आयोजन** :- दि. २७ फेब्रुवारी रोजी कवी कुसूमाग्रज यांची जयंत आहे. हा दिवस मराठी भाष दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून विभागीय केंद्र औरंगाबाद व सरस्वती भुवन शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने अक्षरलेणं प्रस्तूत 'आनंद सुधा बरसे' या कविता अभिवाचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमामध्ये आद्यकवी मुकूंदराज, मोरोपंत, भा.रा. तांबे, प्र. के. अत्रे, कुसूमाग्रज, संत बहिणाबाई, विं. दा. करंदीकर, शांता शेळके, बा. भ. बोरकर, मंगेश पाडगावकर, सौमित्र, संदीप खरे आदी मराठी साहित्यातील नामवंत कवींच्या कवितांचे अभिवाचन करण्यात आले. या कार्यक्रमात कवितांचे अभिवाचन सुधीर मोघे, सीमा मोघे, अश्विनी दाशरथे, हर्षवर्धन दिक्षित आणि बालकलाकार रेवा जोशी यांनी केले. मराठी साहित्य सर्वदूर रसिकांपर्यंत पोहचावे, ज्येष्ठ कवींच्या कविता नव्या पिढीतील रसिकांपर्यंत पेहचाव्यात तसेच यानिमित्ताने जुन्या नव्या कवितांचे अभिसरण व्हावे हा या कार्यक्रम आयोजनामागचा केंद्राचा हेतू होता.

६.१८ **दि. १० मार्च २०१६ - जागतिक महिलादिनानिमित्त 'नई उडान' कार्यक्रमाचे आयोजन** :- आजही समाजातील महिला सामाजिक, शारिरीक व मानसिक शोषणाच्या बळी जात आहेत. देशात याविषयी पुरेसे कायदे असूनही केवळ महिलांना

त्याविषयी माहिती नसल्यामुळे कित्येक महिलांना न्याय मिळत नाही. यासाठी महिलाविषयक कायद्यांची समाजाच्या तळागाळापर्यंत जनजागृती होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन ॲड. निलोफर शेख यांनी केले. विशेषतः मुस्लिम समाजातील युवती-महिलांना भेडसावणा-या प्रश्नांची, त्यांच्यापुढील आव्हानांची उकल त्यांनी आपल्या भाषणातून विषद केली. यावेळी बोलताना आर्थिक परिस्थिती नसलेल्या युवती-महिलांसाठी मोफत कायदेविषयक सल्ला व मदत करणार असल्याचे सांगितले. समाजात वावरताना कुठल्याही महिलांनी अन्याय अत्याचार सहन करु नये, त्याविरुध्द कायद्याचा आधार घेऊन आवाज उठवावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. जागतिक महिला दिनानिमित्त विभागीय केंद्र औरंगाबाद व हारुन मुकाती इस्लामिक सेंटर, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महिलांसाठी मार्गदर्शनपर 'नई उडान' या विशेष कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी हारुन मुकाती इस्लामिक सेंटरचे युसूफ मुकाती मेहराज पटेल, सीमा बाजी, राबिया मुकाती, कौसर मुकाती, नाहिद बाजी, मुमताज मेनन, फरहाना बाजी केंद्राचे सुबोध जाधव, गणेश घुले यांची प्रमुख उपस्थिती होती.

यानंतर महिला उद्योजकता या विषयावर सामाजिक कार्यकर्त्या मेहराज पटेल यांनी मार्गदर्शन केले. महिलांनी स्वतः पुढाकार घेऊन, शासनाच्या विविध योजनांची माहिती घेऊन आत्मविश्वासाने उद्योग विश्वात आपला ठसा उमटवण्याची गरज असल्याचे मत पटेल यांनी मांडले. यावेळी महिलांसाठी असणा-या शासनाच्या विविध आर्थिक सहाय्य योजनांची माहिती त्यांनी दिली. उपस्थित महिलांनीदेखील उत्सफूर्तपणे प्रश्न विचारुन आपल्या शंकांचे निरसन केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अक्षरा संस्थेने तयार केलेली जोर से बोल हा लघुपट दाखविण्यात आला.युवतीना होणारी छेडछाड, पुरुषी मानसिकता, समाजाचा स्त्रीयांकडे बघण्याचा दृष्टिकोन आदी विषयांवर या लघुपटात भाष्य करण्यात आले होते. या लघुपटाला उपस्थित युवती-महिलांनी याला भरभरुन दाद दिली. हा लघुपट समाजात वावरताना युवती-महिलांच आत्मविश्वास उंचावण्यास मदत करेल असे मत युसूफ मुकाती यांनी व्यक्त केले. तसेच महिलांनी न घाबरता आत्मनिर्भर होण्यासाठी घराबाहेर पडावे व आयुष्यत स्वतःच्या पायावर उभे रहावे, त्यासाठी हारुन मुकाती इस्लातिक सेंटर कार्यरत असल्याचे सांगितले.

६.१९ **दि. १२ मार्च २०१६ - चित्रपट चावडी** :- विभागीय केंद्र औरंगाबाद व एम.जी.एम. जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभागाच्या वतीने दरमहा राबविण्यात येणा-या चित्रपट चावडी या उपक्रमात या महिन्यात सुप्रसिध्द चित्रपट दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांचा १९७४ साली प्रदर्शित झालेला 'सामना' हा मराठी चित्रपट दाखविण्यात आला. चित्रपटाची कथा विजय तेंडुलकर यांची आहे तर संगीत भास्कर चंदावरकर यांचे आहे. मराठी मनावर अधिराज्य गाजविणा-या सामना या सिनेमाच्या निर्मितीला चाळीस वर्ष पूर्ण झाली आहेत. महाराष्ट्राचे ग्रामीण सामाजिक व राजकीय अंतरंग या सिनेमाने ढवळून निघाले होते. मारुती कांबळेचे नक्की काय झाले? हा प्रश्न समाजमनात आजही विविध ज्वलंत विषयांवरुन जिवंत आहे. महाराष्ट्राच्या चित्रपट परंपरेचा महत्वपूर्ण साक्षीदार असलेला हा सिनेमा आपल्या चाळीशीच्या निमित्ताने चित्रपट चावडीत प्रदर्शित करण्यात आला. चित्रपटात डॉ. श्रीराम लागू, निळू फुले, स्मिता पाटील, मोहन आगाशे यांनी अजरामर भूमिका केल्या आहेत.

६.२० **द. २३ मार्च २०१६ - 'जागार दुष्काळाचा' पदयात्रेत हजारो विद्यार्थ्यांनी दिल्या पाणी बचतीच्या घोषणा, बजाजनगरमध्ये विद्यार्थ्यांनी घेतली पाणी बचतीची शपथ, विभागीय केंद्रानी काढली जागर दुष्काळाचा पदयात्रा** :- विभागीय केंद्र औरंगाबाद यांच्या वतीने बजाजनगर येथे रंगपंचमीत होणा-या पाणी नासाडी विरोधात दि. २३ मार्च २०१६ रोजी सकाळी ८ वा. 'जागर दुष्काळाचा' पदयात्रा काढण्यात आली. पदयात्रेमध्ये सुरुवातीला राम मर्लापल्ले यांनी पाणी बचतीची विद्यार्थ्यांना शपथ दिली. यानंतर प्रदीप माळी यांनी व्यसनमुक्ती याविषयावर मार्गदर्शन केले. यावेळी लाकडाऐवजी गुटखा, सिगारेट, तंबाखूची होळी करण्यात आली. पाणी बचतीचे फलक हाता घेऊन, पाणी बचतीच्या घोषणा देत शरद पवार क्रीडा मंडळ मैदान - वडगाव फाटा - महादेव मंदीर - जयभवानी चौक - नांदरे आबा चौक - लोकमान्य चौक - मोरे चौक अशी पदयात्रा संपन्न झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गणेश घुले यांनी तर आभार श्रीकांत देशपांडे यांनी मांडले. पदयात्रेत परीसरातील विविध शाळेमधील सुमारे दिड हजार विद्यार्थी-विद्यार्थीनी सहभाग नोंदवला.

गेल्या तीन वर्षांपासून सतत कमी पडलेल्या पावसामुळे मराठवाडा भीषण दुष्काळाला तोंड देतो आहे. हजारो गावाना टँकरने पाणी पुरवठा चालू आहे. मराठवाडा ख-या अर्थाने टँकरवाडा झाला आहे. फेब्रुवारीमध्येच जायकवाडी धरणाने मृतसाठा पाणी पातळी गाठली आहे. अजून पुढील तीन ते चार महिने अत्यंत भयावह असणार आहेत. पिण्याच्या पाण्याचा, शेतीचा, जनावरांच्या चा-यांचा प्रश्न गंभीर बनला आहे. यामुळे अनेक कुटूंबे शहरांकडे स्थलांतरीत होत आहेत. गावे ओस पडत असल्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यातच सरकारकडून मिळणारी मदत खूप तुटपुंजी असल्यामुळे निराशाजनक परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर रंगपंचमीला पाण्याची नासाडी करु नये. पाण्याचा काटकसरीने वापर करावा याविषयीच्या जनजागृतीसाठी सदर पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

## १०.७. विभागीय केंद्र लातूर :-

७.१ **महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार व आजचे शिक्षण :-** दि. ११ एप्रिल २०१५ रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त वरील विषयावर विभागीय केंद्राच्या वतीने परिसंवाद घेण्यात आला. या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. एस.टी. गायकवाड, प्रा. एन. एस. कुलकुर्णी, महात्मा फुले यांचे अभ्यासक श्री. गोपाळराव कदम इत्यादीनी वरील परिसंवादात आपले सविस्तर विचार मांडले. या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेत विभागीय केंद्राचे सचिव श्री. हरिभाऊ जवळगे यांनी आता विभागीय केंद्रामार्फत १ एप्रिल २०१५ ते ३१ मार्च २०१६ पर्यंत विभागीय केंद्रामार्फत उस्मानाबाद, लातूर, नांदेड, हिंगोली या केंद्रांतर्गत येणा-या जिल्हयात कोणकोणते कार्यक्रम राबविले जाणार आहेत याची सविस्तर माहिती सभागृहाला देवून सर्व जिल्हयातून आमच्या विभागीय केंद्राला यशवंतप्रेमी श्रोतागणाकडून प्रतिसाद मिळत असल्याबद्दल समाधान व्यकत करुन या बांधवाना धन्यवाद दिले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विवेक सौताडेकर यांनी केले. सर्वांचे अभार श्री. अरविंद कांबळे यांनी मानले.

७.२ **विभागीय केंद्र लातूरच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन :-** विभागीय केंद्र लातूरच्या वतीने त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे, सचिव श्री. हरिभाऊ जवळगे व इतर पदाधिकारी सदस्य मोठया संख्येने उपस्थित होते.

७.३ **शेतक-यांनी आधुनिक पध्दतीने शेती व्यवसाय करावा - दि. १४ एप्रिल, २०१५ :-** शेती हा आतबटयाचा व्यवहार आहे. कुणीही शेती व्यवसायात श्रीमंत झाला नाही हे सर्व विचार नकारार्थी मनाचे लक्षण आहे, आधुनिक पध्दतीने शेती केल्यास शेतकरी आणि देश स्वावलंबी होईल. फळबाग मोठया प्रमाणात निर्माण व्हाव्यात, त्याची लागवड केल्यास पैसाही मिळेल व जमिनीची सुपीकता टिकून राहील असे उद्‌गार शेतीतज्ञ डॉ. शिवजी शिंदे यांनी काढले. विभागीय केंद्र लातूरच्या वतीने नांदेड जवळील वाडी (बु.) येथे शेतीविषयक कार्यक्रम आयोजित केला होता.

७.४ **महाराष्ट्र राज्य प्रगतीपथावर नेण्यासाठी तनमन धनाने समर्पणाची आवश्यकता - दिनांक १ मे २०१५ :-** विभागीय केंद्र लातूरच्या वतीने शास्त्री सभागृहात महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. प्रमुख वक्ते सुप्रसिध्द साहित्यिक प्रा. डॉ. जगदीश कदम हे होते. त्यांनी महाराष्ट्राच्या प्रगतीत मा. यशवंतराव चव्हाण यांच्या योगदानाचे महत्व विशद केले. आपल्याकडील समर्पण भावना महाराष्ट्र प्रगतीपथावर नेईल असे त्यांनी आपल्या भाषणात विशद केले. अध्यक्षस्थानी श्री. मोहनराव पाटील हे होते.

७.५ **साने गुरुजी यांचा स्मृतिदिन :-** दि. ११ जून २०१५ रोजी शिवाजी महाविद्यालय हिंगोली येथे परमपुज्य साने गुरुजी यांचा स्मृतीदिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे हिंगोली जिल्हयातील ज्येष्ठ संचालक

प्राचार्य श्री. गोपाळराव सोंडगे हे होते. या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते प्रा. एस. जी. जोशी, प्रा. के. वाय. कुलकर्णी होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. जी. एस. कदम यांनी केले. शेवटी सर्वांचे आभार श्री. केशवराव भोसले यांनी मानले.

७.६ **अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा मुलभूत हक्क :-** दि. २१ जून २०१५ सध्या आपल्याकडे अस्वस्थ करणा-या घटना घडत आहेत. नरेंद्र दाभोळकर, कॉ. गोविंद पानसरे यांच्या हस्ते अभिव्यक्ती स्वातंत्र्य प्रभावित झाले आहे. तो आपला मुलभूत हक्क आहे, त्यासाठी साहित्यकांनी समाजाचे नेतृत्व स्वीकारावे व चळवळ उभी करावी असे उद्‌गार डॉ. केशव पाटील यांनी येथे कार्यक्रमात काढले. विभागीय केंद्र लातूरच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. अध्यक्षस्थानी प्रकाशक श्री. निर्मल कुमार सूर्यवंशी हे होते.  आभार डॉ. विकास भोसले यांनी मांडले.

७.७ **मराठवाडयाला हक्काचे पाणी मिळावे यासाठी पायथा ते माथा धोरण उपयुक्त :-** दि. १४ जुलै २०१५ - विभागीय केंद्र लातूरच्या वतीने शंकरराव चव्हाण महाविद्यालय, अर्धापूर, जिल्हा नांदेड येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रमुख वक्ते प्रा. उत्तम सूर्यवंशी तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. रावसाहेब जाधव हे होते. प्रा. सुर्यवंशी म्हणाले, मराठवाडा भारताच्या नकाशावर आणला, आज मराठवाडयाला हक्काचे पाणी मिळत नाही. पायथा ते माथा हे धोरण शासनाने स्वीकारले तर जायकवाडीत हक्काचे पाणी येऊ शकेल. आभार डॉ. हनुमंत भोसले यांनी मानले.

७.८ **राजर्षी शाहू महाराज जयंती :-** जगाच्या इतिहासात दीनदुःखी केवळ तळागाळातील लोकांसाठी आपले आयुष्य खर्च करणा-या जागतिक किर्तीच्या राजापैकी राजर्षी शाहू महाराज यांचे नाव प्रामुख्याने सर्व जनतेचे ओठावर येते. कारण राजर्षी शाहू महाराज यांनी दीनदुःखी दलितांचे अश्रु पुसण्यासाठी आपले आयुष्य वेचले असे मौलिक विचार विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. जे. एम. वाघमारे यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त अध्यक्षस्थानी असताना काढले. प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिध्द शेतीतज्ञ श्री. डी. एन. शेळके दादा, श्री. माधवराव पाटील, श्री. अरविंदजी कांबळे इ. मान्यवर मंडळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय केंद्राचे सचिव श्री. हरिभाऊ जवळगे यांनी केले तर सर्वांचे आभार ॲड. मनोहरराव गोमारे यांनी मानले.

७.९ **क्रांतीदिन :-** ९ ऑगस्ट २०१५ रोजी उस्मानाबाद येथे विभागीय केंद्र लातूरच्या वतीने क्रांतीदिनाबद्दल चर्चेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे संचालक प्रा. रमेशराव दापके हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय केंद्राचे सचिव श्री. हरिभाऊ जवळगे होते. याप्रसंगी प्राचार्य रझवी, बी. एस. साळुंके यांनी आपले यथोचित विचार मांडले. शेवटी सर्वांचे आभार प्रा. बी. एस. पळसकर यांनी मानले.

७.१० **स्वातंत्र्य दिन :-** भारताचा स्वातंत्र्यदिन विभागीय केंद्र लातूरच्या वतीने शास्त्री सभागृहात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी श्री. रणजित जाधव हे होते. आभार प्रदर्शन श्रीमती मुक्ता शिंदे यांनी केले.

७.११ **५ सप्टेंबर २०१५ - शिक्षण दिन :-** विभागीय केंद्र लातूरच्या वतीने हिंगोली जिल्हयाचे विभागीय केंद्राचे सदस्य प्राचार्य डॉ. गोपाळराव सोंडगे यांच्या अध्यक्षतेखाली शिवाजी महाविद्यालय, हिंगोली येथे शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त प्रा. उत्तम सूर्यवंशी व विभागीय केंद्राचे सचिव श्री. हरिभाऊ जवळगे उपस्थित होते. याप्रसंगी हिंगोली जिल्हयातील काही आदर्श शिक्षक शिक्षिका, अध्यापक अध्यापिका यांचा विभागीय केंद्राच्या वतीने सत्कार करण्यात आला.

७.१२ **दि. १७ सप्टेंबर २०१५ मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन :-** लातूर विभागीय केंद्राच्या वतीने सालाबादप्रमाणे मराठवाडयाला मुक्ती मिळावी म्हणून ज्या थोर स्वातंत्र्यसैनिकांनी आपले बलिदान पत्कारले अशा थोर स्वातंत्र्य सैनिकांच्या

स्मृतीप्रित्यर्थ निलंगा येथे दि. १७ सप्टेंबर २०१५ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे विश्वस्त माजी मुख्यमंत्री डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा येथे स्वातंत्र्यसैनिकांचा सत्कार आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे व सचिव श्री. हरिभाऊ जवळगे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाराष्ट्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एन. एरंडे यांनी केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर म्हणाले की, मी स्वतः मराठवाडा मुक्तीसंग्रामातील सैनिक असून माझ्या शालेय जीवनात मी या लढयात उडी घेतली. हे मिळालेले यश आपल्या सर्वांचे आहे तेव्हा या देशाची जोपासना माणूसकीने होणे गरजेचे आहे. या कार्यक्रमात अनेक मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. सर्वांचे आभार विभागीय केंद्राचे सचिव श्री. हरिभाऊ जवळगे यांनी मानले.

७.१३ **दि. २ ऑक्टोबर २०१५ - महात्मा गांधी जयंती** :- राष्ट्रपिता महात्मा गांधी व निश्पृह जीवन जगलेले या देशाचे माजी पंतप्रधान लालबहाूर शास्त्री यांना अभिवादन करण्यात आले.

७.१४ **दि. ४ ऑक्टोबर २०१५ बैठक** :- पुरोगामी विचारवंत व अस्वस्थ समाज या विषयावर व्यापक विचार मंथन व जनजागरण या घ्यावयाच्या कार्यक्रमाच्या संदर्भात दि. ४ ऑक्टोबर २०१५ रोजी विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीत वरील विषयाची चर्चा करुन वरील विषयाचा परिसंवाद व त्या परिसंवादात डॉ. सूर्यनारायण रणसुभे, ॲड. मनोहरराव गोमारे, डॉ. नागोराव कुंभार, ॲड. प्रभाकर येरोळकर, प्रा. फ. म. शहाजिंदे या मान्यवरांचा सहभाग घ्यावयाचे ठरले. ही आगाऊ बातमी सर्व वृत्तपत्राला देण्याचे ठरवण्यात आले. तसच हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वेगवेगळया समित्या स्थापन करण्यात आल्या व कामची विभागणी सोपविण्यात आली.

७.१५ **दि. ८ ऑक्टोबर २०१५ - ज्येष्ठ नागरिक आनंद मेळावा** :- उस्मानाबाद येथे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे कार्यकारिणी सदस्य मा. श्री. जीवनराव गोरे यांच्या अध्यक्षतेखाली लातूर विभागीय केंद्राचा ज्येष्ठ नागरिक आनंद मेळावा साजरा करण्यात आला. या सोहळयाचे प्रमुख वक्ते विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे हे होते तर प्रमुख पाहुणे मा. नानासाहेब पाटील, माजी नगराध्यक्ष उस्मानाबाद व मा. वसंतराव नागदे होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय केंद्राचे सचिव श्री. हरिभाऊ जवळगे यांनी केले तर सर्वांचे आभार विभागीय केंद्राचे उस्मानाबाद प्रमुख रमेश दापके यांनी मानले. याप्रसंगी लातूर विभागीय केंद्रातर्फे ज्येष्ठ बंधू भगिनींचा सत्कार करण्यात आला.

७.१६ **दि. २१ ऑक्टोबर २०१५ - अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच ही धोक्याची पूर्वसूचना** :- जो विचार समाजाला पुढे नेण्याचा प्रयत्न करतो आणि माणूस केंद्रबिंदू मानतो तोच विचार पुरोगामी असतो. अशा विचाराला जर संपविण्याचा प्रयत्न होणार असेल तर ते पर्यायाने देशाच्या आणि समाजाच्या ऐक्याच्या दृष्टीकोनातून धोक्याचे आहे असे प्रतिपादन माजी खासदार तथा माजी कुलगुरु डॉ. जनार्दन वाघमारे यांनी केले. विभागीय केंद्र लातूरच्या वतीने आयोजित व्यापक विचारमंथन आणि जनजागरण कार्यक्रमात ते बोलत होते.

याप्रसंगी विचारपीठावर डॉ. सुर्यनारायण रणसुभे, प्रा. फ. म. शहाजिंदे, ॲड. प्रभाकर येरोळकर, प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, ॲड. मनोहरराव गोमारे, सचिव श्री. हरिभाऊ जवळगे हे उपस्थित होते. यावेळी ॲड. श्री. प्रभाकर येरोळकर म्हणाले की, आता डावे उजवे असा भेद उरलेला नाही. किंबहुना विचारधारांचा संघर्षच मिटलेला असल्याने दोन्ही बाजूकडील कट्टरपंथी डोके वर काढीत आहेत. निवडणूक सुधारणा आणि न्यायिक सुधारणा या कठोरपणे अंमलात आणून व्यवस्था परिवर्तन केले तरच अशा प्रकारांना भविष्यात आळा बसू शकेल. डॉ. नागोराव कुंभार यांनी पुरोगामी आणि प्रतिगामी यातील फरक स्पष्ट करुन विचारवंताची व्याख्या आपल्या भाषणातून समजावून दिली. प्रा. शहाजिंदे यांनी धर्मनिरपेक्षतेवर बोलताना कापरे भरावे

इतकी परिस्थिती भयावह असल्याचे प्रतिपादन केले तर डॉ. सुर्यनारायण रणसुभे यांनी मागील अनेक दशकातील खानपान संस्कृती व इतर उदाहरणे देवून अभ्यासपूर्ण पट श्रोत्यांपुढे ठेवला. ॲड. मनोहरराव गोमारे यांनी दिवसाढवळया पानसरे, दाभोळकर, कलबुर्गी यासारख्या विचारवंतांचे खून पडत असताना समाज पेटून का उठत नाही यावर प्रश्नचिन्ह उभे केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय केंद्राचे सचिव श्री. हरिभाऊ जवळगे यांनी केले तर सुत्रसंचालन विवेक सौताडेकर व आभारप्रदर्शन प्राचार्य एन. एम. मोटे यांनी केले. या विचारमंथनास मोठया संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

७.१७ **दि. २२ ऑक्टोबर २०१५ - मा. यशवंतराव चव्हाण पुण्यतिथी कार्यक्रम पूर्वतयारी बैठक** - नांदेड येथे घ्यावयाच्या कार्यक्रमाची पूर्वतयारी व दि. ३० नोव्हेंबर २०१५ रोजी लातूर येथे दि. २५ नोव्हेंबर २०१५ चव्हाण साहेबांची पुण्यतिथी, दि. २६ नोव्हेंबर संविधान दिन, दि. २८ नोव्हेंबर महात्मा फुले यांचा स्मृतिदिन यानिमित्ताने घ्यावयाच्या कार्यक्रासंदर्भात डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात येवून या बैठकीत वरील कार्यक्रमाची सविस्तर चर्चा होवून या दोन्ही कार्यक्रमाच्या वृत्तपत्राला बातम्या देवून प्रसार करुन लातूर व नांदेड शहरात लावायचे बॅनर, वाटप करावयाच्या पत्रिका या सर्व बाबींवर चर्चा करण्यात आली.

७.१८ **दि. २५ ऑक्टोबर २०१५ - समकालीन युवकांच्या समस्या संवाद** - विभागीय केंद्र लातूर व पिपल्स कॉलेज नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने समकालीन युवकांच्या समस्या या विषयावर विभागीय केंद्राचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे यांनी युवकांशी संवाद साधला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून लातूर विभागीय केंद्राचे सदस्य डॉ. व्ही. एन. इंगोले उपस्थित होते. प्रास्ताविक लातूर विभागीय केंद्राचे सचिव श्री. हरिभाऊ जवळगे यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. अमोल काळे यांनी केले. शेवटी सर्वांचे आभार प्रा. डॉ. सिध्दार्थ सिध्देवाड यांनी मानले.

७.१९ **दि. ४ नोव्हेंबर २०१५ - मराठी राजभाषा दिन** - हिंगोली येथे मराठी राजभाषा दिनानिमित्त मराठी भाषेचा उदय आणि विषय या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष लातूर विभागीय केंद्राचे सदस्य प्राचार्य डॉ. गोपाळराव सोंडगे होते तर कार्यक्रमाचे वक्ते प्रा. बालाजी पोतूलवार हे होते. त्याप्रसंगी प्रा. डॉ. बाजीराव वडवळे उपस्थित होते.

७.२० **दि. ८ नोव्हेंबर २०१५ - बैठक** - दि. २५ नोव्हेंबर २०१५ या दिवशी मा. यशवंतराव चव्हाण यांच्या ३१ व्या स्मृतिदिनानिमित्त घ्यावयाच्या कार्यक्रमाच्या संदर्भात व दि. २८ डिसेंबर २०१५ रोजी नांदेड येथे प्रतिष्ठानचे अध्यक्ष माजी कृषिमंत्री मा. खा. शरदराव पवार साहेब यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त घ्यावयाच्या कार्यक्रमांची चर्चा डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात येवून याप्रसंगी कार्यक्रमाचे स्वरुप, विषय ठरवून पुढील तारखाना कार्यक्रम घेण्याचे ठरले. बुधवार दि. २५ नोव्हेंबर २०१५ मा. यशवंतराव चव्हाण यांचा स्मृतिदिन, गुरुवार दि. २६ नोव्हेंबर २०१५ भारतीय सविधान दिन, शनिवार दि. २८ नोव्हेंबर २०१५ महात्मा ज्योतिबा फुले यांचा स्मृतिदिन या अनुषंगाने दि. ३० नोव्हेंबर रोजी घ्यावयाच्या कार्यक्रमाची रुपरेषा व विषय याबद्दल सविस्तर चर्चा करुन ही बातमी वृत्तपत्रात देण्याचे ठरले.

७.२१ **दि. १४ नोव्हेंबर २०१५ - पंडित जवाहरलाल नेहरु जयंती** : भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या जयंतीनिमित्त जवाहरलाल नेहरु व बालक दिन या विषयावर प्रा. एस. टी. कुलकर्णी यांचे यशवंत नगर येथे बालवाडीमध्ये विभागीय केंद्राच्या वतीने बालगीते घेण्यात आली.

७.२२ **दि. २५ नोव्हेंबर २०१५ - मा. यशवंतराव चव्हाण पुण्यतिथी कार्यक्रम** : यशवंतराव चव्हाण यांच्या ३१ व्या स्मृतिदिनानिमित्त लातूर महानगरपालिकेच्या समोरील मा. यशवंतराव चव्हाण यांच्या पुर्णाकृती पुतळयाला अभिवादन करण्यात

आले. याप्रसंगी विभागीय केंद्राचे अध्यक्ष जनार्दन वाघमारे, सचिव श्री. हरिभाऊ जवळगे, ज्येष्ठ संचालक मनोहरराव गोमारे, लक्ष्मीरमण लाहोटी इ. मान्यवर उपस्थित होते.

